# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

# राज्यशास्त्र

**ऐच्छिक पेपर १ व २**

**बी. ए. भाग–१**

**सेमिस्टर १ व २ करिता**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम

शैक्षणिक वर्ष २०२२–२३ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१९
**द्वितीय आवृत्ती :** २०२१
सुधारित आवृत्ती : २०२२
बी. ए. (राज्यशास्त्र) भाग–१ पेपर १ व २ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर – ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर – ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-18-2

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर–४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र**

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

■ **राज्यशास्त्र अभ्यासमंडळ समन्वयक** ■

**डॉ. प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात आणण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

बी. ए. भाग १ च्या राज्यशास्त्र विषयाच्या ऐच्छिक पेपर क्रमांक १ व २, सत्र १ व २ साठी असलेले 'राज्यशास्त्र' हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या माजी अध्यक्षा व माजी मानव्यविद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, राज्यशास्त्र विभागप्रमुख व राज्यशास्त्र अभ्यासमंडळाचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार, राज्यशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. रविंद्र भणगे, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक व केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांच्या सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**डॉ. शिवाजी सुबराव पाटील**

छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **सत्र-१ पेपर-१ : राज्यशास्त्र परिचय** | |
| **प्रा. डॉ. आप्पासाहेब शामराव शेळके**<br>मा. श्री. आण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हातकणंगले, जि. कोल्हापूर | १ |
| **प्रा. डॉ. दत्तात्रय सौदागर सावंत**<br>बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा | २ |
| **प्रा. डॉ. एच. एस. कुचेकर**<br>तुकाराम कृष्णाजी कोलेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय, नेसरी, ता. कालग, जि. कोल्हापूर | ३ |
| **प्रा. आर. एस. कांबळे**<br>विश्वासराव नाईक कला, वाणिज्य आणि बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, शिराळा, ता. शिराळा, जि. सांगली | ४ |
| **सत्र-२ पेपर-२ : भारतीय राज्यघटना** | |
| **प्रा. मोहन गणपती हजारे**<br>श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी, जि. सांगली | १ |
| **प्रा. आर. जी. मोंगले**<br>राजा शिवछत्रपती कला, वाणिज्य महाविद्यालय, महागांव | २ |
| **डॉ. अर्जुन गंगाराम येरगे**<br>श्री. संपतराव माने महाविद्यालय, खानापूर | ३ |
| **प्रा. डॉ. दत्तात्रय सौदागर सावंत**<br>बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा<br>**डॉ. प्रदिप महादेव जगताप**<br>लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. शिवाजी सुबराव पाटील**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **पेपर–१ : सेमिस्टर–१** | |
| | **राज्यशास्त्र परिचय** | |
| १. | राज्यशास्त्र परिचय | १ |
| २. | राज्यशास्त्राच्या उपविद्याशाखांचा परिचय | १० |
| ३. | राज्य आणि लोकशाही | ३२ |
| ४. | राज्यशास्त्रातील प्रमुख संकल्पना | ६२ |
| | **पेपर–२ : सेमिस्टर–२** | |
| | **भारतीय राज्यघटना** | |
| १. | भारतीय राज्यघटनेची निर्मिती प्रक्रिया | ८५ |
| २. | भारतीय संविधान : तात्त्विक अधिष्ठान | ११५ |
| ३. | भारताचे कायदे मंडळ व कार्यकारी मंडळ | १४५ |
| ४. | न्यायमंडळ | १७१ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. विद्यार्थ्यांकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२२-२३ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १

# राज्यशास्त्र परिचय

## ( Introduction to Political Science )


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

 १.२.१ राज्यशास्त्राचा अर्थ

 १.२.२ राज्यशास्त्राचे स्वरूप

 १.२.३ राज्यशास्त्राची व्याप्ती

 १.२.४ राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व

१.३ सारांश

१.४ स्वयं अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

१.५ सरावासाठी स्वाध्याय

१.६ संदर्भ ग्रंथ / पुस्तके

१.७ पारिभाषिक शब्द


### १.० उद्दिष्टे

या प्रकरणाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील माहिती मिळेल.

१. राज्यशास्त्र म्हणजे काय ते समजून घेता येईल.

२. राज्यशास्त्राचे पारंपरिक व आधुनिक स्वरूप स्पष्ट करता येईल.

३. राज्यशास्त्राची व्याप्ती किती मोठी आहे हे लक्षात येईल.

४. राज्यशास्त्र आणि राजकारण या मधील फरक स्पष्ट करता येईल.

५. राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट करता येईल.

## १.१ प्रस्तावना

राज्यशास्त्र हे इतर साामाजिक शास्त्राप्रमाणे सामाजिक शास्त्र आहे. हत्तीच्या पावलात जसे सर्व पक्षांची पावले सामावली जातात तसे सर्व सामाजिक शास्त्राचा समावेश राज्यशास्त्रात होतो. पुढे मानवी जीवनांच्या अनक गरजा वाढल्या. या गरजांची पूर्तता करण्यासाठी विविध अभ्यास शाखांचा विकास व उदय झाला. राज्यशास्त्रापासून अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, तत्वज्ञान इत्यादी विषयाचे अध्ययन होऊ लागले. राज्यशास्त्राचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास प्लेटो, ॲरिस्टॉटल इ. ग्रीक-विचारवंतानी केला तर भारतामध्ये कौटिल्याने आपला अर्थशास्त्र ग्रंथ लिहून राज्यशास्त्रविषयक विचार मांडले आहेत. महाभारताच्या शांतीपर्वामध्ये राज्यसंस्थेबाबत विचार मांडले आहेत. याचाच अर्थ असा आहे की, राज्यशास्त्राचा उदय हजारो वर्षांपूर्वी झाला आहे.

समाजात राहिल्यामुळे मानवाचा सर्वांगीण विकास होत आहे. समाजजीवन जगतानाच मनुष्य सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय इत्यादी अनेक प्रकारच्या कृती करतो. ॲरिस्टॉटलने मानव हा समाजशील प्राणी आहे असे त्यांच्या ''द पॉलिटिक्स'' या ग्रंथात म्हटले आहे. ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्राला शास्त्राचा दर्जा प्राप्त करून दिला म्हणून त्यांना राज्यशास्त्राचे जनक असे म्हणतात.

भारतात राज्यशास्त्र विषय विद्यापीठातून व महाविद्यालयातून शिकवण्याची सुरुवात १९३८ सालापासून झाली.

## १.२ विषय विवेचन

या प्रकरणामध्ये पुढील घटकांचा विचार आपण करणार आहोत राज्यशास्त्राच्या व्याख्या, राज्यशास्त्राचे पारंपारिक व आधुनिक स्वरूप, राज्यशास्त्राची व्याप्ती, राज्यशास्त्र आणि राजकारण यातील फरक राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व इत्यादी बाबत विवेचन करणार आहोत.

### १.२.१ राज्यशास्त्राचा अर्थ

पुढील विचारवंतानी राज्यशास्त्राच्या व्याख्या केलेल्या आहेत.

१. **ग्रेरिस** : ''राज्याची शक्ती, राज्याचे संबंध, राज्याची उत्पत्ती, राज्याचे स्वरूप, राज्यांचा उद्देश, राज्याचे नैतिक महत्त्व , राज्याच्या आर्थिक समस्या आणि राज्याचे अस्तित्व इत्यादींचा विचार करणारे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय.''

२. **गार्नर** : ''ज्या शास्त्रात राज्याचा प्रारंभ व शेवट राज्याच्या अभ्यासातच होतो त्यास राज्यशास्त्र असे म्हणतात.''

३. **आर. जी. गेटेल** : ''ज्या शास्त्राद्वारे भूतकालीन राज्य कसे होते, वर्तमानकालीन राज्य कसे आहे व भविष्यकालीन राज्य कसे असावे इत्यादींची आपणास माहिती मिळते त्यास राज्यशास्त्र असे म्हणतात.''

४. **सीली** : ''ज्याप्रमाणे अर्थशास्त्रात संपत्तीचा, प्राणीशास्त्रामध्ये जीविताचा, बीजगणितात अंकाचा व भूमितीमध्ये स्थल व उंचीचा विचार करतात त्याचप्रमाणे ज्या शास्त्रामध्ये शासनाच्या तत्त्वांचे संशोधन केले जाते त्यास राज्यशास्त्र असे म्हणतात.''

५. **पेनॉक आणि स्मिथ** : ''शासनसंस्था आणि राजकीय प्रक्रिया यांचे स्वरूप काय आहे ते कसे असावे आणि त्यांच्यात एकरूपता कशी साधता येईल या उद्देशाने सुव्यवस्थितपणे केलेला अभ्यास म्हणजे राज्यशास्त्र होय.

६. **पॉल जेनेट** : ''राज्यशास्त्र हे समाजशास्त्राचे असे अंग आहे की ज्यामध्ये राज्याचे अधिष्ठान व शासनसंस्थेची मूलतत्त्वे यांचा विचार होतो.''

७. **रॉबर्ट डाल** : ''राज्यासबंधी, राजकीय व्यवस्था आणि मानवी संबंधाचा आकृतिबंध की ज्यामध्ये सत्ता, अधिकार आणि प्रभाव याबाबत विचार मांडणारे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय.''

### १.२.२ राज्यशास्त्राचे स्वरूप

राज्यशास्त्राचे स्वरूप विचार करताना राजकीय तत्त्वज्ञान, राजकारण आणि या राज्यशास्त्र या संकल्पनांचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. राजकीय तत्त्वज्ञानामध्ये राजकीय विचार, राजकीय अनुभव, गृहीत प्रमाण, मते माहिती व सामाजीकरण यांचा एकत्रित विचार केला जातो. प्रो. डनिंगने राजकीय तत्त्वज्ञान (Political Philosophy) हा शब्द History of Political Theories या ग्रंथात वापरला आहे. याशिवाय सेबाईन व मॅन्सी आणि कोकर यांनी तत्त्वज्ञान हा शब्द वापरला आहे. राजकीय तत्त्वज्ञान, राजकीय विचार, तात्त्विक आणि वैचारिक पद्धतीने मांडले जातात. प्लेटो, ॲरिस्टॉटल, सिसोरो, व्यास, कौटिल्य या विचारवंतानी जे विचार मांडले त्यास राजकीय तत्त्वज्ञान असे म्हणतात. राज्य म्हणजे काय, त्याची आज्ञा का पाळावी, शासन म्हणजे काय, व्यक्ती आणि राज्य यांचे संबंध कसे असावेत इत्यादीबाबत विचार वरील विचारवंतानी तात्त्विक दृष्टिकोनातून केला. राज्याच्या मुलभूत प्रश्नासंबंधी त्यांची उत्तरे अंतिम किंवा परिपूर्ण नसली तरी त्यातून राजकीय तत्त्वज्ञान उदयास आले. राजकीय सिद्धांत आणि राजकीय तत्त्वज्ञान यामध्ये फरक करणे कठीण आहे.

पॉलिटिक्स (Politics) हा शब्द सर्वप्रथम ग्रीक विचारवंत ॲरिस्टॉटल यांनी वापरला. त्यांनी आपल्या ग्रंथाचे नावच पॉलिटिक्स असे ठेवले. Politics हा शब्द ग्रीक शब्द 'Polis' म्हणजे 'नगर राज्य' या शब्दापासून तयार झाला आहे. राजकारण म्हणजे राज्यविषयक विवेचन करणारे शास्त्र होय. आपल्या देशातील पॉलिटिक्स कसे काय आहे ? असा प्रश्न सामान्यपणे विचारला जातो. येथे पॉलिटिक्स याचा अर्थ प्रचलित राजकारण असा असतो.

आधुनिक राज्यशास्त्रज्ञानी राजकारण या शब्दाऐवजी राज्यशास्त्र हा शब्द वापरला आहे. फ्रेडरिक पोलॉक याने सैद्धांतिक राज्यशास्त्र आणि व्यावहारिक राज्यशास्त्र असे दोन भाग पाडलेले आहेत. त्यांच्या मते, सैद्धांतिक राज्यशास्त्रामध्ये राज्याची उत्पत्ती, शासनसंस्थेचे सिद्धांत, लोकशाही, स्वातंत्र्य, सत्तेचे विभाजन, आंतरराष्ट्रीय संकल्प इत्यादींचा अभ्यास केला जातो. व्यावहारिक राज्यशास्त्रामध्ये राज्य व शासनाचे आधुनिक स्वरूप,

त्यांची प्रत्यक्ष कार्ये, राष्ट्रा-राष्ट्रांतील संबंध करारनामे, कूटनिती आणि राजकारण यांचा समावेश होतो. राज्यशास्त्राचे स्वरूप समजून घेताना पुढील तीन कालखंडांचा विचार करावा लागतो.

१. इ.स. १८५० पूर्वीचे पारंपरिक राज्यशास्त्र

२. इ.स. १८५० ते १९५० - संक्रमण काळातील राज्यशास्त्र

३. इ.स. १९५० नंतर आधुनिक राज्यशास्त्र

### १.२.२.१ राज्यशास्त्राचे पारंपारिक स्वरूप

राज्यशास्त्राच्या अभ्यासाला इ.स.पू. चौथ्या शतकापासून सुरुवात झाली. राज्यशास्त्र हा शब्द चार अर्थांनी वापरला जातो.

(अ) राज्याविषयीचे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय. ग्रीक विचारवंत प्लेटो, ॲरिस्टॉटल यांनी आपल्या 'द रिपब्लिक आणि पॉलिटिक्स' या ग्रंथात राज्यविषयक विचार मांडून राज्यशास्त्राला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. प्रो. गार्नर यांनी आपल्या ग्रंथाला Political Science and Government हे नाव वरील अर्थाने दिले आहे.

(ब) राज्यशास्त्राचा दुसरा अर्थ राज्य आणि शासनसंस्था यासंबंधी विचार करणारे शास्त्र असा होतो. राज्यशास्त्राची तोंडओळख (Introduction to Political Science) या ग्रंथात राज्य आणि शासनसंस्थांचा विचार करणारे शास्त्र या अर्थाने राज्यशास्त्र हा शब्दप्रयोग केला आहे.

(क) राज्यशास्त्र सामाजिकशास्त्र आहे. राज्यशास्त्रात राज्यशास्त्र आणि राजनीतिशास्त्र, सरकार आणि लोकप्रशासन, आंतरराष्ट्रीय कायदा, आंतरराष्ट्रीय राजकारण आणि आंतरराष्ट्रीय संघटन यांचा अभ्यास केला जातो.

(ड) सामाजिक जीवनामध्ये घडणाऱ्या विविध घटनांचा अर्थ लावणारे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय. उदा. राजकीय व्यवस्था आणि राजकीय पद्धत, सत्ता इत्यादी.

**राज्यशास्त्राचे स्वरूप**

राज्यशास्त्राचे स्वरूप पुढीलप्रमाणे :

**१. नैतिक मूल्यांचा प्रभाव** : पारंपारिक राज्यशास्त्रात नैतिक मूल्ये, विचार व संस्कार व मानवतावादी धर्मग्रंथांचा प्रभाव दिसून येतो. सत्य-असत्य, पाप-पुण्य, नीति-अनिती, चांगले-वाईट इत्यादी बाबीवर अधिक भर देऊन चांगल्या बाबींचा स्वीकार हे पारंपारिक राज्यशास्त्रात दिसून येते.

**२. आदर्शवाद** : पारंपारिक राज्यशास्त्रात आदर्श मूल्यांना महत्त्व दिल्यामुळे अनेक निष्कर्ष अपुरे आहेत. शास्त्रीय पद्धतीला महत्त्व न देता मांडलेले सिद्धांत पुढे निरुपयोगी ठरले आहेत.

**३. वर्णनात्मक पद्धतीचा वापर** : पारंपारिक राज्यशास्त्रात वर्णनात्मक पद्धतीचा वापर अधिक प्रमाणात केला आहे. शास्त्रीय चिकित्सा, विश्लेषण करण्याऐवजी काल्पनिकता, अलंकारिक भाषा यांना महत्त्व दिले आहे.

**४. शास्त्रीय पद्धतीचा अवलंब** : पारंपारिक राज्यशास्त्रात शास्त्रीय पद्धतीचा वापर न करता विश्लेषण केले जात होते. तंत्रज्ञानाचा आधार, वस्तुनिष्ठता, गणिताचा वापर न करता सिद्धांत मांडले जातात.

**५. मर्यादा** : पारंपारिक राज्यशास्त्राचा अभ्यास, राज्याचा उदय, राज्याची कार्ये, राज्याची कामे, शासनपद्धती, राजकीय पक्ष, लोकमत इत्यादीबाबत केला जातो.

**६. तर्कशास्त्राला महत्त्व** : पारंपारिक राज्यशास्त्राने तर्काच्या आधारावर राजकीय क्रिया-प्रक्रियाचे विश्लेषण केले आहे. वास्तवाला व निरीक्षणाला फारसा वाव दिला नाही.

### १.२.२.२ आधुनिक राज्यशास्त्र

सन १८५० ते १९५० हा राज्यशास्त्राचा संक्रमण कालखंड मानला जातो. या काळात अनेक विचारवंतानी आपले विचार मांडले. राज्यशास्त्राचा अभ्यास इतर सामाजिक शास्त्राच्या दृष्टिकोणातून करण्यात येऊ लागला. ऑगस्त कॉम्त यांनी सामाजिक आणि राजकीय व्यवहारातून राज्यशास्त्राचा अभ्यास केला व सिद्धांत मांडले. कार्ल मार्क्स, लास्की, टॉलकॉट पार्सन्स, स्पेन्सर इत्यादी विचारवंतानी राज्यशास्त्राच्या सिद्धांतात भर घातली.

१९५० नंतर राज्यशास्त्राला वैज्ञानिक व आधुनिक स्वरूप प्राप्त झाले. रॉबर्ट डाल, डेव्हीड ईस्टन, ग्रॅबियल आल्मंड, डेव्हीड ॲपर, ल्युसियन पाय इत्यादी विचारवंतानी राज्यशास्त्राचा अभ्यास आधुनिक पद्धतीने सुरू केला. संशोधनाच्या पद्धतीचा वापर करून वास्तववादी व अनुभवजन्य निष्कर्ष राज्यशास्त्रात मांडले जाऊ लागले. आधुनिक राज्यशास्त्राचा उदय पुढील कारणामुळे झाला.

**१. राज्यशास्त्राच्या व्याख्या - स्वरूपाबाबत मतमतांतरे** : राज्यशास्त्रज्ञामध्ये राज्यशास्त्राची व्याख्या, स्वरूप व व्याप्तीबाबत मतमतांतरे आहेत. उदा. लोकशाही, राष्ट्रवाद, राजकीय तत्त्वज्ञान, सर्वत्र सारख्याच प्रमाणात मान्य झालेली नाही.

**२. विचारसरणीला महत्त्व** : २० व्या शतकात रशिया, पोलंड, चीन, इत्यादी देशात कार्ल मार्क्सच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसतो. तेथे साम्यवादी शासनपद्धतीचा उदय झाला. लोकशाही राजकीय व्यवस्था आणि साम्यवादी शासनव्यवस्था अभ्यासामुळे विचारसरणीला महत्त्व प्राप्त झाले.

**३. आंतरराष्ट्रीय राजकारण** : आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्ता स्पर्धा व शस्त्रास्त्र स्पर्धा, गटबाजी, विविध संघटनांचे राजकारण, शीतयुद्ध, आर्थिक घटक इत्यादी विषयाचा अभ्यास राज्यशास्त्रात करण्यात आला. युरोपमधील राष्ट्रे, अमेरिका, चीन यांच्या परराष्ट्र संबंधाचा खूप मोठा परिणाम राज्यशात्राच्या अभ्यासावर झाला.

**४. राजकीय व्यवस्थाचा अभ्यास** : आधुनिक राज्यशास्त्रात राजकीय व्यवस्थावर, रचनात्मक कार्यावर, वर्तनवादावर, उत्तर वर्तनवादावर, राजकीय संस्कृती व संसूचन राजकीय समाजीकरण, राज्यघटनांची माहिती इत्याची अभ्यास केला जात आहे. विश्लेषणाच्या शास्त्रीय पद्धतीचा स्वीकार करण्यात आला आहे.

### १.२.३ राज्यशास्त्राची व्याप्ती

सन १९४८ साली युनेस्कोने राज्यशास्त्राच्या अभ्यासासंबंधी एक परिसंवाद आयोजित केला होता. या परिसंवादात अनेक विचारवंतानी राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या व्याप्तीबाबत विचार मांडले ते पुढीलप्रमाणे :

**१. मानवाचे अध्ययन** : मानवी जीवन सुखी करण्यासाठी राज्याची निर्मिती झाली. राज्याच्या निर्मितीमधील एक आवश्यक घटक म्हणजे मानव आहे. तेव्हा मानवी संबंधाचा अभ्यास राजकीय क्रिया संज्ञेद्वारे केला जाऊ लागला. जनतेचे अधिकार व कर्तव्ये, राज्याचे अधिकार इत्यादी दृष्टिकोनातून मानवी संबंधाचे अध्ययन केले जात आहे.

**२. राज्याचा अभ्यास** : राज्याचे शास्त्र राज्यशास्त्र भूतकाळात राज्ये कशी होती. वर्तमानकाळात राज्ये कशी आहेत व भविष्यकाळात राज्ये कशी असावीत याबाबतचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो. राज्याच्या उदयाचे दैवी सिद्धांत, सामाजिक करार सिद्धांत, ऐतिहासिक सिद्धांत राज्याचे सार्वभौमत्व इत्यादींचा अभ्यास राज्यशास्त्राच्या व्याप्तीमध्ये केला जातो.

**३. राजकीय विचारप्रणालीचा अभ्यास** : राज्यशास्त्रात लोकशाही समाजवाद, साम्यवाद, नाझीवाद, फॅसिझम, अराज्यवाद, दहशत, नक्षलवाद, पर्यावरणाचा असमतोल व शाश्वत विकास इत्यादी विचारप्रणालीचा अभ्यास केला जातो आहे. राजकारणातील घडामोडी, तत्त्वे, सिद्धांताबाबत विचार केला जात आहे.

**४. शासनसंस्थांचा अभ्यास** : जगभरातील विविध देशातील शासनव्यवस्थाचा अभ्यास करताना शासनसंस्थेचे स्वरूप, कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ यांच्या स्वरूपाचा व कार्यपद्धतीचा विचार केला जातो. संसदीय, अध्यक्षीय, राजेशाही, महाजनशाही, हुकूमशाही व साम्यवादी शासनपद्धतीचे गुण-दोष, त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास केला जातो.

**५. विविध संस्थांचा अभ्यास** : राज्यशास्त्राच्या कक्षेत स्थानिक स्वराज्यसंस्था, राज्यनियंत्रित मांडणे, निवडणूक आयोग, लोकसेवा आयोग, लोकप्रशासन, विभिन्न प्रशासन इत्यादी संस्थांचा अभ्यास करण्यात आला आहे. त्या संस्थेची कार्ये, शासनसंस्थेशी असणारा त्यांचा संबंध इत्यादीचा अभ्यास केला जातो.

**६. राज्याराज्यांचे संबंधाचा अभ्यास** : राज्याराज्यांचे संबंध सुव्यवस्थेत असल्याशिवाय शांतता व स्वातंत्र्य असू शकत नाही. तेव्हा राज्याराज्याचे संबंध कसे आहेत, कसे असावेत ते संबंध नियंत्रित करण्याकरिता निर्माण झालेल्या आंतरराष्ट्रीय संस्थांची निर्मिती, अधिकार व कार्ये, आंतरराष्ट्रीय नियम व कायदे इत्यादींचा समावेश राज्यशास्त्राचा व्याप्तीत केला जातो.

### १.२.४ राजकारण आणि राज्यशास्त्र फरक

राज्यशास्त्र आणि राजकारण यातील फरक पुढीलप्रमाणे :

१. राज्यशास्त्रात राजकीय व्यवस्थेचा अभ्यास केला जातो तर राजकारणात राजकीय सत्ता प्राप्त करण्याचा अभ्यास केला जातो.

२. राज्यशास्त्राला सिद्धांताचा आकार असतो तर राजकारणात सिद्धांतापेक्षा सत्ता प्राप्तीला महत्त्व असते.

३. राज्यशास्त्र इतर आंतरविद्याशाखेशी संबंधीत तत्त्वज्ञान मांडते तर राजकारणात राजकीय पक्ष व कार्यपद्धतीतील विचार मांडले जातात.

४. राज्यशास्त्रात मानवी वर्तनाचा अभ्यास केला जातो. राजकारणात मानवी वर्तनाच्या परिणामाचा अभ्यास महत्त्वाचा असतो.

### १.२.५ राज्यशास्त्राचे महत्त्व

राज्यशास्त्राचे महत्त्व आधुनिक काळात खूपच वाढलेले आहे. प्रत्येक व्यक्तीचा जन्म हा कोणत्या ना कोणत्या कुटुंबामध्ये होतो. त्याचवेळी त्याची पालनपोषणाची जबाबदारी आईवडील पार पाडत असतात तर बाह्य संरक्षणाची जबाबदारी राज्याने स्वीकारलेली असते. जॉर्ज बर्नार्ड शॉ यांच्या मते, ''मानवी संस्कृतीचे रक्षण फक्त राज्यशास्त्रातच करू शकतो.'' यावरून राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व लक्षात येण्यास मदत होते.

राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व पुढीलप्रमाणे :

**१. विविध देशाच्या राज्यघटनेची माहिती** : राज्यशास्त्रात जगातील अनेक देशाच्या राज्यघटनेची माहिती दिली जाते. राज्यघटना म्हणजे देशाचा राज्यकारभार चालविण्यासाठीचे लिखित नियम होय. आधुनिक राज्यशास्त्रात राज्यघटनेचा तौलनिक अभ्यास करून कोणती राज्यघटना योग्य, कोणती अयोग्य याची माहिती राज्यशास्त्रातूनच मिळते.

**२. राजकीय संकल्पना** : राज्यशास्त्रातील विविध संकल्पनांचा अर्थ राज्यशास्त्राच्या अभ्यासातूनच स्पष्ट होतो. राजकीय घटना, राजकीय हालचाली आणि आंदोलने यातून राजकारणाची दिशा समजते. सोयीचे होते. सिद्धांत मांडणीमुळे राजकीय जीवनातील समस्या सोडविणे शक्य झाले कारण सिद्धांत हे अमूर्त तसेच संदिग्ध नसतात.

**३. राज्यशास्त्राचे बहुसंख्य देशात अध्ययन** : राज्यशास्त्र हा विषय बहुसंख्य देशातील विद्यापीठे, महाविद्यालयातून शिकविला जातो. त्याचप्रमाणे अधिक संशोधनात्मक पद्धतीने संशोधनही केले जात आहे. इंग्लंडमध्ये पोलिटिकल स्टडीज असोसिएशन ऑफ द युनायटेड किंगडम, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पोलिटिकल सायन्स, अमेरिकेत ॲकॅडमी ऑफ पॉलिटिकल सायन्स, भारतात गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे, जपान, चीन, कॅनडा, रशिया, फ्रान्स, जर्मनी इत्यादी अनेक देशात राज्यशास्त्र विषयाचे संशोधन, अध्ययन व अध्यापन केले जाते.

**४. आंतरराष्ट्रीय राजकारण** : आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करून प्रत्येक राष्ट्राने शांतता व सुव्यवस्था निर्माण केली पाहिजे. मैत्री, मानवतावादी बंधुता व शांतता याचे महत्त्व जगाला कळाले आहे. युद्धामुळे मानवी संस्कृतीचा नाश होतो. देशा-देशातील संघर्ष कमी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनाची गरज निर्माण झाली व त्यातूनच युनोचा उदय झाला. राष्ट्रांना आपले प्रश्न मांडण्याचे व त्यावरील उपाय शोधण्याचे साधन म्हणून संयुक्त राष्ट्र संघटनेकडे पाहिले जाते. या सर्वांचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो.

**५. विचारप्रणाली** : राज्यशास्त्रात विविध स्वरूपाचे सिद्धांत मांडले जातात. या सिद्धांतातून एक विचार प्रवाह तयार होतो. उदा. दहशतवाद, नक्षलवाद, नाझीवाद, साम्यवाद, समाजवाद, लोकशाही इ. आज जग इतक्या झपाट्याने बदलत चालले आहे. त्यामुळे राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व वाढले आहे.

## १.३ सारांश

राज्यशास्त्राची तोंडओळख करून घेताना प्राचीन ग्रीक राजकीय विचारवंतानी मांडलेल्या सिद्धांताचा विचार केला. पारंपारिक राज्यशास्त्रात तात्त्विक विचार अधिक मांडले जात असत. सन १८५० पूर्वीचा कालखंड हा पारंपारिक राज्यशास्त्राचा होता. सन १८५० नंतर ते १९५० पर्यंतचा कालखंड हा राज्यशास्त्राचा संक्रमण काळ मानला जातो. या संक्रमण काळात अनेक विचारवंतानी विविध सिद्धांत मांडले. १९५० नंतर आधुनिक राज्यशास्त्राचा कालखंड सुरू झाला. लोकसंख्या वाढ, विज्ञान-तंत्रज्ञानाचा विकास यामुळे राज्यशास्त्राला शास्त्राचा दर्जा प्राप्त झाला. समाजाला मार्गदर्शन करण्याचे कार्य राज्यशास्त्र करते.

## १.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. इ. स. १८५० ते १९५० या काळास राज्यशास्त्राचा ............ काल म्हणतात.

(अ) सांस्कृतिक (ब) परंपरागत (क) संक्रमण (ड) आधुनिक

२. ............ विषयक शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय.

(अ) संपत्ती (ब) समाज (क) सत्ता (ड) नीती

३. ............ यांना राज्यशास्त्राचे जनक असे म्हणतात.

(अ) प्लेटो (ब) ॲरिस्टॉटल (क) मॅलिकाव्हेती (ड) कार्ल मार्क्स

४. राजकारणाचे व्याकरण (A Grammar of Politics) हा ग्रंथ ............ यांनी लिहिला आहे.

(अ) प्रा. लास्की (ब) प्रा. डनिंग (क) रॉबर्ट डाल (ड) प्लेटो

**उत्तरे** :

(१) संक्रमण (२) सत्ता (३) ॲरिस्टॉटल (४) प्रा. लास्की

## १.५ सरावासाठी प्रश्न

१. राज्यशास्त्र म्हणजे काय ?

२. राज्यशास्त्राचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करा.

३. राज्यशास्त्राचे महत्त्व सांगा.

४. राज्यशास्त्र आणि राजकारण यातील फरक सांगा.

## १.६ संदर्भसूची


१. भोळे भा. ल., राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे २००२.

२. गोखले रा. म., राज्यशास्त्राची मूलतत्त्वे, भाग १ व २.

३. घांगरेकर चि. त्र., राज्यशास्त्राची मूलतत्त्वे, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९९.

४. गर्दे दि. का., बाचल वि. मा., आधुनिक राजकीय विश्लेषण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९७५.

५. Verma S. P., Modern Political Theory, Vikas Publication House, Delhi.

६. Garner J. W., Political Science and Government, 1951.

७. Kapur A. C. Principle of Political Science, S. Chand and Co. Ltd., New Delhi.

८. Sabine G. H., A History of Political Theory.


## १.७ पारिभाषिक शब्दाचा अर्थ

**१. सिद्धांत** : शास्त्राच्या आधारावर विशिष्ट क्रिया-प्रतिक्रियाबाबत लोकांची मते किंवा कार्यकारण भाव.

**२. लोकशाही** : लोकशाही ही शासन पद्धत आहे. जगामधील बहुतांशी देशात लोकशाही व्यवस्था आहे. लोकशाहीत राज्याची सत्ता निर्वाचित लोकांच्या हाती असते.

**३. राजकीय वर्तन** : प्रत्येक व्यक्तीच्या वर्तनाचा अभ्यास राजकीय वर्तनामध्ये केला जातो. राजकीय वर्तन म्हणजे व्यक्तीची क्रिया-प्रक्रिया होय.

**४. तत्त्वज्ञान** : मूल्ये, श्रद्धा, अस्मिता आणि नैतिकता या घटकावर मांडलेले विचार म्हणजे तत्त्वज्ञान.

# घटक – २

# राज्यशास्त्राच्या उपविद्याशाखांचा परिचय

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ राजकीय सिद्धांत : अर्थ, स्वरूप, व्याप्ती

  २.२.२ राजकीय प्रक्रिया : अर्थ, स्वरूप, व्याप्ती

  २.२.३ लोकप्रशासन : अर्थ, स्वरूप, व्याप्ती

  २.२.४ आंतरराष्ट्रीय राजकारण : अर्थ, स्वरूप, व्याप्ती

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणांस पुढील बाबी समजून येतील.

१. राज्यशास्त्राच्या उपविद्याशाखांचा परिचय होईल.

२. राजकीय सिद्धांत, त्याचा अर्थ, स्वरूप व व्याप्ती समजून घेता येईल.

३. राजकीय प्रक्रिया, तिचा अर्थ, स्वरूप व व्याप्ती समजून घेता येईल.

४. लोकप्रशासनाचा अर्थ, स्वरूप व व्याप्ती समजून घेता येईल.

५. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अर्थ, स्वरूप व व्याप्ती समजून घेता येईल.

## २.१ प्रास्ताविक

पहिल्या प्रकरणात आपण राज्यशास्त्र म्हणजे काय ? त्याची स्वरूप व व्याप्ती, राज्यशास्त्र आणि राजकारण यातील फरक व राज्यशास्त्राचे महत्त्व अभ्यासले. प्रस्तुत प्रकरणात आपण राज्यशास्त्राच्या उपविद्याशाखांचा परिचय करून घेणार आहोत.

अमेरिकन पोलिटीकल सायन्स असोसिएशनने १९७३ मध्ये राज्यशास्त्राच्या आठ उपविद्याशाखा सुचविल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे :

१. परदेशी राजकीय संस्था आणि वर्तन

२. आंतरराष्ट्रीय कायदा, संघटना व राजकारण

३. पद्धतीशास्त्र

४. राजकीय स्थैर्य, अस्थैर्य व बदल

५. राजकीय सिद्धांत

६. सार्वजनिक धोरण

७. लोकप्रशासन

८. अमेरिकी राजकीय संस्था, क्रिया व वर्तन

या आठ उपविद्याशाखांपैकी आपण प्रस्तुत प्रकरणात राजकीय सिद्धांत, राजकीय प्रक्रिया, लोक प्रशासन व आंतरराष्ट्रीय राजकारण या उपविद्याशाखांचा अभ्यास करणार आहोत. प्रामुख्याने राजकीय सिद्धांत, प्रक्रिया लोकप्रशासन व आंतरराष्ट्रीय राजकारणांचा उदय, अर्थ, स्वरूप व व्याप्ती यांचा सविस्तर अभ्यास करणार आहोत. प्रामुख्याने राजकीय सिद्धांत, प्रक्रिया, लोकप्रशासन व आंतरराष्ट्रीय राजकारणाचा उदय, अर्थ, स्वरूप व व्याप्ती यांचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

## १.२ विषय विवेचन

राज्यशास्त्राच्या उपविद्याशाखांचा अभ्यास पुढील चार घटकांच्या आधारे केला आहे.

### १.२.१ राजकीय सिद्धांत

राजकीय सिद्धांताचा अर्थ, स्वरूप, व्याप्ती पुढीलप्रमाणे :

**(अ) अर्थ** : राजकीय सिद्धांत म्हणजे राज्यव्यवहारामधील गोष्टीबद्दल ज्ञान मिळविण्याच्या दृष्टीने नियमांच्या साच्यात सूत्रबद्ध रीतीने विचारांचा जो समूह मांडण्यात येतो. त्यास राजकीय सिद्धांत असे म्हणतात. थोडक्यात, शासनसंस्था कशी चालते, कोण चालवते व कशा पद्धतीने चालविली जाते त्यासाठी असलेले विशिष्ट नियम त्यांचा संच, कार्यपद्धती याकडे पाहण्याचा विशिष्ट दृष्टिकोन म्हणजे राजकीय सिद्धांत होय.

**(ब) व्याख्या :** राजकीय सिद्धांताच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत :

**१. सेबाईन :** राजकीय समस्यांचा जाणिवपूर्वक व शिस्तबद्ध शोध म्हणजे राजकीय सिद्धांत होय.

**२. कोकर :** शासनसंस्थेचा अभ्यास करताना जनतेच्या इच्छा, गरजा आणि मते विचारात घेतली जातात. त्याला राजकीय सिद्धांत असे म्हणतात.

**३. अँण्ड्र्यू हॅकर :** राजकीय व्यवस्थेसंबंधीत भूतकालीन, वर्तमानकालीन आणि भविष्यकालीन तत्त्वज्ञान व शाखांचे ज्ञान म्हणजे राजकीय सिद्धांत होय.

**४. राजकीय शब्दकोष :** राजकीय घटनांचे मूल्यमापन, स्पष्टीकरण आणि भाकीते यासंबंधी शोध घेणारे विचार म्हणजे राजकीय सिद्धांत होय.

या व्याख्यांवरून असे म्हणता येते की, उपलब्ध तथ्ये आणि साधनसामुग्रीच्या आधारे आपल्या अनुभवातून प्राप्त झालेल्या ज्ञानाच्या मदतीने घटनांच्या कार्यकारण संबंधाचे स्पष्टीकरण करून त्या आधारावर काढलेले तर्कसंगत निष्कर्ष म्हणजे सिद्धांत होय.

**(क) स्वरूप**

**१. तात्त्विक स्वरूप :** सुरुवातीच्या काळात राजकीय सिद्धांताचे स्वरूप हे तात्त्विक स्वरूपाचे होते. त्यावेळी राजकीय सिद्धांत व तत्त्वज्ञान यांत फरक केला जात नव्हता. तथ्ये आणि मूल्ये या बाबी एकाच अर्थाने वापरल्या जात होत्या. राजकीय सिद्धांत व व्यवहारात फरक दाखविण्याचा प्रयत्न ॲरिस्टॉटलने केला. परंतु समाजातील प्रत्येक व्यक्ती समोर निर्माण होणाऱ्या प्रश्नांबाबत योग्य ते स्पष्टीकरण राजकीय सिद्धांताला द्यावेच लागते.

प्लेटो, कार्ल मार्क्स व हॅरॉल्ड लास्की यांनी तात्त्विक गोष्टींना महत्त्व दिले. प्राचीन, तात्त्विक व राजकीय तत्त्वज्ञ समाजापासून वेगळे होते. विचारवंतांनी स्वतःला राजकीय सहभागी न मानता तेव्हाच्या परिस्थितीचे विश्लेषण मूल्यांच्या आधारावर तटस्थपणे केले आणि वेगवेगळ्या घटनांमागील सत्य शोधण्याचा प्रयत्न केला.

**२. मूल्याधिष्ठित स्वरूप :** १९व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत मूल्य व तथ्य यांत फरक केला जात होता. पुढे राजकीय सिद्धांताची मांडणी करणारी व्यक्ती राजकीय व्यवहार व वास्तवतेच्या आधारे सत्य शोधनाचे काम करणारी असावी असे प्रतिपादन केले गेले. सत्यशोधनावेळी संबंधित व्यक्ती प्रत्यक्ष राजकीय संघर्षापासून अलिप्त राहून, राजकारणातील अनिष्ट प्रवृत्तीचा परिणाम होऊ न देता सत्यशोधन करेल अशी अपेक्षा व्यक्त होत गेली. तर राजकीय सिद्धांत हे पूर्णपणे मूल्यनिरपेक्ष असू शकत नाहीत. कारण राजकीय घडामोडी किंवा राजकारण याविषयी उदासिनता दाखवून राजकीय घडामोडी व तथ्ये यांचे संकलन शक्य होत नाही.

**३. राजकीय सिद्धांत व व्यवहार यांतील संबंध :** समाजात निर्माण होणारे राजकीय सिद्धांत व

राजकीय व्यवहार यांचा परस्पर घनिष्ठ संबध आहे. मनुष्याकडून निसर्गतः अनेक चुका होतात. मात्र पुन्हा पुन्हा त्याच चुका होत असल्यास त्यात तो सुधारणा करतो. म्हणजे चुकांची पुनरावृत्ती टाळण्याची प्रवृत्ती मानवाची असते. याचप्रमाणे व्यावहारिक सिद्धांत प्रतिपादनात चूक आहे असे आढळून येते तेव्हा सिद्धांताची पुनर्रचना किंवा मांडणी केली जाते. हे चक्र नियमित चालू असते. या सिद्धांतात अनेक वेळा भविष्यकालीन चुकांचा अंदाज घेऊन त्यांना प्रतिबंध करण्याची दक्षताही घेतली जाते. कारण संभाव्य चुकांचे स्वरूप हे गंभीर ठरू शकते. व्यवहार पद्धतीने राजकीय सिद्धांत आणि व्यवहार यांच्यामधील संबंध स्पष्ट होतो.

**४. राजकीय सिद्धांत ही समाजजीवनाची गरज** : परिस्थितीतून राजकीय सिद्धांताची निर्मिती होत असते. सामाजिक जीवनसाठा विज्ञानाच्या विकास व प्रगतीमुळे सिद्धांताची गरज वाढलेली दिसते. आधुनिक काळात जसजसा समाजजीवनाचा विकास होत गेला तसतशी नवनवीन राजकीय सिद्धांताची निर्मिती मानवाने केली. कला, विज्ञान व इतर घटकांची गरज माणसाला जगण्यासाठी असते तेवढीच गरज राजकीय सिद्धांताचीही असते.

आधुनिक काळात राजकीय सिद्धांताचे स्वरूप बदलत आहे. आज राजकीय सिद्धांताचा वास्तवाचा शोध घेण्याकडे कल असलेला दिसतो. तसेच संशोधन पद्धतीवर अधिक भर दिला जातो. सांख्यिकी माहिती गोळा करून विश्लेषणही केले जात आहे. अशा प्रकारचे राजकीय सिद्धांताचे स्वरूप असल्याचे दिसते.

**(ड) व्याप्ती** : राजकीय सिद्धांताच्या व्याप्तीत पुढील गोष्टींचा समावेश होतो.

**१. मानवी विचार** : मानव हा राजकीय सिद्धांताचा केंद्रबिंदू आहे. राजकीय सिद्धांत ज्या राज्याविषयी निर्माण होतात ते राज्य सुद्धा व्यक्तीभोवतीच फिरते. ॲरिस्टॉटलच्या मते, मनुष्य हा सामाजिक (राजकीय) प्राणी आहे. मानवाच्या या समाजप्रिय वृत्तीतून राज्याची निर्मिती झाली आहे. शासनसंस्था आणि राज्य या संबंधीच्या विविध दृष्टिकोनातून राजकीय सिद्धांताचा अभ्यास केला जातो. व्यक्तीचा सुसंघटित समाजच राज्यात रूपांतरित झाल्याने व्यक्तीचे राज्य व शासनाशी संबंध कशा प्रकारे असावे याचा अभ्यास राजकीय सिद्धांतात होऊ लागला. मनुष्यानेच राज्य व सरकार निर्माण केले म्हणून राज्याविषयी, शासनाविषयी राजकीय सिद्धांतात अभ्यास होत असताना त्याचा केंद्रबिंदू व्यक्तीच असते.

**२. राज्याचा अभ्यास** : राजकीय सिद्धांतात राज्याचा उदय, त्याची उद्दिष्टे, मुलभूत वैशिष्ट्ये, राज्याच्या उदयाचे विविध सिद्धांत या सर्वाचा अभ्यास केला जातो. तसेच भूतकाळात राजकीय संस्था कशी होती? वर्तमानकाळात कशी आहे? भविष्यकाळात तिचे स्वरूप कसे असावे? याचे अनुमान राजकीय सिद्धांतात मांडता येते.

**३. शासनसंस्थेचा अभ्यास** : समाज संघटित होऊन कायदे व नियमासाठी शासनसंस्था निर्माण केली. समाजावर नियंत्रण ठेवणारे लोक म्हणजे कायदे करणारे लोक आणि त्यांनाच शासक म्हटले जाते. म्हणून व्यक्ती बरोबर शासनसंस्थेचा अभ्यास राजकीय सिद्धांतात केला जाऊ लागला. त्यात शासनसंस्थेचा उगम, त्याचे प्रकार जसे लोकशाही, हुकूमशाही, साम्यवादी शासन, शासनसंस्थेचे स्वरूप यांचा अभ्यास होऊ लागला.

**४. राजकीय रचना व संस्थांचा अभ्यास** : पारंपरिक राज्यशास्त्रात राजकीय संस्थांचा अभ्यास होत होता. विसाव्या शतकात राजकीय संस्थांऐवजी राजकीय प्रक्रियेचा अभ्यास राजकीय सिद्धांतात होऊ लागला. व्यक्तीच्या राजकीय कृती व राजकीय व्यवहारातील त्याचे वर्तन, भूमिका यांचा अभ्यास राजकीय सिद्धांतात केला जाऊ लागला.

**५. राजकीय साहित्य व मुलभूत दस्तऐवजांचा अभ्यास** : राजकीय सिद्धांताला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून देण्यात राजकीय साहित्य व मुलभूत दस्तऐवजांना महत्त्वाचे स्थान आहे. ॲरिस्टॉटलचा 'पॉलिटिक्स्' कार्ल मार्क्सचा 'दास कॅपिटल', जे. एस. मिलचा 'ऑन लिबर्टी', कौटिल्याचा 'अर्थशास्त्र' अशा अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथांनी राजकीय सिद्धांताची जडणघडण केली. या ग्रंथांचा राजकीय घडामोडींवर परिणाम होतो. उदाहरणार्थ रुसोने लिहिलेल्या सामाजिक करारातून फ्रेंच क्रांती होऊन स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या सिद्धांताची निर्मिती झाली. ब्रिटनच्या राजकीय व्यवस्थेचे आकलन होण्यासाठी मॅग्ना कार्टा, बिल ऑफ राईटस्, पिटीशन ऑफ राईटस् या मुलभूत दस्तऐवजांचा राजकीय सिद्धांतात अभ्यास केला जातो.

**६. विचारसरणीचा अभ्यास** : प्रत्येक राजकीय व्यवस्था काही मूल्ये, नैतिकता, श्रद्धा यांच्या आधारावर टिकून असते. गांधीवाद, समता, जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था, सर्वंकष सत्तावाद, फॅसिझम, साम्यवाद व माओवाद अशा अनेक विचारसरणीचा अभ्यास राजकीय सिद्धांतात केला जातो.

**७. मतदारांच्या वर्तनाचा अभ्यास** : आधुनिक काळात नवीन राजकीय प्रवाह अस्तित्वात येत असल्याने व्यक्तीचे/मतदारांचे राजकीय वर्तन महत्त्वाचे ठरत आहे. संशोधक मतदारांच्या वर्तनाची पाहणी करून त्यचे विश्लेषण करताहेत. या सर्व गोष्टींचा अभ्यास राजकीय सिद्धांतात केला जातो.

या सर्व बाबींबरोबरच अलीकडच्या काळात नवनवे राजकीय विचार येत असल्याने राजकीय सिद्धांताच्या व्याप्तीत वाढ होत आहे. त्यामुळे प्रो. गुडनाऊ असे म्हणतात की, राजकीय सिद्धांताची व्याप्ती गतिशील आहे.

### (इ) राजकीय सिद्धांताचे महत्त्व

प्रत्येक व्यक्तीचे राजकीय जीवन आणि राज्यव्यवस्था यांच्या संदर्भात राजकीय सिद्धांताची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे. त्यामुळे बदलत्या काळातही राजकीय सिद्धांताचे महत्त्व कायम राहिले आहे.

१. राजकीय सिद्धांत मूल्यनिर्मितीचे काम करतात. उदा. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय इत्यादी. ही मूल्ये मानवी जीवनास अत्यावश्यक आहेत. म्हणून मूल्यनिर्मिती ही श्रेष्ठत्वाच्या दृष्टीने राजकीय सिद्धांताला महत्त्व प्राप्त झाले आहे.

२. प्रत्येक राजकीय व्यवस्थेत काळाच्या ओघात स्थित्यंतरे, परिवर्तन होत असते. त्या परिवर्तनाची नेमकी दिशा कोणती असावी ? त्यासाठी राजकीय सिद्धांत मार्गदर्शन करतात.

३. राजकीय सिद्धांत राजकीय व्यवस्थेला सैद्धांतिक आधार मिळवून देत असतात.

४. आज मानवी वर्तन आणि राजकीय प्रक्रिया यांच्यातील कार्यकारण संबंधाचा व्यापक पातळीवर शोध घेण्याचे काम राजकीय सिद्धांत करतात.

थोडक्यात, राज्य व्यवहाराचे आकलन होण्यासाठी राजकीय सिद्धांताला महत्त्व प्राप्त झाले आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न–१**

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. अमेरिकन पोलिटिकल सायन्स असोसिएशनने राज्यशास्त्राच्या आठ उप विद्याशाखा केव्हा सुचविल्या ?

२. राजकीय सिद्धांताची 'राजकीय समस्यांचा जाणिवपूर्वक शिस्तबद्ध शोध म्हणजे राजकीय सिद्धांत होय' ही व्याख्या कोणी केली ?

३. राजकीय सिद्धांत व व्यवहारात फरक दाखविण्याचा प्रथम प्रयत्न कोणी केला ?

४. राजकीय सिद्धांताला कोणत्या बाबींमुळे वैचारिक अधिष्ठान प्राप्त होते ?

५. 'पॉलिटिक्स' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

६. 'दास कॅपिटल' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

७. 'ऑन लिबर्टी' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

## १.२.२ राजकीय प्रक्रिया

राजकीय प्रक्रियेचा अर्थ, व्याख्या, स्वरूप व व्याप्ती पुढीलप्रमाणे आहे :

### (अ) अर्थ

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात राजकीय प्रक्रिया या उपविद्याशाखेचा शास्त्रशुद्ध व पद्धतशीर अभ्यास होऊ लागला. प्रक्रिया हा शब्द रीती, सारणी, कार्यपद्धती या अर्थाने वापरला जातो. त्यामुळे प्रक्रियेत विशिष्ट अशी अभ्यासाची पद्धती वापरलेली असते. राजकीय व्यवहारांचा राजकीय प्रक्रियेत समावेश होतो. राजकीय संस्था, संघटना, गट आणि व्यक्तीच्या कृती यांच्यातील व्यवहारांचा राजकीय प्रक्रियेत समावेश होतो. तसेच क्रिया व प्रक्रिया या दोन्हींच्या समावेशामुळे त्यांच्या घडामोडीतून नव्याने साकारणाऱ्या अर्थाचा, आशयाचा, संकल्पनांनाचाही समावेश राजकीय प्रक्रियेत होतो. उदा. निवडणूक प्रक्रिया या संज्ञेत निवडणूक आयोग, प्रौढ मताधिकार, समान लोकसंख्येचे मतदार संघ, त्यांची संख्या, राखीव मतदार संघ, कोणी कोणाला मत दिले. अशा विविध घटकांचा यांत समावेश होतो. म्हणजेच औपचारिक व अनौपचारिक राजकीय कर्त्या घटकांनी केलेल्या सर्व कृतींचा राजकीय प्रक्रियेत अभ्यास केला जातो. राजकीय प्रक्रिया ही संज्ञा राजकीय कृतीशी परस्पर संबंधित आहे तर राजकीय कृतीमागे निश्चित कारण व संबंध असतो. त्यामुळे प्रक्रियेतून निश्चितता व्यक्त होते. तसेच कृतीची एक शृंखला दिसते. परिणामी राजकीय कृतीतून, तिच्या निरीक्षणातून

अनुभवजन्य सिद्धांत विश्लेषणासाठी मांडता येतात. थोडक्यात, राजकीय व्यवहार, कृती घटते राजकीय प्रक्रिया ठरत असते.

**(ब) व्याख्या**

राजकीय प्रक्रियेची निश्चित अशी व्याख्या करणे कठीण आहे. तरीही काही विचारवंतानी राजकीय प्रक्रियेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

१. **हंटिंग्टन, आल्मंड, डेव्हिड इस्टन** : संस्थात्मक विस्तार आणि निर्णय घेणे, राबविण्याची प्रक्रिया (व राजकीय अधिमान्यता) म्हणजे राजकीय प्रक्रिया होय.

**२. हेबरमास** : राजकीय संस्था, व्यवहार, कायद्यांना वैधता प्राप्त करणे म्हणजे राजकीय प्रक्रिया होय.

**(क) स्वरूप आणि व्याप्ती :**

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात अगोदर राजकीय व्यवहारांचा अभ्यास राजकीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भात केला जात होता. राजकीय व्यवहार कसा चालावा ? राजकीय व्यवहाराचे ध्येय कोणते असावे ? असा अभ्यास राजकीय प्रक्रियेत केला जात होता. अशा प्रकारचा आदर्शवादी अभ्यास १९व्या शतकाच्या उत्तरार्धात केला गेला नाही. राजकीय व्यवहारातून व्यक्त होणारे विविध अर्थ राजकीय प्रक्रियेचे अभ्यासक सांगतात. थोडक्यात, राजकीय प्रक्रियेतून संकल्पना, विचार, तत्त्वज्ञान आणि सिद्धांत यांचा जन्म होतो. अशी भूमिका राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासकांनी गेल्या पन्नास वर्षांत मांडली आहे.

राजकीय संरचनांमधील सहसंबंध हा एक राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासाचा महत्त्वाचा भाग आहे. विभाजन, स्पर्धा, संघर्ष यांविषयीच्या घडामोडी उपलब्ध संसाधनाच्या वाटपामधून घडतात. तसेच विशिष्ट समाजात प्रतिकात्मक, संसाधनाच्या वाटपामधून घडते. असे मत हेलेन स्टुअर्ट यांनी मांडले आहे. साधारणपणे राजकीय प्रक्रियेच्या व्याप्तीत प्रामुख्याने पुढील गोष्टींचा समावेश होतो.

**१. राजकीय व्यवस्थांचा अभ्यास :**

राजकीय प्रक्रियेत विविध राजकीय व्यवस्थांचा अभ्यास केला जातो. प्रत्येक व्यवस्थेतील राज्यघटना, शासनसंसथा, प्रशासकीय व्यवस्था, राजकीय पक्ष, चळवळी यांचा अभ्यास राजकीय प्रक्रियेत केला जातो. हा अभ्यास ऐतिहासिक व समाजशास्त्रीय दृष्टकोनातून अर्थकारण व राजकीय समाजशास्त्राच्या चौकटीत केला जातो. असे मत राजकीय प्रक्रियेचे अभ्यासक मांडतात. त्यामुळे राजकीय प्रक्रियेत राजकीय समाजशास्त्र, राजकीय चळवळी, राजकीय अर्थकारण हे घटक वेगळे न मानता राजकीय प्रक्रियेच्या व्याप्तीत त्यांचा समावेश केला जातो. परिणामी, राजकीय प्रक्रियेचा अभ्यास एका अर्थाने समाजशास्त्रीय स्वरूपाचा वाटतो. त्यामुळे राज्यशास्त्राचे अभ्यास त्यांच्या अभ्यासात राजकीय प्रक्रिया हा शब्दप्रयोग वापरतात. उदा. रजनी कोठारी यांनी The Non-Party Political Process असे नाव त्यांच्या पक्षावरील अभ्यासास दिले आहे.

**२. राजकीय प्रक्रियेचा अभ्यास** : राजकीय व्यवस्था, संरचना, संकल्पना, सिद्धांत, विचारप्रणाली यांच्या संदर्भात राजकीय प्रक्रियेचा अभ्यास केला जातो. व्यवस्था, संरचना, संकल्पना, सिद्धांत व विचार-प्रणालीचे बदलते स्वरूप यांचाही अभ्यास राजकीय प्रक्रियेने केला जातो. याचबरोबर राजकीय पक्ष, दबाव गट, नेतृत्व अशा बिगर संस्थात्मक घटकांचा अभ्यासही राजकीय प्रक्रियेत केला जातो. तसेच सार्वजनिक धोरणनिश्चिती निर्णय घेण्यात कोणाचा किती सहभाग आहे ? राजकीय प्रक्रियेचा इतिहास, राजकीय प्रक्रियेवर प्रभाव टाकणारे घटक या सर्वांचा अभ्यास राजकीय प्रक्रियेत केला जातो.

**३. राजकीय संकल्पना व पक्षांचा अभ्यास** : राजकीय प्रक्रियेत राजकीय स्थैर्य, लोकानुरंजनवाद, राजकीय उदासिनता, सार्वजनिक हित, बहुध्रुवी राजकारण, द्विध्रुवी राजकारण, राजकीय अभिजन, राजकीय संस्कृती, राजकीय बदल, राजकीय आधुनिकीकरण, राजकीय समावेशन, वैचारिक प्रभुत्वाचे क्षेत्र, नेतृत्व या विविध संकल्पनांचा अभ्यास केला जातो. त्याबरोबरच राजकीय पक्ष, हितसंबंधी, दबावगट, सत्ता स्पर्धा यांचाही अभ्यास राजकीय प्रक्रियेत केला जातो. राजकीय पक्षांच्या अभ्यासाला राजकीय प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान आहे.

### (ड) राजकीय प्रक्रियेवरील अभ्यास

राजकीय प्रक्रियेचा अभ्यास अनेक विचारवंतानी व संशोधकांनी केला आहे. त्याचा निवडक आढावा पुढीलप्रमाणे घेता येतो.

भारताच्या संदर्भात रजनी कोठारी यांनी The Congress System in India असा अभ्यास १९६४ मध्ये केला आहे. जयंत लेले यांनी Caste, Class and Power : Political Mobilization in Maharashtra असा अभ्यास १९९० मध्ये केला आहे. राजकीय अर्थकारण व नवउदारमतवादी अर्थव्यवस्थेमुळे राजकीय पक्षांची भूमिका व त्यांचे राजकीय सामाजिक आधार बदलले आहेत. या पार्श्वभूमीवर हे अभ्यास झालेले दिसतात.

महाराष्ट्राच्या संदर्भात विचार करता राजकीय प्रक्रियेवरील अभ्यासाची काही उदाहरणे देता येतील. 'सत्तांतर' हा ग्रंथ १९९५ मध्ये व्होरा व पळशीकर यांनी लिहिला, तर 'महाराष्ट्राचे बदलते राजकारण' २००३ मध्ये पळशीकर यांनी, 'राजकीय चळवळ' प्रकाश पवार यांनी अभ्यास केला आहे. या सर्व अभ्यासात समाज, लोकशाही व न्याय या मुद्यांची चर्चा केली आहे. त्यामुळे राजकीय संस्थांच्या व्यवहाराशी थेट संबंधित समाज, लोकशाही, आर्थिक विकास व सामाजिक न्याय असे विषय राजकीय प्रक्रियेत मध्यवर्ती विषय ठरत आहेत.

१९९० नंतर राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासात बदल झाले आहेत. प्रामुख्याने सुधा पै यांनी Political Process in Uttrar Pradesh आणि पॉल ब्रास यांनी Language, Religion and Politics in North India या ग्रंथात भाषा, धर्म व राजकारणाचा सहसंबंध तसेच शासन व्यवहार, अर्थकारण व सुधारणा यांची मांडणी केली आहे. यावरून राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासाची पुढील नवीन क्षेत्रे सांगता येतात.

१) राजकीय अर्थकारण, २) राजकीय व सामाजिक चळवळी, ३) राजकीय सत्तास्पर्धा, ४) आघाड्यांचे राजकारण, ५) निवडणुकांचा अभ्यास.

एकूण अशा प्रकारे राजकीय प्रक्रियेचा अभ्यास केला जातो.

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. The Non-Party Political Process हा ग्रंथ ............. यांनी लिहिला.

(अ) सुहास पळशीकर (ब) रजनी कोठारी (क) हेलेन स्टुअर्ट

२. Language, Religion and Politics in North India हा ग्रंथ ............. यांनी लिहिला.

(अ) सुधा पै (ब) जयंत लेले (क) पॉल ब्रास (ड) हेलेन स्टुअर्ट

३. वैधता प्राप्त करणे म्हणजे राजकीय प्रक्रिया होय. असा राजकीय प्रक्रियेचा अर्थ .............. यांनी लावला.

(अ) डेव्हिड ईस्टन (ब) हेबरमास (क) हंटींग्टन (ड) आमंड

४. रजनी कोठारी यांनी १९६४ मध्ये ............. हा ग्रंथ लिहिला.

(अ) The Congress System in India (ब) Political Process in Uttar Pradesh

(क) Caste, Class and Power

### २.२.३ लोकप्रशासन

मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास करणे हा राज्यसंस्थेचा मुख्य उद्देश असल्याने तो साध्य करण्यासाठी योग्य व कार्यक्षम प्रशासनाची आवश्यकता असते. लोककल्याणासाठी विविध योजना, उपक्रम व कार्यक्रम राबविण्यासाठी प्रशासनाची गरज असते. त्यामुळे आज प्रगत व अप्रगत अशा सर्वच देशांत लोकप्रशासन आढळते. त्याचा अर्थ, स्वरूप व व्याप्ती पुढीलप्रमाणे आहे :

**(अ) अर्थ**

लोकांचे, लोकांसाठी असलेले प्रशासन म्हणजे लोकप्रशासन होय. लोक (public) हा शब्द 'राज्यातील सर्व लोक' या अर्थाने वापरलेला आहे. Public म्हणजे सार्वजनिक असाही अर्थ होतो. राज्यातील संपूर्ण जनतेच्या हितासाठी सरकारकडून विविध कामे पार पाडली जातात. त्यासाठी विविध संघटना निर्माण केल्या जातात. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने विविध प्रकारच्या ध्येयधोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा उभारलेली असते. लोकल्याणाची कामे सरकारच्या विविध विभागांद्वारे पार पाडली जातात. त्याला लोकप्रशासन असे म्हणतात. काही विचारवंत लोकप्रशासनाला सार्वजनिक प्रशासन असेही संबोधतात.

**(ब) व्याख्या :**

**१. प्रो. एल. डी. व्हाईट :** लोकप्रशासनात अशा सर्व कृतींच्या आणि कार्याचा समावेश केला जातो की, ज्यांचा उद्देश सार्वजनिक धोरणांची पूर्तता किंवा अंमलबजावणी करणे हा असतो.

**२. वुड्रो विल्सन :** कायद्याची तपशिलवार आणि पद्धतशीरपणे कार्यवाही करणे म्हणजे लोकप्रशासन होय.

**३. पर्सी मॅक्वीन :** लोकप्रशासन म्हणजे असे प्रशासन की, ज्याचा संबंध राष्ट्रीय अथवा स्थानीय सरकारच्या कार्याशी येतो.

**४. ब्रिटिश ज्ञानकोश :** शासनसंस्थेद्वारा राज्यसंस्थेच्या धोरणाचे उपयोजन म्हणजे लोकप्रशासन होय.

**५. ल्युथिर ग्युलिक :** लोकप्रशासनाचा संबंध शासनसंस्थेच्या कार्यकारी विभागाशी येतो. कारण, कार्यकारी विभागाद्वारे संपूर्ण कार्य चालते. म्हणूनच लोकप्रशासनात प्रामुख्याने कार्यकारी विभागाचा विचार केला जातो.

वरील सर्व व्याख्यांवरून असे म्हणता येते की, शासनसंस्थेच्या विविध कृती आणि कार्यपद्धतींना लोकप्रशासन असे म्हणतात.

**(क) स्वरूप**

लोकप्रशासनाचे स्वरूप समजावून घेण्यासाठी पुढील दोन दृष्टिकोन अभ्यासणे महत्त्वाचे ठरते.

**१. संकलित दृष्टिकोन :** जेव्हा एखादे विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संघटनेतील सर्व घटकांचा आणि त्यांच्या सर्व कार्याचा समावेश लोकप्रशासनाच्या अभ्यासात केला जातो तेव्हा त्यास संकलित दृष्टिकोन असे म्हणतात. संकलित दृष्टिकोनास सर्वव्यापी दृष्टिकोन असेही म्हणतात. सार्वजनिक महामंडळे, शासकीय खाती, खाजगी व्यवसाय व उद्योगधंदे, कारखाने, बँका अशा विविध संघटनांमधील सर्व घटकांचा आणि कर्मचारी वर्गाच्या कार्याचा समावेश प्रशासनात केला जातो. संघटनेतील सर्व कर्मचारी कनिष्ठ लिपिक, शिपाई, विभागप्रमुख, शाखा प्रमुख, कनिष्ठ-वरिष्ठ अधिकारी, संघटनेचा प्रमुख अधिकारी, संबंधित सहाय्यकारी कर्मचारी वर्ग, संबंधित राजकीय कार्यकारी प्रमुख मंत्री, संचालक मंडळ इत्यादी सर्व घटकांच्या कार्याचा समावेश लोकप्रशासनाच्या अभ्यासात संकलित केला जातो. थोडक्यात, संघटनेतील सर्व घटकांचा आणि त्यांच्या संबंधित कार्याचा समावेश संकलित दृष्टिकोनात केला जातो.

हेन्री फेयॉल व एल. डी. व्हाईट यांनी लोकप्रशासनाच्या संकलित दृष्टिकोनाचे समर्थन केले आहे. एल. डी. व्हाईट यांच्या मते, लोकप्रशासनात संघटनेच्या सर्व कार्याचा समावेश केला जातो. ज्यांचा अंतिम उद्देश हा लोकांचे कल्याण करणे, सार्वजनिक धोरणांची अंमलबजावणी करणे हा असतो.

**२. व्यवस्थापनात्मक दृष्टिकोन** : लोकप्रशासनासंबंधीचा व्यवस्थात्मक दृष्टिकोन म्हणजे केवळ व्यवस्थापन करणे, इतरांकडून कार्य करवून घेणे होय. संघटनेतील सर्व कर्मचाऱ्यांच्या आणि त्यांच्या कार्याचा प्रशासनात समावेश न करता केवळ वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कार्याचा समावेश करणे होय. संघटनेतील वरिष्ठ अधिकारी निर्णय घेणे, नियंत्रण ठेवणे, देखरेख करणे, मार्गदर्शन करणे अशी व्यवस्थापनात्मक कार्ये करतात. व्यवस्थापनात्मक दृष्टिकोणात फक्त व्यवस्थापनात्मक कार्याचा समावेश केला जातो. शिपाई, लिपिक व कनिष्ठ सेवकवर्गाचा व्यवस्थापनात्मक दृष्टिकोनात समावेश केला जात नाही. कारण व्यवस्थापन करणे ही एक प्रशासकीय कला आहे. संघटनेतील वरिष्ठ अधिकारी आपल्या प्रशासकीय कौशल्याद्वारे, क्षमतेद्वारे व्यवस्थापनाचे कार्य करतात. वरिष्ठ कार्यकारी प्रमुख कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवून, मार्गदर्शन व पर्यवेक्षण करून संघटनेचे उद्दिष्ट किंवा हेतू साध्य करत असतात.


लोकप्रशासनाच्या व्यवस्थापनात्मक दृष्टिकोनाचा पुरस्कार हर्बर्ट सायमन, स्मिथबर्ग, थॉम्पसन, ल्यूथर ग्युलिक यांनी केला. त्यांच्या मते, संघटनेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आवश्यक असणारा वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी वर्ग आणि उपलब्ध साधनसामग्रीचा समावेश प्रशासनाच्या व्यवस्थापनात्मक दृष्टिकोनात केला जातो. थोडक्यात, व्यवस्थापनात्मक दृष्टिकोनात प्रशासकीय कार्याला व कौशल्याला महत्त्व दिले जाते.

अशा प्रकारे लोकप्रशासनाच्या स्वरूपाविषयी संकलित व व्यवस्थापनात्मक दृष्टिकोनाचे विवेचन करता येते. या दोन्ही दृष्टिकोनापैकी कोणताही एक दृष्टिकोन महत्त्वाचा आहे असा निष्कर्ष मात्र काढता येत नाही. कारण एखादे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संघटनेच्या प्रशासनातील सर्व घटक आणि त्यांचे कर्मचारी जबाबदार असतात. संघटनेतील शिपाई-कारकुनापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यापर्यंतच्या सर्व घटकांचा प्रशासनात समावेश केला जातो. तसेच दुसरीकडे प्रशासकीय क्षमता, कौशल्य याकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. थोडक्यात प्रशासनासंबंधीचे हे दोन्ही दृष्टिकोन प्रशासनकार्य यशस्वी करण्यासाठी उपयुक्त व आवश्यक आहेत.

### (ड) व्याप्ती


आधुनिक काळात लोकप्रशासनाची व्याप्ती व्यापक स्वरूपाची बनली आहे. कारण आधुनिक समाज गुंतागुंतीचा व व्यापक स्वरूपाचा बनल्यामुळे राज्याचे कार्यक्षेत्र वाढले आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक अशा विविध स्वरूपाची कामे शासनसंस्थेला करावी लागत आहेत. त्यामुळे शासनसंस्थेला तीनही विभागांची कार्ये लोकप्रशासनात समाविष्ट केली जातात. कायदेनिर्मिती, त्यांची अंमलबजावणी आणि न्यायदान या कार्यक्षेत्रांचा अभ्यास लोकप्रशासनात करावा लागतो. तर काही विचारवंतानी लोकप्रशासनाची व्याप्ती संकुचित केली आहे. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे :

**(अ) हेन्री फेयॉल :** हेन्री फेयॉलने लोकप्रशासनाची व्याप्ती व्यवस्थापनात्मक दृष्टिकोणातून स्पष्ट केली आहे. त्यासाठी फेयॉलने पुढील पाच तत्त्वे सांगितली आहेत.




फेयॉलच्या मते लोकप्रशासनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या पाच तत्त्वांचा स्वीकार करावा लागतो.

**(ब) पर्सी मॅक्वीन :** पर्सी मॅक्वीन यांनी लोकप्रशासनाची व्याप्ती स्पष्ट करताना 3M ही संकल्पना मांडली आहे.




पर्सी मॅक्वीनच्या मते, लोकप्रशासनाच्या व्याप्तीत कर्मचारी, साधनसामग्री व कामकाज पद्धती यांचा समावेश होतो.

**क) हर्वे वॉलकर :** वॉलकर यांनी लोकप्रशासनाची व्याप्ती व्यापक दृष्टिकोनातून केली आहे. त्यांनी लोकप्रशासनाच्या अभ्यासाचे दोन भागात वर्गीकरण केले आहे.

**१. प्रशासकीय सिद्धांत :** वॉलकर यांनी प्रशासकीय सिद्धांतात राष्ट्रीय, प्रांतीय, स्थानिक पातळीवरील सर्व प्रकारच्या सार्वजनिक प्रशासनाच्या संघटना, रचना, कार्यपद्धती, संसद, मंत्रीमंडळ यांचे प्रशासनावरील नियंत्रण, योजना, नियोजन, भरती, प्रशिक्षण या बाबींचा समावेश केला आहे.

**२. व्यवहारवादी प्रशासन :** वॉलकर यांच्या मते, व्यवहारवादी प्रशासनात कार्यकारी विभाग व कायदेमंडळ यांतील संबंध, मंत्री व सेवक वर्ग यांतील संबंध, अंदाजपत्रक निर्मिती, मंजुरी व अंमल-बजावणीची प्रक्रिया यांचा समावेश होतो.

**(ड) ल्यूथर ग्युलिक :** ल्यूथर ग्युलिक यांनी लोकप्रशासनाची व्याप्ती स्पष्ट करताना 'POSDCORB' ही संकल्पना वापरली आहे. त्या आधारे प्रशासनातील तत्त्वे आणि कार्ये विचारात घेऊन प्रशासन कार्याची व्याप्ती पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

१. P : Planning (नियोजन) : कार्याची रुपरेषा ठरविणे. तसेच ते कार्य यशस्वी करण्यासाठी योग्य ती कार्यपद्धती स्वीकारणे म्हणजे नियोजन होय.

२. O : Organization (संघटना) : प्रशासकीय कार्यासाठी विशिष्ट अशी संघटना निर्माण करावी लागते. विभाग, उपविभाग पाडून अधिकारपदांची रचना करावी लागते.

३. S : Staffing (कर्मचारी वर्गाची व्यवस्था) : कर्मचारी वर्गाची व्यवस्था करणे. त्यात प्रशासकीय कार्यासाठी लागणाऱ्या कुशल, पात्र, नोकरवर्गाची भरती करणे, त्यांना प्रशिक्षण देणे.

४. D : Directing (मार्गदर्शन करणे) : प्रशासनात कर्मचारी वर्गाला आदेश, सूचना देणे तसेच विशिष्ट निर्णय घेणे. वेळप्रसंगी मार्गदर्शन करणे.

५. CO : Co-ordination (समन्वय) : संघटनेच्या विविध विभागांत परस्परसंबंध प्रस्थापित करून त्यांच्यातील संघर्ष कमी करणे.

६. R : Reporting (अहवाल देणे) : प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रशासनासंबंधी माहिती दिली जाते. तसेच तपासणी, संशोधन व नोंदणीद्वारे माहिती जमवून अहवाल तयार करणे.

७. B : Budgeting (अंदाजपत्रक निर्मिती) : अंदाजपत्रक तयार करणे, त्याची मंजुरी, कार्यवाही, आर्थिक नियंत्रण, हिशोब व्यवस्था इत्यादी गोष्टींचा समावेश अंदाजपत्रक प्रक्रियेत केला जातो.

अशा प्रकारे ल्यूथर ग्युलिक यांनी लोकप्रशासनाची व्याप्ती स्पष्ट केली आहे.

**(इ) महत्त्व**

आधुनिक काळात लोकप्रशासनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आज आधुनिक समाज व्यापक स्वरूपाचा, जटील व गुंतागुंतीचा बनला आहे. प्रत्येक शासनपद्धतीत प्रशासन व्यवस्थेला महत्त्वाचे स्थान आहे. प्रगत राष्ट्रातील प्रशासनाचे अनुकरण अप्रगत राष्ट्रे करताहेत. त्या आधारावर राष्ट्रात विकास योजना राबवून स्वतःचा विकास करत आहेत. या प्रक्रियेत प्रशासकीय जबाबदारी, कार्यक्षमता, मानवी वर्तन यांनाही महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. साधारणपणे पुढील बाबीमुळे लोकप्रशासनाचे महत्त्व वाढले आहे.

१. लोकप्रशासनाकडे सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून पाहिले जाते.

२. लोकप्रशासन योजना व कार्यक्रमाच्या माध्यमातून जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करते.

३. लोकप्रशासन समाजातील समस्या सोडवून राष्ट्रात शांतता, स्थैर्य व एकता निर्माण करते.

४. लोकप्रशासन जनकल्याणासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन योजना ठरवून त्याची अंमलबजावणी करते. या माध्यमातून जनतेला चांगल्या सेवा पुरविल्या जातात.

५. अविकसित व विकसनशील राष्ट्रांचा विकास करण्यासाठी विकासप्रशासन महत्त्वाची भूमिका पार पाडते.

या विविध बाबींमुळे लोकप्रशासनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न ३**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ''लोकप्रशासनात अशा सर्व कृतींचा आणि कार्याचा समावेश केला जातो की, ज्यांचा उद्देश सार्वजनिक धोरणांची पूर्तता किंवा अंमलबजावणी करणे हा असतो.'' लोकप्रशासनाची ही व्याख्या .......... यांनी केली.

(अ) श्री. एल. डी. व्हाईट (ब) विड्रो विल्सन (क) ल्युथिर ग्युलिक

२. .......... या दृष्टिकोनात संघटनेतील सर्व घटकांचा आणि त्यांच्या सर्व कार्याचा समावेश केला जातो.

(अ) संकलित दृष्टिकोन (ब) व्यवस्थापनात्मक दृष्टिकोने (क) यापैकी नाही

३. लोकप्रशासनाची व्याप्ती स्पष्ट करताना .............. यांनी POCCC ही पाच तत्त्वे सांगितली.

(अ) हेन्री फेयॉल (ब) ल्युथर ग्युलिक (क) वॉलकर

४. ल्युथर ग्युलिक यांनी लोकप्रशासनाची व्याप्ती स्पष्ट करताना ............. ही संकल्पना मांडली.

(अ) POCCC (ब) MMM (क) POSDCORB

५. .............. यांनी लोकप्रशासनाच्या अभ्यासाचे प्रशासकीय सिद्धांत व व्यवहारवादी प्रशासन अशा दोन भागात वर्गीकरण केले.

(अ) विड्रो विल्सन (ब) पर्सी मॅक्वीन (क) वॉलकर

## १.२.४ आंतरराष्ट्रीय राजकारण

राष्ट्रा-राष्ट्रातील सत्ता संघर्षाला आंतरराष्ट्रीय राजकारण असे म्हणतात. साधारणपणे हा संघर्ष राष्ट्रीय हित, सत्ता व सामर्थ्य यासाठी होताना दिसतो. प्रस्तुत मुद्यांतर्गत आपण आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अर्थ, व्याख्या, स्वरूप व व्याप्ती यांचे अध्ययन करणार आहोत.

**(अ) अर्थ :**

आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे राष्ट्रा-राष्ट्रातील राजकारण होय. राष्ट्रा-राष्ट्रांत मित्रत्वाचे किंवा शत्रूत्वाचे संबंध असतात. तर काही राष्ट्रे तटस्थतेचे धोरण स्वीकारून आपले धोरण ठरवितात. आधुनिक काळात तंत्रज्ञानाचा विकास, औद्योगिकरण यांमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे काय ? हे त्याच्या व्याख्येवरून आपणांस अधिक स्पष्ट करता येते.

**(ब) व्याख्या :**

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या व्याख्या विविध विचारवंतानी केल्या आहेत. त्यातील निवडक व्याख्या पुढीलप्रमाणे :

**१. हॅन्स मॉर्गेन्थॉ** : राष्ट्रा-राष्ट्रांतील सत्तेसाठी चाललेला संघर्ष आणि सत्तेचा वापर म्हणजेच आंतरराष्ट्रीय राजकारण होय.

**२. मार्गारेट स्पाऊट** : आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे स्वतंत्र राजकीय समाजांचे उद्देश किंवा हितसंबध याबाबतच्या परस्परांतील विरोध व संघर्ष यामुळे निर्माण होणाऱ्या क्रिया आणि प्रतिक्रियांचा अभ्यास होय.

**३. केनेथ थॉम्पसन** : राष्ट्रा-राष्ट्रातील परस्पर संबंध बिघडविण्यास किंवा सुधारण्यास कारणीभूत ठरणारी परिस्थिती आणि संस्था यांचा अभ्यास म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारण होय.

**४. फेलिक्स ग्रॉस** : राष्ट्रांच्या विदेश नितींचा अभ्यास म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारण होय.

**५. स्टॅन्ले हॉफमन** : आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणावर परिणाम करणाऱ्या घडामोडींचा आणि घटनांचा अभ्यास होय.

**६. हार्टमन** : राज्ये ज्या क्रिया-प्रतिक्रियांद्वारे आपल्या राष्ट्रीय हितसंबंधाची सांगड इतर राष्ट्रांच्या हितसंबंधाशी घालतात त्या क्रिया-प्रतिक्रियांना आंतरराष्ट्रीय राजकारण असे म्हणतात.

**७. क्विन्सी राईट** : आंतरराष्ट्रीय राजकारण ही आपल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी कोणत्याही विरोधाला न जुमानता, जगातील प्रमुख गटावर आपल्या कुटील व्यूहरचनेचा प्रभाव पाडण्याची किंवा त्यांच्यावर आपले नियंत्रण प्रस्थापित करण्याची एक कला होय.

वरील आंतरराष्ट्रीय राजकारणांच्या विविध व्याख्यांवरून असे म्हणता येते की, राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये घडणाऱ्या विविध घडामोडी व त्यांच्यातील क्रिया-प्रतिक्रिया म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारण होय. 'आंतरराष्ट्रीय राजकारण' हा विषय पूर्वी राज्यशास्त्रामध्ये अभ्यासला जात होता. आज तो स्वतंत्र अभ्यासविषय म्हणून उदयास आला आहे. त्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका १९१८ मध्ये न्यूयॉर्क येथे स्थापन झालेल्या 'फॉरेन पॉलिसी असोसिएशन' आणि 'कौन्सिल ऑफ फॉरेन रिलेशन' या दोन संस्थांनी पार पाडली आहे.

**(क) स्वरूप**

आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप समजून घेण्यासाठी पुढील मुद्यांचे अध्ययन करणे गरजेचे आहे.

**१. आंतरराष्ट्रीय राजकारण एक सामाजिक शास्त्र** : आंतरराष्ट्रीय राजकारण हे शुद्ध शास्त्र नसून ते एक सामाजिक शास्त्र आहे. शुद्ध शास्त्र म्हणजे जसे रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र होय. शुद्ध शास्त्राप्रमाणे आंतरराष्ट्रीय राजकारणात परिक्षण निरीक्षण करून, प्रयोग करून निश्चित निष्कर्ष काढता येत नाहीत. कारण आंतरराष्ट्रीय राजकारणात मानवी वर्तन व्यवहारांचे अध्ययन केले जाते. तर मानवी वर्तन हे अचूक निष्कर्ष काढणे

कठीण बनते. तरीही त्यातून वास्तववादी निष्कर्ष काढले जातात. उदाहरणार्थ विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट राष्ट्राचे धोरण कसे होते ? पुढे त्यांचे धोरण कसे असू शकते ?

**२. आंतरराष्ट्रीय राजकारण एक स्वतंत्र अभ्यास विषय** : विसाव्या शतकात आज आंतरराष्ट्रीय राजकारण हा विषय एक स्वतंत्र अभ्यास विषय म्हणून उदयास आला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास स्वतंत्रपणे होऊ लागला. क्विन्सी राईट, के. एम. पॉपर, सी. ए. मेनिंग, हॅन्स मॉर्गेन्था, हॉफमन यांनी आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाला स्वतंत्र अभ्यास विषय मानले. त्यात राज्याचे अस्तित्व, ध्येयधोरणे, परराष्ट्र धोरण यांचा समावेश होतो. राष्ट्राच्या वर्तनाचा अभ्यास केला जाऊ लागला. गेल्या ५० वर्षांत या विषयाच्या अभ्यासाला अधिक गती व प्रोत्साहन मिळाले. हॅन्स मॉर्गेन्था, रिचर्ड स्नायडर व फ्रेड सोंडरमन यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाला स्वतंत्र अभ्यास विषय म्हणून दर्जा व महत्त्व देण्यास खूप प्रयत्न केले. पुढे १९५४ ला युनेस्कोने प्रसिद्ध केलेल्या सी. ए. डब्ल्यू. मेनिंग यांच्या अहवालात आठ राज्यांच्या उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमात आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाला स्वतंत्र दर्जा दिला.

**३. आंतरराष्ट्रीय राजकारण एक आंतरविद्याशाखीय विषय** : आंतरराष्ट्रीय राजकारण ही राज्यशास्त्राची एक उपविद्याशाखा आहे. तिचा संबंध इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, भूगोल व नितिशास्त्र या विषयांशी येतो. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करताना अन्य सामाजिक शास्त्रांच्या दृष्टिकोनातून विविध बाबींच्या आधाराद्वारे विश्लेषण करावे लागते. सामाजिक, आर्थिक दृष्टिकोनातून आंतरराष्ट्रीय राजकारणात निष्कर्ष काढले जातात. परिणामी आंतरराष्ट्रीय राजकारणाचा संबंध अन्य सामाजिक शास्त्रांशी येत असल्याने त्याला एक आंतरविद्याशाखीय विषय म्हणून संबोधले जात आहे.

**४. आंतरराष्ट्रीय राजकारण – एक कला** : क्विन्सी राईट यांच्या मते, राजकारण ही एक कला आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाला जेव्हा एक स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून ओळखले गेले तेव्हा ती एक कला किंवा कौशल्य म्हणून प्रकट झाले. तर आंतरराष्ट्रीय राजकारणात राजनय ही एक कला आहे. या राजनयाद्वारे राजकीय नेतृत्वे आपल्या राष्ट्राचे हितसंबध, प्रतिष्ठा यांचे संरक्षण व संवर्धन करीत असतात. अशा वेळी राजकीय नेते मुत्सद्देगिरी, चातुर्य वापरत असतात. म्हणून आंतरराष्ट्रीय राजकारणाला एक कला आहे असे म्हटले जाते.

**५. आंतरराष्ट्रीय राजकारण एक तत्त्वज्ञान** : क्विन्सी राईट यांच्या मते राजकीय नेते आपल्या कौशल्याद्वारे विशिष्ट विचारधारेची मांडणी करून एक तत्त्वज्ञान निर्माण करतात. उदाहरणार्थ : हिटलरने नाझी तत्त्वज्ञान, मुसोलिनीने फॅसिस्ट तत्त्वज्ञान, लेनीन, स्टॅलिन, माओ यांनी साम्यवादी तत्त्वज्ञान निर्माण करून सत्ता प्राप्त केली. याबरोबरच जागतिक शांततावाद, वसाहतवाद, साम्राज्यवाद, लोकशाहीकरण ही सुद्धा आंतरराष्ट्रीय संबंधाच्या तत्त्वज्ञानाची उदाहरणे आहेत.

### (ड) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे बदलते स्वरूप

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप बदलत चालले आहे. त्याचा अभ्यास पुढीलप्रमाणे करता येतो.

**१.** आधुनिक काळात सार्वभौम राष्ट्रांच्या संख्येत वाढ झाली आहे. १९४५ ला संयुक्त राष्ट्र संघटनेत ५१ सदस्य राष्ट्रे होती. आज १९२ सदस्य राष्ट्रे आहेत. या नवोदित राष्ट्रांमध्ये लोकशाही शासनपद्धती स्वीकारली आहे. परिणामी, जनतेचा सहभाग वाढला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप बदलत चालले आहे.

२. विसाव्या शतकात प्रचंड वेगाने औद्योगिक व तांत्रिक विकास घडून आला आहे. तसेच उत्पादन व आयात-निर्यात वाढून राष्ट्रा-राष्ट्रातील व्यापारी संबंध मजबूत होत आहेत. त्याच्या जोडीला शस्त्रनिर्मिती, अण्वस्त्र क्षेपणास्त्रांची खरेदी-विक्रीसाठी प्रचंड स्पर्धा निर्माण झाली आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप बदलले आहे.

३. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आंतरराष्ट्रीय राजकारणावर तेलाच्या राजनयाचा प्रभाव पडला आहे. तेलाची आजची गरज ओळखून तेल उत्पादक राष्ट्रे, अमेरिका व खरेदीदार राष्ट्रे यांच्यात तेलाचे राजकारण सुरू आहे. परिणामी राष्ट्रा-राष्ट्रांत संबंधाची फेररचना होत आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप बदलले आहे.

४. आधुनिक काळात व त्यानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात वेगवेगळ्या संघटनांची निर्मिती झाली आहे. उदाहरणार्थ, राष्ट्र संघ, संयुक्त राष्ट्र संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, विश्व बँक, विश्व व्यापार संघटना, नाटो, सिटो, युरोपियन युनियन, ब्रिक्स, सार्क इत्यादी होय. या विविध संघटना आंतरराष्ट्रीय राजकारणात सामाजिक, आर्थिक, शांतताविषयक क्षेत्रात महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. त्यातून आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप बदलत चालले आहे.

धार्मिक मूलतत्त्ववाद, दहशतवाद व वंशवाद यांच्या वाढत्या विस्ताराने, प्रभावाने आंतरराष्ट्रीय राजकारण बदलत चालले आहे. शिवाय विसाव्या शतकात आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासपद्धतीत बदल झाला आहे. नवनवे सिद्धांत मांडले जावून राजकारणाचे विश्लेषण केले जात आहे. परिणामी आंतरराष्ट्रीय राजकारणाचं स्वरूप बदलून गेले आहे.

### (इ) आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याप्ती

पूर्वी आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाचा अभ्यास राज्यशास्त्र व इतिहासात केला जात होता. त्यामुळे त्याची व्याप्ती मर्यादित होती. दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाला स्वतंत्र ज्ञान शाखा म्हणून ओळखले जावू लागले तेव्हापासून या विषयाच्या व्याप्तीत वाढ होत गेली. ग्रेसन कर्क यांच्या मते, १९४७ मध्ये अमेरिकेतील एका परराष्ट्र संबंध विषयक आयोगाने आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या व्याप्तीत राजकीय

व्यवस्थेचे स्वरूप व कार्य, राष्ट्रसत्तेवर प्रभाव पाडणारे घटक, राष्ट्रांचे परराष्ट्र धोरण, आंतरराष्ट्रीय संबंध आणि विश्वव्यवस्थेच्या निर्मितीची प्रक्रिया या पाच घटकांचा समावेश केला होता. पुढे १९५४ साली व्हिन्सेंट बेकर यांनी या अभ्यासात आंतरराष्ट्रीय संघटना, राष्ट्रसत्तेवरील नियंत्रण व वर्तमानकाळातील घटनांचा अभ्यास यांची भर घातली. पुढील काळात मॉर्गेन्था, मेनिंग, लॉसवेल अशा अनेक विचारवंतानी आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याप्ती स्पष्ट केली. या सर्व अभ्यासावरून आपणांस आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याप्ती पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

**१. राष्ट्रांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास** : आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्र अत्यंत महत्त्वाचे असते. राष्ट्रांच्या परस्परसंबंधातूनच आंतरराष्ट्रीय राजकारण घडत असते. प्रत्येक राष्ट्राचे अन्य राष्ट्राशी आर्थिक, राजकीय, व्यापारी, सांस्कृतिक अशा विविध प्रकारचे संबंध असतात. या सर्वांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या व्याप्तीत केला जातो.

**२. राष्ट्रीय सत्ता व तिच्या घटकांचा अभ्यास** : आंतरराष्ट्रीय राजकारण हे राष्ट्रीय सत्तेभोवती फिरत असते. प्रत्येक राष्ट्र राष्ट्रीय सत्तेसाठी विविध प्रकारची धोरणे ठरवित असते. प्रामुख्याने भौगोलिक घटक, लोकसंख्या, तंत्रज्ञान, विचारप्रणाली, नेतृत्व, राजकीय व आर्थिक व्यवस्था या घटकांवर राष्ट्रीय सत्ता निर्धारित होत असते. तेव्हा या सर्व घटकांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासक्षेत्रात केला जातो.

**३. आंतरराष्ट्रीय संस्था व संघटनांचा अभ्यास** : आंतरराष्ट्रीय राजकारणात विविध संस्था, संघटनांमुळे आमूलाग्र बदल होतो. तसेच संघटनांमुळे राष्ट्राचे परराष्ट्र धोरण त्याचे स्वरूप समजते. परिणामी, राष्ट्रसंघ, संयुक्त राष्ट्रसंघ, जागतिक व्यापार संघटना, जागतिक बँक, युरोपियन महासंघ, सार्क, ब्रिक्स अशा विविध संस्था-संघटना, त्याची कार्ये यांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासात केला जातो.

**४. राष्ट्रांचे परराष्ट्र धोरण व राजनयाचा अभ्यास** : प्रत्येक राष्ट्र-स्वराष्ट्राच्या संरक्षणासाठी, हितसंवर्धनासाठी विशिष्ट धोरणे स्वीकारत असते. आपले परराष्ट्र धोरण ठरविते. या परराष्ट्र धोरणाचा हेतू साध्य करण्यासाठी राजकीय नेते राजनयाचा आधार घेतात. राजनयाद्वारे नेते राष्ट्राचा विकास, हित साधण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासात राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणाचा व राजनयाचा अभ्यास केला जाऊ लागला.

**५. विचारप्रणालीचा अभ्यास** : आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्थित्यंतरे समजून घेण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप जाणून घेण्यासाठी विचारप्रणालीचा अभ्यास आवश्यक ठरतो. सद्य परिस्थितीत आंतरराष्ट्रीय राजकारणात वसाहतवाद, साम्राज्यवाद, भांडवलवाद, राष्ट्रवाद, अलिप्ततावाद, वंशवाद अशा विविध विचारप्रणालींचा अभ्यास केला जातो.

**६. आंतरराष्ट्रीय कायद्यांचा अभ्यास** : पहिल्या महायुद्धानंतर जागतिक पातळीवर विविध कायदे निर्माण करण्यात आले तर दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाली. त्याचे एक अंग म्हणून आंतरराष्ट्रीय न्यायालयाची निर्मिती करण्यात आली. बहुसंख्य राष्ट्रांनी या न्यायालयाचे निर्णय-कायदे पालन

केले. परिणामी जागतिक राजकारणात बदल झाले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासात आंतरराष्ट्रीय कायद्यांचा अभ्यास केला जाऊ लागला.

**७. आंतरराष्ट्रीय समस्यांचा अभ्यास :** आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप आधुनिक काळात बदलत चालले आहे. बदलत्या काळात आंतरराष्ट्रीय राजकारणासमारे नवनवीन सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, आरोग्यविषयक अशा अनेक समस्या उभारल्या आहेत. अशा वेळी या समस्यांचे सखोल अध्ययन होऊन त्याचे निराकरण करणे आवश्यक ठरते. हे काम आंतरराष्ट्रीय राजकारणाचे अभ्यासक करतात. यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासात या समस्यांचा अभ्यास केला जाऊ लागला.

याचबरोबर राष्ट्रा-राष्ट्रांमधील झालेली युद्धे, तह, करार तसेच विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट राष्ट्रांच्या राजकीय नेतृत्वाने राबविलेले परराष्ट्र धोरण, निशस्त्रीकरण व शस्त्रनियंत्रण यांचाही अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासात केला जातो. तसेच दुसऱ्या बाजूला आंतरराष्ट्रीय राजकारणात येणाऱ्या नवनवीन संकल्पना, शांतता व सहकार्यासाठीचे प्रयत्न यांचाही अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या व्याप्तीत केला जातो.

### (फ) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे महत्त्व

आंतरराष्ट्रीय राजकारण हा विषय अत्यंत महत्त्वपूर्ण व आवश्यक विषय आहे. पुढील कारणांसाठी आंतरराष्ट्रीय राजकारण या अभ्यास विषयाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

१. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासामुळे राष्ट्रा-राष्ट्रांतील परस्पर संबंध समजून येतात. त्यासाठी हा अभ्यास विषय महत्त्वाचा ठरतो.

२. जागतिक पातळीवरील विविध समस्यांचे आकलन होऊन त्यांची सोडवणूक करण्यासाठी आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास आवश्यक व उपयुक्त ठरतो.

३. जगातील प्रत्येक राष्ट्राचे परराष्ट्र धोरण कसे आहे? त्याला अनुरूप किंवा त्याविरोधी धोरणे विशिष्ट राष्ट्राकडून राबविली जातात. यांचे ज्ञान आंतरराष्ट्रीय राजकारणामुळे होते.

४. जागतिक राजकारणावर, अर्थकारणावर, व्यापारावर विविध गोष्टी प्रभाव पाडत असतात. त्या जाणून घेण्यासाठी आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

वरील विविध कारणांसाठी आंतरराष्ट्रीय राजकरणाच्या अभ्यासाला महत्त्व प्राप्त झाले आहे. अलीकडच्या काळात वाढती जागतिक शस्त्रस्पर्धा विचारात घेता ती थांबविणे व शांतता प्रस्थापित करणे या दृष्टीने आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाचे महत्त्व वाढत आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न – ४**

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. 'राष्ट्रा-राष्ट्रातील सत्तेसाठी चाललेला संघर्ष आणि सत्तेचा वापर म्हणजेच आंतरराष्ट्रीय राजकारण होय' ही आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याख्या कोणी केली ?

२. १९१८ मध्ये फॉरेन पॉलिसी असोसिएशन ही संस्था कोठे स्थापन झाली ?

३. सध्या संयुक्त राष्ट्र संघटनेत किती सभासद राष्ट्रे आहेत ?

## १.३ सारांश

राज्यशास्त्राच्या प्रमुख उपविद्याशाखा म्हणून राजकीय सिद्धांत, राजकीय प्रक्रिया, लोकप्रशासन आणि आंतरराष्ट्रीय राजकारण यांकडे पाहिले जाते. राज्यशास्त्राचा गाभा म्हणून राजकीय सिद्धांताला विशेष महत्त्व आहे. राजकीय सिद्धांतावर राज्यव्यवस्था व राज्यशास्त्र आधारले आहे. राजकीय सिद्धांतानुसारच राज्यसंस्थेची राजकीय प्रक्रिया सुरू असते. राज्यव्यवहाराची कार्यपद्धती जाणून घेण्यासाठी राजकीय प्रक्रियेचा अभ्यासाचा महत्त्वाचा ठरतो तर दुसऱ्या बाजूला जन कल्याण हा राज्यसंस्थेचा हेतू पूर्ण करण्यासाठी प्रशासनाची आवश्यकता असते. राज्यसंस्था जनकल्याणाच्या विविध योजना प्रशासनाच्या माध्यमातून राबविते, त्याला लोकप्रशासन असे म्हटले जाते. राज्यशास्त्राची एक उपविद्याशाखा म्हणून आज लोकप्रशासनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. तसेच जागतिक घडामोडी समजून घेण्यासाठी आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास आज महत्त्वाचा ठरतो. राष्ट्रा-राष्ट्रातील सत्ता संघर्ष, विविध प्रकारचे संबंध जाणून घेण्यासाठी आंतरराष्ट्रीय राजकारणाचे अध्ययन गरजेचे आहे. ही ज्ञानशाखा राज्यशास्त्राची एक महत्त्वाची उपविद्याशाखा असली तरी आज ती स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून विकसित झाली आहे. एकूणच अशा पद्धतीने आपणांस या राज्यशास्त्राच्या उपविद्याशाखांची तोंडओळख करून घेता येते.

## २.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

**१. आंतरराष्ट्रीय राजकारण** : राष्ट्रा-राष्टांमधील राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, व्यापारी अशा विविध प्रकारच्या संबंधामागील अभ्यास म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारण होय.

**२. राष्ट्र** : राज्य या सार्वभौम सत्तेखाली राहणारा व एकतेची भावना जपणाऱ्या समुहास राष्ट्र म्हणतात.

**३. परराष्ट्र धोरण** : स्वराष्ट्राचे हित जोपासण्यासाठी इतर राष्ट्राबरोबर ठरविलेले धोरण म्हणजे परराष्ट्र धोरण होय.

**४. राजकीय सिद्धांत** : राजकीय घडामोडींचे स्पष्टीकरण, मूल्यमापन यांचा शोध घेणाऱ्या विचारांचा समूह म्हणजे राजकीय सिद्धांत होय.

**५. राजकीय प्रक्रिया** : राज्यव्यवस्थेचा व्यवहार, कायदे करणे व त्याची अंमलबजावणीची पद्धत म्हणजे राजकीय प्रक्रिया होय.

**६. लोकप्रशासन** : लोककल्याणासाठी कायद्याची पद्धतशीरपणे केलेली अंमलबजावणी व त्यासाठी उभारलेली यंत्रणा म्हणजे लोकप्रशासन होय.

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### स्वयं अध्ययन प्रश्न १

(१) १९७३ (२) सेबाईन (३) ॲरिस्टॉटल

(४) राजकीय साहित्य व मूलभूत दस्तऐवज (५) ॲरिस्टॉटल

(६) कार्ल मार्क्स (७) जे. एस. मिल

### स्वयं अध्ययन प्रश्न २

(१) रजनी कोठारी (२) पॉल ब्रास (३) हेबरमास

(४) The Congress System in India

### स्वयं अध्ययन प्रश्न ३

(१) प्रो. एल. डी. व्हाईट (२) संकल्पित दृष्टिकोन (३) हेन्री फेयॉल

(४) POSDCORB (५) वॉलकर

### स्वयं अध्ययन प्रश्न ४

(१) हॅन्स मॉर्गेन्था (२) न्यूयॉर्क (३) १९२

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

### दीर्घोत्तरी प्रश्न

१. राजकीय सिद्धांत म्हणजे काय ? ते सांगून राजकीय सिद्धांताचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करा.

२. राजकीय प्रक्रियेचा अर्थ, स्वरूप व व्याप्ती विशद करा.

३. लोकप्रशासन म्हणजे काय ते सांगून त्याचे स्वरूप व व्याप्ती विशद करा.

४. आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे काय ? ते सांगून त्याची व्याप्ती विशद करा.

**टीपा लिहा.**

१. राजकीय सिद्धांताचे स्वरूप

२. राजकीय प्रक्रियेचे स्वरूप

३. लोकप्रशासनाचे स्वरूप

४. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप व बदलते स्वरूप

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. भोळे भा. ल., राजकीय सिद्धांत, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

२. डॉ. देव विजय, राजकीय संकल्पना आणि सिद्धांत, डायमंड प्रकाशन, पुणे.

३. डॉ. जैन अशोक व डॉ. पवार शिरीष, राजकीय सिद्धांताची मूलतत्त्वे, सेठ प्रकाशन, मुंबई २००४.

४. प्रा. बंग के. आर., लोकप्रशासन, तत्त्वे आणि सिद्धांत,

५. शिरसाठ श्याम, लोकप्रशासनशास्त्र,

६. रायपुरकर व्ही. आर., आंतरराष्ट्रीय संबंध, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००१.

७. देवळाणकर शैलेंद्र, आंतरराष्ट्रीय संबंध व राजकारण,

८. डॉ. अमृतकर प्रशांत, आंतरराष्ट्रीय संबंध, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २००४.

## घटक – ३

# राज्य आणि लोकशाही

## ( State & Democracy )

३.० उद्दिष्ट्ये (Objectives)

३.१ प्रास्ताविक (Introduction)

३.२ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

- ३.२.१ राज्याचा अर्थ (Meaning)
- ३.२.२ राज्याचे घटक (Organs of State)
- ३.२.३ लोकशाही – अर्थ (Democracy meaning)
- ३.२.४ लोकशाही – प्रकार (Forms of Democracy)
  - ३.२.४.१ प्रत्यक्ष लोकशाही (Direct Democracy)
  - ३.२.४.२ अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधीक लोकशाही (Representative Democracy)
  - ३.२.५ लोकशाही– वैशिष्ट्ये (Features of Democracy)
  - ३.२.६ लोकशाही– महत्त्व (Importance of Democracy)
  - ३.२.७ लोकशाहीसमोरील आव्हाने (Challenges before Democracy)

३.३ सारांश (Summary)

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ (Terms to remember)

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे १, २, ३ (Answer to check your progress)

३.६ सरावासाठी स्वाध्याय (Exercise)

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके (Reference for further study)

## ३.० उद्दिष्ट्ये (Objectives)

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास

१. राज्याचा अर्थ आणि राज्याचे घटक यांची ओळख होईल.

२. लोकशाहीचा अर्थ आणि प्रकार समजण्यास मदत होईल.

३. लोकशाहीची वैशिष्ट्ये व महत्त्व यांचा अभ्यास करता येईल.

४. लोकशाहीसमोरील आव्हानांची माहिती होईल.

## ३.१ प्रास्ताविक (Introduction)

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. मनुष्याच्या समूहवृत्तीतूनच समाज निर्माण झाला आहे. मानवाने आपल्या विविध गरजा भागविण्यासाठी अनेक संस्था निर्माण केल्या आहेत. काही संस्था निसर्गतःच निर्माण झालेल्या आहेत तर काही संस्था जाणीवपूर्वक मानवाने निर्माण केल्या आहेत. त्या संस्थाकडून मानवी गरजा भागविल्या जावू लागल्या. अर्थातच व्यक्तीचे संबंध संस्थांशी वाढत गेले. कालांतराने त्यांच्यात अनेकदा संघर्षाचे प्रसंग निर्माण होऊ लागले. संघर्ष सोडवले नाहीत तर समाज जीवनच अशक्य होऊन बसेल म्हणून संघर्ष टाळून माणसामाणसांमध्ये परस्पर सहकार्य वृद्धींगत करण्यासाठी आणि मानवी जीवन सुखी करण्यासाठी राज्यसंस्थेची निर्मिती झाली.

राज्य ही एक सर्वव्यापी आणि आवश्यक संस्था आहे. प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्यातरी राज्याची सदस्य असते. सुखी स्वयंपूर्ण आणि श्रेष्ठ जीवनाच्या प्राप्तीसाठी राज्यसंस्था आवश्यक ठरली आहे. सदर प्रकरणात राज्याचा अर्थ, राज्याचे घटक तसेच लोकशाहीचा अर्थ, प्रकार, वैशिष्ट्ये, महत्त्व आणि लोकशाहीसमोरील आव्हाने इत्यादी गोष्टी समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## ३.२. विषय विवेचन

### ३.२.१ राज्याचा अर्थ

मानवाने आपला विकास करून घेण्यासाठी अनेक संस्थांची निर्मिती केली आहे. मानवी जीवनाच्या गरजा भागविण्यासाठी राज्य अस्तित्वात आले आणि श्रेष्ठ जीवन प्राप्त करून देण्याच्या उद्देशाने ते आजतागायत टिकून आहे. असे ग्रीक विचारवंत ॲरिस्टॉटल यांनी म्हटले आहे. आपण पाहतो की, राज्याशिवाय कोणतीही व्यक्ती सुरक्षित जीवन जगू शकत नाही. राज्य असेल तर समाजात गोंधळ अराजकाची अवस्था निर्माण होईल. समाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्याला सर्वश्रेष्ठ सामाजिक संघटनेचा दर्जा प्राप्त झाला आहे. प्रत्येकाला राज्याची आज्ञा पाळणे बंधनकारक असते. राज्याचे सदस्यत्व हे अनिवार्य असते. व्यक्तीची इच्छा असो अथवा नसो त्याला राज्यसंस्थेचे सभासद व्हावेच लागते. राज्याच्या आधीन रहावे लागते. अशा रीतीने राज्य ही सर्वव्यापी, आवश्यक आणि सर्वश्रेष्ठ संघटना आहे.

मानवी जीवनाच्या प्रारंभ काळापासून कोणत्या ना कोणत्या स्वरूपात राज्याचे अस्तित्व आढळून येते. महाभारत, रामायण या ग्रंथात राज्याचा उल्लेख आढळतो. कौटिल्याच्या अर्थशास्त्र या ग्रंथात राज्याची सप्तांगे आढळतात. स्वामी, अमात्य, जनपद, कोष, दुर्ग, दंड आणि मित्र ही अंगे आवश्यक आणि महत्त्वाची मानली होती. प्राचीन भारतीय राजनितीत राजांच्या अधिसत्तेखाली असणाऱ्या प्रदेशाला राज्य असे संबोधले होते. ग्रीक विचारवंत ॲरिस्टॉटल यांनी प्राचीन ग्रीक नगरराज्यांचा अभ्यास करून 'पॉलिटीक्स' हा ग्रंथ लिहिला आहे. इटालियन विचारवंत मॅकियाव्हेली यांनी आपल्या 'प्रिन्स' ग्रंथात राज्य या संस्थेचे स्वरूप स्पष्ट केले आहे. 'शासनयुक्त समाज' या अर्थाने 'राज्य' या शब्दाचा वापर सर्वप्रथम इटलित मॅकियाव्हेलींने केला होता.

आज राज्यसंस्था ही मानवी जीवनाचे केंद्रस्थान बनले आहे. आजच्या काळात व्यक्तीशिवाय राज्य आणि राज्याशिवाय व्यक्ती आढळून येत नाही. इतके दोघांचे अतूट संबंध निर्माण झाले आहेत. म्हणूनच ॲरिस्टॉटलने "A man living alone is either a God or a Beast" असे म्हटले आहे. ''राज्याशिवाय राहणारी व्यक्ती ही एकतर परमेश्वर तरी असली पाहिजे किंवा हिंस्त्र पशू तरी !'' ''मानवाच्या सामाजिक वर्तनाचे नियमन करण्यासाठी दंडशक्तीचा पाठिंबा लाभलेली समाजातील सर्व घटकांवर नियंत्रण ठेवून मानवाचे जीवन सुखी व समाधानी बनविणारी, त्यासाठी समाजात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करणारी एकमेव मानवी संस्था म्हणजे 'राज्य' होय. म्हणून राज्याला संस्थांची संस्था (Institution of the Institutions) असे संबोधले जाते.

**राज्याची व्याख्या** (Definition of State)

राज्याच्या व्याख्यासंबंधी राजकीय विचारवंतात एकमत आढळत नाही. कारण प्रत्येकाचा राज्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन भिन्न आहे. विविध राज्यशास्त्रज्ञांनी केलेल्या काही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे-

१. ॲरिस्टॉटल यांच्या मते - 'स्वयंपूर्ण, सुखी आणि समृद्ध जीवन जगण्यासाठी कुटुंबांचा व खेड्यांचा मिळून निर्माण झालेला संघ म्हणजे राज्य होय.' (State is a union of families and villages having for its end a perfect and self sufficient life by which we mean a happy and honourable life.)

२. ब्लंटश्ली यांच्या मते - 'एका निश्चित भूप्रदेशावर राजकीयदृष्ट्या संघटीत झालेला लोकसमुदाय म्हणजे राज्य होय'. (The state is the politically organized people of a definite territory).

३. प्रा. ऑगबर्न यांच्या मते - 'निश्चित भूप्रदेशावर सर्वोच्च शासनातर्फे राज्यकारभार करणारी संघटना म्हणजे राज्य होय. (A state is an organization which rules by means of a supreme Government over a definite territory.)

४. प्रे. वुड्रो विल्सन यांच्या मते - 'निश्चित अशा भूप्रदेशात कायद्यासाठी सुसंघटीत झालेला लोकसमुदाय म्हणजे राज्य होय.' (The state is a people organized for law within a definite territory.)

५. प्रो. गेटेल यांच्या मते– 'निश्चित भूप्रदेशात कायमची वस्ती करून राहणारा कायदेशीरदृष्ट्या बाह्य नियंत्रणापासून स्वतंत्र असलेला कायदे निर्माण करून आपल्या अधिकारक्षेत्रात असलेल्या सर्व व्यक्ती व समुहांवर सुसंघटीत शासनसंस्थेच्याद्वारे शासन करणारा संघ म्हणजे राज्य होय.'

६. ऑपेन हेम यांच्या मते – 'जेव्हा लोक आपल्या स्वतःच्या सार्वभौम शासनसंस्थेच्या नियंत्रणाखाली एका देशात स्थायिक होतात तेव्हा राज्य अस्तित्वात येते'.

७. प्रो. गार्नर यांच्या मते – 'निश्चित अशा भूप्रदेशावर कमी–जास्त संख्येने कायम वस्ती करून राहणारा बाह्य नियंत्रणापासून स्वतंत्र असणारा आणि ज्यातील बहुसंख्य लोक ज्याची आज्ञा स्वाभाविकपणे पाळतात अशी सुसंघटीत शासनसंस्था असणारा समाज म्हणजे राज्य होय.'

वरील व्याख्यांचा आशय विचारात घेतला असता आपणास या व्याख्यांच्या शब्दरचनेमध्ये फरक वाटत असला तरी राज्याच्या मुलभूत वैशिष्ट्याबाबत त्यांच्यात एकमत आहे ती वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे दिसतात.

१. निश्चित भूप्रदेश असला पाहिजे.

२. त्या भूप्रदेशावर कायम वस्ती करून राहणारा लोकसमूह पाहिजे.

३. तो लोकसमूह बाह्य नियंत्रणापासून मुक्त असला पाहिजे.

४. त्या लोकसमूहाची सामूहिक इच्छा ज्याद्वारे व्यक्त होते आणि अंमलात आणली जाते अशी सर्वोच्च सत्ता असली पाहिजे. या चार घटकांच्या संयोगातून राज्य अस्तित्वात येते.

### ३.२.२ राज्याचे घटक (Organs of State)

प्राचीन काळापासून ते आजतागायत राज्याच्या बाह्य स्वरूपात बरेच बदल घडून आले आहेत. स्थळ, काळ, परिस्थितीप्रमाणे राज्याचे कार्यक्षेत्र, आकारमान, व्यक्ती आणि राज्य यातील संबंध यात बदल घडून आले आहेत पण राज्यसंस्थेचे मुलभूत स्वरूप कायम राहिलेले आहे. हे स्वरूप जाणून घेणेसाठी आणि राज्यसंस्था इतर संस्थाहून कोणत्या प्रकारे वेगळी आहे हे जाणून घेण्यासाठी राज्याच्या चार घटकांची माहिती घेणे आवश्यक आहे.

#### १. लोकसंख्या (Population)

राज्याच्या निर्मितीसाठी लोकसंख्या आवश्यक घटक आहे. लोकसंख्या नसेल तर राज्याची आवश्यकताच उरणार नाही. मानवाच्या समूहवृत्तीतून राज्याची निर्मिती झाली. लोक नसलेल्या निर्जन प्रदेशाला राज्य म्हणता येत नाही. लोकांशिवाय राज्याची कल्पना करणे शक्य नाही. लोक नसतील तर शासनसंस्था व शासनकर्ते राहणार नाहीत. समाजाचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी लोकांनी राज्यसंस्था निर्माण केली आहे.

राज्याची लोकसंख्या किती असावी हा मुद्दा व्यवस्थेच्यादृष्टीने गौण आहे. किमान किती लोकसंख्या असावी अशा अर्थाचा नियम कोणी केलेला नाही. पण आदर्श राज्य निर्माण होण्यासाठी अनेक विचारवंतांनी

राज्याच्या लोकसंख्येविषयी विचार व्यक्त केलेले आहेत. प्लेटोच्या मताप्रमाणे आदर्श राज्यात ५०४० इतकी लोकसंख्या पुरेसी आहे. ॲरिस्टॉटल या विचारवंतांने राज्याची लोकसंख्या १०,००० इतकी असावी असे सांगितले आहे. कारण एवढीच लोकसंख्या त्यांनी राज्यासाठी आदर्श मानली होती.

लोकसंख्या किती असावी याबाबत नियम नाही. कारण जगामध्ये एका बाजूला चीन, भारत यासारखी विशाल लोकसंख्या असलेली राज्ये आहेत. तर दुसऱ्या बाजुला मोनॅको, सॅमरिनो यासारखी कमी लोकसंख्या असलेली राज्ये आहेत. लोकसंख्येबाबत विचारवंतात मतभेद आढळतात. राज्याची लोकसंख्या अधिक असल्यास राज्याला उदरनिर्वाहाचा प्रश्न, अंतर्गत शांतता, राहणीमानाचा दर्जा असे प्रश्न भेडसावतात. याउलट लोकसंख्या कमी असेल तर संरक्षणाचा प्रश्न उभा राहतो. म्हणून याबाबत असे म्हणता येईल की, राज्याचा भूप्रदेश आणि साधनसामग्री या प्रमाणात लोकसंख्या असावी.

लोकसंख्या किती असावी यापेक्षा लोक कोणत्या गुणाचे, दर्जाचे आहेत हे महत्त्वाचे असते. कारण त्यावरच राज्याचा दर्जा, प्रतिष्ठा अवलंबून असते. हुशार, कार्यक्षम, देशाभिमानी, चारित्र्यवान, श्रमाची आवड असणारे लोकच देशाचा विकास करू शकतात. याउलट देशद्रोही, स्वार्थी, भित्रे, आळशी, भ्रष्टाचारी लोक राज्याचे अस्तित्व धोक्यात आणतात. म्हणूनच ॲरिस्टॉटल यांनी म्हटले आहे की, 'आदर्श नागरिकच आदर्श राज्य निर्माण करू शकतात.'

### २. भूप्रदेश (Territory)

राज्यनिर्मितीसाठी दुसरा महत्त्वाचा घटक भूप्रदेश हा आहे. भूप्रदेशाशिवाय राज्याची निर्मिती होवू शकत नाही. प्राचीन काळी मनुष्य भटकंती अवस्थेत राहत होता. त्याकाळी माणसांच्या टोळ्या शिकार करून त्यावर आपली गुजराण करीत असत. टोळ्या एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकंती करत असे. त्यामुळे त्यांना राज्य निर्माण करता आले नाही. १९४७ पूर्वी ज्यू लोक हे सर्वत्र जगभर विखुरलेले होते. त्यामुळे त्यांना स्वतःचे राज्य निर्माण करता आले नव्हते. मात्र जेव्हा त्यांना पॅलेस्टाईनचा भूप्रदेश देण्यात आला तेव्हा त्याचे इस्त्राईल हे राज्य निर्माण झाले.

राज्याचा भूप्रदेश किती असावा हा प्रश्न महत्त्वाचा नसून तो प्रदेश राज्याच्या विकासाला किती उपयुक्त आहे हे महत्त्वाचे असते. राज्याची भूमी सुपीक आहे की नापीक, खनिजसंपत्ती आहे की नाही, राज्याच्या सीमा निसर्गनिर्मित आहेत की मानवनिर्मित आहेत आदी गोष्टींचा विचार सातत्याने करावा लागतो. कारण या गोष्टींचा परिणाम राज्यावर होतो. म्हणजे ज्या देशात लोखंड, कोळसा, पेट्रोल, युरेनियम इत्यादी खनिज संपत्ती मुबलक आहे. ती राष्ट्रे इतर राष्ट्रापेक्षा औद्योगिक व आर्थिक प्रगती झपाट्याने करू शकतात.

राज्याचा भूप्रदेश किती असावा याविषयी विचारवंतात एकमत नाही. ग्रीक तत्त्ववेत्त्यांनी राज्याचे क्षेत्रफळ मर्यादीत असावे असे सांगितले कारण राज्यकर्त्याला २४ तासाच्या अवधित घोड्यावरून रपेट करून एका सरहद्दीवरून दुसऱ्या सरहद्दीवर जाता येईल व नियंत्रण करता येईल इतका भूप्रदेश असावा.

आज अमेरिका, सोव्हिएट रशिया, भारत, चीन ही राज्ये आकाराने मोठी आहेत. तर नेपाळ, पोलंड, सॅनमरिनो, बार्बाडोस इत्यादी राज्ये आकाराने लहान आहेत. सॅनमरिनोचे क्षेत्रफळ ६१ चौ.कि.मी. तर मोनॅकोचे क्षेत्रफळ १.९५ चौ.कि.मी. आहे. त्यामुळे राज्याचा भूप्रदेश किती असावा याविषयी मर्यादा नाही. पण भूभागाबाबत काही प्रश्नांचा विचार होणे गरजेचे आहे. उदा. (१) राज्याचा भूप्रदेश हा तेथील लोकसंख्येला पुरेसा आहे किंवा नाही. (२) राज्याच्या संरक्षणाच्यादृष्टीने तो भूप्रदेश सुरक्षित आहे का ? (३) खनिज संपत्तीच्या दृष्टीने भूभाग कसा आहे इत्यादीचा विचार करावा लागतो.

### ३. **शासनसंस्था** (Government)

राज्यनिर्मितीसाठी आवश्यक तिसरा घटक म्हणजे शासनसंस्था होय. राज्य ही अमूर्त संकल्पना असून शासनसंस्था किंवा सरकार हे त्याचे मूर्त स्वरूप आहे. समाजाच्या संरक्षणासाठी, समाजजीवन सुरळीत चालू राहण्यासाठी काही नियमांची गरज असते. हे नियम तयार करणे, त्यांची अंमलबजावणी करणे हे कार्य शासनसंस्था करते. राज्यात सरकार नसेल तर अराजकता, अस्थिरता निर्माण होवू शकते. शासनसंस्थेच्या पाठीमागे सार्वभौम सत्ता असते. या सत्तेच्या बळावर सरकार राज्यातील नागरिकावर हक्क गाजविते. सरकारच्या नियमाविरुद्ध जो कोणी वर्तन करेल त्याला शिक्षा करण्याचा अधिकार शासनसंस्थेला असतो.

राज्याची सार्वभौम सत्ता प्रत्यक्ष अंमलात आणणाऱ्या किंवा अंमलात आणण्याची शक्ती असणाऱ्या सर्व संघटनांची गोळाबेरीज म्हणजे शासन होय, असे प्रो. गेटेल यांनी म्हटले आहे. शासनसंस्थेशिवाय समाजात एकसूत्रता येत नाही आणि सुव्यवस्थाही निर्माण होत नाही. व्यक्तीच्या किंवा नागरिकांच्या दृष्टीने सरकार म्हणजेच राज्य होय. व्यक्तीच्या मनात जसे सरकारचे स्वरूप असेल तसे राज्याचे स्वरूप निर्माण होते. कारण सरकारशी व्यक्तीचा नेहमीच संबंध येतो. नवीन कायद्यांची निर्मिती करणे, जुने कायदे रद्द करणे, जुन्या कायद्यात दुरुस्ती करणे हे प्रमुख कार्य शासनसंस्थेला करावे लागते.

राज्यात शासनसंस्थेचा कोणताही प्रकार असो तेथे शासनपद्धती असते. उदा. भारत, इंग्लंड या देशात संसदीय शासनपद्धती, अमेरिकेत अध्यक्षीय शासनपद्धती, चीन, रशिया, बल्गेरिया या देशात साम्यवादी शासनपद्धती आहे. शासनसंस्थेकडून आंतरराष्ट्रीय क्षेत्रात पत, प्रतिष्ठा आणि महत्त्व वाढविण्याचे कार्य केले जाते. लोकमताच्या पाठिंब्यावरच शासनसंस्थेचे स्थैर्य अवलंबून असते. त्यामुळे देशात कोणताही प्रकार असो तेथे शासनसंस्था लोककल्याणकारीच असली पाहिजे अशीच जनतेची इच्छा असते.

### ४. **सार्वभौमत्व (Sovereignty)**

सार्वभौमत्व हा राज्यनिर्मितीचा चौथा आवश्यक घटक आहे. सार्वभौमत्व म्हणजे राज्याची सर्वोच्च सत्ता, अंतिम सत्ता. सार्वभौमत्व म्हणजे राज्याचे स्वतंत्र अस्तित्व. राज्य हे अंतर्गत व बाह्य बाबतीत कोणताही निर्णय घेण्यास स्वतंत्र असले पाहिजे. पारतंत्र्यात असलेले राज्य हे सार्वभौम असू शकत नाही. कारण अशा राज्यासंबंधीचा निर्णय दुसरे एखादे राज्य घेत असते.

सार्वभौमत्व हा राज्याचा प्राण, आत्मा असतो. प्राणाशिवाय व्यक्तीचे अस्तित्व जसे टिकू शकत नाही तसे सार्वभौमत्वाशिवाय राज्य अस्तित्वात येऊच शकत नाही. १९४७ पूर्वी भारत पारतंत्र्यात होता. भारताच्या राज्यकारभाराची अंतिम सूत्रे ब्रिटीश पार्लमेंटच्या हाती होती. १९४७ ला भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले आणि ब्रिटीश पार्लमेंटच्या हातातील सार्वभौम सत्ता भारताच्या हाती आली. भारताला स्वतंत्र राज्याचा दर्जा प्राप्त झाला. सार्वभौमत्वामुळे इतर सर्व संस्थांना राज्याच्या अधिन राहून कार्य करावे लागते.

अशारितीने राज्यनिर्मितीसाठी लोकसंख्या, भूप्रदेश, शासनसंस्था आणि सार्वभौमत्व असे चार घटक आवश्यक आहेत. यातील एखादा घटक जरी कमी असला तरी राज्य निर्माण होवू शकत नाही.

**स्वयंअध्ययन प्रश्न १**

**रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. राज्य ही ............ ही संकल्पना आहे.
(मूर्त, अमूर्त, वास्तव, साधी)

२. ............ या प्रदेशात ज्यू लोकांनी इस्त्रायल हे राज्य निर्माण केले.
(मोनॅको, नायझेरिया, पॅलेस्टाईन, फ्रान्स)

३. प्लेटोच्या कल्पनेप्रमाणे आदर्श राज्यात ............ इतकी लोकसंख्या पुरेसी आहे.
(१०००, १००००, ५०४०, ५०००)

४. प्राचीन काळी ग्रीक नगरराज्यात ............ लोकशाही होती.
(प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, नियंत्रित, अनियंत्रित)

५. राज्याच्या निर्मितीसाठी ............ घटक आवश्यक असतात.
(दोन, तीन, चार, पाच)

६. ब्रिटीश पार्लमेंटच्या हातातील सत्ता भारताच्या हाती ............ साली आली.
(१९५०, १९४५, १९४७, १९३५)

७. चीन या देशात ............ शासनपद्धती आहे.
(लोकशाही, साम्यवादी, भांडवलवादी, संसदीय)

### ३.२.३ (ब) लोकशाही (Democracy)

आधुनिक युग हे लोकशाही युग मानले जाते. आधुनिक काळात लोकशाहीचा उदय सर्वप्रथम इंग्लंडमध्ये झाला. म्हणून इंग्लंडला लोकशाहीची जननी मानले जाते. जगातील बहुतेक देशात लोकशाही शासनपद्धती अस्तित्वात आहे. लोकांच्या इच्छेवर आधारित लोकशाही सरकार लोकांना जबाबदार असते. लोकांच्या

हितासाठी शासन करणे हे लोकशाही शासनाचे मुख्य सूत्र आहे. त्यामुळे या विचारसरणीला सर्वाधिक लोकप्रियता मिळाली. जगातील आज २/३ राष्ट्रे लोकशाही राष्ट्रे म्हणून ओळखली जातात.

**लोकशाहीचा अर्थ (Meaning)**

प्रथम आपणास लोकशाही हा शब्द कोणत्या अर्थाने वापरला जातो याकडे लक्ष द्यावे लागते. इंग्रजीतील या शब्दाचे मराठीत लोकशाही असे भाषांतर केले आहे. लोकशाही म्हणजे 'लोकांची सत्ता, लोकांनी चालविलेली प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सत्ता होय.' हा शब्द मूळ ग्रीक शब्द Demos आणि Kratos या दोन शब्दांपासून बनला आहे. Demos म्हणजे लोक आणि Kratos म्हणजे सत्ता किंवा शक्ती यावरून लोकशाही म्हणजे लोकांची सत्ता किंवा लोकांचे राज्य होय. 'जेथे राज्याची संपूर्ण सत्ता जनतेच्या हाती केंद्रीत झालेली असते आणि जनता प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे त्या सत्तेचा वापर करत असते असे राज्य म्हणजे लोकशाही राज्य होय.'

प्राचीन ग्रीक नगरराज्यात लोकांची प्रत्यक्ष सत्ता होती. लोक राज्यकारभारात प्रत्यक्ष भाग घेत होते. परंतु आधुनिक काळात वाढत्या लोकसंख्येमुळे लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी राज्यकारभार चालवितात. लोकांची संमती आणि लोकांची टिका या प्रक्रियेतून लोकशाहीचा कारभार चालतो. काही राजकीय विचारवंतांनी लोकशाहीच्या व्याख्या पुढीलप्रमाणे केल्या आहेत.

१. अब्राहम लिंकन यांच्या मते, 'लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले शासन होय.' (Democracy is the Government of the people, by the people and for the people.)

२. लॉर्ड ब्राईस यांच्या मते, 'लोकशाही म्हणजे असा शासनप्रकार की ज्यात सत्ता एखाद्या विशिष्ट वर्गाच्या हाती नसते. तर संपूर्ण जनतेच्या हाती असते'.

३. प्रा. सिलीच्या मते, 'ज्या शासनात प्रत्येकाला सहभागी होता येते ती लोकशाही होय'. (Democracy is a Government in which everyone has a share).

४. प्रा. डायसी यांच्या मते, 'लोकशाही हे शासनाचे असे रूप आहे की, ज्यात जनतेचा फार मोठा भाग शासन करतो.

५. हर्नशॉम यांच्या मते, 'ज्या शासनपद्धतीमध्ये सार्वभौम सत्ता जनतेच्या हाती असते व जनतेचे संपूर्ण नियंत्रण शासन कारभारावर असते ती लोकशाही होय.'

६. डॉ. बेनीप्रसाद यांच्या मते, 'लोकशाही ही अशा प्रकारची जीवनपद्धती आहे की, ज्यात कोणत्याही व्यक्तीला आपले सुख साध्य करण्यासाठी इतर व्यक्तींना साधन बनविता येत नाही.'

७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, 'लोकशाही हा असा प्रकार आहे की, ज्यात सामाजिक व आर्थिक परिवर्तन हे शांततामय व कायदेशीर मार्गाने होते'.

८. पं. नेहरू यांच्या मते, 'लोकशाही म्हणजे केवळ मतदानाच्या हक्कासंबंधीची राजकीय समता नव्हे तर राजकीय समतेबरोबर आर्थिक व सामाजिक समता प्रस्थापित करणे होय.'

९. म. गांधी यांच्या मते, 'लोकशाही हा एक जीवनमार्ग आहे. (Democracy is a way of life.)

लोकशाहीच्या विविध व्याख्यांचा परामर्श घेतल्यास असे दिसून येते की, लोकशाही ही शासनाची अशी पद्धत आहे की ज्यामध्ये लोक सार्वभौम आहेत. राज्याची सत्ता समाजातील विशिष्ट वर्गाच्या हाती नसते. राज्य लोकांच्यासाठी चालविले जात असून प्रत्येक व्यक्तीला लोकशाहीत सहभागी करून घेतले जाते. लोकमताच्या विरोधी शासन या पद्धतीत नसते. लोकशाही ही एक व्यापक संकल्पना आहे. ती एक शासनाचा प्रकार आणि जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे.

### ३.२.४ लोकशाहीचे प्रकार (Types of Democracy)

जगातील सर्व लोकशाही देशात शासनसंस्थेचे स्वरूप, तिची रचना एकसारखी नाही. तिची कार्यपद्धती एकसारखी नाही. त्यात काही मुलभूत स्वरूपाचे फरक दिसून येतात. त्याआधारे लोकशाहीचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष लोकशाही असे प्रमुख दोन प्रकार पाडले आहेत. अप्रत्यक्ष लोकशाहीचे संसदीय आणि अध्यक्षीय लोकशाही असे प्रकार पडतात तर संसदीय लोकशाहीचे मर्यादीत राजेशाही आणि प्रजासत्ताक असे प्रकार पाडले आहेत.

### ३.२.४.१. प्रत्यक्ष लोकशाही (Direct Democracy)

प्रत्यक्ष लोकशाहीचा इतिहास फार जुना आहे. प्राचीन नगर राज्यात प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात होती. शासनाचे निर्णय सर्व नागरिक मिळून घेतात. तिला प्रत्यक्ष लोकशाही असे म्हणतात. ज्या शासनपद्धतीमध्ये राज्यातील सर्व नागरिक शासनकारभारामध्ये प्रत्यक्ष सहभागी होतात. त्या शासनपद्धतीस प्रत्यक्ष लोकशाही असे म्हणतात. ग्रीक नगरराज्यातील नागरिक एकत्र येवून शासनाच्या प्रश्नाबद्दल, विविध समस्यांची चर्चा करीत असत. निर्णय नागरिक स्वतः घेत असत. प्रत्यक्ष लोकशाहीत नागरिक स्वतः शासनात सक्रीय भाग घेत असल्यामुळे ही एक उत्तम पद्धती मानली जात असे. तेथील नागरिक एकलिजियामध्ये एकत्रित येवून शासनकारभाराचे धोरण ठरवित असे.

इ. स. पूर्व ५ व्या शतकात पेरिकल्स या राज्यकर्त्याच्या पुढाकाराने अथेन्स या नगरराज्यात प्रत्यक्ष लोकशाही अंमलात आली. प्राचीन भारतात वज्जीसंघामध्ये प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात होती. रुसोने प्रत्यक्ष लोकशाहीचे समर्थन केले आहे. त्याच्या मते, एक व्यक्ती दुसऱ्याचे प्रतिनिधीत्व करू शकत नाही. कारण व्यक्तीच्या आशा-आकांक्षा, आचारविचार आणि त्यांच्या समस्या प्रतिनिधीला समजू शकत नाहीत यावर उपाय म्हणजे प्रत्येक व्यक्तीने शासनाच्या कार्यात भाग घ्यायला पाहिजे. परंतु आज सर्व जनतेला एकत्रित बसून निर्णय घेणे शक्य नसल्यामुळे प्रातिनिधीक लोकशाहीचा स्वीकार करण्यात आला. तरीही पुढील काही मार्गांचा वापर करून आजही स्वित्झर्लंड आणि अमेरिकेच्या काही घटक राज्यात प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात आहे.

**१. लोकनिर्णय किंवा जनपृच्छा** (Referendum) **:** जनपृच्छा म्हणजे एखाद्या प्रश्नावर जनतेचे मत अजमाविणे होय. विधिमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकावर जनतेचे मत जाणून घेण्यासाठी त्या विधेयकावर लोकांचे मत घेण्यात येते. जनतेने बहुमताने या विधेयकाचे समर्थन केले तर त्याचे कायद्यात रूपांतर होते. जर जनतेने ते अमान्य केले तर विधेयक रद्द समजले जाते. लोकनिर्णय कायदेमंडळावर बंधनकारक असतो. लोकनिर्णयाचे दोन प्रकार पुढीलप्रमाणे आहेत –

**(अ) ऐच्छिक लोकनिर्णय किंवा जनपृच्छा** (Optional Referendum) : एखाद्या विधेयकावर जनपृच्छा घेण्यात यावी अशी मागणी जर जनतेने केली तर ते विधेयक लोकनिर्णयासाठी पाठविण्यात येते. विधेयकावरील जनतेचा निर्णय अंतिम समजण्यात येतो. जनपृच्छेची मागणी करण्यासाठी कमीतकमी किती लोकांचा पाठिंबा असावा हे ठरविण्यात येते. तेवढ्या संख्येत लोकांनी पाठिंबा देणे आवश्यक असते. उदा. स्वित्झर्लंडमध्ये जनपृच्छेची मागणी करणाऱ्या प्रस्तावावर कमीतकमी तीस हजार व्यक्तींच्या सह्या असणे आवश्यक असते.

**(ब) अनिवार्य लोकनिर्णय किंवा जनपृच्छा** (Compulsory Referendum) : विधिमंडळाने मंजूर केलेले विधेयक जनपृच्छेसाठी पाठविणे आवश्यक असते. यासाठी जनतेकडून मागणी होण्याची वाट पाहण्याची आवश्यकता नसते. म्हणून याला अनिवार्य जनपृच्छा म्हणतात. साधारणपणे घटनादुरुस्ती आणि अतिशय महत्त्वाच्या विधेयकाच्या बाबतीत आवश्यक लोकनिर्णयाची व्यवस्था करण्यात येते. थोडक्यात शासनाला कायदा बनविण्यासाठी घेण्यात येणारी लोकांची संमती म्हणजे जनपृच्छा होय. जनतेला नको असलेली विधेयके रोखण्यासाठी ही जनतेच्या हाती ढाल असते.

२. **जनोपक्रम** (Initiative) : जनोपक्रम म्हणजे लोकांचा पुढाकार होय. आपल्याला कोणत्या प्रकारचा आणि कोणत्या स्वरूपाचा कायदा पाहिजे याबाबत जनतेने कायदेमंडळाला विनंती करणे म्हणजे जनोपक्रम होय. अशी विनंती कायदेमंडळाने मान्य केली तर त्याला कायद्याचे स्वरूप प्राप्त होते. बहुसंख्य लोकांनी पुढाकार घेवून अशी विनंती केल्यास विधिमंडळ त्याविरुद्ध वागू शकत नाही. जनोपक्रमाद्वारे नको असलेली विधेयके रोखणे आणि हवी असलेली विधेयके मंजूर करून घेणे अशी दोन प्रभावी साधने आहेत. जनोपक्रमाचे पुढील दोन प्रकार आहेत.

**(अ) स्पष्ट जनोपक्रम** (Formulated Initiative) : जनता ज्या विषयावर कायद्याची आवश्यकता आहे त्या विधेयकाचे प्रारूप तयार करून विधिमंडळाकडे पाठविते. जनतेने पाठविलेले विधेयक जर विधिमंडळाला मान्य नासेल तर जनमत घेणेत येते. लोकांना पाहिजे असलेला कायदा निःसंदिग्ध आणि तपशिलवाररित्या स्पष्ट शब्दात विधिमंडळाकडे पाठविण्यात येतो.

**(ब) अस्पष्ट किंवा अरचित जनोपक्रम** (Unformulated Initiative) : यात जनतेला हवा असलेला कायदा मोघम शब्दात विधिमंडळाकडे पाठविण्यात येतो. त्यात विषय नमूद केलेला असतो. त्याचे विधेयकाच्या स्वरूपात प्रारूप तयार करण्याची जबाबदारी विधिमंडळावर असते. अस्पष्ट जनोपक्रमात जाता केवळ संबंधित विषयासंबंधी मार्गदर्शक तत्त्वे आणि काही सिद्धांत नमूद करीत असते.

**३. प्रत्यावहन किंवा आवर्तन** (Recall) : जनतेने निवडून दिलेला प्रतिनिधी हा तत्त्वतः जनतेला जबाबदार असतो. पण निवडून आल्यानंतर त्याच्यावर ठराविक काळापर्यंत जनतेचे कोणतेच नियंत्रण राहत नाही. आपण निवडून पाठविलेला प्रतिनिधी अकार्यक्षम, बेजबाबदार आहे असे मतदारांना वाटले किंवा प्रतिनिधी आपली कामे योग्य पद्धतीने करीत नसेल तर विशिष्ट मतदारसंख्येने त्याला परत बोलविण्याची शासनाकडे मागणी करणे याला प्रत्यावहन असे म्हणतात. जनतेची ही विनंती मान्य केली तर प्रतिनिधीचे प्रतिनिधीत्व रद्द होते.

ज्या जनतेने आपणाला निवडून दिले तीच जनता आपले सभासदत्व रद्द करू शकते याची जाणीव प्रतिनिधीला प्रत्यावहन पद्धतीमुळे होते. प्रतिनिधी आपल्या मतदारसंघातील प्रश्नाकडे दुर्लक्ष करीत नाही. प्रत्यावहनाची पद्धती स्वित्झर्लंडमध्ये आहे.

**४. प्रारंभिक सभा** (Landsge Meinde) : लोकतंत्राचे हे प्राचीन सरळ व शुद्ध स्वरूप आहे. ही सर्व लोकांची सभा असते. तिला सार्वभौम अधिकार असतो. राज्यकारभारासंबंधी निर्णय घेण्यासाठी, कायदे तयार करण्यासाठी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी सर्व नागरिक एकत्रित येतात व बहुमताने निर्णय घेतात. अशा प्रकारे आज स्वित्झर्लंडच्या अपेंनजेल, ग्लेरस, इतर रोड्स, आऊटर रोड्स वगैरे कॅंटॉन्समध्ये ही पद्धत आजही अस्तित्वात आहे.

**प्रत्यक्ष लोकशाहीचे गुण (Merits)**

१. प्रत्यक्ष लोकशाहीत नागरिक राज्यकारभारात जाणीवपूर्वक भाग घेतात. कारण त्यांनी त्यांचे संपूर्ण जीवन राज्यालाच अर्पण केलेले असते.

२. नागरिक राज्यकारभारात भाग घेत असल्यामुळे सरकार आणि जनता यामध्ये अधिक सलोख्याचे, सहकार्याचे संबंध निर्माण होवू शकतात.

३. प्रत्येक नागरिकाला त्याच्या योग्यतेप्रमाणे राज्यकारभारात भाग घेण्याची संधी प्राप्त होते.

४. प्रत्येक नागरिकाला राज्यकारभाराविषयी राजकीय ज्ञान प्राप्त होते.

**प्रत्यक्ष लोकशाहीचे दोष (Demerits)**

१. मोठ्या लोकसंख्येच्या देशात प्रत्यक्ष लोकशाहीची पद्धती उपयुक्त ठरत नाही. कारण ती फक्त मर्यादीत लोकसंख्या व मर्यादीत भूप्रदेश असलेल्या देशातच प्रत्यक्ष लोकशाही शक्य असते.

२. प्रत्यक्ष लोकशाहीत सतत निवडणुका, जननिर्णय, जनोपक्रम, आवर्तन इत्यादी कार्यातच जनता कायमची गुंतलेली असते. त्यामुळे वेळ, पैसा व शक्तीचा अपव्यय होतो.

३. प्रत्यक्ष लोकशाही असलेल्या देशातील सर्वच नागरिकांना राज्यकारभाराबाबत उत्साह, आस्था, ओढ असेलच असे नाही.

४. या व्यवस्थेत मतदारांचा अंकुश राज्यकर्त्यांवर नेहमीच असल्यामुळे शासनकर्ते उदासीन बनतात.

५. प्रत्यक्ष लोकशाहीत काही ठराविक लोकांनाच राज्यकारभारात सहभागी होता येते. त्यामुळे तेथे समतेच्या तत्त्वाचा अभाव असतो. स्त्रिया, गुलाम यांना राज्यकारभारात भाग घेता येत नाही.

### ३.२.४.२. अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधीक लोकशाही (Indirect or Representative Democracy

आधुनिक काळात राष्ट्र-राज्ये निर्माण झाली आहेत. राष्ट्र-राज्याची लोकसंख्या, भूप्रदेश विस्तृत आहे. त्यांचे कार्यक्षेत्रही फार वाढलेले आहे. त्यामुळे तेथील लोक एकत्रित येवून शासन कारभारासंबंधी निर्णय घेवू शकत नाहीत. म्हणूनच आज प्रातिनिधीक लोकशाही अस्तित्वात आली. या लोकशाहीचा राज्यकारभार लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीमार्फत चालतो.

प्रातिनिधीक लोकशाही म्हणजे ज्या पद्धतीत शासनाची सत्ता प्रत्यक्ष लोकांच्या हाती नसते. तर लोकांनी निवडून दिलेल्या आणि लोकांना जबाबदार असणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या हातात असते. या पद्धतीत नियमीतपणे होणाऱ्या निवडणुकांद्वारे जनतेकडून विशिष्ट लोकसंख्येच्या प्रमाणात आणि विशिष्ट कालावधीसाठी प्रतिनिधी निवडले जातात. ही निवड प्रादेशिक प्रतिनिधीत्वाच्या पद्धतीनुसार होत असते. जनतेचे प्रतिनिधी कायदेमंडळाद्वारे सार्वभौम सत्तेचा वापर करतात. त्यामुळेच असे शासन जनतेला जबाबदार असते.

आधुनिक काळात इंग्लंडमध्ये सर्वप्रथम प्रातिनिधीक लोकशाही शासन उदयास आले. अमेरिका स्वातंत्र्ययुद्धानंतर आणि दुसऱ्या महायुद्धानंतर पश्चिम युरोपातील अनेक देशात लोकशाहीचा उदय झाला आहे. आज जगातील २/३ देशात लोकशाही शासनपद्धती अस्तित्वात आहे. इंग्लंड, भारत, जपान, ऑस्ट्रेलिया, कॅनडा इत्यादी देशात संसदीय शासनपद्धती आहे. अमेरिका व फ्रान्समध्ये अध्यक्षीय शासनपद्धती तर स्वित्झर्लंडमध्ये संमिश्र शासनपद्धती आहे.

कायदेमंडळ आणि कार्यकारीमंडळ यातील संबंध कोणत्या प्रकारचे आहेत त्याआधारावर प्रातिनिधीक लोकशाहीचे संसदीय आणि अध्यक्षीय लोकशाही असे दोन प्रकार पाडले आहेत. ते पुढील प्रमाणे-

**(अ) संसदीय लोकशाही** : संसदीय लोकशाहीचा उदय इंग्लंड या देशात झाला. ज्या शासनपद्धतीमध्ये कार्यकारीमंडळ हे आपले राजकीय धोरण व कृती याबाबत प्रत्यक्षरित्या कायदेमंडळाला जबाबदार असते आणि अप्रत्यक्षरित्या व अंतिमतः मतदारवर्गाला जबाबदार असते त्या शासनपद्धतीला संसदीय शासनपद्धती असे म्हणतात. कार्यकारीमंडळ (मंत्रिमंडळ) हे कायदेमंडळाचा पाठिंबा असेपर्यंतच अधिकारपदावर राहतील. कायदे-मंडळातील बहुमताचा पाठिंबा गमावल्यास मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो.

**संसदीय लोकशाही : वैशिष्ट्ये**

**१. दोन कार्यकारी प्रमुख** : संसदीय शासनपद्धतीत एक नामधारी प्रमुख असतो. तोच घटनात्मक प्रमुख असतो. शासनाचा सर्व कारभार त्याच्या नावाने चालतो. दुसरा वास्तववादी प्रमुख असतो. त्याच्या हाती सर्व सत्ता असते.

**२. कायदेमंडळ आणि मंत्रिमंडळ यांचे जवळचे संबंध** : कायदेमंडळात ज्या पक्षाला बहुमत मिळालेले असते त्या पक्षाचे मंत्रिमंडळ बनते. मंत्रिमंडळाचे सर्व सदस्य हे कायदेमंडळाचे सभासद असतात. मंत्रिमंडळाला कायदेमंडळातील बहुमताचा पाठिंबा असल्यामुळे मंत्रिमंडळाने मांडलेली विधेयके खात्रीने मंजूर होतात.

**३. सामुहिक जबाबदारी** : सामुहिक जबाबदारीचे तत्त्व हे संसदीय लोकशाहीचे अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. मंत्रिमंडळाचे कार्य सामुहिक जबाबदारीच्या तत्वाानुसार चालते. मंत्रिमंडळाने कायदेमंडळास सादर केलेले आर्थिक विधेयक कायदेमंडळाने नामंजूर केल्यास मंत्रिमंडळावरील तो अविश्वास मानला जातो. त्यावर मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो.

**४. पंतप्रधानाचे नेतृत्व** : कायदेमंडळात बहुमत असलेल्या पक्षाचा नेता पंतप्रधान असतो. तो संपूर्ण शासन यंत्रणेचा केंद्रबिंदू असतो. मंत्रिमंडळाचा नेता असतो. पंतप्रधानांच्या मार्गदर्शनानुसार मंत्रिमंडळाचे कार्य चालते. तसेच तो मंत्रिमंडळ व शासनप्रमुख यांच्यातील दुवा म्हणून कार्य करतो. त्यांनी राजीनामा दिल्यास तो सर्व मंत्रिमंडळाचा राजीनामा मानला जातो. त्यावेळी मंत्रीमंडळ बरखास्त होते.

**५. पक्षशिस्तीला महत्त्व** : संसदीय पद्धतीत पक्ष शिस्त महत्त्वाची असते. मंत्रिमंडळाचे अस्तित्व कायदेमंडळातील बहुमताच्या पाठिंब्यावर अवलंबून असल्यामुळे सत्तारूढ पक्षात पक्षशिस्त असली तरच मंत्रिमंडळ टिकून राहते. पक्ष शिस्त नसेल तर मंत्रिमंडळाचे अस्तित्व धोक्यात येते.

**(ब) अध्यक्षीय लोकशाही** :

अध्यक्षीय लोकशाही शासनपद्धती ही अमेरिका, फ्रान्स आणि द. अमेरिका खंडातील काही देशांमध्ये आहे. या पद्धतीत अध्यक्ष हा कार्यकारी प्रमुख असतो. त्याची निवड जनतेकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या होते. तो कायदेमंडळाला जबाबदार नसतो. या पद्धतीत अध्यक्षपद हे प्रबळ सत्ताकेंद्र असल्यामुळे तिला अध्यक्षीय लोकशाही असे नाव पडले आहे. या पद्धतीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे–

**१. एकच प्रमुख** : अध्यक्ष हा कार्यकारी मंडळाचा घटनात्मक प्रमुख असतो. वास्तविक सत्ता ही त्याच्याच हातात असते. नामधारी आणि वास्तववादी असा भेद नसतो.

**२. जनतेकडून निवड** : अध्यक्षाची निवड जनतेकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या होते. म्हणजे अध्यक्षांची निवड करण्यासाठी लोक आपले प्रतिनिधी निवडतात आणि ते प्रतिनिधी अध्यक्षाची निवड करतात.

**३. निश्चित कार्यकाल** : अध्यक्षाचा कार्यकाल निश्चित असतो. तो राज्यघटनेने ठरविलेला असतो. अमेरिका अध्यक्षाचा कार्यकाल चार वर्षाचा आहे. येथील अध्यक्षांना दोन वेळाच अध्यक्षस्थान भूषवता येते.

**४. अध्यक्षाचे स्थान** : कार्यकारी सत्ता अध्यक्षाच्या हाती असते. मंत्रिमंडळातील मंत्र्यांची नेमणूक अध्यक्ष करतो. त्यामुळे मंत्री अध्यक्षाला जबाबदार असतात. मंत्र्यांची भूमिका ही सल्लागाराची असते. ते आपल्या खात्याच्या कारभाराबाबतची माहिती अध्यक्षाला देतात.

वरील दोन्ही शासनपद्धतीची विविध वैशिष्ट्ये असली तरी सर्व लोकशाही देशात एक गोष्ट समान आढळते. ती म्हणजे तिचे प्रातिनिधीक लोकशाहीचे स्वरूप. प्रत्येक देशातील सामाजिक, आर्थिक, राजकीय स्थिती भिन्न असल्यामुळे तेथील लोकप्रतिनिधी आणि जनता यांनी कोणत्या पद्धतीने लोकशाही मूल्यांची जोपासना केलेली आहे यावर तेथील लोकशाहीचे स्वरूप निश्चित होते.

**अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधिक लोकशाहीचे गुण (Merits)**

तुलनात्मकदृष्ट्या लोकशाही शासनपद्धती ही इतर शासनपद्धतीपेक्षा श्रेष्ठ दर्जाची आहे तिचे गुण पुढीलप्रमाणे :

**१. शासनाचा सर्वश्रेष्ठ प्रकार** : लोकशाहीचे तत्त्वज्ञान स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, सहकार्य, तत्त्व-सहिष्णुता इत्यादी श्रेष्ठ शाश्वत जीवनमूल्यांवर आधारित आहे. या जीवनमूल्यांची राजकीयप्राप्ती हे लोकशाहीचे ध्येय आहे. लोकशाहीपेक्षा अधिक उत्तम पर्याय अजूनपर्यंत समोर आलेला नाही. त्यामुळे हा शासनाचा सर्वश्रेष्ठ प्रकार ठरला आहे.

२. **समानतेची वागणूक** : लोकशाहीत सर्वांना समानतेची वागणूक दिली जाते. राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रात समतेचे तत्त्व स्वीकारून समाजाचा सर्वांगीण विकास साधला जातो. समाजात उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव केला जात नाही. त्यामुळे समाज एकसंघ राहण्यास मदत होते.

**३. जबाबदार शासनपद्धती व कल्याणकारी राज्य** : लोकशाही शासनपद्धती ही जबाबदार शासनपद्धती म्हणून ओळखली जाते. लोकप्रतिनिधी जनतेला जबाबदार राहून कार्य करतात. मंत्रिमंडळ कायदेमंडळाला जबाबदार राहून लोककल्याणाची कार्य करते. कायदेमंडळाचा विश्वास असेपर्यंत मंत्रिमंडळ सत्तेवर राहते. लोकशाहीला कल्याणकारी राज्य अभिप्रेत असल्यामुळे राज्यशासन नेहमी लोकहितासाठी कल्याणकारी योजना राबवित असते.

४. **व्यक्तिस्वातंत्र्यांचे संरक्षण आणि व्यक्तिविकास** : लोकशाही विचारप्रणालीत व्यक्तीस्वातंत्र्याला प्रथम प्राधान्य दिले जाते. राज्य हे व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे रक्षण करते. व्यक्तीस्वातंत्र्याची हमी फक्त लोकशाहीतच मिळते. व्यक्तीच्या सुप्तगुणांचा विकास घडवून आणण्यासाठी लोकशाही उपयुक्त ठरली आहे. लोकशाहीत व्यक्तीला आचार-विचार व उच्चार यांचे स्वातंत्र्य दिले जाते. व्यक्तीचे अधिकार सुरक्षित ठेवून व्यक्ती विकासाचा आदर लोकशाहीत केला जातो.

**५. शांततेचा सनदशीर राज्यकारभार** : लोकशाहीत लोकांच्या विचारविनिमयातून, चर्चेतून, लोकांच्या इच्छेतून लोकमतानुसार राज्यकारभार चालतो. लोकशाहीत लोकप्रतिनिधी शांततेच्या मार्गाने निवडून आलेले असतात. त्यामुळे लोकांच्या भावनेचा आदर करून निर्णय घेतात. संघर्ष, प्रतिकार या मार्गाऐवजी शांतता, सहकार्य अशा मार्गाने जातेचे प्रश्न सोडविता येतात अशी भावना लोकशाहीत दृढ झालेली दिसते.

**६. सत्तेचे विकेंद्रीकरण आणि जनताभिमुख राज्यकारभार :** लोकशाहीत सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे तत्त्व स्वीकारलेले असते. राजकीय आणि शासकीय सत्ता केंद्र सरकारपासून स्थानिक स्वराज्य संस्थापर्यंत विकेंद्रीत झालेली आढळून येते. विकेंद्रीकरणामुळे जनतेचा राजकीय सहभाग वाढून जनतेचे सार्वभौमत्व प्रकट होते आणि राज्यकारभार जनताभिमुख होवून जनतेचे कल्याण, हित साधले जाते. स्थानिक पातळीवर आलेल्या राजकीय अनुभवाचा फायदा राष्ट्रीय पातळीवरील शासनसंस्थेला होतो.

**७. राजकीय जागरुकता :** लोकशाहीत नागरिकांना राजकीय शिक्षण मिळते. निवडणुकीच्या काळात मतदान, मतप्रचार यामुळे व्यक्तीला लोकशाही मूल्यांची ओळख होते. त्यामुळे ते आपल्या हक्कांचे पालन करण्यासाठी झटतात. ही जागरुकता लोकशाहीस पोषक ठरते.

**८. अल्पसंख्यांकांच्या हिताचे रक्षण :** लोकशाहीत व्यक्ती हा घटक विकासाचा केंद्रबिंदू मानल्यामुळे राज्यातील सर्व लोकांना विकासाची समानसंधी उपलब्ध करून दिली जाते. अल्पसंख्यांक लोकांच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी घटनात्मक तरतुदी आणि उपाययोजना करून ठेवल्या जातात. अल्प-संख्यांकावर अन्याय होऊ नये म्हणून प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाची पद्धती स्विकारण्यात आलेली आहे.

**९. जनहितासाठी सत्तेचा वापर :** लोकशाहीत नागरिकांनी ठराविक कालावधीसाठी निवडून दिलेले प्रतिनिधी राज्यकारभार चालवितात. ते लोकांना जबाबदार असतात. नागरिकांच्या मर्जीवर त्यांचे पद अवलंबून असल्याने त्यांची मर्जी सांभाळण्यासाठी त्यांना व्यापक राष्ट्रहित व जनकल्याणाचा उद्देश समोर ठेवूनच सत्तेचा वापर करावा लागतो.

**१०. नैतिक गुणांचा विकास :** राजकीय समता, जनसहभागाची व्यापक व्यवस्था, जबाबदारीचे तत्त्व, श्रेष्ठ मूल्यांचा पाठलाग या सर्व कारणांमुळे लोकशाही शासन नैतिक स्वरूपाचे ठरले आहे. अशा शासनात नैतिक गुणांना व नैतिक विकासाला योग्य संधी मिळते. राज्याचे अंतिम स्वामित्व जनतेजवळ असल्यामुळे त्यांच्यात स्वाभिमान, देशप्रेम, कर्तव्यपरायणता, परस्पर सहिष्णुता, सहकार्य, त्याग इत्यादी गुणांचा विकास होतो.

**११. नेतृत्वाचा विकास :** लोकशाहीत जनसहभागाच्या व्यवस्थेमुळे नागरिकांमध्ये असणाऱ्या नेतृत्व गुणांच्या विकासाला संधी मिळते. आज अनेक राजकीय नेते सामान्य जनतेतून, स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निर्माण झाल्याची उदाहरणे लोकशाही देशात दिसून येतात.

**१२. लोकशाहीला शैक्षणिक महत्त्व :** लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्तीला तिच्या पात्रतेनुसार शासन-कारभारात भाग घेण्याची समानसंधी प्राप्त होते. स्थानिक स्वराज्य संस्थापासून ते केंद्रीयशासनापर्यंत प्रत्येकजण स्वकर्तृत्वानुसार शासन कारभारात भाग घेऊ शकतो. ज्याद्वारे व्यक्तीला राजकीय व शासनकारभाराचे शिक्षण प्राप्त होते. निवडणुकीच्या वेळेस विविध पक्षाच्या ध्येय-धोरणाचा अभ्यास लोक करतात आणि मगच मतदान करतात. लोकशाहीविषयी सी. डी. बर्न असे म्हणतो की, शासनाचा प्रत्येक प्रकार हा शिक्षणाचे कार्य करतो. पण स्वशिक्षण हेच उत्कृष्ट सरकार होय व ते शासन म्हणजेच लोकशाही शासन होय.

**१३. व्यक्तीपूजेला स्थान नसते** : लोकशाहीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा गौरव तिच्या अंगी असलेल्या श्रेष्ठ गुणांमुळे होतो. व्यक्तीपूजा लोकशाहीला मान्य नाही. पण व्यक्तीच्या प्रतिष्ठेला, कार्याला लोकशाहीत फार महत्त्व आहे. लोकशाहीत राष्ट्रपुरुषांचा गौरव व त्यांचे पुण्यस्मरण त्यांच्या अंगी असलेल्या सर्वश्रेष्ठ गुणकर्तृत्वामुळेच आपण करीत असतो.

**१४. लोकशाहीत अनुवांशिकता नाही** : राजेशाहीमध्ये राजाच्या मृत्यूनंतर त्याचा जेष्ठ पूत्र किंवा कन्या राजपदी आरूढ होते. उदा. इंग्लंड. पण लोकशाहीमध्ये सत्ताधिकारी व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याचा पूत्र किंवा कन्या सत्ताधिकारी होत नाही. सत्ताधिकाऱ्याचे पद स्वतःच्या गुणकर्तृत्वानुसार प्राप्त करावे लागते.

**१५. न्यायदानाची खास व्यवस्था** : लोकशाहीमध्ये प्रचलित कायद्यानुसार न्यायदान होते. न्यायदानाचे कार्य स्वतंत्र न्यायपालिकेकडून होते. न्याय देताना कोणताही भेदभाव केला जात नाही. न्यायाधिशांना जास्तीत जास्त स्वातंत्र्य दिले जाते त्यामुळे निःस्वार्थी व निःपक्षपाती न्यायदान होते.

**१६. राष्ट्रीय एकात्मता टिकून राहते** : लोकशाहीत लोक सार्वभौम असतात. राज्याची सर्वश्रेष्ठ शक्ती लोकांमध्ये एकवटलेली असते. देश विकासाच्या स्वातंत्र्याच्या रक्षणाची जबाबदारी जनतेची असते. त्यामुळे सर्व नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेमाची, राष्ट्राभिमानाची भावना वाढीस लागते.

थोडक्यात, लोकशाहीत सर्जनशीलता असल्यामुळे नागरिकांमध्ये समाजहिताची जाणीव-जागृती निर्माण होते. लॉर्ड ब्राईस यांनी लोकशाहीने आत्तापर्यंत उत्कृष्ट कामगिरी बजावून समाजात शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करून व्यक्तिस्वातंत्र्य सुरक्षित ठेवले आहे. अशा शब्दात लोकशाहीचे मूल्यांकन केलेले आहे. म्हणूनच इतर कोणत्याही शासनपद्धतीपेक्षा लोकशाही सर्वश्रेष्ठ आहे यात शंकाच ाही.

**अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधिक लोकशाहीचे दोष (Demerits)**

लोकशाही शासनपद्धती सर्वात श्रेष्ठ आहे असे जरी काही विचारवंतांचे मत असले तरी ती निर्दोष पद्धती आहे असा मात्र याचा अर्थ नाही. कारण लोकशाहीच्या रक्षणार्थ पहिले महायुद्ध झाले पण युद्धाचा शेवट होतो न होतो तोच रशिया व युरोपीय राष्ट्रात हुकूमशाहीचा उदय झाला. त्याचा परिणाम म्हणून दुसरे महायुद्ध झाले. आजही बऱ्याच देशातून आपण लष्करी क्रांती झाल्याचे पाहतो. याचे कारण लोकशाही शासनपद्धतीमध्ये असलेले दोष हेच आहे.

लोकशाही शासनावर अनेकांनी फार विदारक टीका केलेली आहे. टेलिरँड या शास्त्रज्ञाने लोकशाहीला 'काळ्या संरक्षकाची शासनपद्धती' (Aristocracy of Blackguards) असे संबोधले आहे. तर कार्लाईलने लोकशाहीला 'मुर्खांचे शासन' असे म्हटले आहे.

लोकशाही शासनावर हेन्रीमेन, दी टॉकव्हील, ब्लंटश्ली, ट्रीटस्के, ब्राईस मिल, फॉगेट अशा अनेक शास्त्रज्ञांनी टिका केली आहे. **त्यांच्या टिकेचा मुख्य स्त्रोत पुढीलप्रमाणे आहे** :

**१. राजकीयदृष्ट्या अज्ञानी लोकांचे शासन** : फॉगेट या विचारवंताने लोकशाहीला अज्ञानी आणि अयोग्य लोकांचे शासन म्हटले आहे. लोकशाही शासन बहुमताच्या आधारावर चालत असल्यामुळे त्यात नागरिकांच्या गुण आणि चारित्र्याचा विचारच होत नाही. निवडणुकीत उमेदवार खोटी आश्वासने देवून निवडणुका जिंकतात. समाजातील लोकांत शिक्षणाचा अभाव, अज्ञान, दारिद्र्य, देशाच्या प्रश्नांची जाणीव नसल्यामुळे ते अशा आश्वासनाला बळी पडतात. लोकशाहीत केवळ डोकी मोजली जातात. गुणवत्ता पाहिली जात नाही. अशिक्षित लोकांनी निवडून दिलेल्या अपात्र प्रतिनिधींचे शासन म्हणजे मुर्खांचे शासन अशी टिका टेलिरॅन्ड लेकी यांनी केली आहे.

**२. राष्ट्रहितापेक्षा पक्षहिताला अधिक महत्त्व** : लोकशाहीत लोक मतदानाद्वारे आपले मत व्यक्त करतात. मतदारांसाठी शैक्षणिक आणि सांपत्तिक अटी आवश्यक असतात. नागरिकांना राष्ट्राच्या विविध समस्यांची जाणीव नसते. एखाद्या वेळी प्रश्न समजले तरी ते सोडविण्याचे मार्ग माहीत नसतात. राजकीय पक्ष अशा प्रश्नांचा अर्थ स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी आपल्या पद्धतीने लावतात. पक्षाच्या पाठिंब्याने निवडून आलेले प्रतिनिधी स्वतःच्या मताने, विचाराने वागत नाहीत कारण पक्षशिस्तीमुळे त्यांना पक्षाच्या धोरणाचा पुरस्कार करावा लागतो. अन्यथा पक्षातून पक्षशिस्तीसाठी निलंबित व्हावे लागते.

**३. तत्त्व आणि व्यवहार यात अंतर** : लोकशाही शासनामध्ये जमावाचे मानसशास्त्र नेता नेहमीच जाणून घेतो. धूर्त आणि मुत्सद्दी नेता प्रभावी घोषणाद्वारे लोकमत आपल्या बाजूने वळवितो. निवडून येताच व्यवहार वेगळा करतो. कारण मतदारापुढे सादर केलेले धोरण आणि तत्त्वे यांची पूर्तता करण्याची साधने आणि पैसा यांची कमतरता असते. एखादी घोषणा करून, एखादे आश्वासन देवून सत्ता खेचून घेता येते. परंतु या आश्वासनाची पूर्तता करता येणे शक्य नसते. अशा प्रकारे तत्त्व आणि व्यवहार यात तफावत आढळते.

**४. लोकशाही धोरणात सातत्य नसते** : लोकशाहीत एकच पक्ष नेहमीच सत्ताधीश होईल याची शाश्वती देता येत नाही. प्रत्येक पक्षाचे धोरण निरनिराळे असते. पहिल्या पक्षाने सत्तेवर असताना स्विकारलेले धोरण सत्तारूढ होणारा पक्ष स्विकारेलच अशी खात्री नसते. त्यामुळे कोणतेही काम पूर्ण होत नाही. उलट पहिल्या पक्षाचे धोरण चांगले असले तरी ते चुकीचे कसे आहे याचाच बोभाटा दुसरा पक्ष नेहमी करतो.

**५. बहुमताच्या नावाखाली हुकूमशाहीची निर्मिती** : लोकशाहीत बहुमताने निर्णय घेतले जातात. निवडणुकीत कोणत्या पक्षाला किंवा व्यक्तीला किती टक्के मते मिळाली याचा विचार होत नाही. निवडणूक लढणाऱ्या उमेदवारास जास्तीत-जास्त मते ज्याला मिळाली तो उमेदवार विजयी होतो. उदा. शंभर मतदारांचे विभाजन असे केले की, ज्यात अ-२९, ब-२८, क-२६, ड- १७ अशी मतांची विभागणी झाली तर 'अ' ला सर्वाधिक २९ मते प्राप्त झाली म्हणून 'अ' विजयी होतो. पण विरोधात गेलेल्या मतांची बेरीज ७१ होते. मग याला बहुमताच्या नावाखाली हुकूमशाही नाही तर दुसरे काय म्हणावे?

**६. राज्यकारभाराचा दर्जा खालावतो** : लोकशाहीतील सरकार लोकांच्याकडून निवडलेल्या प्रतिनिधींचे असते. निवडणुकीत अनेक उमेदवार उभे राहतात. पण त्यापैकी एकाची बहुमताने लोकप्रतिनिधी

म्हणून निवड होते. ही निवड करताना उमेदवाराची पात्रता लक्षात न घेता जी व्यक्ती प्रसिद्ध, लोकप्रिय, पैसेवाली आहे अशा व्यक्तीस मतदारांकडून मतदान केले जाते आणि तो निवडून येतो. राजकीय व्यवस्थेची माहिती नसणाऱ्या उमेदवारांच्या हाती सत्ता आल्यामुळे राज्यकारभार खालावतो.

**७. लोकशाहीत शिक्षणाचे अवमूल्यन होते** : लोकशाहीमध्ये स्वार्थासाठी लोकांची खुशामत केली जाते. त्यामुळे लोकांचे भाव वाढतात. समाजातील लोकांच्या भावना भडकविण्याचे दुष्ट कार्य लोकशाहीत होते. हुशार, बुद्धिजीवी व योग्य पण राजकारणात भाग घेण्यास असमर्थ असणाऱ्या बुद्धिजीवी लोकांकडे दुर्लक्ष होते. लोकशिक्षणाच्या गोंडस नावाखाली शिक्षणाचा दर्जा घसरतो.

**८. मंदगतीने विकास** : लोकशाहीत निर्णय सनदशीरमार्गाने, विचारविनिमय करून घेतले जातात. राष्ट्रीय नियोजन, विकास आणि कार्यक्रम यांची अंमलबजावणी सावकाश, संथ गतीने होते. कारण प्रत्येक निर्णयावर चर्चा अपेक्षीत धरली जाते. त्यामुळे नियोजीत वेळेत राष्ट्राचा विकास होऊ शकत नाही.

**९. नैतिक विकासाला घातक** : लोकशाही निवडणुकीत खोटी आश्वासने, भावनिक आव्हान, धनशक्ती आणि अन्य मार्गांचा वापर केला जातो. त्यामुळे अपात्र, अकार्यक्षम व्यक्ती निवडून येण्याची शक्यता अधिक असते. यातून जनहिताऐवजी स्वहितासाठी सत्तेचा वापर सुरू होतो. इतकेच नव्हे तर काही वेळेस सत्ता टिकवून ठेवण्यासाठी अवैध मार्गाचा अवलंब होऊ शकतो.

**१०. नोकरशाहीची सत्ता** : लोकशाहीत जबाबदार शासनाच्या नावाखाली नोकरशाहीची सत्ता निर्माण होण्याची शक्यता असते. मतदारांनी निवडून दिलेले अनेक प्रतिनिधी अनुभवहिन प्रशासन कार्याबाबत अनभिज्ञ असतात. म्हणून काही टिकाकार लोकशाहीला 'नवख्या लोकांचे शासन' असे म्हणतात. नवख्या अनुभव नसणाऱ्या प्रतिनिधीला शासनकार्यासाठी नोकरशाहीवर विसंबून रहावे लागते.

**११. भ्रष्टाचार, काळाबाजार व लाचलुचपत** : लोकशाहीत संधीसाधू लोक निवडणुकीच्यावेळी वाममार्गाचा अवलंब करून मतदारांना पैसे देवून ते मतांची खरेदी करतात. त्यासाठी लागणारा पैसा उभा करण्यासाठी भ्रष्टाचार, काळाबाजार या मार्गाचा वापर करतात. आधुनिक लोकशाही राष्ट्रांना भ्रष्टाचाराची किड लागलेली आहे. अर्थात सर्वांनाच भ्रष्टाचारी म्हणता येत नाही. काही लोकप्रतिनिधी निःस्वार्थी, प्रामाणिक, पारदर्शी व्यक्तिमत्त्वाचे आहेत.

**१२. अस्थिर शासनपद्धती** : अनेक पक्ष असणाऱ्या लोकशाही देशात काही वेळा कोणत्याच राजकीय पक्षाला बहुमत प्राप्त होत नाही. अशा वेळी विविध राजकीय पक्ष एकत्र येवून आघाडीचे सरकार स्थापन करतात. पण प्रत्येक राजकीय पक्षाची ध्येयधोरणे भिन्न असल्यामुळे त्यांच्यात एकवाक्यता, एकजूट राहत नाही. अशा वेळी ते सरकार अल्पजिवी ठरून लोकशाही अस्थिर बनते. अस्थिर राज्यकारभारामुळे राष्ट्रीय विकासाकडे दुर्लक्ष होऊ शकते.

अशाप्रकारे लोकशाहीत काही दोष आढळून येत असले तरीही आज जगातील दोन तृतीयांश राष्ट्रांनी लोकशाही शासनपद्धती स्विकारलेली आहे. त्यामुळे लोकशाही जगात सर्वश्रेष्ठ असल्याचे दिसून येते.

### ३.२.५ लोकशाहीची वैशिष्ट्ये (Features of Democracy)

आज एकविसाव्या शतकात जगातील दोन तृतीयांशपेक्षा अधिक राष्ट्रांनी प्रातिनिधीक लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. या लोकशाहीची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

**१. जनतेचे सार्वभौमत्त्व** : लोकशाहीत जनतेची सत्ता ही अंतिम आणि सर्वश्रेष्ठ असते. लोकशाहीत राज्यकारभार लोकांच्या संमतीतून आणि लोकांच्या टिकेतून चालतो. येथे शासनाची प्रत्यक्ष सत्ता जनतेच्या हाती नसली तरी राज्यकर्ते-शासनकर्ते कोण असावेत ते ठरविण्याचा अधिकार जनतेला असतो.

**२. राजकीय समता** : लोकशाहीत जनतेचे शासन असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीला त्यात समान वाटा, समान सहभाग आणि समान अधिकार मिळावेत हे तत्त्व स्विकारले जाते. धर्म, जात, वंश, लिंग इत्यादीच्या आधारावर कोणताही भेदभाव न करता प्रत्येक व्यक्तीला राज्यकारभारात सहभागी होण्याची संधी देणे हे लोकशाहीचा मुख्य उद्देश असतो.

**३. मुलभूत हक्क** : व्यक्तीला स्वतःच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी तसेच प्रतिष्ठेने जीवन जगण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या हक्कांचा समावेश मुलभूत हक्कामध्ये केलेला असतो. उदा. स्वातंत्र्याचा, समतेचा इ. मूलभूत हक्क हे लोकशाहीचे प्राणतत्त्व आहे. म्हणूनच लोकशाही देशात मुलभूत हक्कावर अतिक्रमण झाल्यास त्याविरुद्ध न्यायालयात दाद मागता येते.

**४. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार** : खऱ्या लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी प्रौढ मताधिकाराचे तत्त्व सर्वमान्य झालेले आहे. राज्याने ठरविलेली विशिष्ट वयाची अट पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्त्री-पुरुषाला आपले प्रतिनिधी निवडण्याचा मिळालेला अधिकार म्हणजे सार्वत्रिक प्रौढ मताधिकार होय. धर्म, वंश, मालमत्ता, लिंग, शिक्षण अशा कोणत्याही कारणावरून मतदानाचा अधिकार नाकारला जाणे हे लोकशाही तत्त्वाशी विसंगत ठरू शकते.

**५. जबाबदार शासनपद्धती** : लोकशाहीत शासन हे लोकांना जबाबदार असते. संसदीय लोकशाही शासनपद्धतीला जबाबदार शासनपद्धती असे म्हणतात. संसदीय लोकशाहीत मंत्रिमंडळ सामूहिकरित्या पार्लमेंटला जबाबदार असते. संसदीय शासनपद्धतीत अविश्वासाची टांगती तलवार नेहमी मंत्रिमंडळावर असते. त्यामुळे मंत्रीमंडळ जबाबदारीने कार्य करते. अध्यक्षीय लोकशाही पद्धतीत राष्ट्राध्यक्ष कायदेमंडळाला जबाबदार राहत नसला तरी तो जनतेशी जबाबदार असतो. राष्ट्राध्यक्षांनी घेतलेला प्रत्येक निर्णय आणि कृती यांना सिनेटची मान्यता घ्यावी लागते.

**६. लोकमतानुसार शासन** : आधुनिक काळात प्रातिनिधीक लोकशाही असल्यामुळे जनता आपले प्रतिनिधी निवडून त्यांच्यामार्फत राज्यकारभार चालविते. त्यासाठी लोकनिर्वाचित अशा निर्णय निर्धारण संरचना निर्माण केल्या जातात. अशा संरचनामधून निर्णय घेणाऱ्यांना लोकमताचा आधार घ्यावा लागतो. लोकमताच्या विरोधात कोणताही निर्णय त्यांना घेता येत नाही.

**७. कायद्याचे राज्य** : लोकशाही व्यवस्थेत कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान मानल्या जातात. कोणतीही

व्यक्ती कायद्यापेक्षा श्रेष्ठ नसते. राजकीय पदाधिकारी, शासकीय अधिकारी, सरकारी नोकर, सर्वसामान्य नागरिक, असा भेदभाव न करता सर्वांना कायद्यासमोर समान मानले जाते. ब्रिटीश न्यायपंडीत प्रो. डायसी यांनी कायद्याचे राज्य या तत्त्वाचा पुरस्कार केला आहे. समाजातील व्यक्तीचा दर्जा विचारात न घेता सर्वांना एकच कायदा व एकच न्याय लागू केला जातो.

८. **शांततेच्या मार्गाचा अवलंब** : लोकशाही शासनपद्धती ही सनदशीर व शांततेच्या मार्गाने चालणारी प्रक्रिया आहे. लोकशाहीत सार्वत्रिक निवडणुका खुल्या व स्वच्छ वातावरणात होऊन सरकार शांततेच्या मार्गाने बदलते. लोकशाही राज्यकारभार हा बंदुकीच्या गोळीतून चालत नाही तर तो मतपत्रिकांच्या माध्यमातून चालतो.

९. **व्यक्तिस्वातंत्र्याला महत्त्व** : व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी स्वातंत्र्य आवश्यक असते. प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्याचा निसर्गदत्त अधिकार आहे. त्यामुळे व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची जबाबदारी शासनसंस्थेवर अवलंबून असते. प्रत्येक व्यक्तीला आचार, विचार, श्रद्धा, धर्म आणि संस्कृती यांचे स्वातंत्र्य दिले जाते.

१०. **प्रभावी विरोधी पक्ष** : लोकशाहीत लोकांच्या संमतीतून राज्यकारभार चालतो. लोकांचा पाठिंबा मिळवून बहुमताच्या जोरावर राजकीय पक्ष सत्तेवर येतात. विरोधी पक्षाचे प्रतिनिधी राज्यकारभारावर देखरेख ठेवतात. सत्तारुढ पक्षाच्या कार्यावर अंकुश ठेवण्याचे कार्य विरोधी पक्षामार्फत चालते म्हणूनच लोकशाही म्हणजे लोकांची संमती आणि टीका यावर चालणारी शासनपद्धती अशी व्याख्या केली जाते. अशा प्रकारे लोकशाहीची वैशिष्ट्ये आढळून येतात.

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

**रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. इंग्लंडला .......... ची जननी म्हणून ओळखले जाते.
(लोकशाही, साम्यवादी, हुकूमशाही, राजेशाही)

२. लोकांचे लोकांनी आणि लोकांसाठी चालविले जाणारे शासन म्हणजे लोकशाही ही व्याख्या .......... नी केली आहे. (जॉर्ज वॉशिंग्टन, अब्राहम लिंकन, जॉर्ज बुश, रेगन)

३. आज प्रत्यक्ष लोकशाही .......... या राष्ट्रात अस्तित्वात आहे.
(इंग्लंड, भारत, स्वित्झर्लंड, पाकिस्तान)

४. भारतात .......... ही शासनपद्धती आहे.
(अध्यक्षीय, हुकूमशाही, साम्यवादी, लोकशाही)

५. ज्या शासनात प्रत्येकाला सहभागी होता येते ती लोकशाही होय. असे .......... यांनी म्हटले आहे.
(लॉर्ड ब्राईस, सिली, मॅकआयव्हर, म. गांधी)

६. अमेरिकेत ........... ही शासनपद्धती आहे.

(संसदीय, अध्यक्षीय, साम्यवादी, राजेशाही)

७. प्राचीन भारतातील वज्जीसंघामध्ये .......... लोकशाही होती.
(प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, नियंत्रित, अनियंत्रित)

८. रुसोने .......... लोकशाहीचे समर्थन केले आहे.

(मर्यादित, नियंत्रित, प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष)

### ३.२.६ लोकशाही : महत्त्व (Democracy : Importance)

आधुनिक काळात लोकशाही शासनपद्धती हा सर्वात उत्तम शासन प्रकार मानला जातो. लोकशाही ही प्राचीन काळापासून चालत आलेली राज्यव्यवस्था आहे. प्राचीन काळात ग्रीक, भारत याठिकाणी गणराज्यांचे अस्तित्व होते. त्यांचा कारभार प्रत्यक्ष लोकशाही तत्त्वानुसार चालत असे. परंतु आधुनिक काळात तो जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीमार्फत चालतो. लोकशाही शासनपद्धतीचे महत्त्व पुढीलप्रमाणे–

**१. लोकहिताचे शासन** : लोकशाही शासनाचा पहिला उद्देश लोकहिताचा असतो. जनतेचे प्रतिनिधी जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील असतात. त्यामुळे शासन जनहिताकडे विशेष लक्ष देते. जॉन स्टुअर्ट मिलने लोकशाहीला शासनाचा आदर्श प्रकार मानला आहे. ''कारण यात सार्वभौम सत्ता जनतेकडे असते. प्रत्येक व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्त्वाचा विकास करण्याची समान संधी मिळते. मला तशी संधी मिळाली नाही किंवा माझ्याकडे दुर्लक्ष झाले अशी तक्रार करण्याची संधी नाही. असे लोकशाहीमध्ये व्यक्ती म्हणू शकत नाही'' असे लॉवेल यांनी म्हटले आहे.

**२. जबाबदार शासनपद्धती** : लोकशाही लोकानुवर्ती शासन आहे. प्रातिनिधीक लोकशाहीत वैधानिक व राजकीय जबाबदारी निश्चित करण्यात आलेली असते. शासनकर्ते हे जनतेचे नम्र सेवक असतात अशीच भावना सर्वांच्या मनात निर्माण झालेली असते. शासनकर्ते जनतेच्या गाऱ्हाण्याकडे दुर्लक्ष करू शकत नाहीत. अल्पमतवादीसुद्धा प्रचार सहाय्याने शासनाचे व लोकांचे लक्ष आपल्याकडे आकर्षित करू शकतात परंतु जनतेच्या मागण्यांकडे आणि गाऱ्हाण्यांकडे दुर्लक्ष करणारे शासनकर्ते बेजबाबदार शासनकर्ते म्हणून टीकेस पात्र ठरतात. त्यांच्या कार्याचे मूल्यमापन ठराविक मुदतीनंतर होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीद्वारे जनता नेहमीच करीत असते. अकार्यक्षम, बेजबाबदार, जनतेला खोटी माहिती देवून फसविणाऱ्या प्रतिनिधींना जनता निवडणुकीद्वारे त्यांची जागा दाखविते.

**३. जनतेला जबाबदारीची जाणीव** : लोकशाही ही जबाबदार शासनपद्धती आहे. शासनकर्तेच राज्यकारभारासाठी जबाबदार असतात असे नाही. तर जनतेलाही तितकेच जबाबदार धरले जाते. चांगले काय किंवा वाईट काय ही गोष्ट लोकांनीच ठरवायची असते. जनतेने स्वमताच्या आग्रहाला मुरड घालून दुसऱ्याच्या मताचा आदर करणे, सहकार्य, सेवावृत्ती आणि सहिष्णुता दाखविणे हे आपलेच कर्तव्य आहे. अकार्यक्षम

शासनास आणि त्यामुळे होणाऱ्या अधःपतास आपणच पर्यायाने कारणीभूत आहोत याची जाणीव लोकशाहीतच लोकांमध्ये निर्माण होते.

४. **लोकशाही मतपत्रिकेवर चालते** : लोकशाहीत कोणताही निर्णय निवडणुका व जबाबदारी या भूमिकेतून घेतला जातो. लोकांच्या मनात स्वदेशाविषयी प्रेम आणि सद्भावना निर्माण होते. शासनकर्त्यांचे जाचक निर्णय शांततामय मार्गाने विरोध करून जनता बदलून घेते. मतपत्रिकेद्वारे व्यक्त झालेला बहुमताचा निर्णय नेहमीच मान्य करण्यात येतो. कारण लोकशाहीत 'जनता हीच ईश्वर आहे.' (Vox Populi is Vox Devi) असे समजले जाते.

५. **जनतेची शासनातील भागीदारी** : लोकशाही शासनात लोकांच्या भागीदारीला महत्त्व असते. शासनकार्यात प्रत्येकाला भाग घेवून आपले मत मांडता येते. येथील राज्यकारभार जनतेच्या बहुमतानुसार चालतो. प्रत्येकाला लोकमत तयार करण्याची संधी मिळते. राष्ट्रहित आणि समाजहित यादृष्टीने व्यक्त केलेल्या लोकमताचा लोकशाहीत कधीच अनादर केला जात नाही.

६. **लोकशाहीत शांततेला प्राधान्य** : लोकशाहीत लोकांमध्ये शासनाविषयी जबाबदारी व जागरूकता निर्माण होते. संघर्षाचे प्रश्न शांततामय मार्गाने सोडविले जातात. शक्तीचा अपव्यय, पैशाची नासाडी, वैमनस्य या दुर्गुणाना लोक बळी पडत नाहीत. लोकांमध्ये लोकमतांतरे असली तरीही त्यांचे पर्यावसान लूट, जाळपोळ, मारामारी, क्रांती यामध्ये होत नाही. कारण या दुष्ट मार्गाचा अवलंब केल्याने आपलेच नुकसान आपणच करित आहोत याची जाणीव लोकांना असते.

अशा रीतीने इतर कोणत्याही शासनपद्धतीपेक्षा लोकशाही शासनपद्धती श्रेष्ठ आहे. कारण आपली जबाबदारी कोणती? संघर्षाचे प्रश्न शांततेच्या मार्गाने का सोडवायचे? याविषयी लोकशाही आपणास शिकवते. आपल्या देशाचे व पर्यायाने आपले भवितव्य आपल्यालाच घडवायचे आहे अशी जाणीव लोकशाहीच निर्माण करून देते. म्हणूनच इतर कोणत्याही शासनपद्धतीपेक्षा लोकशाही शासनपद्धती सर्वश्रेष्ठ आहे यात शंकाच नाही.

### ३.२.७ लोकशाही समोरील आव्हाने (Challenges before Democracy)

आज जगातील दोन तृतीयांश देशात लोकशाही शासनपद्धती स्विकारलेली आहे. बहुतेक सर्व लोकशाही राष्ट्रात प्रादेशिक प्रतिनिधीत्वाची पद्धती स्विकारलेली आहे. तिसऱ्या जगातील बहुतांश राष्ट्रांत लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. परंतु स्वातंत्र्य, समता, न्याय अशा लोकशाही तत्त्वांची तेथे उपेक्षा झालेली आहे. कारण जागतिक, आर्थिक व आण्विक स्पर्धा, भांडवलशाही देशांची आर्थिक मक्तेदारी, वाढता दहशतवाद, आक्रमक राष्ट्रवाद, सामाजिक अस्थिरता, सांस्कृतिक असमतोल, धर्मांधता, जातियता, भाषावाद, जमातवाद, अज्ञान, अशिक्षितपणा, दारिद्र्य, बेकारी आदी समस्यांनी तिसऱ्या जगातील लोकशाही राष्ट्रे ग्रासलेली आहेत. त्यामुळे लोकशाही शासनपद्धती अस्थिर व अयशस्वी झालेली दिसून येते.

लोकशाही म्हणजे जंगलात कशाही परिस्थितीत वाढत जाणारे झाड नसून त्याची काळजीपूर्वक निगराणी करावी लागते असे मूल्यवान रोपटे आहे. ज्या समाजाची लोकशाहीवर श्रद्धा असते त्या समाजाला अनेक

आव्हानांना तोंड देत लोकशाहीची जोपासना करावी लागते. मग त्याचे डेरेदार वृक्षात रूपांतर होते. याचे कारण म्हणजे लोकशाही ही काही मूल्यांवर आधारलेली शासनव्यवस्था आहे. ती मूल्ये म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही होय. जो समाज या मूल्यांची कदर करतो त्या समाजातच लोकशाहीचा विकास होतो. पण हा विकास साध्य करण्यासाठी लोकशाहीच्या मार्गातील अडथळे व आव्हाने दूर केली पाहिजेत. लोकशाहीसमोरील आव्हाने पुढीलप्रमाणे आहेत.

**१. सामाजिक असमानता (Social Inequality)**

**(अ) धर्मांधता :** लोकशाही समाजव्यवस्थेत धर्म, वंश, पंथ, दर्जा, व्यवसाय इत्यादी कारणांनी समाजात विषमता निर्माण झालेली आढळते. इंग्लंड, भारत, अमेरिका अशा लोकशाही देशात वर्णभेद, जातीभेद, धर्मांधता, जमातवाद, पंथभेद अशी विषमता आढळते. उदा. इंग्लंडमध्ये ख्रिश्चन पंथात प्रोटेस्टंट आणि कॅथॉलिक, अमेरिकेत काळा-गोरा, पाकिस्तान-अफगाणिस्तानमध्ये सिया-सुन्नी असा भेद आढळतो. भारतात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शिख, पारसी अशा विविध धर्माचे लोक आढळतात.

धर्मांधतेमुळे भारतात अनेकदा दंगली झालेल्याची उदाहरणे आहेत. उदा. १९५० साली दिल्ली, मुंबई, कलकत्ता येथे दंगली झाल्या. १९६९ साली गोहत्येमुळे अहमदाबाद येथे दंगल झाली. १९८४ साली इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर दिल्ली येथे दंगल झाली. १९८७ साली जगन्नाथाच्या यात्रेत घोषणा देण्यावरून अहमदाबाद येथे दंगल झाली. १९९२ साली बाबरी मशीद पाडल्यानंतर मुंबई, गुजरात व संपूर्ण महाराष्ट्रात दंगल झाली तर २००२ साली गोध्रा हत्याकांडानंतर हिंसाचाराची दंगल झाली. अशा प्रकारे भारतात अनेकदा धार्मिक आणि जातीय दंगली झालेल्या आहेत. या सर्वांचा विचार केला तर राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने ही बाब अधिक चिंतेची वाटते.

**(ब) जातीय राजकारण** : भारतीय राजकारणाचा विचार केला असता भारतीय लोकशाहीला जातीयतेची कीड लागलेली आहे. भारतीय समाज वर्णव्यवस्थेवर आधारलेला आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या चार वर्णात तीन हजारापेक्षा अधिक जाती-उपजाती निर्माण झालेल्या आढळतात. या जाती जन्मावरून ठरलेल्या आहेत. प्रत्येकाला आपलीच जात श्रेष्ठ आहे असा अहंगंड जडलेला आहे.

भारतात विविध घटक राज्यात विशिष्ट जातींचाच प्रभाव असलेला दिसून येतो. उदा. कर्नाटकात लिंगायत व ओक्कळिगा, आंध्र प्रदेशमध्ये रेड्डी व कम्मा, केरळमध्ये नायर व इझवा, उत्तरप्रदेशमध्ये रजपूत, जाट, अहिर व गुजर, तामिळनाडूमध्ये मुदलियार, गौडर व पदयाची आणि महाराष्ट्रात मराठा, ब्राह्मण, लिंगायत व मागासवर्गीय जाती इत्यादी. भारतीय राजकारणात मोठ्या प्रमाणात जातीय राजकारण चालू असलेले दिसते. त्यावरून अनेकवेळा जातीय दंगली होवून राजकीय हिंसाचार घडलेला आहे.

**२. लोकशाही प्रक्रियेत अल्पसहभाग :** लोकशाही ही लोकांनी, लोकांच्यासाठी, लोकांकडून चालविली जाणारी शासनव्यवस्था आहे. त्यामुळे यात लोकांचा अल्पसहभाग असेल तर खऱ्या अर्थाने लोकशाही हा गंभीर प्रश्न राहतो. कारण लोकप्रतिनिधींची निवड करण्यासाठी लोकांनी मतदान करावे ही किमान अपेक्षा असते. भारतात १९५२ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचे प्रमाण ३० ते ३५ टक्के इतके होते.

शहरी भागात थोडे अधिक प्रमाण होते. १९५२ पासून २०१४ पर्यंत झालेल्या निवडणुकीत मतांची टक्केवारी थोडी-थोडी वाढत गेली. पण तिचा वेग फारच मंद होता. लोकशाहीची मधुर फळे चाखण्यासाठी लोकसहभाग अधिकाधिक असावा लागतो. यासाठीच म्हणून २०१९ ला होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत मतांचा टक्का वाढावा, लोकसहभागाचे प्रमाण अधिक व्हावे यासाठी मतदार जागृती मोहीम सुरू करून १०० टक्के मतदार म्हणून नाव नोंदणी करण्याचा प्रयत्न झालेला दिसतो आहे. पण लोकसहभाग वाढविणे हे भारतीय लोकशाहीसमोर एक कडवे आव्हान उभे आहे हे नाकारता येत नाही.

**३. जमातवादी राजकारण** : अनेक देशात धर्म, वंश, पंथ अशा आधारावर समाजात काही गट निर्माण झाले आहेत. एखाद्या धार्मिक किंवा वांशिक गटामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होवून तो धार्मिक गट आपले संरक्षण करणेसाठी आणि धार्मिक हितसंबंध हेच सर्वोच्च हितसंबंध मानून ते जपण्यासाठी सामूहिक कृती करू लागतो तेव्हा त्याला जमातवाद असे म्हणतात. एखादी धार्मिक संघटना आपल्या गटाच्या हितसंबंधांना सर्वात जास्त महत्त्व देवून राजकीय चळवळ करू लागतो. तेव्हा ती संघटना जमातवादी मानली जाते. अशा संघटना आपली राजकीय उद्दिष्टे आणि कृती यांचा आधार धर्म मानते. बहुवांशिक समुहाचे एक राष्ट्र असणे ही कल्पना जमातवादी संघटनांना बहुदा मान्य नसते. म्हणूनच जमातवादी राजकारणातून फुटीरतावादी चळवळी उदयास येतात. अशा चळवळी कधी-कधी हिंसाचाराचाही आश्रय घेतात. उदा. श्रीलंकेतील तमिळी वंशाच्या लोकांची स्वतंत्र राज्यासाठी चाललेली चळवळ, भारतात पंजाबमधील खलिस्तानी चळवळ इत्यादी अशा जमातवादी राजकारणापासून लोकशाहीला धोका निर्माण होवू शकतो.

**४. प्रादेशिकता** : लोकशाही राष्ट्रात प्रादेशिक असमतोल बिघडल्यामुळे लोकशाही धोक्यात येऊ पाहत आहे. वेळप्रसंगी प्रादेशिक निष्ठा आणि प्रांताभिमान वाढल्यामुळे राष्ट्राचे विघटन होवू शकते. उदा. प्रादेशिकतेमुळेच पाकिस्तानचे विघटन होवून बांग्लादेशाची निर्मिती झाली आहे. उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश आणि राजस्थान या प्रांतांचे एक राज्य करावयाचे झाल्यास ते विस्ताराने अतिविशाल होईल आणि प्रशासकीयदृष्ट्या कारभार करणे अशक्यप्राय होईल म्हणून हिंदी भाषिकांची उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, राजस्थान अशी चार राज्ये करण्यात आली. येथेच खऱ्या अर्थाने भाषावार प्रांत रचनेला पहिले गालबोट लागले आणि प्रादेशिकवादाची सुरुवात झाली. प्रजेची अस्मिता, धर्म, भाषा, भौगोलिक हवामान या घटकांचा विचार करून अरुणाचल प्रदेश या राज्याचे विभाजन करून नागालँड, मेघालय, मिझोराम, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, मणीपूर आणि आसाम अशी नवीन राज्ये करण्यात आली. पण राज्याची अशी पुनर्रचना केली जात असताना भाषेचा विचार बाजूला पडला आणि प्रादेशिकवादाला खतपाणी घातले गेले.

**५. भ्रष्टाचार** : भ्रष्टाचार ही समाजव्यवस्थेला लागलेली किड आहे. लोकशाहीचा आधारस्तंभ असलेला प्रतिनिधी लोकांकडून निवडला जातो. त्यामुळे त्याच्याकडे सचोटी आणि चारित्र्यगुण असावेत. लोकांनी विश्वासाने आपल्याकडे सत्ता सोपविली आहे. आपण जनतेला जबाबदार राहून कार्य करावे याची सतत जाणीव त्यांना असावी. पण प्रतिनिधींची निवड होत असताना मतदारांना पैसे वाटले जातात. त्यामुळे निवडून आलेला प्रतिनिधी निवडणूक जिंकण्यासाठी केलेल्या खर्चाची भरपाई करतो येथूनच खऱ्या अर्थाने भ्रष्टाचाराला

सुरुवात होते. हा भ्रष्टाचार कोठे थांबेल हे समजणे फार मोठे अवघड झाले आहे. अशा दुष्ट चक्रात लोकशाही प्रक्रिया सापडली आहे. असे चित्र आज सर्वत्र दिसून येत आहे.

**६. दहशतवाद :** अलिकडील काळात दहशतवादाने अनेक देशात थैमान घातलेले आहे. दहशतवाद धार्मिक, वांशिक अशा कोणत्याही आधारावर निर्माण होऊ शकतो. अनेक देशात दहशतवादी संघटना निर्माण होत आहेत. या संघटनेचा लोकशाही प्रक्रियेवर विश्वास नाही. चर्चा, विचारविनिमय करून मार्ग काढणे या लोकशाही पद्धतीचा अवलंब दहशतवादी संघटना करत नाहीत. त्याऐवजी आधुनिक शस्त्रास्त्रे, स्फोटके यांचा वापर करून निरपराध लोकांचे बळी घ्यायचे, समाजात भितीचे आणि दहशतीचे वातावरण निर्माण करायचे हा मार्ग त्यांच्याकडून स्विकारला जातो. निवडणुकांवर बहिष्कार टाकणे, लोकांना मतदान करण्यास प्रतिबंध करणे, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारावर हल्ले करणे अशी कृत्ये दहशतवादी संघटनेकडून केल्याचे आढळून येते. त्यामुळे लोकशाही प्रक्रिया खंडीत होऊ लागली आहे.

**७. निरक्षरता :** लोकशाही यशस्वी करण्यासाठी राज्यात सुशिक्षित सुजाण व सुसंस्कृत नागरिक असावे लागतात. भारतीय जनतेला अगदी प्राचीन काळापासून निरक्षरता ही व्याधी जडलेली आहे. वेदोत्तर काळापासून साक्षरता-लेखन-वाचन बौद्धिक शक्तीचा विकास आणि उपयोगिता इत्यादी गोष्टीत समाजातील विशिष्ट वर्गाचीच मक्तेदारी होती.

लोकशाहीचे यश लोकांच्या राजकीय सहभागावर अवलंबून असते. त्यासाठी लोकशाही देशातील समाज राजकीयदृष्ट्या जागरूक असावा लागतो. सुशिक्षित व्यक्ती ज्या प्रकारे राजकीय घडामोडींचे ज्ञान प्राप्त करू शकतात त्याप्रमाणे अशिक्षित व्यक्ती करू शकत नाहीत. त्यांना लोकशाही मूल्यांचे महत्त्व समजून येत नाही. त्यामुळे लोकशाहीची मूल्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय खऱ्या अर्थाने जोपासली जात नाहीत. इंग्लंड, स्वित्झर्लंड, फ्रान्स या देशात साक्षरतेचे प्रमाण १०० टक्के असल्यामुळे तेथे लोकशाही पद्धती स्थिर व यशस्वी झालेली आहे. त्या देशात लोकशाही अधिक प्रगल्भ झालेली दिसून येते. अशा प्रकारे लोकशाहीसमोर आज अनेक आव्हाने उभी असलेली दिसून येतात.

**स्वयं अध्ययन प्रश्न ३**

**खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१. प्रातिनिधिक लोकशाहीचे किती प्रकार आहेत ?

२. इंग्लंडमध्ये ख्रिश्चन धर्मात कोणते पंथ आहेत ?

३. लोकशाही शासनपद्धती ही कोणत्या मार्गाने चालणारी प्रक्रिया आहे ?

४. जॉन स्टुअर्ट मिल यांनी लोकशाहीला शासनाचा कोणता प्रकार मानला आहे ?

५. पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या कोणत्या साली झाली ?

६. पाकिस्तानचे विघटन होवून कोणता देश निर्माण झाला ?

७. रेड्डी आणि कम्मा या जाती कोणत्या राज्यात प्रभावी आहेत ?

## ३.३ सारांश (Summary)

''राज्य आणि लोकशाही'' या घटकात आपण राज्याचा अर्थ याचा अभ्यास करून ॲरिस्टॉटल, ब्लंटश्ली, ऑगबर्न, वुड्रो विल्सन, गेटेल, ऑपेनहेम, गार्नर यांच्या व्याख्या विचारात घेवून राज्याचे घटक – लोकसंख्या भूप्रदेश, शासनसंस्था आणि सार्वभौमत्व यांचा अभ्यास केला आहे. तसेच लोकशाहीचा अर्थ विचारात घेवून अब्राहम लिंकन, लॉर्ड ब्राईस, सिली, डायसी, हर्नशॉम, डॉ. बेनीप्रसाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पं. नेहरू आणि म. गांधी यांच्या व्याख्या अभ्यासल्या आहेत. त्यानंतर लोकशाहीचे प्रकार, वैशिष्ट्ये, महत्त्व आणि लोकशाहीसमोरील आव्हाने यांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केलेला आहे.

**३.३.१ राज्याचे घटक** : (१) लोकसंख्या (२) भूप्रदेश (३) शासनसंस्था (४) सार्वभौमत्व

**३.३.२ लोकशाहीचे प्रकार** : (१) प्रत्यक्ष लोकशाही (२) अप्रत्यक्ष लोकशाही

**प्रत्यक्ष लोकशाहीचे मार्ग :**

**१.** लोकनिर्णय किंवा जनपृच्छा (Referendum)

(अ) ऐच्छिक जनपृच्छा (Optional Referendum)

(ब) अनिवार्य जनपृच्छा (Compulsory Referendum)

२. जनोपक्रम (Initiative)

(अ) स्पष्ट जनोपक्रम

(ब) अस्पष्ट किंवा अरचित जनोपक्रम

**३.** प्रत्यावहन किंवा आवर्तन

४. प्रारंभिक सभा

**प्रत्यक्ष लोकशाहीचे गुण**

१. प्रत्यक्ष लोकशाहीत नागरिक राज्यकारभारात जाणीवपूर्वक भाग घेतात. कारण त्यांनी त्यांचे संपूर्ण जीवन राज्यालाच अर्पण केलेले असते.

२. नागरिक राज्यकारभारात भाग घेत असल्यामुळे सरकार आणि जनता यामध्ये अधिक सलोख्याचे, सहकार्याचे संबंध निर्माण होवू शकतात.

३. प्रत्येक नागरिकाला त्याच्या योग्यतेप्रमाणे राज्यकारभारात भाग घेण्याची संधी प्राप्त होते.

४. प्रत्येक नागरिकाला राज्यकारभाराविषयी राजकीय ज्ञान प्राप्त होते.

**प्रत्यक्ष लोकशाहीचे दोष :**

१. मोठ्या लोकसंख्येच्या देशात प्रत्यक्ष लोकशाहीची पद्धती उपयुक्त ठरत नाही. कारण ती फक्त मर्यादीत लोकसंख्या व मर्यादीत भूप्रदेश असलेल्या देशातच प्रत्यक्ष लोकशाही शक्य असते.

२. प्रत्यक्ष लोकशाहीत सतत निवडणुका, जननिर्णय, जनोपक्रम, आवर्तन इत्यादी कार्यातच जनता कायमची गुंतलेली असते. त्यामुळे वेळ, पैसा व शक्तीचा अपव्यय होतो.

३. प्रत्यक्ष लोकशाही असलेल्या देशातील सर्वच नागरिकांना राज्यकारभाराबाबत उत्साह, आस्था, ओढ असेलच असे नाही.

४. या व्यवस्थेत मतदारांचा अंकुश राज्यकर्त्यांवर नेहमीच असल्यामुळे शासनकर्ते उदासीन बनतात.

५. प्रत्यक्ष लोकशाहीत काही ठराविक लोकांनाच राज्यकारभारात सहभागी होता येते. त्यामुळे तेथे समतेच्या तत्त्वाचा अभाव असतो. स्त्रिया, गुलाम यांना राज्यकारभारात भाग घेता येत नाही.

**अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधीक लोकशाही (Indirect Democracy)**

प्रातिनिधीक लोकशाहीचे संसदीय आणि अध्यक्षीय लोकशाही असे **दोन प्रकार** पाडले आहेत ते पुढीलप्रमाणे–

**(अ) संसदीय लोकशाही**

संसदीय लोकशाही *:* **वैशिष्ट्ये–** (१) दोन कार्यकारी प्रमुख (२) कायदेमंडळ आणि मंत्रिमंडळ यांचे जवळचे संबंध (३) सामुहिक जबाबदारी (४) पंतप्रधानाचे नेतृत्व (५) पक्षशिस्तीला महत्त्व

**(ब) अध्यक्षीय लोकशाही**

अध्यक्षीय लोकशाही : **वैशिष्ट्ये–** (१) एकच प्रमुख (२) जनतेकडून निवड (३) निश्चित कार्यकाल (४) अध्यक्षाचे स्थान

**अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधिक लोकशाहीचे गुण :**

(१) शासनाचा सर्वश्रेष्ठ प्रकार (२) समानतेची वागणूक (३) जबाबदार शासनपद्धती व कल्याणकारी राज्य (४) व्यक्तीस्वातंत्र्यांचे संरक्षण आणि व्यक्तीविकास (५) शांततेचा सनदशीर राज्यकारभार (६) सत्तेचे विकेंद्रीकरण आणि जनताभिमुख राज्यकारभार (७) राजकीय जागरूकता (८) अल्पसंख्यांकांच्या हिताचे रक्षण (९) जनहितासाठी सत्तेचा वापर (१०) नैतिक गुणांचा विकास (११) नेतृत्वाचा विकास (१२) लोकशाहीला शैक्षणिक महत्त्व (१३) व्यक्तीपूजेला स्थान नसते (१४) लोकशाहीत अनुवांशिकता नाही (१५) न्यायदानाची खास व्यवस्था (१६) राष्ट्रीय एकात्मता टिकून राहते.

**१. अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधिक लोकशाहीचे दोष :**

(१) राजकीयदृष्ट्या अज्ञानी लोकांचे शासन (२) राष्ट्रहितापेक्षा पक्षहिताला अधिक महत्त्व (३) तत्त्व आणि व्यवहार यात अंतर (४) लोकशाही धोरणात सातत्य नसते (५) बहुमताच्या नावाखाली हुकूमशाहीची निर्मिती (६) राज्यकारभाराचा दर्जा खालावतो (७) लोकशाहीत शिक्षणाचे अवमूल्यन होते (८) मंदगतीने विकास (९) नैतिक विकासाला घातक (१०) नोकरशाहीची सत्ता (११) भ्रष्टाचार, काळाबाजार व लाचलुचपत (१२) अस्थिर शासनपद्धती

### ३.३.३ लोकशाहीची वैशिष्ट्ये (Features of Democracy)

(१) जनतेचे सार्वभौमत्त्व (२) राजकीय समता (३) मुलभूत हक्क (४) सार्वत्रिक प्रौढ मताधिकार (५) जबाबदार शासनपद्धती (६) लोकमतानुसार शासन (७) कायद्याचे राज्य (८) शांततेच्या मार्गाचा अवलंब (९) व्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्व (१०) प्रभावी विरोधी पक्ष.

### ३.२.६ लोकशाही : महत्त्व (Democracy : Importance)

(१) लोकहिताचे शासन (२) जबाबदार शासनपद्धती (३) जनतेला जबाबदारीची जाणीव(४) लोकशाही मतपत्रिकेवर चालते (५) जनतेची शासनातील भागीदारी (६) लोकशाहीत शांततेला प्राधान्य.

### ३.३.५ लोकशाही समोरील आव्हाने (Challeges before Democracy)

(१) सामाजिक असमानता (Social Inequality) : (अ) धर्मांधता (ब) जातीय राजकारण (२) लोकशाही प्रक्रियेत अल्पसहभाग (३) जमातवादी राजकारण (४) प्रादेशिकता (५) भ्रष्टाचार (६) दहशतवाद (७) निरक्षरता.

### ३.४ पारिभाषीक शब्द, शब्दार्थ (Terms to Remember)

**१. सार्वभौमत्व** : राज्याची सर्वोच्च सत्ता, अंतिम सत्ता, राज्याचे स्वतंत्र अस्तित्व

**२. शासन** : राज्याची सार्वभौम सत्ता प्रत्यक्ष अंमलात आणणाऱ्या किंवा अंमलात आणण्याची शक्ती असणाऱ्या सर्व संघटनांची गोळा बेरीज.

**३. प्रत्यक्ष लोकशाही** : ज्या शासन पद्धतीमध्ये राज्यातील सर्व नागरिक राज्यकारभारामध्ये प्रत्यक्ष सहभागी होतात आणि शासनाचे निर्णय सर्व नागरिक मिळून घेतात ती व्यवस्था.

**४. अप्रत्यक्ष लोकशाही** : ज्या शासनपद्धतीत शासनाची सत्ता प्रत्यक्ष लोकांच्या हाती नसते तर लोकानी निवडून दिलेल्या आणि लोकांना जबाबदार असणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या हाती असते ती व्यवस्था.

**५. वंशभेद** : सर्व वंशाचे लोक एकसमान नाहीत असे मानणारा विचार.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answer to check your progress)

**स्वयं अध्ययन प्रश्न १**

| | | | |
|---|---|---|---|
| १) अमूर्त | २) पॅलेस्टाईन | ३) ५०४० | ४) प्रत्यक्ष |
| ५) चार | ६) १९४७ | ७) साम्यवादी | |

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

| | | | |
|---|---|---|---|
| १) लोकशाही | २) अब्राहम लिंकन | ३) स्वित्झर्लंड | ४) संसदीय |
| ५) प्रा. सिली | ६) अध्यक्षीय | ७) प्रत्यक्ष | ८) प्रत्यक्ष |

**स्वयं अध्ययन प्रश्न ३**

१. प्रातिनिधिक लोकशाहीचे दोन प्रकार आहेत.

२. इंग्लंडमध्ये ख्रिश्चन धर्मात प्रोटेस्टंट आणि कॅथॉलिक पंथ आहेत.

३. लोकशाही शासनपद्धती ही सनदशीर आणि शांततेच्या मार्गाने चालणारी प्रक्रिया आहे.

४. जॉन स्टुअर्ट मिल यांनी लोकशाहीला शासनाचा आदर्श प्रकार मानला आहे.

५. पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या १९८४ साली झाली.

६. पाकिस्तानचे विघटन होवून बांग्लादेश निर्माण झाला.

७. रेड्डी आणि कम्मा या जाती आंध्र प्रदेश राज्यात प्रभावी आहेत.

## ३.६ स्वाध्याय (सरावासाठी प्रश्न) (Exercises)

**(अ) दीर्घोत्तरी स्वरूपाचे प्रश्न :**

१. राज्याचा अर्थ सांगून त्याचे घटक स्पष्ट करा.

२. लोकशाहीचा अर्थ सांगून अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधीक लोकशाहीचे गुण-दोष स्पष्ट करा.

३. लोकशाही समोरील आव्हानाविषयी चर्चा करा.

**(ब) लघुत्तरी प्रश्न - टिपा लिहा**

१. प्रत्यक्ष लोकशाहीचे मार्ग

२. लोकशाहीची वैशिष्ट्ये

३. अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधीक लोकशाहीचे प्रकार

४. लोकशाहीचे महत्त्व

## ३.७ **संदर्भ (अधिक वाचनासाठी पुस्तके)** (Reference for further Study)


१. डॉ. घारे, पां. श्री. (१९७२), राज्यशास्त्र, पुणे : पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन.

२. गर्दे, दि. का. आणि बाचळ, वि. मा. (१९७९) आधुनिक राजकीय विश्लेषण, पुणे : कॉटिनेंटल प्रकाशन.

३. प्रा. घांगरेकर, चि. ग. (१९९१), आधुनिक राजकीय विश्लेषण, नागपूर : विद्या प्रकाशन.

४. प्रा. तिजारे, रा. अं. आणि प्रा. घांगरेकर, चि. ग. (१९९४), आधुनिक राजकीय विश्लेषण, नागपूर : श्री मंगेश प्रकाशन.

५. डॉ. भोळे, भास्कर ल. (१९९५), राजकीय सिद्धांत, नागपूर : पिंपळापूरे अॅड कं. पब्लिशर्स.

६. प्रा. तिजारे, रा. अं. आणि प्रा. घांगरेकर, चि. ग. (१९९७), राजकीय सिद्धांत आणि राजकीय विश्लेषण, नागपूर : श्री मंगेश प्रकाशन.

७. प्रा. घांगरेकर, चि. ग. (१९९९), राज्यशास्त्राची मूलतत्त्वे, नागपूर : श्री मंगेश प्रकाशन.

८. प्रा. मुठाळ, राम (१९९९), राजकीय सिद्धांत आणि राजकीय विचारवंत, नागपूर : अंशुल पब्लिकेशन्स.

९. प्रा. शेख, हाशम आणि डॉ. गवई, जोगेंद्र व. (२००८), राजकीय सिद्धांत, नागपूर : विश्व पब्लिशर्स अॅड डिस्ट्रिब्यूटर्स.

१०. प्रा. पाटील, बी. बी. (२००९), राजकीय सिद्धांत आणि संकल्पना, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

११. प्रा. पाटील, बी. बी. आणि प्रा. सौ. चव्हाण, उर्मिला (२०१४), राज्यशास्त्रातील मुलभूत संकल्पना, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

१२. प्रा. पाटील, बी. बी. आणि प्रा. डॉ. सौ. चव्हाण उर्मिला (२०१८), राज्यशास्त्र परिचय, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

घटक – ४

# राज्यशास्त्रातील प्रमुख संकल्पना

## ( Key Concepts in Political Science )

---

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

    ४.२.१ हक्क

    ४.२.२ स्वातंत्र्य

    ४.२.३ समता

    ४.२.४ न्याय

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

४.४ स्वयं अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

### ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर

* हक्क म्हणजे काय ? त्याचं स्वरूप व प्रकार समजून घेता येतील.
* स्वातंत्र्य म्हणजे काय ? त्याचे स्वरूप व प्रकार याची माहिती मिळेल.
* समता या संकल्पनेचा अर्थ, व्याख्या व प्रकार समजून घेता येतील.
* न्याय ही संकल्पना व तिचे प्रकार याची माहिती मिळेल.

## १.१ प्रस्तावना

व्यक्तीपासून समाज आणि समाजापासून राज्य निर्माण होते. या व्यक्ती व समाज यांच्या विकासाची जबाबदारी राज्यसंस्थेवर अवलंबून असते. या व्यक्ती व समाजाला आपल्या विकासाची अपेक्षा राज्याकडून असते. त्या विकासाची कल्पनाही समाजाकडून रंगवलेली असते. ते कल्पनेनुसार व राज्याकडून अपेक्षा याला आधार मानून समाज आपल्या विकासासाठी राज्याकडून मागण्या मान्य करण्याची अपेक्षा करीत असतो. समाजाने अपेक्षा केलेल्या मागण्यांचा विचार करून राज्य मागण्या मान्य करते. अशा मागण्या मान्य करीत असताना राज्य समाजाकडून मागण्यांची वर्गवारी करते व समाज विकासासाठी अत्यावश्यक मागण्यांनाच मान्यता देते. समाजाकडून केल्या गेलेल्या अनेक मागण्यातील ज्या मागण्यांना राज्याकडून मान्यता मिळते त्यालाच हक्क असे म्हणतात.

विकासाची जबाबदारी म्हणून राज्याने व्यक्ती व समाजाचा विकास साधला जाईल अशी परिस्थिती निर्माण करणे गरजेचे असते. जी परिस्थिती निर्माण केल्यामुळे व्यक्तीला आपला आर्थिक, सामाजिक व राजकीय विकास साधता येतो. अशी परिस्थिती म्हणजेच व्यक्तीचे हक्क मान्य करणे होय. अशा हक्कांना राज्यांकडून मान्यता मिळून त्यांची अंमलबजावणी झाल्याशिवाय व्यक्तीचा पर्यायाने समाजाचा विकास होणे अशक्य आहे. व्यक्तीच्या जीविताचे व वित्ताचे संरक्षण राज्याकडून केले जाईल हे हक्काचे उदाहरणे हक्कांचे महत्त्व सांगून जाते. अशा हक्कांच्या संरक्षणाची जबाबदारी ही राज्यावरच असते.

थोडक्यात, प्रथम व्यक्ती व नंतर समाज निर्माण झाला. या समाजातून राज्याचा उदय झाला. राज्याद्वारा हक्कांना मान्यता मिळून हक्क निर्माण झाले.

**व्याख्या** (Definication of Rights)

**१. प्रा. लास्की** : व्यक्तीला स्वतःच्या क्षमतेप्रमाणे विकास करता येईल. अशी राज्याद्वारे परिस्थिती निर्माण करणे यास मुलभूत अधिकार असे म्हणतात.

**२. बेन्थम** : व्यक्तीने स्वतःच्या विकासासाठी राज्याकडे मागणी करणे अशा मागण्यातील ज्या मागण्यांना राज्याद्वारे मान्यता मिळते. अशा राज्याद्वारे मान्य झालेल्या मागण्या म्हणजेच मुलभूत अधिकार होय.

**हक्कांचे स्वरूप** (Nature of Rights)

**१. समाजात हक्कांची निर्मिती होते** : हक्कांचा उदय समाजात होतो. समाजातील व्यक्ती व समाज यांच्या परस्पर संबंधातून हक्कांची निर्मिती होते.

**२. हक्क निर्मितीचा उद्देश व्यक्ती विकास आहे** : हक्क ही समाजाद्वारे राज्याकडे केलेली मागणी असते. अशा मागण्या व्यक्तिविकासासाठी आवश्यक असता. त्यांना राज्याची मान्यता असते.

**३. हक्कांना राज्याकडून कायदेशीर मान्यता मिळते** : हक्क ही समाजाची मागणी असली तरी, या मागण्या व्यक्ती विकासासाठी आवश्यक आहेत काय? याचा विचार करून राज्याने त्यांना मान्यता देणे आवश्यक

असते. राज्याच्या मान्यतेशिवाय हक्कांना काहीही महत्त्व नसते. म्हणजेच हक्कांच्या निर्मितीमध्ये राज्याची कायदेशीर मान्यता असते.

**४. हक्क आणि कर्तव्य नाण्याच्या दोन बाजू :** हक्क हे व्यक्तीला मोकळीकता देते तर कर्तव्य व्यक्तीला आवर घालते. हक्क ही व्यक्तीची राज्याकडून मागणी आहे. तर त्याच्या बदल्यात राज्याद्वारा व्यक्तीकडून काही कर्तव्य पालनाची अपेक्षा आहे. म्हणजेच हक्क आणि कर्तव्य नाण्याच्या दोन बाजू आहेत.

**५. हक्क हे काल व परिस्थिती सापेक्ष असतात :** विविध देशातील हक्कांचे स्वरूप भिन्न दिसून येतो. म्हणजे परिस्थितीनुसार हक्क हे बदलताना दिसतात. त्याचबरोबर विशिष्ट कालखंडातील हक्क हे काही कालावधीनंतर बदललेले दिसन येतात. याचाच अर्थ काळ व परिस्थितीनुसार हक्क हे सापेक्ष असतात.

**६. हक्क हे स्पष्ट व निश्चित स्वरूपाचे असतात :** हक्क हे सापेक्ष असले तरी एकाच प्रदेशातील अथवा एकाच कालखंडातील हक्क मात्र स्पष्ट व निश्चित असतात. त्याच्याबाबत संदिग्धता आढळून येत नाही.

**७. हक्कावर मर्यादा घालता येतात :** हक्कांवर मर्यादा नसणे म्हणजे व्यवस्थेत स्वैराचार असणे होय. त्यामुळे समाजात अराजक परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असते. म्हणून समाजहीतार्थ परिस्थितीनुसार हक्कांवर मर्यादा घालता येतात. अशा मर्यादा व बंधने घालण्याचा अधिकार राज्याला असतो.

**८. हक्क हे सकारात्मक असतात :** हक्कांवर राज्याद्वारे नियंत्रणावर असणार नसेल तर ती परिस्थिती समाजासाठी विघातक असेल. हक्क हे राज्याद्वारा राज्याच्या नियंत्रणाखाली समाजाला बहाल केले जातात. यांचा उद्देश व्यक्ती व समाजकल्याण हाच असतो. म्हणून ते सकारात्मक असतात.

**हक्कांचे प्रकार** (Types of Rights)

सर्वसाधारणपणे नैतिक हक्क व कायदेशीर हक्क असे हक्कांचे दोन प्रकार पडतात. यातील कायदेशीर हक्काचे नागरी हक्क व राजकीय हक्क असे दोन उपप्रकार पडतात. यातील नागरी हक्काचे दहा उपप्रकार तर राजकीय हक्काचे सहा उपप्रकार पडतात ते पुढीलप्रमाणे :

**१. नैतिक हक्क** (Moral of Rights) : हे हक्क नैतिक मूल्यांवर आधारीत आहेत. या हक्कांचा आधार नैतिक मूल्य असल्यामुळे त्यांना नैतिक हक्क असे संबोधले जाते. या हक्कांना राज्याची मान्यता नसली तरी समाजमान्यता असते. जर राज्याने नैतिक हक्कांना मान्यता दिली तर हक्कांचे कायदेशीर हक्कांमध्ये रूपांतर होते. एक पत्नी विवाह कायदा, वारसा हक्क व पोटगी हक्क हे नैतिक हक्कातून कायदेशीर हक्कांमध्ये रूपांतरीत झाले आहेत. मुलांनी थोरांचा आदर करावा, पुरुषांनी स्त्रियांचा आदर करावा, वृद्धांचा व रुग्णाचा मान-सन्मान करावा, वृद्ध माता-पित्यांचा सांभाळ करावा. आशा मूल्यांना राज्याची मान्यता नसल्यामुळे त्यांना हक्क म्हणता येणार नाही. या हक्कांच्या सुरक्षेचा विचार केला तर त्यांच्या सुरक्षिततेची व्यवस्था केली नाही. नैतिक हक्कांचं उल्लंघन झाले तर न्यायालयात दाद मागता येत नाही. अथवा हक्क नाकारणाऱ्यांना राज्याद्वारा शिक्षा करता येत नाही.

**२. कायदेशीर हक्क :** (Legal Rights) कायदेशीर हक्कांना राज्याची मान्यता असते म्हणून त्याला

कायदेशीर हक्क म्हणतात. नैतिक हक्कांना ज्यावेळी राज्याची मान्यता मिळते. त्यावेळी ते कायदेशीर हक्कामध्ये रूपांतरित होतात. कायदेशीर हक्कांना राज्याद्वारा संरक्षण असते. कारण या हक्कामागे राज्याची दंडशक्ती असते. या हक्कांचे उल्लंघन झाले तर राज्याद्वारा शिक्षेची तरतूद केलेली असते. कायदेशीर हक्काचे नागरी हक्क व राजकीय हक्क असे उपप्रकार पडतात.

**(अ) नागरी हक्क** (Civil Rights) : नागरी हक्काचे जीवीताचा हक्क, व्यक्तीस्वातंत्र्याचा हक्क, मालमत्तेचा हक्क, समतेचा हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, काम करण्याचा हक्क, कौटुंबिक जीवनाचा हक्क, संघटना स्वातंत्र्याचा हक्क, विचारस्वातंत्र्याचा हक्क, शिक्षणाचा हक्क व करार करण्याचा हक्क असे उपप्रकार पडतात ते पुढीलप्रमाणे :

**१. जीवीताचा हक्क** (Rights of Life) : नागरिकांच्या जीविताचे राज्यात आणि राज्याबाहेर संरक्षण करण्याची जबाबदारी राज्याकडे असते. हा हक्क नैसर्गिक स्वरूपाचा असल्यामुळे आदीम काळापासून या हक्काच्या संरक्षणाची जबाबदारी राज्याने स्वीकारलेली दिसते. व्यक्तीला या हक्कानुसार दुसऱ्याच्या जीविताला धोका पोहोचविणे गुन्हा आहे. तसाच गुन्हा स्वतःच्या जीविताला म्हणजे आत्महत्या करणे हा गुन्हा आहे. एखाद्याच्या खुनाला जबाबदार असलेल्या खुनी व्यक्तीला फाशीच्या शिक्षेऐवजी त्याचे मतपरिवर्तन करण्यावर भर देताना दिसून येते.

**२. व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क** (Right to Personal Freedom) : व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर राज्याचा विकास अवलंबून असतो. त्यामुळे व्यक्तीला स्वातंत्र्य व स्वातंत्र्याला पोषक वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी राज्यावर असते. म्हणजेच व्यक्ती विकासाला पोषक असे वातावरण निर्माण करून त्यांच्या विकासासाठी समान संधी निर्माण करून देण्याची जबाबदारी राज्याला करावी लागते. व्यक्तीच्या स्वातंत्र्यानंतर व्यक्तीचा विकास अवलंबून असतो. व्यक्तीच्या विकासावर राज्याचा विकास अवलंबून असतो. म्हणून व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर कमीत कमी मर्यादा घालून व्यक्ती विकासातील अडथळे दूर करण्याचे कार्य राज्याला करावे लागते. योग्य कारणाशिवाय व्यक्तीला अटकही करता येत नाही. शांततेच्या काळात व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा असत नाहीत. परंतु सार्वजनिक हीत म्हणजेच आणीबाणीच्या काळात व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा असल्या पाहिजेत याचे समर्थन भारतीय संविधानाद्वारे केले गेले आहे.

**३. मालमत्तेचा हक्क** (Right to Property) : व्यक्तीला आपल्या विकासासाठी मालमत्तेच्या हक्काची आवश्यकता आहे. व्यक्तीला आपल्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी संपत्ती, मालमत्ता व साधने यांची आवश्यकता असते. यासाठीच संपत्ती मिळविणे व त्याचा उपभोग घेण्याचा अधिकतर व्यक्तीला राज्याने दिला आहे. अशी परिस्थिती निर्माण करण्याची जबाबदारी राज्यावर असते. कारण त्या मिळकतीतून व्यक्ती गरजांची पूर्तता करते व आपला विकास साधते. व्यक्तीचा विकास पर्यायाने राज्याचा विकास साधला जातो. व्यक्तीला संपत्तीची जमवाजमव त्याचबरोबर त्या संपत्तीची विल्हेवाट लावण्याचा अधिकार असला तरी सार्वजनिक हितासाठी राज्य मालमत्तेच्या हक्कावर मर्यादा घालू शकते.

या हक्काबाबत कार्ल मार्क्स या विचारवंताची भूमिका विरोधी होती. त्यांच्या मते या अधिकाराच्या अवलंबामुळे समाजात गरीब व श्रीमंत असे दोन वर्ग निर्माण होतील. आर्थिक विषमतेमुळे वर्गसंघर्ष होऊन अराजक परिस्थिती निर्माण होईल तेव्हा आर्थिक समता निर्माण होऊन राज्याचे अस्तित्व टिकविण्यासाठी व्यक्तीच्या मालमत्तेच्या अधिकारावर काही प्रमाणात मर्यादा घालणे आवश्यक ठरते.

४. **समतेचा हक्क** (Right to Equality) : देशातील सर्व नागरिकांना जात, धर्म, लिंग, वर्ण, भाषा व जन्म ठिकाण या आधारावर भेद न करता सर्वांना समानतेने कायद्यापुढे मानणे म्हणजे सभ्यतेच्या हक्काचा अवलंब होय. सर्व जातीधर्मातील तळागाळापासून वरिष्ठ जातीतील लोकांना त्याचबरोबर व्यवस्थेतील साधा कर्मचारी ते वरिष्ठ अधिकारी अशा सर्वांना कायद्यापुढे समान मानले जाते. समतेच्या हक्काशिवाय व्यवस्थेतील राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात प्रगती होऊ शकत नाही. भारताचा विचार केला तर कलम १४ ते १८ दरम्यान समतेच्या हक्काची तरतूद दिसून येते. मागास जाती-जमाती व महिला यांच्यासाठी संविधानात केलेली आरक्षणाची तरतूद ही समतेच्या हक्काबाबत राज्याने घातलेली मर्यादा आहे. असे असले तरी ही मर्यादा समतेच्या हक्काला बाधा आणू शकत नाही. अशी तरतूद करणे अपरिहार्य आहे.

५. **धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क** (Right to Religion) : देशातील नागरिकांना आपल्या धर्मानुसार आचार-विचार-प्रचार करता येईल असा धार्मिक स्वातंत्र्याचा सारांश आहे. भारताच्या बाबत विचार केला तर संविधानातील कलम २५ ते २८ यामध्ये धार्मिक स्वातंत्र्याच्या हक्काची तरतूद करण्यात आली आहे. याबाबत अट अशी घालण्यात आली आहे की, धार्मिक स्वातंत्र्य उपभोगताना सार्वजनिक स्वास्थ्याला बाधा येणार नाही. असे असले तरी भारताने धर्मनिरपेक्ष पद्धतीचा स्वीकार केल्यामुळे काही प्रमाणात धार्मिक स्वातंत्र्यावर मर्यादा आल्या आहेत. जसे की, धार्मिक स्वातंत्र्याच्या नावाखाली राजकारणात हस्तक्षेप करता येणार नाही.

५. **काम करण्याचा हक्क** (Right to Work) : प्रत्येक नागरिकाला काम करण्याचा हक्क असला पाहिजे. नागरिकांच्या गरजेनुसार व क्षमतेनुसार त्यांना रोजगार उपलब्ध करण्याची जबाबदारी सरकारची असते. असे रोजगाराच्या बाबत आदर्श विचार असला तरी व्यावहारिकदृष्ट्या राज्यासाठी जबाबदारी म्हणून हे अवघड काम आहे. कारण वाढती लोकसंख्या व वाढत्या सामाजिक समस्यांच्या पार्श्वभूमीवर राज्याला ही जबाबदारी पेलणे अवघड आहे. अमेरिका व इंग्लंडसारख्या देशातही नागरिकांना कामाचा हक्क दिला नाही. एवढे मात्र खरे की, विकसित राष्ट्र कामगारांच्या सोयी-सुविधेबाबत जागृत आहेत. भारताचा विचार केला तर नागरिकांना काम करण्याचा हक्क दिलेला नाही. कामगारांच्या सोयी-सुविधा व हितासाठी राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये तरतूद केली आहे.

७. **कौटुंबिक जीवनाचा हक्क** (Right to Family Life) : व्यक्तीपासून कुटुंब आणि कुटुंबापासून अखिल समाज तयार झाला आहे. त्यासाठी कुटुंबाच्या कल्याणामध्ये समाजाचे कल्याण सामावले आहे. कौटुंबिक जीवनाचा हक्क देणे म्हणजे कुटुंब कल्याणातून समाज कल्याण साधणे होय. म्हणून कौटुंबिक जीवनाच्या हक्काची मागणी समाजातून होत आहे. विवाह, वारसा हक्क, घटस्फोट, बालकांचे व वृद्धांचे संगोपन

या विषयांचा समावेश कौटुंबिक जीवनाच्या हक्कामध्ये होतो. या विषयासंदर्भात राज्यसरकार कायदे करते आणि या कायद्याद्वारे वरील विषयासंदर्भात नागरिकांना काही अंशी मर्यादा व सूट दिली जाते.

**८. संघटना स्वातंत्र्याचा हक्क** (Right of Association) : माणूस हा निसर्गतः समाजशील प्राणी आहे. पशू-प्राण्यासारखा जंगलात राहणाऱ्या माणूस प्राण्याने माणूस नावाचे संघटन तयार केले आणि आजपर्यंतचा विकास साधला. या पार्श्वभूमीवर संघटना स्वातंत्र्याच्या हक्काचे समर्थन केले जाते. कुटुंब संस्था, विवाह संस्था, शिक्षण संस्था, राजकारण, धर्मकारण, अशा संघटनांशी व्यक्तीचा संबंध येत असतो. अशा मानवी संबंधामुळे व्यक्ती विकास व समाज विकास झाल्याचा इतिहास आहे. अशा समाजहितासाठी उदयाला आलेल्या संस्था संघटना आपापल्या उद्दिष्टांपासून दूर जावून समाजात अस्थिरता निर्माण करण्यासही कारण ठरताना दिसतात. त्यासाठी सरकारचे संघटना स्वातंत्र्याच्या हक्कांवर नियंत्रण असले पाहिजे याचेही समाजातून समर्थन होताना दिसते.

**९. विचार स्वातंत्र्याचा हक्क** (Freedom of Thought) : विचार स्वातंत्र्य व त्याचे प्रकटीकरण हे व्यक्तीच्या विकासाच्या पाया आहे. मिल्टन, मिल, लॉक व लास्की यासारख्या विचारवंतानी या हक्काचे जोरदार समर्थन केले आहे. संपूर्ण समाजाचा विरोध झाला तरी या हक्काची संधी राज्याने उपलब्ध करून दिली पाहिजे. प्राचीन काळात या हक्काला प्राधान्य दिले होते. म्हणून प्राचीन काळात विकास झाल्याचे दिसून येते. मध्ययुगीन काळात विचार व प्रकटीकरणाचे स्वातंत्र्य राजा व धर्मगुरूच्या मर्जीवर अवलंबून होते म्हणून या काळात अंधकार युग म्हणून ओळखतात. आधुनिक काळात या हक्काला पोषक वातावरण होते म्हणून हा काळ विकासाच्या बाबतीत सरस ठरला. या पार्श्वभूमीवर विचार स्वातंत्र्य व त्याचे प्रकटीकरण याला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**१०. शिक्षणाचा हक्क** (Right of Education) : शिक्षणाचे महत्त्व प्राचीन काळापासून आहे. त्याचे आत्यंतिक महत्त्व ओळखून प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे ही जबाबदारी आज राज्याने स्वीकारली आहे. शिक्षणाने व्यक्तीला मूल्य कळतात, हक्क व कर्तव्याची जाणीव होते. प्रतिनिधी निवडण्याची दृष्टी येते. यासाठी कसलाही भेदभाव न करता राज्याने सर्वांना समान पद्धतीने शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. वरील प्रकारचे उद्दिष्ट ठेवणाऱ्या शिक्षण संस्था स्थापन झाल्या पाहिजेत. त्या शिक्षण संस्थानी उद्दिष्टांपासून दूर जावू नये म्हणून त्यावर सरकारचे नियंत्रण असले पाहिजे.

**११. करार करण्याचा हक्क** (Right of Contract) : करार हा सामाजिक संस्था व संघटनांचा कणा असतो. केलेला करार त्या संस्था व संघटनावर बंधनकारक असतो कारण यावरच संस्था व संघटनांचा विकास अवलंबून असतो. त्यामुळे करार करण्याचा हक्क वैधानिक आहे. करार करीत असताना मानसिक व आर्थिक शोषण, माणसांचा क्रयविक्रय, अनैतिक, अन्यायकारकता असा गैरवापर होऊ नये यासाठी कराराची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होते की नाही हे पाहण्याचे कार्य शासनाला करावे लागते.

**(ब) राजकीय हक्क**

राजकीय हक्कांचा वापर लोकशाही शासनव्यवस्थेत चांगल्या प्रकारे होताना दिसून येतो. एवढेच नव्हे तर

लोकशाहीच्या यशाचा महत्त्वपूर्ण आधार म्हणून राजकीय हक्कांना ओळखले जाते. लोकशाहीतून राजकीय हक्कांना वगळल्यास लोकशाही पद्धतीच नष्ट होते. लोकशाहीचे दुसरे नाव म्हणजे लोकांचा राजकीय सहभाग होय. ज्यावेळी लोक राजकारणात वेगवेगळ्या पद्धतीने सहभाग घेतात. त्यासाठी त्यांना राजकीय हक्क देणे क्रमप्राप्त ठरते. मतदानाचा हक्क, पदे स्वीकारण्याचा हक्क, विरोध करण्याचा हक्क, अर्ज करण्याचा हक्क असे हक्कांचे वितरण नागरिकांना केले जाते.

**१. मतदानाचा अधिकार** (Right to Vote) : भारताचा विचार केला तर मतदानाचा हक्क आत्यंतिक महत्त्वाचा मानला जातो. लोकप्रतिनिधींना निवडताना प्रौढमताधिकार पद्धतीचा अवलंब केला जातो. या पद्धतीने निवडलेल्या प्रतिनिधीकडून भारताचा कारभार चालतो. जनतेने मतदानपद्धतीने प्रतिनिधी निवडले असल्यामुळे ते जनतेला जबाबदार असतात. भारताचा विचार केला तर वय, शिक्षण, संपत्ती, लिंग यांच्या आधारावर मतदानाचा अधिकार दिला जात असे. आज फक्त वयाचा विचार करून १८ वर्षे पूर्ण असणाऱ्या भारतीय नागरिकांना मतदानाचा हक्क दिला जातो. तरीपण वेडे, दिवाळखोर, गुन्हेगार, परकीय, अल्पवयीन यांना मतदानाचा हक्क नाकारण्यात आला आहे.

**२. निवडणूक लढविण्याचा हक्क** (Right to Contest Election) : प्रत्येक देशांच्या राज्यघटनेत वेगवेगळ्या अटी घालून निवडणूक लढविण्यास परवानगी दिल्याच्या तरतुदी आढळून येतात. याचा उद्देश एवढाच की, सुजाण, आदर्श, जागृत असा लोकप्रतिनिधी लोकांना मिळाला पाहिजे. ज्यामुळे नागरिकांच्या पर्यायाने व्यवस्थेचा विकास साधेल. या अटींशिवाय उर्वरीत गोष्टी मतदार पाहतील आणि सुजाण, आदर्श, सुसंस्कृत व सुशिक्षित व्यक्ती प्रतिनिधी म्हणून निवडतील यासाठी मतदारांनी अटी घातल्याच्या तरतुदी प्रत्येक देशाच्या संविधानात केल्याच्या दिसून येतात.

**३. सार्वजनिक अधिकार पद प्राप्तीचा हक्क** (Right to Hold Public Office) : भारताचा विचार केला तर देशाचा राष्ट्रपती ते प्रशासकीय अधिकारी अशी राजकीय पदे प्राप्त करण्याचा हक्क नागरिकांना देण्यात येतो. ही पदे प्राप्त करताना अथवा वितरित करताना धर्म, जात, लिंग या आधारावर भेदभाव केला जात नाही. अशी पदे प्राप्त करण्यासाठी निवडणूक लढवावी लागते तर प्रशासकीय अधिकारी पदी निवडीसाठी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असते. प्रशासकीय पदी निवडीसाठी शिक्षण, वय, अनुभव यासारख्या अटी घातल्या जातात.

**४. अर्ज करण्याचा हक्क** (Right to Petition) : प्रत्येक नागरिकांना शासकीय अधिकारी व पदाधिकारी यांच्याकडे तक्रार करण्याचा अधिकार आहे. अशा तक्रारी व समस्या सोडविण्यासाठी नागरिकांकडून रितसर अर्ज केला जातो. म्हणजेच एकूण व्यवस्थेबाबत आपणाला आपले मत या अर्जाच्या माध्यमातून अधिकारी व पदाधिकाऱ्यांपुढे मांडता येते. कायदेमंडळातील कामकाज काळात अशा तक्रारी व समस्यांबाबत चर्चा करण्यासाठी विशिष्ट वेळ ठरविला जातो. यावेळी संबंधित खात्याचे मंत्री त्या प्रश्नांची उत्तरे देतात. या अधिकारामुळे शासकीय अधिकारी व पदाधिकारी लोकाभिमुख बनतात.

**५. शासनावर टीका करण्याचा हक्क** (Right to Criticise Government) : निवडून आलेल्या प्रतिनिधींनी हुकूमशाही पद्धतीने वागू नये. त्या प्रतिनिधींवर जनतेचा अंकुश रहावा म्हणून वृत्तपत्रे, मोर्चे, आंदोलने, घेराओ सभा या माध्यमाद्वारे जनता प्रतिनिधींना धारेवर धरू शकते असे करण्याचे कारण सार्वजनिक हीत व वैयक्तिक हीत असे शकते. लोकांच्या सरकारवरील टीका करण्याच्या अधिकारामुळे सजग राहते अशी टीका करताना वास्तविकता व नितीमत्तेचा आधार असावा ज्यामुळे समाजहीत साधले जाईल. चारित्र्य हनन, समाज घातक अशा साहित्यावर शासन मर्यादा घालू शकते. देशातील आणीबाणी प्रसंगी लोकांच्या या अधिकार शासन मर्यादा घालू शकते.

**४. विरोध करण्याचा हक्क** (Right to Resist) : शासनाच्या जुलमी व अन्यायी वृत्तीला व कायद्याला विरोध करण्यासाठी नागरिकांना प्रतिकार करण्याचा अधिकार दिला आहे. नागरीक या हक्कांचा वापर, भाषण, आंदोलन, घेराओ, बंद, मोर्चे या माध्यमातून करतात. या हक्काचे स्वरूप मर्यादित स्वरूपाचे असते. कारण राज्याची शांतता व सुव्यवस्था बिघडू नये म्हणून शासन नागरिकांच्या प्रतिकार करण्याच्या हक्कावर मर्यादा घालू शकते.

**स्वयं अध्ययन प्रश्न १**

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

१. हक्कांच्या सुरक्षेसाठी भारतीय संविधानात व्यवस्था केली आहे. ( )

२. व्यक्ती आणि समाज यांच्या विकासाची जबाबदारी राज्यसंस्थेवर असते. ( )

३. नैतिक हक्क मूल्यांवर आधारीत नसतात. ( )

४. माणूस हा निसर्गतः समाजशील प्राणी नाही. ( )

५. लोकशाहीत राजकीय हक्कांना महत्त्व नाही. ( )

## ४.२.२ **स्वातंत्र्य** (Liberty)

**प्रस्तावना** (Introduction)

व्यक्तीला स्वातंत्र्य दिले तर व्यक्तीचा विकास होतो. व्यक्तीचा विकास झाला तर समाजाचा पर्यायाने राज्याचा विकास होतो. म्हणून स्वातंत्र्य या संकल्पनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रत्येक व्यक्तीला नैसर्गिकदृष्ट्या आचार-विचार व उच्चाराच्या स्वातंत्र्याची अपेक्षा असते. स्वातंत्र्याबाबत बंधनाचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य ही गैरसमजूत आहे. असे स्वातंत्र्य मानवी समाजाला व्यक्तीला देणे म्हणजे अराजकतेला आमंत्रण असेल, बंधनाचा अभाव असे स्वातंत्र्य पशु-प्राणी यांच्यासाठी जंगलामध्ये असते. वस्तुस्थितीचा विचार केला तर मानवी समाजात कोणत्याही व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य दिले जात नाही. समाज म्हटले की काही अंशी बंधने आलीच. व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर राज्याचे बंधन असते. त्याचबरोबर समाजाचेही बंधन त्या व्यक्तीवर असतात. याशिवाय प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा आचार व विचारावर नियंत्रण ठेवावेच लागते. व्यक्तीला स्वतःचा

विकास करण्यासाठी जशी स्वातंत्र्याची गरज असते. तसे दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर मर्यादा येतील असे स्वातंत्र्यावर बंधने घालणे अपेक्षित असते. अशी बंधने सकारात्मक बंधने म्हणून ओळखली जातात. थोडक्यात, व्यक्तिविकास व समाज विकासासाठी जसे व्यक्तीस्वातंत्र्य आवश्यक आहे तसे स्वातंत्र्यावर बंधने ही आवश्यक आहेत.

**स्वातंत्र्याचा अर्थ** (Meaning of Liberty)

स्वातंत्र्य हा शब्द Liberty या शब्दाचे भाषांतर आहे. Liberty हा शब्द Liber या लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे. याचा अर्थ 'बंधनाचा अभाव' किंवा 'स्वतंत्र' असा होतो. स्वातंत्र्याच्या या अर्थाचे समर्थन थॉमस् हॉब्स यांनी केले आहे. परंतु हॉब्जच्या मते मान्य असलेल्या स्वातंत्र्याच्या परिणामातून अराजकता निर्माण होण्याचा धोका संभवतो. या बाबतत जे. एस. मिलने नकारात्मक स्वातंत्र्य मान्य करून व्यक्तीच्या वैयक्तिक संबंधीत कृती बाबत संपूर्ण स्वातंत्र्य मान्य केले आहे. ज्यावेळी आपल्या आचार, विचाराचा संबंध दुसऱ्याच्या कृतीशी संबंधित येतो त्यावेळी स्वातंत्र्यावर बंधन आली पाहिजेत.

स्वातंत्र्य या शब्दाला Liberty आणि freedom असे दोन शब्द वापरलेले दिसून येतात. परंतु व्यावहारिक वापरताना दोन्ही शब्दाचा वापर भिन्न अर्थाने केला जातो. व्यक्तीचे राजकीय स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, आर्थिक स्वातंत्र्य या अर्थाने Liberty हा शब्द वापरला जातो. तर राज्याचे स्वातंत्र्य या अर्थाने freedom हा शब्द वापरला जातो.

**स्वातंत्र्याची व्याख्या** (Definiation of Liberty)

१. व्यक्तीला स्वतःच्या इच्छेप्रमाणे आचरण करण्याचे सामर्थ्य म्हणजे स्वातंत्र्य होय. व्यक्तीच्या विकासासाठी तशा प्रकारचे वातावरण निर्माण करून देणे हे स्वातंत्र्याचे उद्दिष्ट असते. **– मॉंटेस्क्यू**

२. संपूर्ण बंधनाचा अभाव असणे म्हणजे स्वातंत्र्य नसून अनुचित बंधनाऐवजी योग्य बंधनाची व्यवस्था म्हणजे स्वातंत्र्य होय – **मॅकेनी.**

३. व्यक्तीला आपल्या मतांना अनुसरून वागण्याची संधी देणे. परंतु तिच्या वागण्याचा इतरांच्या व्यवहारावर परिणाम होणार नाही अशी बंधने लादणे म्हणजे स्वातंत्र्य होय. – **हर्बर्ट स्पेन्सर**

४. ज्यामुळे इतर समस्यांशिवाय व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्वाचे प्रकटीकरण करता येते म्हणजे स्वातंत्र्य होय. – **जी. डी. एच. कोल**

सर्वसाधारणपणे वरील व्याख्यांमध्ये सकारात्मक किंवा नकारात्मक अशा दोन प्रकारच्या स्वातंत्र्याचे समर्थन दिसून येते. नकारात्मक स्वातंत्र्य म्हणजे व्यक्ती व्यवहार करीत असताना तिच्या कृतीवर कसलेच बंधन नसणे म्हणजेच संपूर्णपणे बंधनाचा अभाव म्हणजे नकारात्मक स्वातंत्र्य होय. याउलट व्यक्तीविकासासाठी आवश्यक असलेल्या स्वातंत्र्याचा उपभोग घेत असताना व्यक्ती हिताच्या दृष्टीने, विकासाच्या दृष्टीने बंधने लादणे आवश्यक ठरते यास सकारात्मक स्वातंत्र्य म्हटले जाते.

**स्वातंत्र्याचे प्रकार**

स्वातंत्र्य या संकल्पनेचे प्रकटीकरण विविध स्वरूपात होत असते. त्याला अनुसरून स्वातंत्र्य संकल्पनेचे नैसर्गिक स्वातंत्र्य, नागरी स्वातंत्र्य, राजकीय स्वातंत्र्य, आर्थिक स्वातंत्र्य व राष्ट्रीय स्वातंत्र्य हे प्रकार पडतात.

**१. नैसर्गिक स्वातंत्र्य** (Natural Liberty) : आदीम अवस्थेत माणूस जंगलात इतर पशु-प्राण्यांप्रमाणे जीवन जगत होता. त्यावेळी माणूस नैसर्गिक स्वातंत्र्याचा उपभोग घेत होता. अशा मानवी अवस्थेला हॉब्ज, लॉक व रुसो या विचारवंतानी निसर्गावस्था असे म्हटले आहे. त्या प्रारंभिक निसर्गावस्थेत माणूस स्वतंत्र, बंधनमुक्त, स्वेच्छेनुसार जीवन जगत होता. त्याच्यावर कोणाचेही कसलेही बंधन नव्हते. लॉकच्या मते हा मानवी सुखाचा काळ होता. परंतु नियमांची व्याख्या त्यांना करता येत नव्हती. त्यासाठी राज्याची निर्मिती झाली व व्यक्तीवर राज्याद्वारा बंधने आली. हॉब्जच्या मते नैसर्गिक अवस्थेतील बंधनाच्या अभावामुळे अराजकता माजली व जीवन संघर्षमय पशुप्रमाणे झाले. अशावेळी समजदार लोक एकत्र आले आणि आपापसात करार करून राज्याची निर्मिती झाली व राज्याकडून व्यक्तीविकासासाठी, समाजहितासाठी व्यक्तीवर काही बंधने लादण्यात आली.

**२. नागरी स्वातंत्र्य** (Civil Liberty) : जॉन, लॉक व रुसोच्या मते नैसर्गिक अवस्थेनुसार समाज व राज्याची निर्मिती झाली व व्यक्ती त्याचा सदस्य बनली. समाज व राज्याचा सदस्य या नात्याने व्यक्तीला जे स्वातंत्र्य मिळते त्याला नागरी स्वातंत्र्य असे म्हणतात. नागरी स्वातंत्र्यामध्ये लेखन स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, संघटना स्थापण्याचे स्वातंत्र्य व व्यवसायाचे स्वातंत्र्य इ. स्वातंत्र्याचा समावेश होतो. अशा प्रकारचे स्वातंत्र्य व्यक्तीस राज्याकडून प्राप्त होते. सर्वांना समानतेने दिलेल्या नागरी स्वातंत्र्याचे रक्षणही राज्याकडूनच केले जाते. नागरी स्वातंत्र्याचा उपभोग घेताना राज्यघटनेद्वारा अपेक्षा एवढीच केली जाते की, इतरांच्या म्हणजे इतर व्यक्तींच्या अधिकाराचा विचार केला पाहिजे. थोडक्यात, नागरी स्वातंत्र्याचे रक्षण करणे राज्याची जबाबदारी आहेतच. त्याशिवाय स्वतःही इतरांच्या अधिकारासाठी मर्यादा घालणे गरजेचे आहे. एका व्यक्तीकडून त्याच बरोबर सरकारद्वाराही व्यक्तीच्या नागरी स्वातंत्र्यावर आक्रमण होते. त्यावेळी नगरिकांना त्याबाबत न्याय मागण्याचा अधिकार दिलेला असेल तरच त्या नागरी स्वातंत्र्याचे महत्त्व आहे. त्या अनुषंगानेच भारतात मुलभूत अधिकारांचा समावेश करण्यात आला आहे. सार्वजनिक हितार्थ राज्याद्वारा नागरी स्वातंत्र्यावर मर्यादा घातल्या जातात.

नागरी स्वातंत्र्य लोकशाही राज्यात जापेसले जाते तर हुकूमशाही राज्यात त्याचा संकोच केला जातो.

**३. राजकीय स्वातंत्र्य** (Political Liberty) : मतदानाचा अधिकार, निवडणूक लढविण्याचा अधिकार, सार्वजनिक पदे स्वीकारण्याचा अधिकार, शासनावर टीका करण्याचा अधिकार इ. अधिकारांचा समावेश राजकीय स्वातंत्र्यामध्ये होतो. अशा राजकीय स्वातंत्र्याची जोपासना लोकशाही राज्यात चांगल्या प्रकारे होते तर सर्वंकष राज्यात त्याचा संकोच केला जातो. असे राजकीय स्वातंत्र्य लोकशाही राज्यात शिक्षण प्रसार, राजकीय पक्षाचे कार्य आणि वृत्तपत्रांचे कार्य या माध्यमातून प्रकट होत असते.

राजकीय स्वातंत्र्यामुळे योग्य पद्धतीने लोकप्रतिनिधींची निवड होते. त्याचबरोबर निवडलेले प्रतिनिधीही लोकांप्रती जबाबदार राहतात. कारण लोकांना शासनावर टीका करण्याचा अधिकार याच स्वातंत्र्यामुळे मिळतो. राजकीय स्वातंत्र्यामुळे राजकारभारातील प्रवेशद्वार सर्वांसाठी खुले होते. समाजातील आदर्श, गुणी व्यक्तींच्या कृती–कार्याला चालना मिळते. यामुळे आज प्रत्येक व्यक्तीचा विविध माध्यमातून राजकारणात सहभाग दिसून येतो. प्रत्येक व्यक्ती कोणत्या तरी एक पक्षाची सदस्य असताना दिसून येते. त्यामुळेच प्रत्येक व्यक्ती प्रत्येक पक्षाच्या हालचाली, आश्वासने, कार्यकृतीवर प्रसार माध्यमांना सोबतीला घेऊन लक्ष ठेवून आहेत. राजकीय स्वातंत्र्याचा चांगलाप्रभाव व परिणाम पडण्यासाठी शिक्षणप्रसर महत्त्वाचे आहे. शिक्षणामुळे लोकांना आपल्या हक्कांबद्दल जाणीव व जागृती होते. त्यामुळे योग्य प्रतिनिधीला मतदान होऊन कार्यकुशल प्रतिनिधी निवडले जातात. सुशिक्षित लोकच राजकीय स्वातंत्र्याचा चांगला उपभोग घेऊ शकतात. त्याचबरोबर शिकलेले लोकच सरकार व राजकीय पक्षांच्या चुकांवर आवाज उठवू शकतात. त्यामुळे राजकीय स्वातंत्र्याच्या चांगल्या परिणामासाठी शिक्षणाचा प्रसार महत्त्वाचा आहे.

**४. आर्थिक स्वातंत्र्य** (Economic Liberty) : व्यक्तीला जीवन जगण्यासाठी आर्थिक स्वातंत्र्य महत्त्वाचे आहे. आर्थिक स्वातंत्र्याशिवाय इतर स्वातंत्र्याला काहीही किंमत नाही. कारण या स्वातंत्र्याशिवाय व्यक्ती जिवंत राहू शकत नाही. व्यक्ती जिवंतच राहिली नाही तर इतर स्वातंत्र्याचा ती कशी उपभोग घेणार? व्यक्तीच्या दैनंदिन मुलभूत गरजा भागविण्यासाठी त्यांना त्यांच्या पात्रतेनुसार व गरजेनुसार योग्य संधी व सुरक्षितता उपलब्ध करून देणे म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य होय. अशी परिस्थिती निर्माण करण्याची जबाबदारी राज्याची असते. थोडक्यात, मालमत्ता मिळविणे, व्यवसाय करणे यासाठी व्यक्तीला अधिकार दिले जातात. असे करण्याने व्यक्तीच्या अन्न, वस्त्र व निवारा या प्राथमिक गरजा पूर्ण होतात व व्यक्ती विकासाची वाट सुकर होते.

आर्थिक स्वातंत्र्यावेळी आर्थिक स्थैर्याची गरज महत्त्वाची असते. त्यामुळे आर्थिक समता स्थापन करणे गरजेचे असते. आर्थिक समतेशिवाय आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे 'श्रीमंत हा श्रीमंतच होईल आणि गरीब हा गरीबच राहील' असे उद्दिष्ट साधने होईल. असे उद्दिष्ट साधने म्हणजे आर्थिक अस्थैर्य निर्माण होणे होय. यासाठी सरकारला आर्थिक समता प्रस्थापित करावी लागेल. दारिद्र्य निर्मूलन, मजुरांना न्याय, आर्थिक विषमता कमी करणे, बेकारी निवारण, उत्पन्नाची न्याय वाटणी, मजुरांचा व्यवस्थेत सहभाग इ. कार्ये शासनाला करावी लागतील. भारताचा विचार केला तर आर्थिक स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यासाठी आर्थिक समता स्थापन व्हावी म्हणून व्यावहारिक पातळीवर पंचवार्षिक योजना, रोजगार हमी योजना, वीस कलमी कार्यक्रम, कामगारांच्या हितार्थ केलेले विशेष कायदे असा कृतीकार्यक्रम विचारात घेता येईल.

**५. राष्ट्रीय स्वातंत्र्य** (National Liberty) : राष्ट्रीय स्वातंत्र्य असेल तरच व्यक्तीच्या इतर स्वातंत्र्य व अधिकाराला महत्त्व आहे. स्वातंत्र्य असलेल्या राष्ट्रांमध्येच व्यक्तीला अधिकार व स्वातंत्र्य असते. ज्या ठिकाणी राष्ट्र पारतंत्र्यात असते. त्या ठिकाणी व्यक्ती गुलाम असते. राज्य इतर कोणत्याही परकीय सत्तेच्या नियंत्रणाखाली अथवा वर्चस्वाखाली न संचलित होता, स्वतःच्या इच्छेने पद्धतीने संचलित होते. त्या राज्याला राष्ट्रीय स्वातंत्र्य असते. असे राष्ट्रीय स्वातंत्र्य असलेले राज्य आपले बहिर्गत व अंतर्गत समस्या स्वतःच्या बळावर सोडवित

असते. म्हणजेच स्वयंनिर्णयाचा अधिकार हाच राष्ट्रीय स्वातंत्र्याचा कणा आहे. आज प्रत्येक राज्याला राष्ट्रीय स्वातंत्र्य आहे. एवढेच नव्हे भविष्यात हे स्वातंत्र्य टिकून राहावे म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाकडून तसे प्रयत्न केले जात आहेत. भारताचा विचार केला तर ब्रिटिशांच्या वर्चस्वाखाली असताना राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळाले व हे आजही टिकून आहे.

राष्ट्रीय स्वातंत्र्याचा संबंध भावनेशी आहे. राष्ट्र हे सार्वभौम, स्वतंत्र असेल तरच राष्ट्रवादी भावना प्रकट होते. त्यामुळे नागरिकांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो.

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. हॉब्जच्या मते स्वातंत्र्य म्हणजे काय ?

२. आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे काय ?

३. हुकूमशाही राज्यात व्यक्तिस्वातंत्र्याची स्थिती कशी असते ?

४. राष्ट्रीय स्वातंत्र्य म्हणजे काय ?

५. हॉब्जच्या मते निसर्ग अवस्था कशी होती ?

### ४.२.३ **समता** (Equality)

**प्रस्तावना**

१७८९ साली फ्रेंच राज्यक्रांती आली. त्यावेळी 'स्वातंत्र्य, समता व बंधुता' या तीन तत्त्वांची घोषणा करण्यात आली. तेव्हापासून या तीन तत्त्वांची चर्चा सुरू झाली. त्या घोषणेत स्पष्टपणे म्हटले आहे की, 'प्रत्येक व्यक्ती जन्मतःच स्वतंत्र असून तिला स्वातंत्र्याचा आणि समतेचा अधिकार असतो' या घोषणेपासून म्हणजेच १८व्या शतकपासून समता ही संकल्पना राज्यशास्त्रात विशेषत्वाने अभ्यासली जाऊ लागली आहे. यानंतर भारतीय संविधानात समतेचा विशेषत्वाने पुरस्कार केल्याचे दिसून येते.

समता म्हणजे राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रात समानता यावी असा दृष्टिकोन आहे. परंतु समता म्हणजे समानता, सारखेपणा असा वरवरचा संकुचित अर्थ व्यवहारात घेताना दिसून येते. तसे पाहिले तर समता ही प्रक्रिया आहे, एक उद्दिष्ट आहे. ती संपूर्णपणे प्रस्थापित होणे कठीण आहे. असे कठीण उद्दिष्टच मानवाने स्वीकारले आहे. नैसर्गिकदृष्ट्या संपूर्ण मानव जात, रंग, रूप, स्वभाव व मनभावना या बाबतीत विषम आहे. ही विषमता कधीच कमी होऊ शकत नाही आणि हे मानवाचे उद्दिष्टही नाही. अशा नैसर्गिक विषमतेबरोबरच मानवनिर्मित विषमता मानवी समाजात पसरली आहे. यातून मानवी समाज धोक्यात आला आहे. ही मानवनिर्मित विषमता कमी करणे मानवाचे उद्दिष्ट आहे. ही मानवनिर्मित विषमतेचे समतेमध्ये रूपांतरण होणे या अर्थाने येथे

समता अपेक्षित आहे. राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात मानवनिर्मित विषमता आढळून येते. वर्गभेद, जातीभेद, धर्मभेद, श्रीमंत-गरीब, वर्णभेद व लिंगभेद अशी मानवनिर्मित विषमतेची उदाहरणे सांगता येतील.

थोडक्यात, आर्थिक, सामाजक व राजकीय क्षेत्रात आढळून येत असलेली मानव निर्मिती विषमता नष्ट करून समता निर्माण करणे हे मानवी समाजाचे उद्दिष्ट आहे. यासाठी सर्वांना समान वागणूक व सर्वांना समान संधी देणे म्हणजे समता होय. व्यक्ती व समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी मानव निर्मित विषमता नष्ट करणे व सर्वांना विकासाची समान संधी देणे म्हणजे समता होय.

**समतेचा अर्थ** (Meaning of Equality)

भारताचा विचार केला तर पूर्वी जन्म, जात, धर्म, वंश, भाषा, संपत्ती व वर्ण या आधारावर व्यक्तीला विशेष अधिकार दिले जात होते. त्यामुळेच जातिभेद, लिंगभेद, वर्णभेद अशी विषमता वाढत गेली. समाजात जोपर्यंत व्यक्तीला विशेष अधिकार दिले जातील तोपर्यंत समता स्थापन होणार नाही. त्यासाठी व्यक्ती विशेष अधिकार या मूळावर घाव घालून ते नाकारले पाहिजेत. त्यावेळी समता प्रस्थापित होईल. समता एक प्रक्रिया आहे. याचा अर्थ असा की, समाजातील कोणत्याही व्यक्तीला असे विशेष अधिकार दिले जाणार नाहीत ज्यामुळे ती व्यक्ती इतरांवर मात करून त्याला आपल्या नागरिकत्वाचे अधिकार नाकारील. विविध क्षेत्रातील विषमता नष्ट करून समता स्थापन करणे गरजेचे आहे. यासाठी कायद्यापुढे सर्व व्यक्ती समान असतील. कोणताही लाभ अथवा शिक्षा असेल त्यासाठी सर्वांना समान समजले जाईल. सर्वांना राज्यकारभारात सहभागी होताना समान संधी दिली जाईल. यासाठी सर्वांना विकासाची समान संधी उपलब्ध होईल. अशी परिस्थिती निर्माण करणे राज्याची जबाबदारी असते. उदा. व्यक्तीला राजकारणात सहभागी होण्याची समान संधी व परिस्थिती निर्माण केली तर सर्वांना राजकारणात सहभागी होता येईल.

थोडक्यात समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे अराजकतेचे लक्षण आहे. त्यासाठी समता महत्त्वाची आहे. अशा समतेसाठी मानवनिर्मित विषमता नष्ट करणे गरजेचे आहे.

**समतेची व्याख्या** (Defination of Equality)

१. कोणाही एका व्यक्तीला समाजात असे स्थान दिले जाणार नाही की ज्यामुळे व्यक्ती आपल्या शेजाऱ्यावर मात करून त्याला आपले नागरिकत्वाचे अधिकार नाकारतील. - **प्रा. लास्की**

२. समता म्हणजे मानवनिर्मित विषमता नष्ट करणे होय.

**समतेचे प्रकार** (Kinds of Equality)

**१. नागरी समता** (Civil Equality) : कायद्यापुढे सगळ्यांना समान मानणे म्हणजेच नागरी समता होय. यालाच कायदेशीर समता या नावानेही ओळखले जाते. ज्या ठिकाणी जात, धर्म, वंश व लिंग या आधारावर भेदभाव न करता सगळ्यांसाठी एकच कायदा म्हणजे समान कायदा निर्माण केला जातो. तेथे नागरी समता आहे असे समजले जाते. लिंगभेद, जातीभेद, धर्मभेद अशी मानवनिर्मित विषमता नष्ट केल्यानंतरच नागरी समता

प्रस्थापित होऊ शकते. व्यवस्थेतील अराजकता कमी करून स्थैर्य निर्माण करण्यासाठी नागरी समता महत्त्वाची असते.

२. **राजकीय समता** (Political Equality) : सध्या जगभर यशस्वी ठरलेल्या लोकशाही शासनपद्धतीचे अस्तित्व राजकीय समतेवर असल्याचे दिसून येते. प्रत्येक नागरिकाला वेगवेगळ्या माध्यमातून राजकीय सहभागाची संधी उपलब्ध करून देणे म्हणजे राजकीय समता होय. ज्या ठिकाणी प्रत्येकाला राजकीय सहभाग घेता येईल अशी राज्याद्वारे स्थिती निर्माण केली जाते. तेथे राजकीय समता अस्तित्वात असते. राजकीय सहभागाची स्थिती निर्माण करणे म्हणजे मतदानाचा हक्क देणे. निवडणूक लढविण्याचा हक्क देणे, सार्वजनिक पदे स्विकारण्याचा हक्क, शासनावर टीका करण्याचा हक्क देणे म्हणजे राजकीय अधिकार उपभोगण्याची स्थिती निर्माण करणे होय. जातीभेद, धर्मभेद व लिंगभेद न करता सर्वांना राजकीय सहभागाची संधी राज्याद्वारे दिली जाते. १९व्या शतकापर्यंत धर्म, जात व लिंग यांचा विचार करून मतदानाचा व राजकीय सहभागाचा अधिकार होता. याला राजकीय समता म्हणता येणार नाही.

३. **सामाजिक समता** (Social Equality) : जात, धर्म, वंश व लिंग या आधारावर भेदभाव न करता सर्वांना विकासाची समान संधी राज्याद्वारे देणे म्हणजे सामाजिक समता होय. प्राचीन काळात सामाजिक समतेचे दाखले मिळतात. परंतु मध्ययुगीन काळात मानवनिर्मित विषमता वाढत गेली आणि सामाजिक समता नष्ट झाली. मध्ययुगामध्ये जात, धर्म व लिंग या आधारावर व्यक्तीला विशेषाधिकार दिले गेले आणि सामाजिक समता नष्ट झाली. परंतु आधुनिक काळात लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये व्यक्तीला दिले जाणारे विशेषाधिकार मर्यादित केले आणि पुन्हा सामाजिक समता प्रस्थापित होत आहे. सामाजिक समता ही एक प्रक्रिय आहे. ही प्रक्रिया आजही भारतातच नव्हे तर इंग्लंड व अमेरिकेतही चालू आहे. सामाजिक समतेबाबत जगामध्ये जागृतता दिसून येते. व्यक्तीच्या विकासाबरोबर राष्ट्रीय एकता व एकात्मतेसाठी सामाजिक समता प्रस्थापित होणे गरजेचे आहे. मध्ययुगापासून भारतावर झालेल्या साऱ्या आणि त्या संघर्षातील भारताचा होत गेलेला पराभव आहे. ब्रिटिशांच्या विरुद्ध संघर्षातील विजय व भविष्यात चिरंतन टिकणारे राष्ट्रीय स्वातंत्र्य याचे कारण ही सामाजिक समता हेच असणार आहे. कायद्याच्या भितीने प्रस्थापित होणाऱ्या समतेपेक्षा व्यक्तीमध्ये समतेची भावना निर्माण होणे गरजेचे आहे.

४. **नैसर्गिक समता** (Natural Equality) : प्रत्येक व्यक्ती नैसर्गिक दृष्ट्या रंग, रूप, स्वभाव व भावना या आधारावर भिन्न असते असे असले तरी निसर्गासाठी सगळ्या व्यक्ती समान असतात. ॲरिस्टॉटलने मात्र व्यक्तींचे बुद्धिजीवी, श्रमजिवी व शूर असे वर्ग पाडून नैसर्गिक विषमता मान्य केली. असे असले तरी भिन्न असलेल्या व्यक्ती निसर्गापुढे समान असतात. ॲरिस्टॉटलच्या बरोबरच जी.डी.एच. कोल यांच्या मते ही नैसर्गिकदृष्ट्या व्यक्ती-व्यक्तीमध्ये भेद असतो हे मान्य केलेले आहे. जॉन लॉकने मात्र भिन्नतेला विरोध करून नैसर्गिक समतेचा पुरस्कार केला आहे. त्याच्या मते मानवाकडून सामाजिक भेद पडले गेले व विषमता वाडत गेली. त्याच्या मते हे मानव निर्मित भेद कमी झाले की नैसर्गिक समता प्रस्थापित होईल जी मानवनिर्मित विषमतेपूर्वी अस्तित्वात होती.

**५. आर्थिक समता** (Economic Equality) : आपल्या मुलभूत गरजा भागविणे अवघड होते त्या ठिकाणी आर्थिक विषमता असते. ज्या ठिकाणी व्यक्तीच्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी राज्याद्वारा योग्य परिस्थिती निर्माण केली जाते त्या ठिकाणी आर्थिक समता दिसून येते. आर्थिक समतेतून व्यक्तीच्या मुलभूत गरजांची व्यवस्था होणे गरजेचे असते. म्हणजेच व्यक्तीची भूक भागल्यानंतरच बाकीच्या समस्या महत्त्वाच्या आहेत. म्हणजेच आर्थिक समतेशिवाय इतर राजकीय व सामाजिक समतेला महत्त्व नाही. आर्थिक समतेच्या अभावातून विषमता वाढते. त्यामुळे समाजात वर्गीय अंतर वाढत जाऊन शोषण, सत्तेचे केंद्रिकरण या समस्या निर्माण होऊन अराजकता निर्माण होण्याची शक्यता असते. कार्ल मार्क्सने आर्थिक विषमतेला समाजाची महत्त्वाची समस्या मानले आहे. कार्ल मार्क्सच्या मते, आर्थिक समतेसाठी साम्यवादी समाज रचना हाच उपाय आहे. त्यांच्या मते, व्यक्तीच्या क्षमतेनुसार काम व गरजेनुसार वेतन दिले पाहिजे. थोडक्यात, समाजातील आर्थिक शोषणावर मर्यादा आणण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला आपल्या मुलभूत गरजांची पूर्तता करता यावी अशी राज्याद्वारे परिस्थिती निर्माण करणे म्हणजे आर्थिक समता होय.

**स्वयं अध्ययन प्रश्न ३**

**पुढील प्रश्नांची एक-दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

१. समता या मूल्याची चर्चा जगात कधीपासून सुरू झाली ?

२. मानव निर्मित विषमता म्हणजे काय ?

३. राजकीय समता म्हणजे काय ?

४. नागरी समता म्हणजे काय ?

५. राज्यात समता निर्माण करण्याची जबाबदारी कोणाची आहे ?

### ४.२.४ **न्याय** (Justice)

**प्रस्तावना**

'न्याय' एक सामाजिक मूल्य आहे. स्वातंत्र्य, समता व बंधुता या प्रमाणेच 'न्याय' एक महत्त्वाचे मूल्य आहे. प्राचीन काळापासून 'न्याय' या मूल्याचे महत्त्व मानले गेले आहे. आधुनिक काळात बदलत्या सामाजिक स्थितीमध्ये मानवी संबंध अत्यंत गुंतागुंतीचे झाल्याचे दिसून येते. अशा मानवी संबंधाची योग्य व्यवस्था करण्यासाठी 'न्याय' तत्त्व गरजेचे असते. व्यक्तीद्वारे स्वतःच्या विकासासाठी राज्याकडे ज्या मागण्या केल्या जातात त्या मागण्यांना हक्काचे रूप देण्यासाठी न्याय तत्त्व राज्याला मार्गदर्शन करते. आजच्या काळातील गुंतागुंतीच्या सामाजिक संबंधामध्ये हक्कांची वाटणी कोणत्या हेतूने करावी या संबंधीची तत्त्वे कोणती असावीत या विषयी राज्याला मार्गदर्शन करण्याचे कार्य न्याय हे तत्त्व करीत असते. स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांप्रमाणेच न्याय एक तत्त्व असले तरी या तीन मूल्यांमध्ये मेळ घालण्याचे काम न्याय हे तत्त्व करीत असते. व्यक्तीची स्वतंत्रता, समानता याबरोबरच व्यक्तीची सुरक्षितता या गोष्टीचा विचार न्यायाबाबत केला जातो.

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. जाती, धर्म, भाषा व प्रदेश अशी भिन्नता येथे दिसून येते. अशा भिन्नतेमध्ये व्यक्ती-व्यक्तीमध्ये भेद झाला नाही पाहिजे याला सामाजिक न्याय म्हणतात. यावरून न्यायाचे महत्त्व समजून येते.

**न्यायाचा अर्थ** (Meaning of Justice)

न्याय हे तत्त्व सापेक्ष म्हणजेच गतिमान व बदलणारे असल्यामुळे त्याच्या व्याख्येबाबत एकमत आढळून येत नाही. न्याय म्हणजे आदर्श तत्त्वांचा मेळ घालणे होय. आदर्श तत्त्व ही काळानुसार व परिस्थितीनुसार बदलत असतात. त्यामुळे न्यायाची संकल्पनाही बदलत जाते. विशिष्ट काळात व्यक्तीस्वातंत्र्याचे समर्थन करणाऱ्यांना वाटत होते की स्वातंत्र्यावर कसलेही बंधन नसणे म्हणजे न्याय होय. समतेचे समर्थन करणाऱ्यांना समानता प्रस्थापित होण्यात न्याय दडला आहे असे वाटते. समाजातील परंपरांचे समर्थन करणाऱ्यांना आजही वाटते की, पारंपारिक मूल्यांचा अवलंब करण्यानेच न्याय स्थिती टिकून राहील. नैतिकतेच्या दृष्टिकोनातून न्यायाकडे पाहिले तर नैतिक न्यायाचे प्रकटीकरण होते. तर कायद्याच्या दृष्टिकोनातून कायदेशीर न्यायाचे प्रकटीकरण होते. सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्टिकोनातूनही न्यायाच्या संदर्भात भिन्न मते दिसून येतात. यावरून असे वाटते की, न्यायाची संकल्पना संदिग्ध आहे. समाजातील आदर्श आणि मानवाचे संबंध यांचा मेळ घालण्यासाठी न्याय हे तत्त्व महत्त्वाचे मानले जाते.

'न्याय' या शब्दाला इंग्रजीत Justice असे म्हटले जाते. हा शब्द Jus या लॅटीन शब्दापासून तयार झाला आहे. या शब्दाचा अर्थ समन्वय साधणे असा होतो. म्हणजेच समाजातील आदर्श मूल्य व मानवी संबंध यांच्यात 'समन्वय साधणे' म्हणजे न्याय होय. मराठी भाषेतील 'न्याय' हा शब्द 'नी-नय' या संस्कृत धातूपासून निर्माण झाला आहे. याचा अर्थ विषयाकडे नेणे असा होतो. ते विषय न्यायसूत्रात दिले आहेत ज्यांची संख्या १६ एवढी आहे. म्हणजे या विषयाकडे घेऊन जाणे म्हणजे न्याय होय. न्याय समजून घेतल्यानंतर त्याची काही वैशिष्ट्ये न्यायाबाबत स्पष्ट होतात. ती वैशिष्ट्ये समजून घेतल्यानंतरही न्याय संकल्पना समजून येते. ती वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

१. स्वातंत्र्य, समता व बंधुता या सामाजिक मूल्यांप्रमाणेच न्याय एक आदर्श मूल्य आहे.

२. सामाजिक आदर्श व गुंतागुंतीचे मानवी संबंध यांच्यात मेळ घालण्यासाठी न्याय हे तत्त्व आवश्यक आहे.

३. विचार व परिस्थितीनुसार न्याय ही बदलणारी संकल्पना आहे.

४. नैतिक दृष्टिकोनातून विचार केल्यास न्यायाला नैतिकतेचे अधिष्ठान असते.

५. आर्थिक, सामाजिक व राजकीय हे न्यायाचे तीन प्रकार पडतात.

६. समता व न्याय या दोन भिन्न संकल्पना परस्परांशी निगडित असतात.

७. न्याय व कायदा या संकल्पना परस्परांशी पूरक असतात.

**न्यायाचे प्रकार** (Types of Justice)

**१. राजकीय न्याय** (Political Justice) : राजकीय स्वातंत्र्य व राजकीय समतेच्या दृष्टिकोनातून जेव्हा न्यायाचा विचार केला जातो तेव्हा त्यास राजकीय न्याय असे म्हटले जाते. प्रौढ मतदानाचा अधिकार, सार्वजनिक पद प्राप्त करण्याचा अधिकार, भाषणाचा अधिकार, कायद्याचे संरक्षण मिळविण्याचा अधिकार या अधिकारांना राजकीय स्वातंत्र्य म्हटले जाते. असे राजकीय स्वातंत्र्य उपभोगता यावे अशी राज्याद्वारे परिस्थिती निर्माण करणे म्हणजे राजकीय न्याय होय. राज्याद्वारे राजकीय स्वातंत्र्याबरोबर त्या स्वातंत्र्याला संरक्षण मिळणे गरजेचे असते. त्यासाठी राजकीय स्वातंत्र्य व त्याच्या संरक्षणासाठी घटनेत तरतूद करणे गरजेचे असते. व्यक्तीचा विकास, व्यक्तीच्या विकासातातून समाजाचा विकास, पर्यायाने राष्ट्राचा विकास ही राजकीय न्यायामागची धारणा आहे. याला अनुसरूनच भारतीय संविधानात मुलभूत अधिकारांचा समावेश केला आहे. एवढेच नव्हे तर या अधिकारांना संरक्षण मिळावे म्हणून घटनात्मक उपाययोजनेची तरतूद संविधानात केली आहे.

राजकीय सहभागाचा विचार केला तर माणसा-माणसांत क्षमता, बुद्धीमत्ता व मानसिकता या आधारावर भेद दिसून येतो. या बाबतीत खुले स्वातंत्र्य दिले तर क्षमतावान, बुद्धिवान लोकच याची फळे चाखतील व कमी क्षमतेचा गळून पडेल. ही परिस्थिती सामाजिक विषमदता वाढीस पोषक ठरू शकते. त्यामुळे भिन्न कुवतीच्या व्यक्तींना जास्तीत जास्त संधी देऊन समान लाभ घेता येईल अशी परिस्थिती राज्याने निर्माण करणे गरजेचे असते. यामुळे सामान्यांना राजकीय न्याय प्राप्त होऊ शकतो. लोकशाही व्यवस्थेत सर्वांना लाभ घेता यावा म्हणून समान राजकीय अधिकार दिले जातात. परंतु व्यक्तीच्या कुवतीची भिन्नता असल्यामुळे समान लाभाची संधी देऊनही त्याचा लाभ सर्वांना समान होत नाही. त्यासाठी उपाययोजना म्हणून आरक्षणाची व्यवस्था केल्याचे दिसून येते. त्यामुळे राजकीय न्याय साधण्यासाठी सुलभता येते.

**२. आर्थिक न्याय** (Economic Justice) : राज्याद्वारे समाजात आर्थिक अधिकारांचे वितरण केले जाते. त्याचबरोबर समाजात आर्थिक समता स्थापण्याचा प्रयत्न केला जातो. राज्याद्वारे अशी परिस्थिती निर्माण केल्यामुळे व्यक्तीला आपल्या मुलभूत गरजा पूर्ण करणे सुलभ होते यालाच आर्थिक न्याय असे म्हणतात.

भारताचा विचार केला तर भारतीय संविधानात व्यक्तीच्या आर्थिक विषमता, बेकारी, आर्थिक केंद्रीकरण या आर्थिक न्यायातील विरोधी बाजूंवर मर्यादा आल्या आहेत. कोणताही भेदभाव न करता व्यक्तीला आर्थिक स्वातंत्र्य दिले पाहिजे. त्याचबरोबर राज्यातील उपलब्ध साधनांचे योग्य वाटप होऊन प्रत्येक व्यक्तीला आर्थिक विकास साधता आला पाहिजे अशी आर्थिक न्यायाची धारणा आहे. यानुसार भारतात संविधानिक तरतूद केली असली तरी व्यावहारिक पातळीवर आर्थिक विषमता, बेकारी, आर्थिक केंद्रिकरण असे चित्र दिसून येते. असे असणे म्हणजे आर्थिक न्यायाचा अभाव आहे असे मान्य करावे लागते. थोडक्यात, भारतीय संविधानात आर्थिक न्यायासाठी तरतुदी केल्याचे दिसून येते. परंतु व्यावहारिक स्थिती मात्र भिन्न असल्याचे दिसून येते.

आर्थिक अधिकाराद्वारे व्यक्ती व्यवसायाचे क्षेत्र निवडू शकते. या अधिकारामुळेच एखादे सेवापद व्यक्ती मिळवू शकते. अशा आर्थिक अधिकारामुळेच व्यक्ती आपल्या गरजांची पूर्तता करते. पुढे व्यक्तीला प्रतिष्ठा

प्राप्त होते. म्हणजेच आर्थिक न्याय हा मूळ आहे. आर्थिक न्यायाच्या स्थापनेनंतर राजकीय व सामाजिक न्यायाला महत्त्व आहे. कार्ल मार्क्ससारख्या विचारवंताच्या मते, आजपर्यंतचे सामाजिक बदल, जागतिक युद्ध यांचे मूळ हे आर्थिक अन्यायामध्ये आहे. या पार्श्वभूमीवर आर्थिक न्यायाची गरज व महत्त्व समजून येते. कार्ल मार्क्स पुढे म्हणतो, इतिहासात सत्तेचा वापर करून श्रीमंत हा श्रीमंत होत गेला आणि गरीब हा गरीब होत गेला. याचे कारण साधनांचे असमान वितरण हेच आहे. यातून वर्गीय अंतर वाढत गेले व वर्गीय भेद निर्माण झाला. याचा शेवट हा असंतोषातून संघर्षात होतो. ज्यामुळे व्यवस्था शेवटाला जाते म्हणून कार्ल मार्क्स अधिक न्यायासाठी राज्यविहीन समाजाची अपेक्षा करतो.

**(क) सामाजिक न्याय** (Social Justics)

भारताचा विचार केला तर येथील समाजव्यवस्था शिडीसारखी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी येथील समाजव्यवस्थेला म्हणजेच जातिव्यवस्थेला उतरंडीची उपमा दिली आहे. उतरंडीतील मडके खालीपासून वरपर्यंत लहान होत जाते. तसेच जातीव्यवस्थेतही वरिष्ठ स्तरावरील जात आकाराने लहान तर अधिकाराने मोठी होत जाते. कनिष्ठ स्तराला अधिकार दिलेले नसतात. या समाजव्यवस्थेमुळेच वरिष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच, श्रीमंत-गरीब, स्त्री-पुरुष असे वर्गीय भेद निर्माण झाला आहे. अशा वर्गीय भेदामुळे पुढे सामाजिक विषमता जन्मास आली. अशा सामाजिक विषम वातावरणात सामाजिक अन्याय परिस्थिती आकारास येते. ज्यावेळी समाजात अन्याय परिस्थिती निर्माण होते त्यावेळी ज्यांच्यावर अन्याय होतो त्यांच्याकडून सामाजिक न्यायाची मागणी होत असते. भारतामध्ये कनिष्ठ स्तरावरील लोकांना सामाजिक स्वातंत्र्याचा अधिकार नव्हता. वरिष्ठ वर्गातील लोकांनीच शिक्षण घ्यावे व स्वातंत्र्याचा उपभोग घ्यावा अशी परिस्थिती होती. शिक्षणाचा अधिकार नसल्यामुळे कनिष्ठ वर्गातील लोकांना अन्यायाविरुद्ध लढण्याची दिशा मिळाली नाही. कनिष्ठ वर्गामध्ये सामाजिक न्यायाची अपेक्षा असली तरी शिक्षणाच्या अभावामुळे कनिष्ट दर्जाच्या लोकांना सामाजिक न्यायापासून दूर रहावे लागले होते. ब्रिटिश काळात मिळालेल्या स्वातंत्र्याच्या अधिकारामुळे ब्राह्मण व ब्राह्मणेतर असा संघर्ष सुरू झाला. या संघर्षावेळी कनिष्टांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी म. फुले, डॉ. आंबेडकर, छ. शाहू यांनी ब्राह्मणेतरांची बाजू घेतली इतकेच नव्हे तर फक्त ब्राह्मणेतरांची बाजूच घेतली नाही तर कार्य केले. म. फुले यांनी कनिष्ट वर्गातील दुर्बल लोकांना सामाजिक न्याय मिळावा म्हणून 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छ. शाहू महाराज यांनी सामाजिक न्याय स्थापनेसाठी अस्पृश्यता निवारणाचे कार्य केले.

सर्व माणसे समान व सारखी आहेत त्यांची प्रतिष्ठा सारखी असते. ही सामाजिक न्यायाची धारणा असते.

**स्वयं अध्ययन प्रश्न ४**

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. राजकीय न्याय म्हणजे काय ?

२. न्यायाचे उद्दिष्ट काय आहे ?

३. न्याय म्हणजे काय ?

४. न्यायाचा अभाव म्हणजे काय ?

५. न्यायासाठी पोषक शासनव्यवस्था कोणती ?

## ४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न १**

(१) बरोबर (२) बरोबर (३) चूक (४) चूक (५) चूक

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

१. हॉब्जच्या मते बंधनाचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य होय.

२. व्यक्तीची गरज व क्षमतेनुसार आपल्या गरजा भागविण्यासाठी योग्य संधी व सुरक्षितता उपलब्ध करून देणे म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य होय.

३. हुकूमशाही राज्यात व्यक्तिस्वातंत्र्याचा अभाव असतो.

४. परकीय सत्तेच्या नियंत्रणाखाली संचलित न होता, स्वतःच्या इच्छेने, पद्धतीने संचलीत होणाऱ्या राज्याला राष्ट्रीय स्वातंत्र्य असते.

५. अराजक व अस्थिर अशी निसर्गावस्था होती.

**स्वयं अध्ययन प्रश्न ३**

१. १७८९ साली झालेल्या फ्रेंच राज्यक्रांती पासून समता या मूल्याची चर्चा जगभर सुरू झाली.

२. जातीभेद, स्त्री-पुरुष, वर्गीय भेद, गरीब-श्रीमंत अशा विषमतांना मानवनिर्मित विषमता म्हणतात.

३. प्रत्येक नागरिकाला राजकीय सहभागाची संधी उपलब्ध करून देणे म्हणजे राजकीय समता होय.

४. कायद्यापुढे सगळ्यांना समान मानणे म्हणजे नागरी समता होय.

५. राज्यात समता स्थापन करण्याची जबाबदारी राज्य संस्थेची आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न ४**

१. प्रत्येक नागरिकाला राजकीय स्वातंत्र्य उपभोगता यावे अशी राज्याद्वारे परिस्थिती निर्माण करणे म्हणजे राजकीय न्याय होय.

२. व्यक्ती हित हे न्यायाचे उद्दिष्ट आहे.

३. समाजातील आदर्श व मानवी संबंध यांचा मेळ घालणे म्हणजे न्याय होय.

४. हक्क, स्वातंत्र्य, समता व बंधुता यांचा अभाव असणे म्हणजे न्यायाचा अभाव होय.

५. न्यायाला पोषक शासनव्यवस्था लोकशाही आहे.

## ४.५ सारांश

१. राज्यशास्त्रातील हक्क या संकल्पनेबाबत खालील गोष्टींचा विचार केला.

❊ **हक्कांचे स्वरूप –**

**I** – समाजात हक्कांची निर्मिती होते.

**II** – हक्क निमितीचा उद्देश व्यक्ती विकास आहे.

**III** – हक्कांना राज्याकडून मान्यता मिळते.

**IV** – हक्क आणि कर्तव्य नाण्याच्या दोन बाजू

**V** – हक्क हे काल व परिस्थिती सापेक्ष असतात.

**VI** – हक्क हे स्पष्ट व निश्चित स्वरूपाचे असतात.

**VII** – हक्कांवर मर्यादा घालता येतात.

**VIII** – हक्क हे सकारात्मक असतात.

❊ **हक्कांचे प्रकार –**

१. नैतिक हक्क २. कायदेशीर हक्क

**(अ) नागरी हक्क**

**(I)** जीवीताचा हक्क **(II)** व्यक्तीस्वातंत्र्याचा हक्क

**(III)** मालमत्तेचा हक्क **(IV)** समतेचा हक्क

**(V)** धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क **(VI)** काम करण्याचा हक्क

**(VII)** कौटुंबिक जीवनाचा हक्क **(VIII)** संघटना स्वातंत्र्याचा हक्क

**(IX)** विचार स्वातंत्र्याचा हक्क (**X**) शिक्षिताचा हक्क

(**XI**) करार करण्याचा हक्क

**(ब) राजकीय हक्क**

**(I)** मतदानाचा अधिकार **(II)** निवडणूक लढविण्याचा हक्क

**(III)** सार्वजनिक अधिकार पदप्राप्तीचा हक्क **(IV)** अर्ज करण्याचा हक्क

**(V)** शासनावर टीका करण्याचा हक्क **(VI)** विरोध करण्याचा हक्क

**२. प्रस्तुत प्रकरणात स्वातंत्र्य या संकल्पनेबाबत खालील गोष्टींची मांडणी केली.**

* **स्वातंत्र्याचे प्रकार**

**(I)** नैसर्गिक स्वातंत्र्य **(II)** नागरी स्वातंत्र्य

**(III)** राजकीय स्वातंत्र्य **(IV)** आर्थिक स्वातंत्र्य

**(V)** राष्ट्रीय स्वातंत्र्य

३. समता या संकल्पनेबाबत खालील बाबींची मांडणी प्रस्तुत प्रकरणात केली आहे.

* **समता म्हणजे काय ? व समतेच्या व्याख्या**
* **समतेचे प्रकार**

**(I)** नागरी समता **(II)** सामाजिक समता

**(III)** नैसर्गिक समता **(IV)** आर्थिक समता

४. न्याय या संकल्पनेबाबत खालील गोष्टींची मांडणी केली आहे.

* **न्याय म्हणजे काय ? व न्यायाच्या व्याख्या**
* **न्यायाचे प्रकार**

**(I)** राजकीय न्याय

**(II)** आर्थिक न्याय

**(III)** सामाजिक न्याय

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. मुलभूत हक्कांचे स्वरूप सांगून राजकीय हक्कांचे प्रकार सांगा.

२. स्वातंत्र्य संकल्पना स्पष्ट करून त्याचे प्रकार सांगा.

३. समता या संकल्पनेच्या व्याख्या सांगून प्रकार स्पष्ट करा.

४. न्याय म्हणजे काय ? व न्यायाचे प्रकार स्पष्ट करा.

**टीपा :**

१. समतेचा हक्क

२. आर्थिक स्वातंत्र्य

३. राजकीय समता

४. सामाजिक न्याय.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. व्होरा, पळशीकर (१९८७), 'राज्यशास्त्र कोश', पुणे दास्ताने रामचंद्र आणि कंपनी.

२. डॉ. शुभांगी राठी, भारतीय संविधान, अथर्व पब्लिकेशन, जळगांव.

३. प्रा. चिं ग. घांगरेकर, भारतीय राज्यघटना स्वरूप आणि राजकारण, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

४. डॉ. बी. आर. जोशी, राज्यशास्त्र, संदर्भ ग्रंथ, डायमंड पब्लिकेशन्स.

५. प्रा. चिं. ग. घांगरेकर, राज्यशास्त्राची मूलतत्त्वे, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

### सत्र २ : घटक १

# भारतीय राज्यघटनेची निर्मिती प्रक्रिया

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ भारतीय संविधानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

अ) भारत कौन्सिल कायदा - १९०९

ब) भारत सरकार विषयक कायदा - १९१९

क) भारत सरकार विषयक कायदा - १९३५

१.२.२ भारतीय राज्यघटनेची निर्मिती : घटना समिती

२.२.३ भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

१.५ स्वंय-अध्ययन प्रश्न व उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## १.० उद्दिष्टे :

- भारतीय संविधानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेणे.
- भारतीय संविधानाची निर्मिती व त्यामधील घटना समितीचे योगदान यांची माहिती घेणे.
- भारतीय राज्यघटनेची प्रमुख वैशिष्ट्ये समजून घेणे.

## १.१ प्रास्ताविक :

भारतीय संविधान हा या देशाचा सर्वश्रेष्ठ कायदा असून भारतीयांच्या मनात त्याच्याबद्दल पवित्र भावना आहे. जगातील अनेक देशांची संविधाने गडगडली पण भारताचे संविधान मात्र टिकून आहे. प्रत्येक देशाचा राज्यघटनेवर त्या देशाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक तसेच ऐतिहासिक पार्श्वभूमीचा खोलवर परिणाम झालेला असतो. भारताच्या राज्यघटनेवरही भारताच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा परिणाम झालेला आहे. खऱ्या अर्थाने भारताची राज्यघटना भारताच्या राजकिय प्रकियेचा प्रदीर्घ इतिहास म्हणावा लागेल. भारतीय लोकांनी १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धापासून १९४७ पर्यंत ब्रिटीश सत्तेच्या विरूद्ध लढा उभा करून स्वातंत्र्य प्राप्त केले.या स्वातंत्र्य लढ्याचा भारतीय राज्यघटनेच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आपण अभ्यास करणार आहोत. त्यामध्ये प्रामुख्याने १९०९ ते १९३५ पर्यंतच्या महत्वाच्या कायद्यांचा विचार करावा लागेल. भारतीय स्वातंत्र्यासाठी राष्ट्रीय चळवळ ब्रिटीश सरकारविरूद्ध कशी उभी राहीली व त्याचा भारतीय राज्यघटनेवर कसा प्रभाव पडला याचाही अभ्यास करावा लागेल. त्यानंतर भारताची राज्यघटना निर्माण करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली घटना समिती, तिचे स्वरूप व कार्य तसेच भारतीय राज्यघटनेच्या प्रमुख वैशिष्ट्यांचा अभ्यास या प्रकरणामध्ये करता येईल.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ भारतीय संविधानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

भारतीय संविधानाचा ऐतिहासिक आढावा घेताना ब्रिटीश कालखंडातील काही ठळक घडामोडींचा विचार करावा लागेल. कारण त्या सर्वांचाच प्रभाव भारतीय राज्यघटनेवर झालेला आहे. १६ व्या शतकात भारताच्या समृद्ध, सुपिक अशा भूमीवर फ्रेंच, पोर्तुगीज, डच, ब्रिटीश व्यापाऱ्यांचा डोळा होता त्यांनी व्यापाराच्या निमित्ताने भारतात हातपाय पसरण्यास सुरुवात केली. १७ व्या शतकात ब्रिटीश व्यापाऱ्यांना इंग्लडच्या राणीकडून भारतात व्यापार करण्याचा परवाना मिळाला. म्हणजेच इ. स. १६०० मध्ये इंग्लडची राणी पहिली इलिझाबेथ यांनी ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीला हिंदुस्थानात व्यापाराची परवानगी दिली. इ. स. १६०० ते १७६५ पर्यंत या कंपनीचे स्वरूप व कार्य पूर्णपणे व्यापारी होते. भारतात या कालखंडात मुघल सम्राट औरंगजेबाचे साम्राज्य बळकट असल्यामुळे ब्रिटीशांना आपला व्याप व्यापारापुरताच मर्यादित ठेवणे भाग पडले.

- **ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता**

इ. स. १७५७ साली ईस्ट इंडिया कंपनीने प्लासीच्या लढाईत विजय मिळवून भारतात ब्रिटीश सत्तेचा पाया घातला. कंपनीचा भारतातील गव्हर्नर रॉबर्ट क्लाईव्ह याने प्लासीच्या लढाईत बंगालच्या नवाबाचा पराभव करून भारतात इंग्रजी सत्तेचा पाया घातला. त्यानंतर इ. स. १७६५ पासून ब्रिटीशांनी व्यापाराबरोबर राजकारण करण्यास सुरूवात केली. ईस्ट इंडिया कंपनीने पंजाब, म्हैसूर, झाशी असे भारतातील प्रदेश जिंकून सत्ता स्थापन केली. ईस्ट इंडिया कंपनी ही व्यापारी कंपनी असल्याने तिने भारतात स्थापन केलेल्या राज्यांवर

नियंत्रण ठेवण्यासाठी कायदा करण्याची  आवश्यकता ब्रिटीश संसदेला वाटू लागली. इ. स. १७७३ मध्ये ब्रिटीश पार्लमेंटने ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी 'रेग्युलेटिंग ॲक्ट' किंवा 'नियामक कायदा' केला. या कायद्यानुसार ब्रिटीश पार्लमेंटने कंपनीच्या कारभारावर काही बंधने घातली. रेग्युलेटिंग ॲक्टनुसार बंगालचा गव्हर्नर हा कंपनीच्या ताब्यातील संपूर्ण भारतीय प्रदेशाचा गव्हर्नर बनला. भारतातील सर्व प्रदेशांचे एकीकरण करण्यात आले. याच कायद्याने भारतासाठी एका सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली. गव्हर्नर जनरलला मदत करण्यासाठी चार प्रतिनिधींचे एक कार्यकारी मंडळ निर्माण करणेत आले. ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकारी व नोकरवर्गांकडून जो भ्रष्टाचार होत होता त्याला प्रतिबंध घालण्याचे कार्य या कायद्याद्वारे सुरू झाले.

रेग्युलेटिंग ॲक्ट या कायद्यातील दोष दूर करण्यासाठी ब्रिटीश पार्लमेंटने इ. स. १७८४ मध्ये 'पिटस् इंडिया ॲक्ट' नावाचा कायदा पास केला. या कायद्यानुसार सर्वोच्च न्यायालयाचे कार्यक्षेत्र अधिक व्यापक केले. रेग्युलेटिंग ॲक्ट मधील तरतुदीनुसार ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराची दर २० वर्षांनी फेरतपासणी करण्यात आली.

- **ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्यकारभाराचा शेवट**

लॉर्ड डलहौसी गव्हर्नर झाल्यानंतर त्याच्या अधिपत्याखाली अनेक संस्थाने खालसा करीत १८५७ मध्ये भारताताच्या अर्ध्यापेक्षा जास्त भागावर ब्रिटीशांनी आपली सत्ता प्रस्थापित केली. १८५७ मध्ये भारतीय लोकांनी कंपनीच्या विरोधात फार मोठा उठाव केला. उठाव मोडण्यात कंपनीला यश आले पण इंग्लडमध्ये कंपनीच्या हातातून राज्यकारभार काढून घ्यायला चालना मिळाली. भारताच्या राज्यकारभारातही परिवर्तन करण्याच्या दृष्टीने ब्रिटीश पार्लमेंटने इ. स. १८५८ चा भारत शासन अधिनियम मंजूर केला. ईस्ट इंडिया कंपनीकडून सत्ता काढून ती ब्रिटीश सरकारच्या नियंत्रणाखाली आणली अशारितीने कंपनीच्या भारतातील राज्यकारभाराचा शेवट झाला.

भारतीय जनतेने सत्तेच्या विकेंद्रीकरणाची मागणी केली होती. गव्हर्नर जनरलने ती भारतमंत्र्याला कळविली होती त्यादृष्टीने इ. स. १८६१ चा कोन्सील कायदा मंजूर झाला. या कायद्यानुसार भारतीय व्यवस्थेत संसदिय पद्धतीची सुरूवात झाली. कायदेमंडळ व कार्यकारीमंडळात बदल सूचविणेत आले. कायदेमंडळाचे स्वरुप अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कायदे करण्याचा कार्यात काही भारतीयांची मदत घ्यावी अशीही तरतूद करण्यात आली.

- **राष्ट्रवादी विचारांचा उदय व राष्ट्रीय सभेची (कॉंग्रेस) स्थापना**

इंग्रजी राजवटीने भारताला पारतंत्र्यात जावे लागते परंतु त्याचे काही कायदेही झाले आहेत. कंपनी सरकारने भारतात इंग्रजी शिक्षणाची सुरुवात केली. इंग्रजी शिक्षणामुळे पाश्चिमात्य विचारातील उदारमतवाद, राष्ट्रवाद, लोकशाही, व्यक्तीस्वातंत्र्य यासारख्या विचारप्रणाली भारतीय लोकांना समजू लागल्या. भारतात विविध भाषा बोलणारे लोक इंग्रजी भाषेतूनही संपर्क साधू लागले. त्यामुळे त्यांच्यात एकतेची, एकात्मतेची भावना निर्माण झाली यातूनच भारतात राष्ट्रवादी विचारांचा उदय झाला. भारतातील तरूणांच्या अपेक्षा

उंचावल्या त्या अपेक्षा इंग्रज सरकार पूर्ण करू शकले नाही. इंग्रज सरकारने वांशिक, धार्मिक, भेदभाव सुरू केला या इंग्रजांच्या धोरणांमुळे भारतीय सुशिक्षित वर्गात असंतोष निर्माण झाला त्यातून भारतीय राष्ट्रवादाला चालना मिळाली.

परकीय राज्यकर्त्यांच्या अन्यायाला विरोध करण्यासाठी संघटीत होण्याची गरज भारतीय लोकांना वाटू लागली. ॲलन ह्यूम व वेडरबर्न या ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या पुढाकाराने इ. स. १८८५ साली राष्ट्रीय सभेची म्हणजेच राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. कॉग्रेसमार्फत आवेदन पत्र, अर्ज, विनंती पत्रे ब्रिटीशांना जावू लागली त्यातून ब्रिटीशांनी १८९२ मध्ये कौन्सील कायदा पास केला. दादाभाई नौरोजी, न्या, रानडे, फिरोजशहा मेहता, ना. गोखले यासारखे काही भारतीय नेते इंग्रजांकडून न्यायाची आशा बाळगून होते परंतु इंग्रज सरकारने भारतीयांच्या लहान-लहान मागण्यांकडेही दुर्लक्ष केले. १८९२ च्या केंद्रीय कायद्याने केंद्रीय कायदेमंडळाच्या सदस्य संस्थेत वाढ करणेत आली, प्रांतिक कायदेमंडळाची सदस्य संस्था वाढविणेत आली परंतु त्यातून भारतीयांचे समाधान झाले नाही. त्यातील तरतुदी भारतीयांना अपुऱ्या वाटल्या, त्याचा परिणाम इंग्रजांविरुद्ध राष्ट्रीय सभेत असंतोष निर्माण झाला. इ. स. १८९९ ते १९०५ या काळातील गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झन याच्या धोरणांमुळे भारतीय लोकांच्या असंतोषात भरच पडली. त्याची धोरणे प्रतिगामी स्वरुपाची, दडपशाहीची होती त्याच्या कारकीर्दीत असे अनेक कायदे संमत झाले त्याचा भारतीय जनतेला अपमान सहन करावा लागला. १९०५ साली झालेल्या बंगालच्या फाळणीमुळे तर भारतीय जनमत फारच प्रक्षुब्ध बनले. याच काळात आपल्या मागण्या मान्य करवून घेण्यासाठी, सरकारशी संघर्षाची भूमिका घेणाऱ्या गटाची स्थापना राष्ट्रीय काँग्रेसमध्ये झाली हा गटच जहालवादी गट म्हणून ओळखला जातो. भारतीय जनतेचा असंतोष दूर करण्यासाठी इंग्रजांना विविध कायदे करावे लागले त्यातील १९०९, १९१९, १९३५ आणि १९४७ चे इंग्रज सरकारने केलेले कायदे महत्वपूर्ण आहेत.

**अ) १९०९ चा कौन्सिल कायदा (मोर्ले- मिंटो सुधारणा कायदा)**

राष्ट्रीय सभेत लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, बिपीनचंद्र पाल, अरविंद घोष अशा जहालमतवाद्याचे प्राबल्य वाटू लागले होते. त्याच दरम्यान इ. स. १९०५ मध्ये लॉर्ड मिंटो हा गव्हर्नर जनरल भारतात आला. १९०५ साली बंगालची फाळणी करण्यात आली होती उघडपणे हिंदू-मुस्लिमांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न ब्रिटीशांनी केला. त्यामुळे संपूर्ण भारतात संतापाची लाट उसळली. काँग्रेसचे पुढारपण जहालमतवादी नेतृत्वाकडे गेले. १८८५ ते १९०५ या काळात लॉर्ड लेन्सडाऊन, लॉर्ड एलिगन व लॉर्ड कर्झन हे तीन व्हाईसरॉय भारतात येऊन गेले होते त्यांच्या काळात तर भारतीय जनतेवर अन्याय, जुलुमाने कळस केला होता. एकंदरीत भारतीय जनतेत ब्रिटीश सत्तेविषयी असंतोष वाढत चाललेला होता तेव्हा भारतीय जनतेला काही प्रमाणात खूष करण्यासाठी तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड मिंटो आणि सेक्रेटरी ऑफ स्टेट लॉर्ड मोर्ले यांनी भारतीयांसाठी कायदा केला. १९०९ चा कौन्सील कायदा किंवा मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा म्हणून ओळखले जाते.

- **१९०९ च्या कायद्यातील काही प्रमुख तरतुदी / वैशिष्ट्ये**

**१) केंद्रीय व प्रांतीय विधीमंडळाचा विस्तार**

१९०९ च्या भारत कौन्सील कायद्याने केंद्रीय व प्रांतीय विधिमंडळाच्या सदस्य संस्थेत वृद्धी करण्यात आली. केंद्रीय विधीमंडळातील सदस्य संख्या १६ वरून ६९ करण्यात आली. तसेच मद्रास, मुंबई, उत्तरप्रदेश या प्रांतातील विधिमंडळाची सदस्य संख्या २० पासून ५० पर्यंत आणि इतर प्रांतातील सदस्य संख्या ३० पर्यंत वाढविणेत आली. कायदेमंडळाच्या अधिकारातही वाढ करणेत आली.

**२) सदस्यांचे वर्गीकरण**

विधिमंडळ सदस्यांची संख्या वाढवून त्यांचे तीन प्रकारात वर्गीकरण करणेत आले. निर्वाचीत सदस्य, सरकारी सदस्य आणि गैरसरकारी सदस्य.

**३) गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळात हिंदी सभासदांचा समावेश**

ब्रिटीश पार्लमेंटने १ मार्च १९०९ रोजी विधेयक मंजूर करून गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळात हिंदी सभासदांची नियुक्ती करण्यास संमती दिली. त्यानुसार बंगालचे ॲडव्होकेट जनरल लॉर्ड एस. पी. सिन्हा यांची नियुक्ती केली.

**४) निर्वाचीत पद्धतीला मान्यता**

या कायद्याने निवडणूक प्रक्रियेला मान्यता देण्यात आली. केंद्रीय कायदेमंडळातील प्रतिनिधींची निवड प्रांतिक विधीमंडळातील सदस्यांचेकडून केली जात असे, प्रांतिक कायदेमंडळासाठी नगरपालिका व जिल्हा बोर्डातील प्रतिनिधी मतदान करीत असत. म्हणजेच आजच्याप्रमाणे प्रत्यक्ष मतदान पद्धतीचा स्विकार न करता अप्रत्यक्षपणे प्रतिनिधी निवडले जात. परंतु वर्गीय व खास मतदारसंघातील निवडणूक प्रत्यक्ष पद्धतीने होत असे.

**५) जमातीय मतदानाचा प्रारंभ**

१९०९ च्या कायद्याने जमातीय मतदानाच्या तत्वाला मान्यता दिली होती. भारतीय राजकारणाचे जमातवादाच्या दिशेने पडलेले हे पहिले पाऊल होते. मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघाची तरतूद करून मुस्लिम प्रतिनिधींची निवड मुस्लिम मतदारांनी करण्याचा नवा पायंडा या कायद्याने रुढ केला. त्यातूनच पुढे द्विराष्ट्रवादाचा जन्म झाला.

**६) विधिमंडळाच्या अधिकारात वाढ**

या कायद्याने विधिमंडळातील सदस्यांना सभागृहात प्रश्न, उपप्रश्न विचारणेचा अधिकार मिळाला. अर्थसंकल्पावर चर्चा करणे, सरकारला सूचना करणे, सार्वजनिक प्रश्नासंबंधी प्रस्ताव मांडणे असे अधिकार विधीमंडळ सदस्यांना मिळाले मात्र अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार सरकारला होता.

- **१९०९ च्या कायद्यातील दोष**

ब्रिटीश सरकारने काँग्रेसच्या मागणीनुसार १९०९ चा भारत कौन्सील कायदा पास केला परंतु त्यात अनेक त्रुटी होत्या त्या पुढीलप्रमाणे-

१) प्रांतीय व केंद्रीय कायदेमंडळातील प्रतिनिधींची निवड स्थानिक स्वराज्य संस्थामधून केली जात होती. सामान्य जनतेला व स्त्रीयांना मतदानाचा अधिकार नव्हता.

२) केंद्रीय व प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणूकीस उभे राहणाऱ्या प्रतिनिधींची पात्रता ठरविण्याचा अधिकार सरकारला होता त्यामुळे ते कोणत्याही व्यक्तीला अपात्र ठरवू शकत होते.

३) लॉर्ड मिंटो म्हणतात, ''भारतात ब्रिटनच्या धर्तीवर संसद स्थापन करणेची माझी इच्छा नसून सरकारला सल्ला देण्यासाठी सल्लागार मंडळाची स्थापना करण्याचा माझा उद्देश आहे'' यावरून सुधारणा करण्यामागील सरकारची स्वार्थी भूमिका दिसून येते.

४) या कायद्याने लोकशाहीचा केवळ देखावा केला होता. बिनसरकारी प्रतिनिधींना अधिकार दिले असले तरी त्यांची नियुक्ती सरकार करीत होते त्यामुळे ते सरकारशी एकनिष्ठ असत.

५) मुस्लिम समाजासाठी स्वतंत्र मतदार संघाची तरतूद केल्यामुळे ख्रिश्चन, शिख समाजही स्वतंत्र मतदारसंघाची मागणी करू लागला. त्यातून जातीय प्रतिनिधीच्या मागणीने जोर धरला.

१९०९ च्या मोर्ले-मिंटो कायद्याने झालेल्या सुधारणा फक्त प्रमाणात्मक होत्या, गुणात्मक नव्हत्या. तरीसुद्धा भारतातील प्रतिनिधिक सरकारच्या दिशेने उचललेले ते पहिले पाऊल होते असे म्हणावे लागेल.

**ब) १९१९ चा भारत प्रशासन कायदा (माँटेग्यू - चेम्सफोर्ड सुधारणा कायदा)**

१९०९ चा कायदा असमाधानकारक असल्यामुळे लो. टिळक, श्रीमती ॲनी बेझंट यांनी १९१६ मध्ये होमरुल चळवळ सुरू केली. सुरुवातीस या कायद्यास अनुकूल असणारे ना. गोखलेंसारखे नेतेही नाराज झाले. सरकारने चौफेर दडपशाहीचे धोरण अंमलात आणले, अनेक कडक कायदे मंजूर केले. वृत्तपत्र कायद्याने स्वातंत्र्याचा गळा घोटला सरकारने अधिप्रतिनिधीत आणि स्वतंत्र मतदारसंघ दिल्याने हुरळून गेलेल्या मुस्लिम लिगच्या नेत्यांचा नंतरच्या घडामोडींमुळे भ्रमनिरास झाला. १९११ साली वंगभंगाचा निर्णय सरकारने मागे घेतल्यामुळे मुस्लिम समाजाचा सरकारवरचा विश्वास उडाला. मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा भारतीयांना संतुष्ट करण्यासाठी केला होता परंतु तो अयशस्वी ठरला. त्यामुळे पुढील दहा वर्षाच्या आत ब्रिटीश पार्लमेंटला सुधारणा कायदा करणे भाग पडले.

भारत मंत्री माँटेग्यू आणि व्हाईसरॉय लॉर्ड चेम्सफोर्ड यांनी भारतातील राजकीय परिस्थितीचे निरीक्षण करून एक अहवाल तयार केला पुढे त्या अहवालाच्या आधारे भारत सरकारच्या प्रशासन कायद्यासंबंधीचे एक विधेयक तयार करणेत आले व ते इंग्लडच्या पार्लमेंटमध्ये मांडण्यात आले. इ. स. १९१९ मध्ये ब्रिटीश पार्लमेंटने त्यास मंजुरी दिली यालाच माँटेग्यू- चेम्सफोर्ड सुधारणा कायदा किंवा भारत सरकारविषयक कायदा म्हटले जाते.

- **१९१९ च्या कायद्यातील तरतूदी / वैशिष्ट्ये**

१९१९ च्या भारत प्रशासन कायद्यातील प्रमुख तरतुदीनुसार या कायद्याची काही प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील ती पुढीलप्रमाणे–

**१) संघराज्य पद्धतीची सुरूवात**

या कायद्यान्वये भारतात केंद्रीय आणि प्रांतिक प्रशासनाच्या अधिकाराविषयी प्रथमच वाटणी केल्यामुळे संघराज्य पद्धतीचा प्रारंभ झाला. त्यात केंद्रसरकारचे अधिकार अत्यंत व्यापक होते. केंद्रसूची व राज्यसूचीमध्ये त्या विषयांचा समावेश केला होता.

**२) द्विगृहात्मक विधीमंडळ**

या कायद्याने भारतात प्रथमच द्विसदनात्मक संसदेची तरतूद करण्यात आली. कौन्सील ऑफ स्टेट (राज्यसभा) या वरिष्ठ गृहात ६० सदस्य होते. या गृहाची मुदत पाच वर्षे करणेत आली या सदस्यांमध्ये २६ सरकारनियुक्त व ३४ निर्वाचीत, (२० सर्वसामान्य मतदारसंघातून, १० मुस्लिम, ३ युरोपीयन, १ शीख) सभासदांचा समावेश होता. विधीसभा हे कनिष्ठ सभागृह होते त्यात एकूण १४४ सभासद होते. ४१ सरकार नियुक्त तर १०३ लोकनियुक्त प्रतिनिधींचा समावेश त्यात होता. त्यांची मुदत तीन वर्षे होती.

**३) द्विदल शासन पद्धती**

प्रांतिक कार्यकारी मंडळात द्विदल शासन पद्धतीचा स्विकार करणेत आला. प्रांतिक प्रशासनाच्या अधिकाराविषयी दोन भागात वर्गीकरण करण्यात आले. आरक्षित आणि हस्तांतरित. यालाच 'राखीव' व 'सोपीव' असे म्हटले जाते. आरक्षित विषयांमध्ये जमिन महसूल, दुष्काळी मदत, न्याय, पोलीस, तुरुंग, छापखाने, सिंचन, पाणीपुरवठा, खाणी, वीज, गॅस, मोटार वाहने इ. चा समावेश होता तर हस्तांतरीत अधिकारामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, शिक्षण, ओराग्य, शेती, पशुधन, मासेमारी सहकारी संस्था, औद्योगिक विकास यांचा समावेश होता. प्रांताचा गव्हर्नर त्याच्या कार्यकारी परिषदेसह आरक्षित विषयांचा प्रभार सांभाळीत तर हस्तांतरित विषयांचे प्रशासन गव्हर्नर त्याच्या मंत्र्याकरवी करत होता.

**४) प्रांतिक कायदेमंडळे**

प्रांतात कायदेमंडळातील सदस्य संख्या वाढविणेत येऊन ७०% सभासद निवडणुकीने घेण्याची तरतूद करणेत आली, जातवार व वर्गवार मतदार संघ निश्चित करणेत आले. सदस्यांना भाषण स्वातंत्र्य देण्यात आले. सदस्यांनी विधेयक मंजूर केले तरी ते नाकारून अध्यादेश काढण्याचा अधिकार गव्हर्नरला होता.

**५) जबाबदार शासन पद्धतीचा विकास**

भारतीयांचे सहकार्य राज्यकारभाराच्या प्रत्येक क्षेत्रात घेतले जाईल. प्रशासनाच्या प्रत्येक शाखेत, स्थानिक स्वराज्य संस्थात भारतीयांना सामावून घेऊन जबाबदार शासन पद्धतीला महत्व दिले. त्यामुळे लोकशाहीची जबाबदार शासनपद्धतीची सुरूवात झाली.

- **१९१९ च्या कायद्यातील दोष / त्रुटी**

१) १९१९ च्या कायद्याने द्विदल शासन पद्धतीची सुरूवात केली परंतु त्यातील अधिकार विभागणी असमाधानकारक होती, मंत्र्यांवर खरीखुरी जबाबदारी नव्हती, कार्यकारी परिषद व मंत्रीमंडळ यांच्यात समन्वय नव्हता. गव्हर्नर जनरल स्वतः निर्णय घेत होता.

२) गव्हर्नर जनरलला अमर्याद अधिकार प्राप्त झाले त्याच्या परवानगीशिवाय कायद्यात रुपांतर होत नव्हते त्यामुळे तो पक्षपाती धोरण स्विकारू लागला.

३) कार्यकारी मंडळ कायदेमंडळाचा जबाबदार नव्हते. कायदेमंडळाने त्यांच्याविरूद्ध अविश्वास ठराव दर्शविला तरी त्याला राजीनामा द्यावा लागत नव्हता.

४) मतदानाचा अधिकार श्रीमंत व संस्थानिकांनाच असल्यामुळे कायदेमंडळातील प्रतिनिधी सर्व सामान्यांचे प्रतिनिधी नव्हते.

५) जातीय, वर्गीय तत्वांवर प्रांतिक विधीमंडळाची निवड होत होती त्यामुळे सदस्य अनेक गटात विभागले जात असत. मंत्री गव्हर्नरच्या मर्जीवर अवलंबून राहत असत.

१९१९ च्या कायद्याने जबाबदार शासन पद्धती, निर्वाचीत सदस्यांच्या संस्थेत वाढ, केंद्रीय कायदेमंडळ द्विगृही, प्रांतात द्विदल राज्यपद्धती, गव्हर्नर जनरलच्या अधिकारावर मर्यादा, कायदेमंडळात विविध प्रश्नांवर चर्चा करण्याचा अधिकार अशा अनेक महत्वपूर्ण तरतूदी करण्यात आल्या असल्या तरी त्यात बऱ्याच उणीवाही राहून गेल्या होत्या.

**क) १९३५ चा भारत सरकार विषयक कायदा**

१९२० मध्ये म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली असहकार चळवळ सुरू झाली. १९१९ च्या कायद्याने भारतात जबाबदार शासन पद्धती निर्माण करणेचा प्रयत्न केला होता त्याची प्रगती पाहण्यासाठी १९२७ मध्ये ब्रिटीशांनी सायमन कमिशन भारतात पाठविले. त्याला लोकांनी विरोध केला. १९२९ मध्ये लाहोर काँग्रेस अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव काँग्रेसने पास केला. १९३० ते १९३२ या काळात ब्रिटीश सरकारने तीन गोलमेज परिषदा घेतल्या त्याही अपयशी ठरल्या. १९३० साली गांधीजीनी संपूर्ण भारतभर सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली. असहकार, परकीय मालावर बहिष्कार, सरकारी कामावर बहिष्कार या मार्गांनी गांधीजींनी लढा सुरू केला.

इ. स. १९३३ मध्ये ब्रिटीश सरकारने एक श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली आणि संयुक्त संसदीय समितीमार्फत संपूर्ण प्रश्नाचा सखोल विचार करण्याचा निर्णय घेतला. त्या समितीने सादर केलेल्या शिफारशींच्या आधारे विधेयक तयार करून ब्रिटीश पार्लमेंटपुढे मांडण्यात आले. पार्लमेंटने १९३५ मध्ये हे विधेयक संमत केले आणि त्याचे कायद्यात रुपांतर झाले. या कायद्यात ३२१ कलमे आणि १९ परिशिष्टे होती, ३ जुलै १९३५ पासून ती लागू करण्यात आली.

- **१९३५ च्या कायद्यातील तरतुदी / वैशिष्ट्ये**

**१) संघराज्याची निर्मिती व प्रांतिक स्वायत्तता**

१९३५ च्या कायद्याने भारतासाठी ज्या संघराज्याची तरतूद केली होती त्यात सर्व प्रांत सक्तीने समाविष्ट केले होते तसेच संस्थानांनी सामील व्हायचे की नाही हे त्यांच्या मर्जीवर सोडले होते. कायद्याच्या ८ व्या सूचीत केंद्र व प्रांत यांच्यात अधिकारांची विभागणी करण्यात आली होती केंद्रसूचीत ५९ विषयांचा तर प्रांतिक सूचीत ५४ विषयांचा समावेश करणेत आला होता. तिसरी सामाईक सूची तयार करून त्यात ३६ अधिकार विषयांचा समावेश करून उर्वरित अधिकार किंवा शेषाधिकार गव्हर्नर जनलकडे सुपूर्द केले होते. प्रांतिक सूचीतील सर्व अधिकारविषय प्रांतिक मंडळाच्या अधिन केले होते. प्रांतांना स्वायत्तता देण्यात आली होती.

**२) संघराज्याचा आकृतीबंध**

१९३५ च्या कायद्याने हिंदुस्थानात संघराज्य निर्माण होणार होते. गव्हर्नर जनरल हा राजाचा प्रतिनिधी म्हणून काम करणार होता. भारतात संघीय व प्रांतिक कायदेमंडळे निर्माण झाल्यामुळे ब्रिटीश संसदेवर मर्यादा येणार होत्या. भारतमंत्री हा ब्रिटनच्या मंत्रीमंडळातील वरिष्ठ मंत्री असून तो संसदेचा सदस्य होता. त्याच्या मदतीला १५ लोकांचे भारत मंत्रीमंडळ होते. भारत मंत्र्याला सल्ला देण्यासाठी सल्लागार मंडळाचीही तरतूद केली होती. ३ ते ६ लोकांचे सल्लागार मंडळ तयार केले होते व त्यांची मुदत पाच वर्षे होती. एकंदरीत भारतीय संघराज्याचा आकृतीबंध तयार करण्यात आला. भारतमंत्र्याचे राज्यकारभारावर नियंत्रण ठेवले होते.

**३) केंद्रासाठी द्विदल शासन पद्धती**

१९३५ च्या कायद्याने प्रांतिक द्विदल शासन पद्धती नष्ट करून ती केंद्रासाठी लागू करण्यात आली. मध्यवर्ती सरकारच्या विषयांची दोन विभागणी करण्यात आली. आरक्षित किंवा राखीव विषय आणि हस्तांतरित किंवा सोपीव विषय असे दोन विभाग करून राखीव विषय गव्हर्नर जनरलसह कार्यकारिणीकडे तर हस्तांतरित विषय मंत्रीमंडळाकडे सोपविणेत आले.

**४) ब्रिटीश पार्लमेंटचे सार्वभौमत्त्व**

राज्यघटना बदलण्याचा सर्वस्वी अधिकार ब्रिटीश पार्लमेंटला देऊन या कायद्याने संसदेचे सर्वाभौमत्व स्पष्ट केले. भारतातील केंद्रीय तसेच प्रांतिक विधीमंडळांना याबाबतीत काहीही अधिकार नव्हते.

**५) द्विगृही केंद्रीय कायदेमंडळ**

१९३५ च्या कायद्याने केंद्रासाठी द्विगृही विधीमंडळ पद्धती स्विकारण्यात आली. राज्यसभा (Council of State) हे विधीमंडळाचे द्वितीय किंवा वरिष्ठ सभागृह असून ते घटकराज्यांचे प्रतिनिधीत्व करीत होते त्याच्या एकूण २६० सभासदांपैकी ब्रिटीश इंडियातून १५०, गव्हर्नर जनरलकडून ०६ तर संस्थानिकांकडून १०४ सदस्य निवडले जात होते. हे सभागृह स्थायी असून सदस्यांचा कार्यकाल ९ वर्षांचा होता. दर ३

वर्षांनी १/३ सदस्य निवृत्त होत व त्यांच्या जागी तेवढेच सदस्य नवीन निवडले जात. त्यांच्यातूनच अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड केली जात.

संघीय सभा (Federal Assembly) हे केंद्रीय विधीमंडळाचे प्रथम व कनिष्ठ सभागृह होते. हे सभागृह संघराज्याचे प्रतिनिधीत्व करीत होते त्याची सदस्य संख्या ३७५ असून २५० सदस्यांची निवड प्रत्यक्ष जनतेकडून न होता प्रांतातील विधीमंडळाच्या कनिष्ठ गृहातील सदस्यांकडून होत असे तर १२५ सदस्यांची निवड देशी राज्यांकडून होत होती.

### ६) सांघिक न्यायालयाची स्थापना

१ ऑक्टोबर १९३७ रोजी भारतात फेडरल कोर्ट स्थापन करणेत आले. या कोर्टात एक प्रमुख न्यायाधीश व इतर न्यायाधीशांची नियुक्ती करण्यात आली. त्यांची नियुक्ती, बडतर्फी ब्रिटनच्या राजाकडून होत असे. कायद्याचा अर्थ लावणे, केंद्र व प्रांत यांच्यातील वाद मिटविणे, व्यक्तीस्वातंत्र्याचे रक्षण करणे, गव्हर्नर जनरलला कायदेविषयक सल्ला देणे अशाप्रकारचे कार्य संघ न्यायालय करीत असे.

### ७) आणीबाणी विषयीचे अधिकार गव्हर्नर जनरलला

युद्ध किंवा अंतर्गत उठावांमुळे भारताच्या सुरक्षेला धोका निर्माण झाल्यास आणीबाणी जाहीर करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला होता. आणीबाणी जाहीर केल्यास प्रांतिक सूचीतील कोणत्याही विषयासंबंधी गव्हर्नर जनरलला पूर्वसंमतीने केंद्रीय विधीमंडळ कायदे करू शकत असे.

या तरतुदीबरोबरच लोकसेवा आयोगाची स्थापना, रेल्वे व रिझर्व्ह बँकेची स्थापना, प्रांतिक प्रशासन व्यवस्था, प्रांतिक कायदेमंडळे, प्रांतिक कार्यकारी सत्ता, प्रांतिक गव्हर्नर याविषयी विविध तरतुदी १९३५ च्या कायद्याने केल्या होत्या.

### ● १९३५ च्या कायद्यातील त्रुटी / दोष

१९३५ च्या कायद्याविषयी पं. नेहरू म्हणतात ही, ''अनेक नियंत्रणे असलेले पण इंजिन नसलेले यंत्र.'' तर पं. मदनमोहन मालविय म्हणतात की, ''१९३५ च्या कायद्याने गव्हर्नर जनरल ची हुकुमशाही आमचेवर लादली आहे.'' यावरून १९३५ च्या कायद्याचे स्वरूप समजून येते. या कायद्यामध्ये सुद्धा अनेक त्रुटी दिसून येतात त्या पुढीलप्रमाणे-

१) गव्हर्नर जनरलकडे महत्वाची जबाबदारी सोपविणेत आली होती, तो कायदेमंडळाला जबाबदार नव्हता त्यामुळे त्याचा मनमानी कारभार सुरू झाला.

२) या कायद्याने हुकुमशाही संस्थानिकांना केंद्रीय विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये प्रमाणापेक्षा जास्त प्रतिनिधीत्व दिले होते ते कोणलाच जबाबदार नव्हते.

३) विधीमंडळाचे अधिकार फारच मर्यादित स्वरूपाचे होते. ते ब्रिटीश राज्यसत्तेला धक्का लावू शकत नव्हते. त्यांना डावलून गव्हर्नर जनरल वटहुकूम काढू शकत होता.

४) प्रांतिक स्वायत्तता केवळ नाममात्र होती. प्रांतावर केंद्राचे अनेक मार्गांनी वर्चस्व होते. प्रांताना दिलेली उत्पन्नाची साधने तुटपुंजी होती.

५) १९१९ च्या कायद्यानुसार अपयशी ठरलेली द्विदल शासन पद्धती पुन्हा केंद्रीय शासनामध्ये सुरू करण्यात आली.

६) या कायद्याने संघराज्याची निर्मिती होणार होती परंतु यात संस्थानिक सामील न झाल्याने संघराज्य स्थापन झालेच नाही.

अशाप्रकारे १९३५ च्या कायद्यात काही दोष असले, टीका होत असली तरी प्रांतिक स्वायत्तता, संघीय शासन निर्माण करण्याचा प्रयत्न, केंद्र व प्रांत यांच्यातील अधिकारांची सुस्पष्ट विभागणी, मतदानाच्या अधिकाराचा विस्तार, संघीय न्यायालयाची स्थापना द्विगृही कायदेमंडळाची प्रांतात अणि केंद्रात झालेली सुरूवात, संसदिय शासनाचा पाया अशा विविध तरतुदी १९३५ च्या कायद्याची उपयुक्तता सिद्ध करतात.

१९३७ मध्ये राज्यव्यवस्थेसाठी प्रांतात निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकांमध्ये साधारणपणे १७% जनतेला मतदानाचा अधिकार प्राप्त झाला होता. उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश, मुंबई व मद्रास या सहा प्रांतात राष्ट्रीय सभेची सरकारे सत्तेवर आली तर वायव्य सरहद्द प्रांत व आसाम या ठिकाणी इतर पक्षांचे सहकार्य घेऊन राष्ट्रीय सभेने संमिश्र सरकार स्थापन केले. काही ठिकाणी मुस्लिम लिग व राष्ट्रीय सभा यांच्यात संघर्ष होता. एकूण आठ प्रांतामध्ये राष्ट्रीय काँग्रेसची जबाबदार मंत्रीमंडळे अधिकारावर येऊन प्रांतिक स्वायत्ततेच्या १९३५ च्या कायद्यानुसार राज्यकारभार सुरू झाला. १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले त्यामुळे प्रांतिक स्वायत्तता तहकूब करण्यात आली.

## १.२.२ भारतीय राज्यघटनेची निर्मिती– घटना समिती

- **भारतीय घटना निर्मितीचा पूर्व इतिहास**

भारतात लोक नियुक्त घटना समितीची कल्पना प्रथम १९२७ मध्ये सायमन कमिशनपुढे मानवेंद्रनाथ रॉय यांनी मांडली. १९३०-३१ च्या गोलमेज परिषदेमध्ये घटना निर्मितीबाबत चर्चा करण्यात आली. १९३४ मध्ये काँग्रेसच्या कार्यकारणीने ही मागणी उचलून धरली, १९३६ च्या फैजपूर काँग्रेस अधिवेशनात पं. नेहरूंच्या पुढकाराने काँग्रेसने ठराव पास केला. दुसऱ्या महायुद्धाच्यावेळी भारतीयांचे सहकार्य मिळविण्याच्या हेतूने लॉर्ड लिनलिथगोने ८ ऑगस्ट १९४० रोजी भारतीयांना स्वतःची राज्यघटना बनविणेचा अधिकार आहे अशी घोषणा केली. यालाच 'ऑगस्ट घोषणा' म्हटले जाते. ही घोषणा सुद्धा कोरा चेक ठरला.

- **क्रिप्स योजना**

ऑगस्ट घोषणेच्या अपयशानंतर मार्च, १९४२ मध्ये ब्रिटीश सरकारने भारतीय जनतेतील असंतोष वाढू नये म्हणून सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या नेतृत्वाखाली एक मंडळ भारतात पाठविले. क्रिप्स यांनी भारतात येऊन विविध नेत्यांशी विचारविनिमय करून एक योजना तयार केली त्यात पुढील सूचनांचा समावेश होता.

१) युद्ध संपल्यानंतर भारताला वसाहतीचा (डोमिनियन) दर्जा देण्यात येईल.

२) भारतासाठी संघराज्य स्थापन करणेत येईल. संघराज्यासाठी घटना निर्माण करण्यासाठी एक घटना समिती नियुक्त करण्यात येईल.

३) राष्ट्रकुलात भारताला समान स्थान देणेत येईल व आवश्यक वाटल्यास राष्ट्रकुलातून बाहेर पडण्याची मुभा भारतास राहील.

४) घटना समितीत प्रांताबरोबरच संस्थानानाही प्रतिनिधीत्व दिले जाईल. घटना समितीने केलेली घटना स्विकारण्याचे बंधन ब्रिटीश सरकारवर राहील.

५) युद्धकाळात भारताच्या संरक्षणाची जबाबदारी ब्रिटीश सरकारवर राहील.

अशाप्रकारे क्रिप्स योजनेत भारताच्या भावी स्वातंत्र्याची कल्पना होती पण सत्तांतर केव्हा करणेत येईल याची निश्चित तारीख नव्हती. त्यामुळे 'बुडणाऱ्या बँकेवरील पुढील तारखेचा चेक' अशा शब्दात म. गांधीनी क्रिप्स योजनेचा निषेध केला. राष्ट्रीय काँग्रेस व मुस्लिम लिग या दोन्हीही पक्षांनी ही योजना अमान्य केली. त्यामुळे क्रिप्स यांना हात हालवित इंग्लडला परत जावे लागले.

क्रिप्स योजनेच्या योजनेच्या अपयशानंतर काँग्रेसने अधिक ताठर भूमिका घेतली. ब्रिटीश सरकार भारताला पूर्ण स्वातंत्र्य सहजासहजी देणार नाही त्यामुळे मुंबई काँग्रेस अधिवेशनात ८ ऑगस्ट १९४२ रोजी 'चले जाव' चा ठराव मंजूर करणेत आला आणि स्वातंत्र्यासाठी प्रखर राष्ट्रव्यापी आंदोलन सुरू केले. १९४५ साली या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी गव्हर्नर जनरल वेव्हेल यांनी एक योजना तयार केली व सिमला येथे सर्वपक्षीय परिषद बोलविणेत आली परंतु ती ही अयशस्वी ठरली.

- **कॅबिनेट मिशन योजना (त्रिमंत्री योजना)**

१० जुलै १९४५ रोजी ब्रिटनमध्ये क्लेमंट ॲटली यांच्या नेतृत्वाखाली मजूर पक्षाचे सरकार सत्तेवर आले. ॲटली यांनी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याबाबत एक घोषणा केली, ''हिंदुस्थानला शक्य तितक्या लवकर स्वातंत्र्य दिले जाईल'' त्यासाठी विचारविनिमय करण्यासाठी लॉर्ड पॅथिक लॉरेन्स, सर स्टॅफर्ड क्रिप्स आणि अल्बर्ट अलेक्झांडर या तीन मंत्र्यांचे शिष्टमंडळ भारतात पाठविले हेच शिष्टमंडळ कॅबिनेट मिशन म्हणून ओळखले जाते. त्यांनी काँग्रेस व मुस्लिम लिगच्या नेत्यांशी चर्चा करून १६ मे १९४६ रोजी आपली योजना जाहीर केली यालाच त्रिमंत्री योजना असे म्हटले जाते. त्यात पुढील महत्वाच्या शिफारशींचा समावेश होता.

१) ब्रिटीशांच्या नियंत्रणाखाली भारत आणि संस्थाने यांचे संघराज्य स्थापन करणेत यावे. संघराज्याकडे परराष्ट्र व्यवहार खाते, दळणवळण आणि संरक्षण अशी तीन महत्वाची खाती असावीत.

२) संघराज्यासाठी स्वतंत्र कायदेमंडळ व कार्यकारीमंडळ निर्माण केले जावून त्यामध्ये ब्रिटीश प्रांत व संस्थाने यांचे प्रतिनिधी असावेत.

३) प्रांतिक कायदेमंडळांनी एक घटना समिती निर्माण करावी. घटनासमितीत एकूण ३८९ सदस्य असावेत.

४) घटना तयार होईपर्यंत हे हंगामी सरकार स्थापन करावे.

५) भारताला ब्रिटीश राष्ट्रमंडळातून बाहेर पडण्याचा अधिकार देण्यात आला.

६) भारतातील प्रांतांचे 'अ', 'ब' व 'क' असे तीन गटात वर्गीकरण करून प्रत्येक गटाने आपल्या प्रांतासाठी राज्यघटना तयार करावी नंतर गटांच्या प्रतिनिधींनी एकत्र येऊन संघराज्यासाठी घटना तयार करावी.

त्रिमंत्री योजनेनुसार भारतातील प्रत्येक गटाला आपल्या मागण्या पूर्ण झाल्याचे समाधान मिळाले. त्यामुळे सर्वांनी या योजनेचा स्विकार केला तरीही या योजनेतील काही त्रुटी दाखवून दिल्या त्या पुढीलप्रमाणे-

१) त्रिमंत्री योजनेमुळे केंद्रशासन दुबळे होणार होते, संघराज्यात फुटीरवृत्ती वाढीस लागणार होती. त्यामुळे संघराज्य धोक्यात येणार होते.

२) अल्पसंख्यांक मुस्लिमांचा विचार केला होता परंतु इतर अल्पसंख्य समाजाचा विचार केला नव्हता.

३) पाकिस्तानच्या मागणीचा विचार न केल्यामुळे मुस्लिम लीग नाराज होता.

४) कॅबिनेट मिशनच्या गटराज्याची भूमिका स्पष्ट नव्हती.

अशारितीने या योजनेत काही त्रुटी राहील्या असल्या तरी काही फायदे ही होते ते पुढीलप्रमाणे-

१) पाकिस्तानची मागणी फेटाळली व अखंड हिंदुस्थानची योजना सुचविली.

२) घटना समितीचे सर्व सभासद भारतीय होते व त्यांना घटना बनविण्याचा अधिकार प्राप्त होणार होता.

३) अल्पसंख्यांकांच्या बाबतीत बहुमताने निर्णय घ्यावा या लोकशाही तत्वाचा स्विकार करणेत आला होता.

४) सर्व पक्षीय हंगामी सरकार बनविणेत येणार होते व घटना निर्माण होईपर्यंत सत्तांतर होणार नव्हते.

- **हंगामी सरकारची स्थापना**

कॅबिनेट मिशन योजनेनुसार देशात घटना समितीच्या निवडणुका झाल्या. कॉंग्रेसला प्रचंड प्रमाणात बहुमत मिळाले. मुस्लिम लिगला केवळ ७३ जागा मिळाल्या. शीख समाजाने बहिष्कार टाकला. कॉंग्रेस व मुस्लिम लिगने एकत्र हंगामी सरकार निर्माण करावे अशी सूचना गव्हर्नर जनरल वेव्हेल यांनी केली. दोन्हीही पक्षांनी हंगामी सरकारात भाग घेण्यास नकार दिला. त्यामुळे व्हाईसरॉयने १४ प्रतिष्ठित व्यक्तींची हंगामी सरकारमध्ये सहभागाची घोषणा केली. ती ही या दोन्ही पक्षांनी अमान्य केली. २२ जुलै १९४६ रोजी हंगामी सरकारबाबतची एक योजना गव्हर्नर जनरलने दोन्ही पक्षांच्या नेत्यांकडे विचारासाठी पाठविली.

मुस्लिम लिगने ती फेटाळून लावली तेव्हा ब्रिटीश सरकारने काँग्रेस व इतर पक्षांच्या सहकार्याने हंगामी सरकार स्थापन करण्याचा निर्णय घोषित केला व मुस्लिम लिग शिवाय हंगामी सरकार स्थापन करणेत आले.

२४ ऑगस्ट १९४६ रोजी व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनी पं. नेहरूंच्या नेतृत्वाखाली सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद, सरदार बलदेवसिंह, शरच्चंद्र बोस, राजगोपालाचारी, जगजीवनराम, सर शफत अहमद, सय्यद अली जहीर, के. एच. भाभा, डॉ. जॉन मथाई, असणु अली अशा बारा लोकांचे मंत्रीमंडळाची घोषणा केली. नंतर मुस्लिम लीग ही हंगामी सरकारात सामील झाले. बॅ. जीना अर्थ खात्याचे मंत्री झाले त्यांनी अडणुकीचे धोरण स्विकारले. दोन्ही पक्षातील संघर्ष वाढत गेले. २० फेब्रुवारी १९४७ रोजी प्रधानमंत्री ॲटली यांनी हाऊस ऑफ कॉमन्स या ब्रिटीश पार्लमेंटच्या कनिष्ठ गृहात असे घोषीत केले की, ''जून १९४८ पर्यंत संपूर्ण सत्ता आणि जबाबदारी हिंदुस्थानला देणेत येईल. व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांच्या जागी लॉर्ड माऊंटबॅटन यांची नेमणूक करून सत्तांतराची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर टाकली.''

- **लॉर्ड माऊंटबॅटन योजना (१९४७)**

लॉर्ड वेव्हेल यांच्या जागी लॉर्ड माऊंटबॅटन आले. त्यांनी सूत्रे स्विकारल्यानंतर काँग्रेस व मुस्लिम लिगच्या प्रमुख नेत्यांशी सत्तांतरासंबंधी चर्चा केली. सर्व परिस्थितीचा अभ्यास करून हिंदुसथानचे अखंडत्व कायम ठेवून सत्तांतर करणे कठीण आहे हे ओळखून हिंदुस्थानच्या फाळणीची योजना तयार केली व ती ब्रिटीश मंत्रीमंडळाच्या पूर्वसंमतीने ३ जून १९४७ रोजी जाहीर केली. त्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे–

१) पंजाब, बंगाल, सिंध व बलुचिस्तान या प्रांतातील लोकांनी भारतात सामील व्हायचे की पाकिस्तानमध्ये सामील व्हायचे ते त्यांनी ठरवावे.

२) वायव्य सरहद्द प्रांत व आसाम प्रांतातील सिल्हेट जिल्हा यांना सार्वमताचा अधिकार देण्यात येईल.

३) फाळणी झाल्यास सीमाप्रश्न सोडविण्यासाठी एक सीमा आयोग नेमण्यात येईल.

४) देशी राज्यांनी स्वतंत्र राहायचे की कोणत्या राज्यात सामील व्हायचे याचे स्वातंत्र्य त्यांना दिले जाईल.

५) १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी सत्तांतराचे कार्य पूर्ण केले जाईल. ब्रिटीश सरकार सत्तांतरासाठी जून १९४८ पर्यंत वाट पाहणार नाही.

राष्ट्रीय काँग्रेस व मुस्लिम लिग या दोन्ही पक्षांनी लॉर्ड माऊंटबॅटन योजनेला तत्वतः मान्यता दिली.

- **१९४७ चा भारतीय स्वातंत्र्याचा कायदा**

४ जुलै १९४७ रोजी फाळणीसंबंधीचे विधेयक ब्रिटीश पार्लमेंटपुढे ठेवण्यात आले. १८ जुलै १९४७ रोजी या विधेयकास पार्लमेंटने मंजुरी दिली. या कायद्यालाच भारतीय स्वातंत्र्याचा कायदा असे म्हणतात. त्यातील काही प्रमुख तरतुदी–

१) १५ ऑगस्ट १९४७ पासून भारत व पाकिस्तान ही दोन्ही स्वतंत्र राज्ये उदयास येतील.

२) दोन्ही राज्यांना सार्वभौमत्त्व प्रदान करणेत येईल. त्यांना त्यांची घटना निर्माण करता येईल.

३) भारत व पाकिस्तान या दोन्ही राज्यांवर ब्रिटीश सरकारचे कोणतेही नियंत्रण असणार नाही. भारत मंत्री या पदाची समाप्ती होईल.

४) नवीन घटना निर्माण होईपर्यंत दोन्ही देशांचा राज्यकारभार १९३५ च्या कायद्यानुसार चालेल.

५) प्रत्येक देशासाठी स्वतंत्र गव्हर्नर जनरलची नियुक्ती केली जाईल परंतु त्याचे विशेषाधिकार रद्द केले जातील. तो घटनात्मक प्रमुख या नात्याने मंत्रीमंडळाच्या सल्ल्याने कार्य करेल.

६) दोन्ही देशांची कायदेमंडळे स्वतंत्र राहतील त्यांना कायदेनिर्मितीचा व कायदेदुरुस्तीचा अधिकार असेल.

७) भारतामधील देशी राज्यांवर असलेली ब्रिटीशांची सत्ता संपुष्टात येऊन त्यांच्यातील पूर्वी झालेले करार, तह रद्द केले जातील. त्यांना कोणत्या राज्यात जायचे याबाबत स्वातंत्र्य असेल.

अशाप्रकारे १९४७ च्या कायद्याने ब्रिटीशांची सत्ता संपुष्टात येऊन भारत व पाकिस्तान या दोन स्वतंत्र, सार्वभौम राज्यांची निर्मिती झाली. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला. लॉर्ड माऊंटबॅटन यांनी स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल म्हणून शपथ घेतली व पं. नेहरूजींच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र भारताच्या मंत्रीमंडळाचा शपथविधी पार पडला. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून नेहरूंनी शपथ घेतली.

- **घटना समितीची निर्मिती**

कॅबिनेट मिशन योजनेनुसार जुलै १९४६ मध्ये घटना समितीच्या निवडणुका झाल्या होत्या. ३८९ सदस्यसंख्या निश्चित करण्यात आली होती. ब्रिटीश भारतातील २९२, देशी संस्थानातील ९३ आणि चीफ कमिशनच्या प्रांतातील ४ प्रतिनिधी अशी ३८९ सदस्य संख्या निश्चित करण्यात आली होती. ब्रिटीश प्रांतातील २९२ पैकी २११ जागा काँग्रेसने जिंकल्या आणि मुस्लिम लिगने मुस्लिमांना राखून ठेवलेल्या ७८ जागांपैकी ७३ जागा जिंकल्या होत्या त्याठिकाणी काँग्रेसला केवळ तीनच जागा मिळाल्या म्हणजेच मुस्लिम समाजाचा मुस्लिम लिगला पूर्ण पाठिंबा होता. संस्थानिकांच्या ९३ जागा पूर्ण भरल्या नाहीत. १९४६ च्या निवडणुकीने अखंड भारताच्या घटना समितीने प्रतिनिधी निवडले होते. परंतु हिंदुस्थानचे विभाजन झाल्यामुळे भारत आणि पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राज्ये निर्माण झाली.

पाकिस्तानच्या निर्मितीमुळे घटना समितीच्या ६९ जागा कमी झाल्या. त्यात ५० मुसलमान, २ शीख व १४ इतर धर्मियांचा समावेश होता. उरलेल्या सदस्यांनी भारतीय घटना निर्मितीचे काम केले.

- **घटना समितीचे स्वरूप**

घटना परिषदेच्या निवडून आलेल्या सदस्यांची ९ डिसेंबर १९४६ रोजी दिल्ली येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीस २०७ प्रतिनिधी हजर होते. ही घटना समिती सार्वभौम नव्हती तिचे कार्य कॅबिनेट मिशन योजनेनुसार चालणार होते. तसेच घटना समितीतील प्रतिनिधी जनतेने प्रत्यक्ष निवडणूक पद्धतीने निवडले नव्हते. त्यांची निवड प्रांताच्या विधीमंडळ सदस्यांकडून झाली होती. घटनासमितीत विविध पक्षांचे, हितसंबंधी गटांचे प्रतिनिधी होते. या घटनासमितीच्या बैठकीचे तात्पुरते अध्यक्ष म्हणून डॉ. सच्चिदानंद सिन्हा

यांची निवड करण्यात आली तर सदस्यांमध्ये डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद, गोपाळ स्वामी अय्यंगार, अब्दुल गफार खान, के. एम. मुन्शी, पी. डी. टंडन, टी. टी. कृष्णम्माचारी, अलादी कृष्णास्वामी अय्यर, के. टी. शहा, आचार्य कृपलानी, डॉ. राधाकृष्णन, डॉ. बी. आर. आंबेडकर, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, डॉ. जयकर, हृदयनाथ कुंजरू, विजयालक्ष्मी पंडित, सरोजिनी नायडू, दुर्गाबाई देशमुख, बेगम रसूल, बाबू जगजीवन राव, चक्रवर्ती राजगोपालाचारी, एन माधवराव, पट्टभी सितारामय्या, डी. पी खेतान इत्यादि समाजातील नामवंत, प्रसिद्ध व अनुभवी प्रतिनिधींचा समावेश होता.

११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची घटना परिषदेचे स्थायी अध्यक्ष म्हणून निवड झाली ते घटना समितीचे काम पूर्ण होईपर्यंत अध्यक्ष होते. घटना समितीचे उपाध्यक्ष म्हणून डॉ. एच. सी. मुखर्जी यांची तर सल्लागार म्हणून बी. एन. राव यांची नियुक्ती करण्यात आली.

- **घटना समितीचे कामकाज**

- **पहिले अधिवेशन**

घटना परिषदेचे पहिले अधिवेशन ९ डिसेंबर १९४६ ला सुरू होऊन ते २३ डिसेंबर १९४६ रोजी संपले. या अधिवेशनात ९ डिसेंबर रोजी डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांची अस्थायी / तात्पुरते अध्यक्ष म्हणून निवड झाली. ११ डिसेंबर रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची घटना परिषदेचे कायम स्वरूपी / स्थायी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. मुस्लिम लिगने या अधिवेशनावर बहिष्कार टाकला होता. डॉ. जयकर यांनी स्थगन प्रस्ताव मांडला. मुस्लिम लिग, संस्थानिक यांनी सहभागी व्हावे व तोपर्यंत अधिवेशनाचे कामकाज स्थगीत करावे असा प्रस्ताव होता. डॉ. आंबेडकरांनी अल्पसंख्यांकांकडे बहुसंख्यांकांनी व्यापक भूमिकेतून पहावे हा मुद्दा प्रभावीपणे मांडला व सर्व सभागृह त्यांच्या भाषणाने प्रभावित झाले.

या अधिवेशनातील महत्वाचे कामकाज म्हणजे पंडित जवाहरलाल नेहरूंनी १३ डिसेंबर १९४६ रोजी मांडलेला ''उद्दीष्टांचा ठराव'' होय. भारत हे स्वतंत्र, सार्वभौम, गणराज्य असून त्यात ब्रिटीश प्रांत व संस्थाने यांचा समावेश होतो असे ठरावात म्हटले होते.

- **दुसरे अधिवेशन**

घटना समितीचे दुसरे अधिवेशन २० जानेवारी १९४७ ते २५ जानेवारी १९४७ पर्यंत चालले. नेहरूजींनी मांडलेला उद्दीष्टांचा ठराव दुरुस्त्यांसह २२ जानेवारीला मंजूर करणेत आला. मुस्लिम लीगचा बहिष्कार गृहीत धरून मुस्लिम समाजाच्या भावना दुखाविणार नाहीत याची काळजी घेण्यात आली. या अधिवेशनात सभागृहातील कामकाज समिती, अल्पसंख्याकांबाबत सल्लागार समिती, संघ सरकार अधिकार समिती, मुलभूत अधिकार समिती आदिवासी सीमा प्रदेश समिती अशा काही उपसमित्या स्थापन करण्यात आल्या.

- **तिसरे अधिवेशन**

तिसरे अधिवेशन २२ एप्रिल १९४७ ते २ मे १९४७ या दरम्यान घेण्यात आले. मुस्लिम लीग घटना समितीच्या कामकाजात सामील होत नाही हे स्पष्ट झाल्यामुळे घटना निर्मितीच्या कामकाजाला थेट सुरुवात करणेत आली २८ एप्रिल १९४७ रोजी नेहरुंनी संघ सरकार अधिकार समितीचा अहवाल सभागृहाला सादर केला. दुसरे दिवशी सरदार पटेल यांनी अल्पसंख्यांक व हक्कविषयक समितीचा अहवाल सादर केला. त्याबाबत अधिवेशनात चर्चा करण्यात आली.

- **चौथे अधिवेशन**

१४ जुलै १९४७ ते ३१ जुलै १९४७ पर्यंत घटना समितीचे चौथे अधिवेशन पार पडले. विविध समित्यांचे अहवाल या अधिवेशनात अध्यक्षांनी सादर केले. भारतीय संघराज्याच्या शासन व्यवस्थेच्या रचनेसंबंधी विचारविनिमय करण्यात आला. २२ जुलै १९४७ रोजी घटना समितीने भारताचा राष्ट्रध्वज मान्य केला. चिफ कमिशनरच्या प्रांताविषयी व आर्थिक संबंधाबाबत तंज्ञाची समिती नेमण्यात आली.

- **पाचवे अधिवेशन**

१९४७ च्या भारतीय स्वातंत्र्याच्या  कायद्याने घटना समितीला सार्वभौमत्व प्राप्त झाले त्यामुळे घटना समितीच्या कामकाजात आमूलाग्र बदल झाला. १४ ऑगस्ट १९४७ घटना समितीचे पाचवे अधिवेशन सुरू झाले. लॉर्ड माऊंटबॅटन यांची गव्हर्नर जनरल या पदी व पंडित जवाहरलाल नेहरू यांची पंतप्रधानपदी निवड करणेत आली.

२९ ऑगस्ट १९४७ रोजी घटनेचा मसुदा तयार करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अध्यक्षतेखाली एक मसुदा समिती स्थापन करण्यात आली. या समितीचे सदस्य म्हणून सर्वश्री के. एम. मुन्शी, गोपाल स्वामी अय्यंगार, अल्लादी कृष्णास्वामी अय्यर, सय्यद महम्मद सादुल्ला, व्ही. टी. कृष्णम्माचारी, एन माधवराव, डी. पी. खेतान इ. ची नियुक्ती करणेत आली. मसुदा समितीने आतापर्यंतच्या समित्या, उपसमित्या यांच्या अहवालांचा व सदस्यांनी मांडलेल्या मतांचा आढावा घेऊन भारतीय संविधानाचा मसुदा तयार करण्याचे काम सुरू केले.

- **सहावे अधिवेशन**

सहावे अधिवेशन फक्त एकच दिवस चालले. त्यामध्ये घटनेच्या कलमांवर कशारितीने चर्चा व्हावी व ती कलमे कशाप्रकारे मंजूर व्हावीत याबाबतची प्रक्रिया निश्चित करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व समितीने मसुदा तयार करण्याचे काम पूर्ण केले व २६ फेब्रुवारी १९४८ पासून पुढील आठ महिने तो मसुदा जनतेची मते अजमावण्यासाठी खुला करणेत आला. त्यावर घटना समितीच्या सदस्यांनी व लोकांनी विविध प्रकारची मते या कालावधीत व्यक्त केली.

- **सातवे अधिवेशन**

४ नोहेंबर ते १३ डिसेंबर १९४८ पर्यंत नंतर १५ दिवसांनी सुट्टी घेऊन पुन्हा २७ डिसेंबर १९४८ पासून ८ जानेवारी १९४९ पर्यंत सातवे अधिवेशन सुरू होते. या अधिवेशनात मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व शंकांची योग्य उत्तरे दिली. या अधिवेशनात मसुद्यावर सर्वसाधारण चर्चा होऊन कलमवार चर्चेला सुरुवात झाली.

१८ मे १९४९ ते २६ नोव्हेंबर १९४९ या काळात चार अधिवेशने होऊन, कलमवार चर्चा करून घटनेला अंतिम स्वरुप देण्याचे कार्य करण्यात आले.

- **घटना समितीच्या कार्याचा आढावा**

घटना समितीची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ ला भरली व त्या दिवसापासून घटना निर्मितीचे कामकाज सुरू होऊन ते २६ नोव्हेंबर १९४९ ला पूर्ण झाले. म्हणजे एकूण २ वर्षे ११ महिने १८ दिवस कामकाज चालले. एकूण ११ अधिवेशने झाली. प्रत्यक्ष १६५ दिवस काम चालले व त्यातील ११४ दिवस केवळ घटनेच्या मसुद्यावर विचारविनिमय करणेत खर्ची पडले. घटनेवर एकूण ६३ लाख ९६ हजार ७२९ रुपये खर्च आला. घटनेचा अंतिम मसुदा तयार झाला तेव्हा ३९५ कलमे व ८ परिशिष्टे होती. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची घटना परिषदेचे अध्यक्ष म्हणून स्वाक्षरी झाली. २६ जानेवारी १९५० पासून भारतीय राज्यघटनेचा प्रत्यक्ष अंमल सुरू झाला. २६ जानेवारी १९५० रोजी गव्हर्नर जनरलचे पद संपुष्टात येऊन संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. प्रसाद यांनी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून शपथ घेतली.

- **भारतीय राज्यघटनेची उगमस्थाने**

भारतीय राज्यघटना निर्माण करीत असताना विविध देशांच्या राज्यघटनांचा, शासनपद्धतींचा अभ्यास करावा लागला व त्यातील चांगल्या गोष्टींचा स्विकार करण्यात आला तसेच भारतीय इतिहास, देशाची सामाजिक, राजकिय परिस्थिती, देशापुढील समस्या, देशाची आर्थिक स्थिती, देशातील नागरिक या सर्व बाबींचा विचार करून भारतीय राज्यघटना निर्माण करण्यात आली.

ब्रिटीशांनी भारतावर जवळपास दीडशे वर्ष राज्यकारभार केला त्यामुळे इंग्लडच्या राज्यघटनेचा विशेष प्रभाव भारतीय घटनेवर पडला. इंग्लडची पार्लमेंट, नामधारी राष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्रीमंडळाची सामुहिक जबाबदारी, संसदिय शासन पद्धती इ. पद्धती इंग्लडच्या राज्यघटनेवरून घेण्यात आल्या. लिखीत राज्यघटना, राज्यघटनेची उद्देशपत्रिका, मुलभूत अधिकार, संघराज्य शासनपद्धती, न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार, सर्वोच्च न्यायालय, राष्ट्रपतीचे आणीबाणीविषयक अधिकार, उपराष्ट्रपती, घटना दुरुस्ती इ. गोष्टींचा समावेश अमेरिकेच्या राज्यघटनेचा अभ्यास करून आपल्या घटनेत करणेत आला. कॅनडाच्या राज्यघटनेचा प्रभाव पडून संघराज्य शासन, प्रभावी मध्यवर्ती सरकार, शेषाधिकाराची सत्ता संघसरकारकडे देणे इत्यादी तरतुदी करण्यात आल्या. आयर्लंडच्या राज्यघटनेवरून राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे, राष्ट्रपतींची निर्वाचन मंडळाची पद्धती घेण्यात आली. ऑस्ट्रेलियाच्या राज्यघटनेवरून

संसदेच्या दोन्ही गृहांची संयुक्त बैठक घेण्याची पद्धती, सामाईक सूची आणि त्यामध्ये केंद्राचे कायदे घटन राज्यांपेक्षा श्रेष्ठ मानण्याची पद्धती स्विकारण्यात आली. सोव्हिएत रशियाच्या राज्यघटनेचा प्रभाव पडून मुलभूत कर्तव्ये आणि पंचवार्षिक योजनांचा स्विकार भारतीय राज्यघटनेत करणेत आला.

विविध देशांच्या राज्यघटनांप्रमाणेच १९३५ चा भारत सरकारविषयक कायदा, भारतीय संसदेने वेळोवेळी केलेले कायदे, घटनादुरुस्त्या, न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्णय, घटना परिषद व घटनेची मसुदा समिती यांमधील विविध क्षेत्रातील नामवंत, हुशार, अनुभवी, तज्ञ व्यक्तींचा प्रभाव, राज्यघटनेवरील टीकाकारांनी केलेले भाष्य आणि भारतीय जनतेने वेळोवळी व्यक्त केलेल्या इच्छा या सर्व घटना भारतीय राज्यघटनेच्या उगमस्थान किंवा आधारस्तंभ आहेत. या सर्व बाबींचा विचार करून भारतीय राज्यघटना निर्माण करणेत आली आहे.

### १.२.३ भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये

जगात कोणत्याही दोन व्यक्ती पूर्णपणे सारख्या असत नाहीत त्याप्रमाणेच कोणत्याही देशाच्या राज्यघटना समान व सारख्याच सापडत नाहीत. प्रत्येक व्यक्तीची जशी काही वेगळी वैशिष्ट्ये असतात तशीच भारतीय राज्यघटनेची सुद्धा वैशिष्ट्ये सांगता येतील.

#### १) लिखित व विस्तृत राज्यघटना

भारतीय राज्यघटना जगातील सर्वात लिखीत व मोठी राज्यघटना आहे. भारतीय राज्यघटनेत ३९५ कलमे (सध्या ४४८) व ०८ परिशिष्टे (सध्या १२) जोडण्यात आली होती. त्यामुळे भारतीय राज्यघटना जगातील इतर सर्व देशांच्या राज्यघटनांपेक्षा मोठी व विस्तृत राज्यघटना समजली जाते. भारतीय राज्यघटनेत मध्यवर्ती सरकार व घटक राज्य सरकार यांच्यातील अधिकार क्षेत्रांची विभागणी, नागरिकांना देण्यात आले मुलभूत अधिकार, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे, संसदिय शासनपद्धती, राष्ट्रपतीचे अधिकार व निवडणूक पद्धती, नागरिकत्व, सनदी सेवा, निवडणुका, अल्पसंख्याकांच्या हितासाठी केलेल्या तरतुदी, भाषा आयोग, लोकसेवा आयोग, आर्थिक आयोग, महालेखापरीक्षक व महान्यायवादी यांची तरतूद, घटना दुरुस्तीची पद्धती इत्यादी सर्व भाग तपशीलवार व स्पष्टपणे लिहून ठेवलेला आहे. त्यामुळेच भारतीय राज्यघटना आधिक विस्तृत व मोठी बनली आहे व ती विशिष्ट वेळेत घटनासमितीकडून लिहिली आहे.

#### २) अंशतः परिवर्तनीय व अंशतः परिदृढ राज्यघटना

भारताची राज्यघटना अमेरिका आणि इंग्लड या दोन देशांच्या तुलनेतून अंशतः परिदृढ व अंशतः परिवर्तनीय समजली जाते. संविधान दुरुस्तीच्या पद्धतीवरून संविधानाचे परिवर्तनीय व परिदृढ असे प्रकार पडतात. ज्या संविधानात सहजासहजी साध्या व सोप्या पद्धतीने दुरुस्ती किंवा बदल करता येतो त्यास परिवर्तनीय राज्यघटना असे म्हणतात. उदा. इंग्लडची राज्यघटना. ज्या संविधानामध्ये दुरुस्ती करण्यासाठी विशिष्ट व कठीण पद्धतीचा अवलंब करावा लागतो त्याशिवाय घटनेमध्ये बदल करता येत नाही त्यास परिदृढ स्वरूपाची राज्यघटना असे म्हणतात. उदा. अमेरिकेची राज्यघटना.

भारताची राज्यघटना परिदृढही नाही व परिवर्तनीय नाही. भारतीय घटनेत दुरुस्ती करताना तीन पद्धतीने केली जाते. घटनेच्या काही भागात संसदेच्या उपस्थित सदस्यांच्या साध्या बहुमताने घटना दुरुस्ती करता येते उदा. घटकराज्यांची नावे बदलणे, केंद्रशासीत प्रदेशांना घटक राज्याचा दर्जा देणे अशा दुरुस्त्या साध्या पद्धतीने करता येतात. संविधानातील काही कलमांत संसदेच्या $^{२}/_{३}$ बहुमताने बदल घडवून आणावा लागतो. उदा. मुलभूत हक्क, राज्याची मार्गदर्शक तत्वे यामध्ये बदल करण्यासाठी संसदेचे विशेष बहुमत लागते. तिसरी पद्धती म्हणजे संसदेचे विशेष बहुमत व घटक राज्यांची मान्यता घेतल्याशिवाय घटना दुरुस्ती होऊ शकत नाही. उदा. केंद्र- राज्य संबंध, केंद्रीय कार्यकारी मंडळाचे अधिकार, राष्ट्रपतीची निवडूक पद्धती यामध्ये दुरुस्ती करताना संसदेच्या दोन्ही गृहात $^{१}/_{३}$ बहुमत मिळाल्यानंतर निम्म्यापेक्षा जास्त घटक राज्यांच्या विधीमंडळांनी मान्यता दिली तरच घटना दुरुस्ती होऊ शकते. अशाप्रकारे भारताने अमेरिकेच्या राज्यघटनेप्रमाणे परिदृढ/ ताठर तसेच इंग्लडच्या राज्यघटनेप्रमाणे अति लवचीक/परिवर्तनीय घटना दुरुस्तीची पद्धती न स्विकारता अंशतः परिदृढ व अंशतः परिवर्तनीय अशी पद्धती स्विकारली आहे.

### ३) संसदिय शासन पद्धतीचा स्विकार

भारताने इंग्लडच्या शासन पद्धतीप्रमाणे संसदिय शासन पद्धतीचा स्विकार केला आहे. भारतीय राज्यघटना निर्माण होण्याअगोदर १९०९, १९१९ व १९३५ च्या कायद्याने भारतात संसदिय पद्धतीचा पाया घातला होता. कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांच्या संबंधाबाबत केलेल्या तरतुदीवरून शासन पद्धतीचे स्वरूप ठरत असते. भारतात संसदेच्या लोकसभा या कनिष्ठ गृहात ज्या राजकिय पक्षाला सार्वत्रिक निवडणूकीत बहुमत प्राप्त होते त्या पक्षाचा नेता पंतप्रधान बनतो व आपले मंत्रीमंडळ निर्माण करतो. पंतप्रधान व मंत्रीमंडळ सामुदायिकरित्या लोकसभेला जबाबदार राहून कार्य करते. म्हणजेच संसदिय शासन पद्धतीत कार्यकारी मंडळ कायदेमंडळाला सामुदायिकरित्या जबाबदार राहून कार्य करते तसेच संसदिय शासन पद्धतीत दोन कार्यकारी प्रमुख असतात. पंतप्रधान हा खरा व वास्तववादी कार्यकारी प्रमुख म्हणून ओळखला जातो तर राष्ट्रपती हा घटनात्मक व नामधारी प्रमुख असतो. भारतात घटनेच्या ७४ व ७५ व्या कलमात पंतप्रधान व मंत्रीमंडळाबाबत तरतूद केलेली आहे. मंत्रीमंडळ कायदेमंडळाला व कायदेमंडळ जनतेला जबाबदार राहून कार्य करीत असते. अशा काही महत्वाच्या तरतुदी घटनेमध्ये केलेल्या आहेत त्यावरून भारतात संसदिय शासन पद्धतीचा स्विकार केल्याचे दिसून येते.

### ४) मुलभूत हक्कांचा समावेश

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या विभागात कलम १२ ते ३५ मध्ये मुलभूत अधिकार भारतीय नागरिकांना बहाल केलेले आहेत. पूर्वी ७ मुलभूत अधिकार होते सध्या ६ मुलभूत अधिकार आहेत.

१) समतेचा किंवा समानतेचा अधिकार (कलम नं. १४ ते १८)

२) स्वातंत्र्याचा अधिकार (कलम नं. १९ ते २२)

३) शोषणाविरूद्ध किंवा पिळवणुकीविरूद्ध लढण्याचा हक्क (कलम नं. २३ व २४)

४) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क (कलम नं. २५ ते २८)

५) सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार (कलम नं. २९ व ३०)

६) मालमत्तेचा अधिकार (कलम नं. ३१– १९७८ च्या ४४ व्या घटनादुरुस्तीने रद्द)

७) घटनात्मक उपाययोजना अधिकार (कलम नं. ३२)

याशिवाय २००२ च्या ८६ व्या घटनादुरुस्तीने ६ ते १४ वर्षाच्या वयोगटातील मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याचा हक्क दिला आहे त्याचाही समावेश मुलभूत हक्कांत केला जातो. भारतात स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता या तत्वांची जोपासना करून लोकशाही यशस्वी करण्यासाठी मुलभूत अधिकारांचा समावेश केला आहे. भारतीय घटनेने मुलभूत अधिकारांना कायदेशीर पाठबळ दिलेले आहे. एखाद्या व्यक्तीच्या मुलभूत हक्कावर अन्य व्यक्ती, संस्था किंवा सरकार यांचेकडून आक्रमण झाल्यास संबंधीत व्यक्तीला त्याविरुद्ध न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार आहे. त्यासाठी घटनेत घटनात्मक उपाय योजनेचा अधिकार दिलेला आहे.

**५) मार्गदर्शक तत्वांचा समावेश**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३६ ते ५१ मध्ये राज्याच्या धोरणासंबंधी नितीनिर्देशक किंवा मार्गदर्शक तत्वांचा समावेश केलेला आहे. शासनाने धोरणांची अंमलबजावणी करीत असताना कोणत्या तत्वांचा अवलंब करावा यासंबंधी शासनास मार्गदर्शन करणारी तत्वे घटनेत समाविष्ट केलेली आहेत. आर्थिक, सामाजिक, राजकिय व आंतरराष्ट्रीय संबंधविषयक अशा चार प्रकारच्या मार्गदर्शक तत्वांचा घटनेत समावेश केला आहे. परंतु मार्गदर्शक तत्वांना कायदेशीर मान्यता नसल्यामुळे ती स्विकारलीच पाहिजेत असे शासनावर बंधन नाही. मार्गदर्शक तत्वांचा स्विकार केला नाही म्हणून शासनाविरोधी न्यायालयात दाद मागता येत नाही. स्त्री–पुरुषांना समान कामासाठी समान वेतन, १४ वर्षाखालील मुलामुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण, भौतिक साधनांची मालकी व नियंत्रण, मागासवर्गीय लोकांना आर्थिक व शैक्षणिक सवलती, कामगारांना वेतन, त्यांच्या आरोग्याची काळजी, निवृत्ती वेतन, गरिबांना कायदेशीर मोफत सल्ला, सार्वजनिक ओराग्य सुधारणा, शेतीमध्ये शास्त्रीय व आधुनिकता आणणे, आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे इत्यादी काही महत्वपूर्ण मार्गदर्शक तत्वांचा भारतीय घटनेत समावेश केला आहे. देशाच्या व जनतेच्या विकासाच्या दृष्टीने न्यातील काही तत्वांचा अंगीकार आतापर्यंत शासनाने केला आहे.

**६) जनतेचे सार्वभौमत्व**

भारतीय राज्यघटनेने जनतेचे सार्वभौमत्व मान्य केले आहे. ज्या शासन पद्धतीत देशाची सर्वोच्च सत्ता एका व्यक्तीच्या किंवा व्यक्तीसमुहाच्या हाती सोपविली नसून ती सत्ता सर्व जनतेकडे सोपविली जाते त्या पद्धतीला जनतेचे सार्वभौमत्व असे म्हटले जाते. भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत ''आम्ही भारतीय जनता.... ही घटना आमच्यासाठी तयार करून मान्य व स्वीकृत करीत आहोत'' असा उल्लेख करून भारतीय जनतेचे सार्वभौमत्व मान्य केले आहे. 'आम्ही भारतीय जनता' अशी राज्यघटनेची सुरुवात करून

या घटनेची निर्मिती, मान्यता व स्वीकृती यांची जबाबदारी घटनाकारांनी भारतीय जनतेवर टाकली आहे. भारतातील सर्व नागरिकांना प्रौढ मताधिकार देऊन प्रातिनिधीक पद्धतीचा स्विकार केला आहे. जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींकडे राज्याची सत्ता सोपविली आहे.

### ७) सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्याची निर्मिती

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत भारत हे सार्वभौम, समाजवादी, धर्मातीत, लोकशाही, गणराज्य निर्माण करण्याचे ठरविण्यात आले आहे. भारत परकीय सत्तेपासून मुक्त होऊन आंतरराष्ट्रीय राजकारणात एक स्वतंत्र राष्ट्र आहे. भारत अंतर्गत किंवा बहिर्गत असे कोणतेही निर्णय घेण्यास स्वतंत्र आहे असा सार्वभौम शब्दाचा अर्थ होतो. भारतावर कोणाचेही नियंत्रण असणार नाही. भारतातील जनतेचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी समाजवादी धोरणाचा स्विकार केलेला आहे. जनतेचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी समाजवादाचे धोरण उपयुक्त आहे. भारतीय घटनेने सर्व धर्मांना समान मानले असून प्रत्येकाला आपल्या धर्माचे आचरण व प्रचार करण्याचे स्वातंत्र्य बहाल केले आहे. घटनेत नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे. भारत हे कोणत्याही एका धर्माचे राज्य नाही तसेच ते धर्मबाह्य राज्यही नाही तर ते धर्मनिरपेक्ष राज्य आहे. भारतीय घटनेने आपल्या देशासाठी लोकशाही शासन व्यवस्थेचा स्विकार केला आहे. शासनकर्ते निवडण्याचा, त्यांच्यावर, नियंत्रण ठेवण्याचा, त्यांना बदलण्याचा पूर्ण अधिकार भारतीय जनतेला दिला आहे. त्याचबरोबर प्रजासत्ताक गणराज्य स्थापन करून जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या हातात सत्ता दिलेली आहे. या देशाचा राज्यप्रमुख हा लोकनियुक्त असेल अशी तरतूद करून देशाची अंतिम व सर्वोच्च सत्ता जनतेच्या हाती सोपविली आहे. सुरूवातीला सार्वभौम, लोकशाही, गणराज्य असा उल्लेख उद्देशपत्रिकेत होता. परंतु १९७६ साली ४२ वी घटनादुरुस्ती करून समाजवादी व धर्मनिरपेक्ष या दोन शब्दांची भर उद्देशपत्रिकेमध्ये राज्यघटनेत घालण्यात आली.

### ८) एकात्मतेकडे झुकलेले संघराज्य

भारतीय राज्यघटनेत 'संघराज्य' (Federation) असा कोठेही उल्लेख नाही. त्याऐवजी 'राज्यांचा संघ' (Union of States) असा उल्लेख आढळतो असे जरी असले तरी संघराज्यात्मक शासनाची सर्व वैशिष्ट्ये भारतीय राज्यव्यवस्थेत आढळून येतात. केंद्र आणि घटकराज्ये यांच्यातील अधिकारांची विभागणी, लिखित राज्यघटना आणि सर्वोच्च न्यायालय अशी संघराज्याची वैशिष्ट्ये भारतीय राज्यघटनेत समाविष्ट आहेत त्यामुळे भारत हे एक संघराज्य आहे असे स्पष्ट होते. केंद्रीय सत्ता व घटक राज्ये यांच्यात तीन सूचीमध्ये अधिकारांची विभागणी केली आहे. सध्या घटनादुरुस्तीनुसार केंद्रयादीत ९९ विषय, राज्ययादीत ६१ विषय व सामाईक यादीत ५२ विषयांचा समावेश केलेला आहे. भारतीय घटना लिखीत स्वरुपाची आहे त्यामुळे नागरिकांचे अधिकार व घटकराज्यांची स्वायत्तता व अधिकार सुरक्षित राहीलेले आहेत तसेच केंद्र सरकार व घटक राज्य सरकारे यांच्यातील संघर्ष, तंटे मिटविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची तरतूद केलेली आहे. त्यामुळे भारतात संघराज्यात्मक व्यवस्था आहे.

परंतु प्रत्यक्षात एकात्म शासनाची वैशिष्ट्ये जास्त दिसून येतात केंद्रयादीतील विषय राज्ययादीपेक्षा जास्त व महत्वाचे आहेत त्यामुळे केंद्र सरकारला जास्त अधिकार प्राप्त झाले आहेत तसेच सामाईक यादीतील विषयासंबंधी दोन्हीही सरकारना कायदा करता येतो. एकाचवेळी एखाद्या विषयासंबंधी केंद्र सरकार व घटक राज्य यांनी कायदा केला तर त्यावेळी केंद्र सरकारचा कायदा ग्राह्य मानला जातो. तसेच घटक राज्यांत आणीबाणी जाहीर करून घटकराज्याचे सर्व अधिकार केंद्र सरकार स्वतःकडे घेऊ शकते. भारतात एकेरी नागरिकत्वाची पद्धती स्विकारली आहे नागरिकांना अमेरिकेप्रमाणे घटकराज्याचे वेगळे नागरिकत्व दिले जात नाही. घटक राज्यांना स्वतंत्र राज्यघटना निर्माण करता येत नाही. अशा विविध कारणांमुळे मध्यवर्ती सरकार प्रबळ व शक्तीशाली बनले आहे त्यामुळे भारत हे संघराज्यात्मक असले तरी प्रत्यक्षात एकात्म स्वरूपाचे वाटते.

**९) प्रौढ मताधिकार**

भारताने प्रातिनिधीक लोकशाही शासन पद्धतीचा स्विकार केलेला आहे. भारतातील सर्व स्त्री, पुरुष नागरिकांना प्रौढ मतदानाचा अधिकार दिला आहे. ब्रिटीश राजवटीत मतदानाचा अधिकार मर्यादित स्वरूपाचा होता. १९१९ च्या कायद्याने ३% लोकांना व १९३५ च्या कायद्याने १४% लोकांना मतदानाचा अधिकार दिलेला होता. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २१ वर्षे पूर्ण असणाऱ्या प्रत्येक भारतीय स्त्री, पुरुषांना मतदानाचा अधिकार दिला. १९८९ च्या ६१ व्या घटना दुरुस्तीने वयाची १८ वर्षे पूर्ण असणाऱ्या स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार बहाल केला आहे. म्हणजेच संपत्ती, शिक्षण, जात, धर्म, लिंग असा कोणताही भेदभाव न करता सर्व भारतीयांना प्रौढ मतदानाचा अधिकार बहाल केलेला आहे फक्त वयाची अट घातली आहे. घटना समितीसमोर भाषण करताना डॉ. राजेंद्र प्रसाद म्हणाले होते की, ''या संविधानाद्वारे आम्ही मोठी उडी मारली आहे आणि ती म्हणजे प्रौढ मताधिकाराची होय.'' प्रौढ मताधिकारामुळे जनतेच्या इच्छेतून प्रतिनिधी निवडले जातात. कायदेमंडळात जनमताचे खरेखुरे प्रतिबिंब उमटते. प्रौढ मताधिकाराचा स्विकार करून घटनाकारांनी सर्वासामान्य लोकांच्या निर्णयशक्तीवर टाकलेला विश्वास भारतीय जनतेने सार्थ ठरविला आहे.

**१०) स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय**

भारतीय राज्यघटनेच्या सुरुवातीलाच उद्देशपत्रिकेत स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या लोकशाही तत्वांचा पुरस्कार केलेला आहे. भारतातील लोकशाही यशस्वी करावयाची असेल तर नागरिकांना सामाजिक, आर्थिक, राजकिय अशा सर्व क्षेत्रात समानतेची वागणूक मिळाली पाहिजे कायद्यासमोर सर्वांना समान मानले पाहिजे म्हणून समानतेची वागणूक मिळाली पाहिजे कायद्यासमोर सर्वांना समान मानले पाहिजे म्हणून समानतेच्या तत्वाचा अंगीकार केलेला आहे. समतेबरोबरच नागरिकांना स्वातंत्र्याचा हक्क दिलेला आहे व स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी विविध तरतुदी घटनेत केलेल्या आहेत परंतु स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार या प्रवृत्तीने नागरिकांनी वागू नये म्हणून व्यक्ती स्वातंत्र्यावर काही मर्यादा घातलेल्या आहेत. व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राचे ऐक्य राखणारी बंधुत्वाची भावना नागरिकांत निर्माण झाली पाहिजे या उद्देशाने बंधुता तत्वाचाही

उल्लेख घटनेत केला आहे तसेच समाजातील सर्व लोकांना सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्यायाची हमी भारतीय राज्यघटनेने दिली आहे. भारतातील जाती, धर्म, प्रांत व भाषा यामधील विविधता दूर करून सर्वांनी ऐक्याने, बंधुत्वाच्या भावनेने एकत्रित रहावे या दृष्टीने न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता ही लोकशाहीची तत्वे उपयुक्त ठरतात.

**११) न्यायालयीन स्वातंत्र्य**

भारतीय राज्यघटनेने न्यायालयाचे स्वातंत्र्य व श्रेष्ठत्व मान्य केलेले आहे. न्यायालयीन स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्यासाठी घटनेत विविध तरतुदी केल्या आहेत. न्यायाधीशांच्या नेमणुका, त्यांच्या अधिकारांची व सेवेची शाश्वती, वेतन, भत्ते, सुरक्षितता इत्यादी अनेक तरतुदी केलेल्या आहेत. त्यामुळे भारतीय न्यायालये स्वतंत्र आहेत. न्यायमंडळ हे कायदेमंडळ व कार्यकारीमंडळ यांच्या नियंत्रणापासून मुक्त ठेवले आहे. घटनेचा अर्थ लावणे, न्यायालयीन पुनर्विलोकन, न्यायालयीन सक्रियता अशा जबाबदाऱ्या न्यायालय पार पाडीत आहे. लोकशाहीत न्यायालयाचे स्वातंत्र्य, अलिप्तता टिकविणे लोकशाहीच्या रक्षणासाठी व यशासाठी आवश्यक आहे.

**१२) धर्मनिरपेक्ष राज्याचा पुरस्कार**

ब्रिटीशांनी धर्मा-धर्मात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. 'फोडा व राज्य करा' या पद्धतीने ब्रिटीशांनी राज्यकारभार केला. धर्मातील वादामुळे राज्यास धोका निर्माण होतो याची जाणीव घटनाकारांना होती. त्यामुळे भारतात कोणत्याही एका धर्माला महत्व दिलेले नाही, सर्व धर्मांना समान मानले आहे. भारत हे पाकिस्तानप्रमाणे धर्माधिष्ठित राज्य नाही तसचे ते धर्मबाह्य राज्यही नाही. भारतात हिंदू, मुसलमान, बौद्ध, शीख, जैन, पारशी, ख्रिश्चन इत्यादी विविध धर्माचे लोक राहतात म्हणून सर्व धर्मसमभाव या दृष्टीने प्रत्येकाने राहले यासाठी धर्मनिरपेक्ष राज्याचा पुरस्कार केला आहे. घटनाकारांनी सुरूवातीला तसा उल्लेख घटनेत केला नव्हता परंतु १९७६ साली झालेल्या ४२ व्या घटनादुरुस्तीने 'धर्मनिरपेक्ष' या शब्दाचा सरनाम्यात समावेश केला. धर्म ही वैयक्तिक बाब मानून प्रत्येक नागरिकाला स्वेच्छेने कोणताही धर्म स्विकारण्याचा, स्विकारलेल्या धर्माची पूजा, अर्चा करण्याचा किंवा स्विकारलेल्या धर्माचा त्याग करण्याचा, प्रचार व प्रसार करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.

**१३) अल्पसंख्यांक व मागासवर्गीयांना विशेष सवलती**

भारतात सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने घटनाकारांनी अल्पसंख्याक व मागासवर्गीय जाती-जमातींना काही खास सवलतीच्या तरतुदी केलेल्या आहेत. लोकसभेत व राज्यांच्या विधीमंडळात त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केलेली आहे. केंद्र सरकार व राज्यसरकारच्या नोकऱ्यांत अल्पसंख्यांक व मागासवर्गीय जाती-जमातींच्या लोकांना खास सवलती दिल्या जातात. वन्य जाती-जमाती, अल्पसंख्याक व मागास वर्गीय जाती-जमातीच्या विशेषता अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमातींच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी घटनेत विशेष तरतुदींचा समावेश केलेला आहे. त्यांच्या विकासाच्या दृष्टीने आयोग नेमण्याचा अधिकार राष्ट्रपतींना दिला आहे मागासवर्गीयांच्या

आरक्षणाची तरतूद मूळ राज्यघटनेत १० वर्षांसाठी होती. परंतु आजही आरक्षणाचे धोरण चालू आहे. अल्पसंख्यांक व मागासवर्गीयांना दिलेल्या विशेष सवलतींमुळे त्यांना सामाजिक न्याय व समता प्रस्थापित होण्यास मदत झाली आहे.

**१४) एकेरी नागरिकत्व व एकच राज्यघटना**

भारतीय राज्यघटनेने अमेरिकेच्या राज्यघटनेप्रमाणे दुहेरी नागरिकत्व व दुहेरी राज्यघटनांचा स्विकार न करता एकेरी नागरिकत्व व एकच राज्यघटना या पद्धतीचा स्विकार केला आहे. भारतात विविध धर्मांचे, जातीपंथाचे, भाषांचे लोक राहतात. तेव्हा त्या सर्वांच्यात राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता राहण्याच्या दृष्टीने सर्वांना एकच म्हणजेच भारताचे नागरिकत्व बहाल केले आहे. सर्व नागरिकांना समान राजकिय हक्क, नागरी हक्क याद्वारे एकत्र आणणे हे राष्ट्रहिताच्या दृष्टीने उपयुक्त आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकेरी नागरिकत्वाचे समर्थन करताना असे म्हटले आहे की, ''प्रत्येक भारतीय व्यक्तीला, मग ती कोणत्याही प्रदेशाची रहिवाशी असो तिला नागरिकत्वाचा अधिकार असेल, तसेच भारतीय नागरिकत्व प्राप्त झालेल्या व्यक्तीला कायद्यासमोर समानता व कायद्याचे समान संरक्षण नाकारले जाणार नाही.'' त्यामुळे अमेरिकेप्रमाणे संघराज्याचे व घटकराज्याचे असे दुहेरी नागरिकत्व न देता सर्वांना भारतीय नागरिकत्वाचा दर्जा दिला आहे.

घटनाकारांनी भारतासाठी एकच राज्यघटना निर्माण केली आहे. अमेरिकेत संघराज्याची वेगळी आणि प्रत्येक घटक राज्यासाठी वेगळी अशी दुहेरी घटना पद्धती आहे परंतु भारतात मात्र एकेरी राज्यघटनेचा स्विकार केलेला आहे. भारतीय घटनेने घटकराज्यांना वेगळी राज्यघटना, वेगळा ध्वज निर्माण करण्याचा अधिकार दिलेला नाही. अशा गोष्टीतून घटकराज्यांचे फुटीरता वाढण्याचा धोका असतो. त्यामुळे भारतीय घटनाकारांनी
अतिशय दूरदृष्टीकोनातून सर्वांच्यासाठी एकच नागरिकत्व व एकच राज्यघटना हे तत्व स्विकारले आहे.

**१५) विविध देशांच्या राज्यघटनांचा प्रभाव**

भारतीय राज्यघटनेवर विविध देशांच्या राज्यघटनांचा प्रभाव पडलेला आहे. घटना समितीने विविध देशांच्या राज्यघटनांचा, तेथील शासन पद्धतींचा अभ्यास करून आपल्या देशासाठी जे योग्य आहे अशाच तत्वांचा स्विकार केलेला आहे. सरनामा, मुलभूत अधिकार, संघराज्य पद्धती, न्यायालयीन पुनर्विलोकन, राष्ट्रपतीचे आणीबाणीविषयक अधिकार, घटना दुरुस्तीची पद्धती इत्यादी अमेरिकेच्या राज्यघटनेमधून घेतला आहे. राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे, राष्ट्रपतीची निर्वाचन मंडळाची पद्धती आयर्लंडच्या राज्यघटनेतून, ऑस्ट्रेलियाच्या राज्यघटनेतून संसदेच्या दोन्ही गृहांची संयुक्त बैठक, सामाईक सूची, कॅनडाच्या राज्यघटनेतून शेषाधिकाराची पद्धती, इंग्लडच्या राज्यघटनेचा प्रभाव पडून संसदीय शासनपद्धती, मंत्रीमंडळाची सामुदायीक जबाबदारी, पंतप्रधान, नामधारी कार्यकारीप्रमुख इत्यादी तसेच सोव्हिएत रशियाच्या राज्यघटनेवरून मुलभूत कर्तव्यांचा समावेश भारतीय राज्यटनेत केला आहे. अशाप्रकारे जगातील काही चांगल्या गोष्टींचा स्विकार भारतीय राज्यघटनेमध्ये केलेला आहे. विविध देशांच्या राज्यघटनांचा प्रभाव पडून आपल्या देशाला अनुरूप होतील अशाच पद्धतींचा स्विकार घटनाकारांनी केला आहे.

### १६) द्विगृहात्मक कायदेमंडळ पद्धती

भारतीय राज्यघटनेने भारतासाठी द्विगृहात्मक कायदेमंडळ पद्धतीचा स्विकार केलेला आहे. घटनेच्या कलम ७९ मध्ये असे म्हटले आहे की, 'संघराज्यासाठी एक संसद असेल आणि ती राष्ट्रपती व राज्यसभा, लोकसभा या दोन सभागृहांची मिळून बनलेली असेल. म्हणजेच भारतीय कायदेमंडळाला संसद असे म्हटले जाते. संसदेची दोन सभागृहे आहेत' राज्यसभा द्वितीय व वरिष्ठ सभागृह असून या सभागृहात २५० सदस्य असतात त्यापैकी १२ सभासदांची नियुक्ती राष्ट्रपतींकडून साहित्य, कला, शास्त्र, समाजसेवा, शेती अशा विविध क्षेत्रातील नामवंत, तज्ञ व्यक्तीतून होते. २३८ सभासद घटकराज्यांच्या विधानसभा सदस्यांकडून लोकसंस्थेच्या प्रमाणात निवडले जातात.

लोकसभा हे भारतीय संसदेचे प्रथम व कनिष्ठ सभागृह असून या गृहातील सदस्यांची निवड जनतेकडून प्रत्यक्ष, गुप्त व प्रौढ मतदान पद्धतीने होत असते. लोकसभेत ५४५ सदस्य असतात. लोकसभेची मुदत पाच वर्षे असते तर राज्यसभा हे कायमस्वरूपी सभागृह असून ते कधीही बरखास्त होत नाही मात्र त्यातील सभासदांची मुदत ६ वर्षे असते. दर २ वर्षांनी $^{१}/_{३}$ सभासद निवृत्त होतात व तेवढेच नवीन घेतले जातात. द्विगृहात्मक कायदेमंडळ पद्धतीमुळे कायदेनिर्मितीचे कार्य उत्तमप्रकारे होते. तसेच लोकसभेच्या जुलमी कारभारावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य राज्यसभा करीत असते.

अशाप्रकारे भारतीय राज्यघटनेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. भारतीय राज्यघटना ही वैशिष्ट्यपूर्ण राज्यघटना आहे. २६ जानेवारी १९५० पासून राज्यघटनेची अंमलबजावणी झालेली आहे. आतापर्यंत झालेल्या सार्वत्रिक निवडणुका, त्यातील जनतेचा सहभाग, संसदेचे कामकाज, न्यायालयाचे निर्णय, केंद्र राज्य संबंध, राष्ट्रपतीचे आणीबाणीविषयक अधिकार, वित्त आयोग, भाषा आयोग इत्यादी कार्यांचा परामर्श घेतला तर जनतेने घटना मान्य केलेली आहे हे दिसून येते. भारतीय लोकच घटनेचे खरे संरक्षक आहेत. राज्यघटना हे साध्य नसून साधन आहे. कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ व न्यायमंडळ यांचे कार्य स्वतंत्रपणे होणे आवश्यक आहे. सर्व जनतेने जाणीवेने, जबाबदारीने व सेवावृत्तीने प्रजासत्ताक लोकशाहीची उभारणी केल्यानंतर भारतीय राज्यघटना यशस्वी ठरणार आहे. आजही लोकशाहीत पाहिजे तेवढ्या प्रमाणात राजकिय स्थैर्य निर्माण झालेले नाही. देशापुढे विविध प्रकारच्या समस्या उभ्या आहेत. प्रतिनिधींच्याकडून व्यवस्थितपणे राज्यकारभार पार पाडला जात नाही. जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी कार्यक्षम, चारित्र्यवान आणि प्रामाणिक असतील तर राज्यघटनेची योग्य रितीने अंमलबजावणी होईल, असे प्रतिनिधी निवडण्याची जबाबदारी जनतेची आहे. आजही समाजात आर्थिक, सामाजिक व राजकिय न्यायाची नितांत गरज आहे.

## १.३ सारांश

भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीबाबत विचार केला असता भारतीय राज्यघटनेवर इतिहासातील विविध घटनांचा प्रभाव पडलेला आहे. ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता, पार्लमेंटचे नियंत्रण, रेग्युलेटिंग अ‍ॅक्ट, १८५८ चा कायदा, १८६१ चा कायदा, राष्ट्रीय सभा यांचाही प्रभाव घटनेवर झालेला आहे. १९०९ चा मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा, १९१९ चा मॉंटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा कायदा व १९३५ चा भारत प्रशासन

कायदा या तीन कायद्यामधील विविध तरतुदींचा व योजनांचा विशेष प्रभाव भारतीय घटनेवर पडलेला आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण, द्विदल शासनपद्धती, निर्वाचन पद्धती, मतधिकार, संघराज्य पद्धती, केंद्र व प्रांत यांच्यातील अधिकार विभागणी, न्यायालयीन स्वातंत्र्य, पार्लमेंटचे सार्वभौमत्व इत्यादी विविध तरतुदी या कायद्यामधून घटनेत केलेल्या आहेत. याबरोबरच क्रिप्स योजना, कॅबिनेट मिशन योजना, लॉर्ड माऊंटबॅटन योजना अशा विविध योजनेतील महत्वाच्या शिफारशींचा विचार घटना निर्मितीमध्ये झालेला दिसून येतो.

घटना समितीमधील अनुभवी, तज्ञ व्यक्तींनी ९ डिसेंबर १९४६ पासून २६ नोव्हेंबर १९४९ पर्यंत अहोरात्र कष्ट घेऊन, विविध देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून आपल्या देशातील परिस्थितीला योग्य अशाच तरतुदींचा दूरदृष्टीकोनातून घटनेत स्विकार केला त्यामुळे भारतीय राज्यघटना स्थिर व यशस्वी झालेली दिसून येते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशापुढे अनेक आव्हाने होती, स्वातंत्र्यामुळे लोकांच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. भारतातील दारिद्र्य, बेकारी, बेरोजगारी, शेतजमिनीची नापिकता, प्रादेशिक असमतोल अशा विविध आव्हानांना सामोरे जात देशाचा राज्यकारभार चालू आहे. घटनाकारांनी भारतीय राज्यघटनेमध्ये केलेल्या महत्वपूर्ण तरतुदी त्यास कारणीभूत आहेत.भारतातील सर्व नागरिकांना मुलभूत अधिकार देऊन स्वातंत्र्य, समानता, न्याय यांची हमी राज्यघटनेने दिली तसेच राज्यांनी कशाप्रकारे राज्यकारभार करावा यासाठी त्यांना योग्य मार्ग दाखविण्याचा प्रयत्न मार्गदर्शक तत्वांमुळे झालेला दिसून येतो. त्याचबरोबर प्रौढ मताधिकार सर्वोच्च न्यायालय, केंद्र व घटक राज्ये यांच्या संबंधाबाबत विविध तरतुदी, जनतेचे सार्वभौमत्व, अल्पसंख्याकांची सुरक्षितता, धर्मनिरपेक्षता अशा विविध तरतुदीमुळे भारतीय राज्यव्यवस्था स्थिर व यशस्वी झालेली आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द

- **स्वायत्तता**– राज्यकारभाराचे स्वातंत्र्य
- **प्रांतिक** – प्रादेशिक
- **शेषाधिकार** – उर्वरित/ शिल्लक अधिकार
- **धर्मनिरपेक्ष** – सर्व धर्मांना समान महत्व
- **लिखीत** – लिहून ठेवलेली
- **संघराज्य**– मध्यवर्ती सरकार व घटकराज्य सरकारे अशी विभागणी

## १.५ स्वयं–अध्ययन प्रश्न उत्तरे

**प्रश्न– खालील पर्यायामधून योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.**

१) ब्रिटीश पार्लमेंटने मोर्ले–मिंटो सुधारणा कायदा ...... साली मंजूर केला.

अ) १९०९ ब) १९१९ क) १९३५ ड) १९४७

२) मॉंटेग्यू- चेम्सफोर्ड सुधारणा कायदा ..... साली मंजूर झाला.

अ) १९११ ब) १९१५ क) १९१९ ड) १९३५

३) भारतीय संविधानात सुरुवातीला ......... कलमे होती.

अ) २५० ब) ३६५ क) ३८९ ड) ३९५

४) १९४६ च्या त्रिमंत्री योजनेनुसार ..... सदस्यांची घटना समिती स्थापन करण्यात आली होती.

अ) ३७९ ब) ३८९ क) ३९० ड) ३९१

५) भारतीय घटना परिषदेचे तात्पुरते अध्यक्ष...... हे होते.

अ) पंडित नेहरू ब) सरदार वल्लभभाई पटेल

क) डॉ. सच्चिदानंद सिन्हा ड) डॉ. राजेंद्र प्रसाद

६) भारतीय घटना समितीचे कायमचे अध्यक्ष ..... हे होते.

अ) डॉ. राजेंद्र प्रसाद ब) डॉ. सच्चिदानंद सिन्हा

क) पंडित नेहरू ड) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

७) भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष ..... हे होते.

अ) म. गांधी ब) के. एम. मुन्शी

क) डॉ. राजेंद्र प्रसाद ड) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

८) भारत हे ..... स्वरूपाचे राज्य आहे.

अ) धार्मिक ब) धर्माधिष्ठीत क) धर्मनिरपेक्ष ड) धर्मबाह्य

९) भारतीय राज्यघटना ..... रोजी मान्य करण्यात आली.

अ) २६ नोव्हेंबर १९४९ ब) १५ ऑगस्ट १९४७

क) ९ डिसेंबर १९४६ ड) यापैकी नाही

१०) घटना समितीची पहिली बैठक ..... रोजी घेण्यात आली होती.

अ) २४ ऑगस्ट १९४६ ब) ९ डिसेंबर १९४६

क) २६ नोव्हेंबर १९४९ ड) २६ जानेवारी १९५०

११) ...... साली ईस्ट इंडिया कंपनीने प्लासीच्या लढाईत विजय मिळवून भारतात ब्रिटीश सत्तेचा पाया घातला.

अ) इ. स. १६००  ब) इ. स. १७५७  क) इ. स. १७७३  ड) इ. स. १८५७

१२) भारतीय राज्यघटनेत ..... देशाच्या राज्यघटनेवरून मुलभूत अधिकारांचा समावेश करण्यात आला आहे.

अ) अमेरिका  ब) रशिया  क) ऑस्ट्रेलिया  ड) कॅनडा

१३) राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे ..... देशाच्या राज्यघटनेतून स्विकारणेत आली आहेत.

अ) कॅनडा  ब) अमेरिका  क) आयर्लंड  ड) सो. रशिया

१४) ..... हे भारतीय राज्यघटनेचे वैशिष्ट्य नाही.

अ) जनतेचे सार्वभौमत्व  ब) संसदिय शासन  क) अध्यक्षीय शासन  ड) न्यायालयीन स्वातंत्र्य

१५) १९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्तीने ...... हा शब्द घटनेच्या उद्देशपत्रिकेत समविष्ट करणेत आला.

अ) सार्वभौम  ब) प्रजासत्ताक  क) लोकशाही  ड) धर्मनिरपेक्ष

- **स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१) १९०९ (अ)  २) १९१९ (क)

३) ३९५ (ड)  ४) ३८९ (ब)

५) डॉ. सच्चिदानंद सिन्हा (क)  ६) डॉ. राजेंद्र प्रसाद (अ)

७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (ड)  ८) धर्मनिरपेक्ष (क)

९) २६ नोव्हेंबर १९४९ (अ)  १०) ९ डिसेंबर १९४६ (ब)

११) इ. स. १७५७ (ब)  १२) अमेरिका (अ)

१३) आयर्लंड (क)  १४) अध्यक्षीय शासन (क)

१५) धर्मनिरपेक्ष (ड)

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

- **टीपा लिहा.**

अ) मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा

ब) मॉंटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा कायदा

क) घटना समिती

ड) १९३५ च्या कायद्याची वैशिष्ट्ये

इ) धर्मनिरपेक्ष राज्य

फ) भारतीय घटनेची उगमस्थाने

- **खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

अ) १९०९ च्या मोर्ले-मिंटो सुधारणा कायद्याचे विस्तृत विवेचन करा.

ब) भारतीय राज्यघटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी थोडक्यात स्पष्ट करा.

क) भारतीय घटनासमितीचे स्वरूप व कामकाज थोडक्यात सांगा.

ड) १९३५ च्या कायद्यातील प्रमुख तरतुदी स्पष्ट करा.

इ) भारतीय राज्यघटनेची प्रमुख वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

१) डॉ. भोळे भा. ल. - भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे, नागपूर, २००३.

२) डॉ. भोगले शांताराम - भारतीय राज्यघटना - विकास, स्वरूप आणि राजकारण

३) मुठाळ राम, भारतीय शासन आणि राजकारण, अंशुल, पुणे

४) प्रा. पाटील बी. बी., उर्मिला चव्हाण - भारतीय शासन, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१३

५) डॉ. कारेकर शोभा, डॉ. घोडके शरद - भारतीय शासन आणि राजकारण, डायमंड, पुणे

६) कुलकर्णी बी. वाय. - भारतीय शासन आणि राजकारण, पिंपळापुरे, नागपूर, २०००

❑❑❑

## सत्र २ : घटक २

# भारतीय संविधान : तात्विक अधिष्ठान

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

- २.२.१ भारतीय राज्यघटनेचा सरनामा/उद्देशपत्रिका
- २.२.२ मूलभूत अधिकार/हक्क
- २.२.३ राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे
- २.२.४ मार्गदर्शक तत्त्वाच्या अंमलबजावणीमधील समस्या किंवा अडथळे
- २.२.५ मूलभूत कर्तव्ये

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

२.५ स्वंय-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## २.० उद्दिष्टे :

प्रस्तुत घटकाची खालील उद्दिष्टे आहेत :

- भारतीय राज्यघटनेचा सरनामा किंवा उद्देश्यपत्रिका समजावून घेणे.
- राज्यघटनेने भारतीय नागरीकास दिलेल्या मुलभूत अधिकारांचा अभ्यास करणे.
- राज्यघटनेमधील राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे तसेच नागरिकांची मूलभूत कर्तव्ये समजून घेणे.

## २.१ प्रास्ताविक :

राजकीय समाजाला एकत्रित ठेवणारी आणि तिच्या विकासाची दिशा निश्चित करणारी मुख्य व्यवस्था म्हणजेच त्या समाजाची चौकट होय. समाजातील विविध संस्था त्याचे अंतरसंबंध व्यक्ती व संस्थाचे संबंध त्यांना अर्थ आणि संदर्भ अशा चौकटीने प्राप्त होतो. भारतीय राज्यघटनेची अशी चौकट म्हणजे 'राज्यघटनेचा सरनामा' होय. प्रत्येक देशाच्या राज्यघटनेत काही निश्चित उद्दिष्टये ध्येये असतात त्या ध्येयाचा उद्दिष्टाचा उल्लेख त्या देशांच्या संविधानाच्या सरनाम्यात करण्यात आलेला असतो. भारतीय घटना निमात्यांनी ज्या उद्दिष्टांना प्रेरणास्थानी ठेवून उद्दिष्टाची निर्मिती केली ती उद्दिष्टये साध्य करण्याच्या उद्देशाने आणि संविधानाचा थोडक्यात आशय स्पष्ट करण्याच्या दृष्टीने महत्वाची ठरेल अशी उद्देशपत्रिका संविधानाच्या प्रारंभी जोडण्यात आलेली आहे. या उद्देश पत्रिकेलाच संविधानाचा प्राण किंवा आत्मा असेही म्हणतात.

विविधतेने नटलेल्या भारतीय समाजात समतेच्या तत्वानुसार राज्यवव्यस्था स्थापन करण्याच्या हेतूने घटना निर्मात्यांनी ज्या मुख्य तरतुदी करण्यात आल्या त्यात –

१) संविधानाच्या प्रारंभी लोकशाही गणराज्याची मुद्देसुद मांडणी करणारी प्रास्ताविका जोडलेली आहे.

२) लोकशाही मूल्यावर आधारीत शासन संरचना सर्वच पातळीवर राहील असे नियम तयार केले.

३) राज्यघटनेत नागरिकांचे अधिकार आणि कर्तव्ये समाविष्ट केली.

४) कोणत्याही राजकीय पक्षाचे शासन सत्तेवर असतांना त्यांच्या शासन कारभारात उपयुक्त ठरतील अशी धोरण निदेशक तत्वे भारतीय संविधानात समाविष्ट करण्यात आली.

''सरनामा म्हणजे सारांश रुपाने वर्णन केलेली घटनाच होय'' असे डॉ. एम. व्ही. पायली या विचारवंताने म्हटले आहे. इतक्या मोजक्या शब्दात इतके सुंदर विचार श्रेष्ठतम आदर्श लिहिलेले अपवादानेच आढळतात.

भारतीय नागरिकांना सरनाम्याद्वारे स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्यायाची शाश्वती देण्यात आली आहे. पंडित जवाहरलाल नेहरुनी मांडलेल्या उद्दिष्टांच्या ठरावानुसार सरनाम्याची शब्दरचना करण्यात आली असून सन १९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्तीने सरनाम्यात 'समाजवादी व धर्मनिरपेक्ष' आणि 'राष्ट्रीय एकात्मता' हे शब्द नव्याने समाविष्ट करण्यात आलेले आहेत.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ भारतीय राज्यघटनेचा सरनामा/उद्देशपत्रिका/प्रास्ताविका

''आम्ही भारतीय जनता, भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य निर्माण करण्याचे प्रतिज्ञापूर्वक ठरवून आणि भारतातील सर्व नागरिकांना,

न्याय : समाजिक, आर्थिक व राजकीय

स्वातंत्र्य : विचार, आचार व समजुती श्रद्धा व उपासना यांचे

समता : दर्जा आणि संधी याबाबत

बंधुता : व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्रीय ऐक्य, एकात्मता आणि अखंडता राखणारी

यांची शाश्वती देण्याचे आमच्या या घटना परिषदेने आज २६ नोव्हेंबर १९४९ रोजी ठरवून आम्ही तिचा विचारपूर्वक स्वीकार करीत आहोत''.

सरनामा हा राज्यघटनेचा भाग नसला तरी घटनात्मक तरतुदीचा अर्थ लावण्यासाठी न्यायाधीशांना उपयुक्त ठरतो म्हणून सरनाम्यास घटनेची गुरुकिल्ली असे म्हटले जाते.

**सरनाम्याचे महत्व :**

१) सरनाम्यातून देशाच्या शासन व्यवस्थेचे स्वरुप लक्षात येते.

२) शासनाचे तात्विक आधार सरनाम्यात स्पष्ट केले आहेत. याच आधारावर राज्यघटना तयार झालेली आहे.

३) नैतिक व राजकीय दृष्टीकोनातून सरनामा शासनकर्त्यांची जबाबदारी स्पष्ट करतो.

४) राज्यघटनेच्या अंमलबजावणीमध्ये सरनामा मार्गदर्शकाची भूमिका बजावतो.

आपल्या देशाची शासनव्यवस्था, राज्याची ध्येय धोरणे, राज्याची कार्ये, नागरिकांचे अधिकार आणि कर्तव्ये, व्यक्ती स्वातंत्र्य इत्यादी गोष्टी सारांश रुपाने सांगण्याचे काम सरनामा करीत असतो. राज्यघटनेच्या सरनाम्यातील काही संज्ञाचा अर्थ स्पष्ट केला तर राज्यघटनेचे अंतरंग समजून येईल.

भारतीय राज्यघटनेच्या वरील सरनाम्यावरुन पुढील बाबी स्पष्ट होतात.

अ) भारतीय राज्यघटनेचे उगमस्थान

ब) भारतीय राज्यव्यवस्थेचे स्वरुप

क) राज्यव्यवस्थेचे उद्देश

सरनाम्याचे महत्व स्पष्ट करताना सर्वोच्च न्यायालयानेच 'राज्यघटनेची प्रस्तावना म्हणजे संविधान निर्मात्यांचा आशय स्पष्ट करणारी चावी आहे' अशा शब्दात वर्णन केलेले होते.

**सरनाम्याचे तत्वज्ञान :**

**१) जनता घटनेचा आधार :**

आम्ही भारतीय जनता या शब्दानी भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याची सुरुवात झालेली आहे. भारतीय राज्यघटना घटनापरिषदेने केलेली असली तरी या घटनपरिषदेला भारतीय जनतेने घटनानिर्मितीचे अधिकार

दिलेले होते. तसेच या घटना समितीने वेळोवेळी जनतेची मते, इच्छा, सूचना विचारात घेऊन घटना निर्माण करण्यात आलेली आहे. भारतीय जनता सार्वभौम आहे याचा अर्थ असा की, भारतीय जनतेने घटनापरिषद निर्माण करून त्याद्वारे घटनेची निर्मिती करण्यात आली असून व राज्यघटनेला मान्यता दिली आणि प्रतिज्ञापूर्वक तिचा स्वीकार करण्यात आलेला आहे. अंतिम सत्ता जनतेच्या हाती आहे हे यातून स्पष्ट होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या मते 'सरनामाद्वारे हे स्पष्ट होते की, या घटनेचा आधार जनता आहे. यात समाविष्ट करण्यात आलेले कायदे व सत्ता सर्व जनतेस दिलेले आहेत.'

२) **सार्वभौमत्व** (Sovereign) :

भारत हे सार्वभौम राज्य आहे. १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी भारतावर ब्रिटीशांची सत्ता होती. १५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. १५ ऑगस्ट १९४७ ते २६ जानेवारी १९५० या कालावधीत भारत हे वसाहतींचे राज्य समजले गेले. पण २६ जानेवारी १९५० पासून भारत हे सार्वभौम राज्य बनले. भारत हे स्वतंत्र राष्ट्र असून अंतर्गत व्यवहाराच्या बाबतीत ते सर्वश्रेष्ट सार्वभौम राज्य आहे. बाहेरील कोणत्याही देशाच्या प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष नियंत्रणात असणार नाही. अंतर्गत अथवा परकीय संबध प्रस्थापित करण्यास भारत पूर्णपणे स्वतंत्र आहे. ब्रिटीश राष्ट्रकुल संघाचा भारत सदस्य असला तरी ते सदस्यत्व सार्वभौमत्वाच्या विरोधी नाही. पंडित नेहरु म्हणाले ''भारत ब्रिटीश सम्राटाला आता जबाबदार असणार नाही. केवळ मित्रत्वाचे संबध प्रस्थापित करण्याकरिता भारताने राष्ट्रकुल परिषदेचे सभासदत्व स्वीकारलेले आहे.'' म्हणून भारताचे सार्वभौमत्व आबाधित आहे.

३) **समाजवादी** (Socialist) :

भारतीय राज्यव्यवस्था समाजवादी असावी या दृष्टीने भारतीय राज्यघटनेत १९७६ च्या ४२ व्या घटना दुरुस्तीने समाजवादी हा नवीन शब्द समाविष्ट करण्यात आला. समाजवादाला खाजगी मालकीला प्राधान्य असलेली भांडवलशाही अर्थव्यवस्था मान्य नाही. यातून भारताचे आर्थिक आणि सामाजिक धोरण स्पष्ट होते. उत्पादनाची साधने आणि वितरणावर सामाजिक मालकी व नियंत्रण असणारी समाजवादी राज्यव्यवस्था भारताने स्वीकारलेली आहे.

४) **धर्मनिरपेक्ष** (Secular) :

राज्याला सर्व धर्म समान असतील. कोणत्याही एका धर्माला राज्य पाठींबा देणार नाही. राज्याकडून कोणत्याही धर्माला प्रोत्साहन दिले जाणार नाही. १९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्तीने धर्मनिरपेक्षता या तत्वाचा समावेश भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात करण्यात आला. भारत हे एक धर्मनिरपेक्ष राज्य आहे तर पाकीस्तान हे धर्माधिष्ठित राज्य आहे. धर्म ही व्यक्तिगत बाब असून देशातील प्रत्येक नागरिकाला आपल्या इच्छेनुसार कोणत्याही धर्माची उपासना, पूजा अर्चा करता येईल. शांततेने धर्माचा प्रचार प्रसार करता येईल. पण इच्छा नसताना दुसऱ्यावर जबदरदस्तीने धर्म लादता येणार नाही. अगर सक्तीने धर्मांतर करता येणार नाही. भारतीय संघराज्यात कोणत्याही धर्माला राजाश्रय दिलेला नाही. राज्यघटनेने कोणताही एक धर्म राष्ट्रीय धर्म म्हणून स्वीकारलेला नाही.

५) **प्रजासत्ताक (लोकशाही)** (Democratic) :

प्रजा म्हणजे जनता होय. सरनाम्यात वापरण्यात आलेला प्रजासत्ताक लोकशाही हा शब्द अर्थपूर्ण आहे. लोकशाही शासनामध्ये देशातील नागरिकांना प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या सहभागी होता येते. भारतीय प्रजासत्ताकात जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीच्या मार्फत राज्यकारभार चालतो. राज्यघटनेतील आवश्यक बदल, घटनादुरुस्ती देखील जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीद्वारे होते. प्रजासत्ताकात अगर लोकशाहीमध्ये अंतिम सत्ता देखील जनतेकडेच असते. भारतात एक व्यक्ती अगर काही व्यक्तीचेच मंडळ सार्वभौम नसून खऱ्या अर्थाने भारतीय जनताच ही सार्वभौम आहे. पण प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार जनतेला असून अकार्यक्षम प्रतिनिधी अगर शासन यांना परत बोलविण्याचा अधिकार मात्र जनतेला नाही. पण असे असले तरी जनतेचे प्रातिनिधीक शासन हे सार्वभौम आहे. पर्यायाने जनता सार्वभौम असलेले भारत हे प्रजासत्ताक राज्य आहे. जनतेच्या इच्छेने राज्य कारभार चालतो. जनता आपल्या इच्छा प्रतिनिधीच्याद्वारे व्यक्त करतात म्हणून देशातील अंतिम सत्ता जनतेकडेच आहे.

६) **गणराज्य** (Republic) :

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यातील 'प्रजासत्ताक' आणि 'गणराज्य' ही तत्वे एकाच अर्थाने वापरलेली नाहीत. गणराज्य म्हणजे राजा नसलेले राज्य होय. लोकशाही राज्यव्यवस्थेत राज्यप्रमुख अगर राष्ट्रप्रमुख लोकनियुक्त असतो. त्यामुळे इंग्लड हे प्रजासत्ताक राज्य असले तरी गणराज्य नाही. कारण तेथील राज्यप्रमुख अगर राष्ट्रप्रमुखाची निवड वंशपरंपरेच्या तत्वानुसार होऊन आपले पद धारण करतो. (उदा. इंग्लंडचा राजा अगर राणी) गणराज्यातील सर्वोच्च शासनप्रमुख हा लोकनियुक्त असतो. त्या अर्थाने भारत हे गणराज्य आहे. भारतातील राष्ट्रपती हे पद सर्वोच्च सर्वश्रेष्ठ व मानाचे आहे. भारताच्या राष्ट्रपतीची निवड (राष्ट्रप्रमुख) अप्रत्यक्षरित्या मतदानाद्वारे केली जाते. ही निवड ठराविक कालावधीकरिता म्हणजे ५ वर्षासाठी असते भारताने गणराज्य शासन व्यवस्था स्वीकारली आहे. प्रत्येक गणराज्यात प्रजासत्ताक शासन असतेच असे नाही. उदा. चीन या देशात गणराज्य आहे पण लोकतंत्र शासनाचा अभाव आहे. भारतात मात्र राज्यघटनेनुसार गणतंत्र प्रजासत्ताकाची निर्मिती केलेली आहे म्हणजेच राष्ट्रपती या सर्वश्रेष्ठ पदाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

७) **न्याय** (Justice) :

जास्तीत जास्त लोकांचे अधिकाधिक कल्याण ('बहुजन हिताय बहुजन सुखाय') अगर हित साधणे हे गणराज्याचे ध्येय असते. मानवी व्यवहारातील समाजिक, आर्थिक आणि राजकीय या तिन्ही क्षेत्रात न्यायाची निर्मिती करणे हे शासन व्यवस्थेचे उद्दिष्ट राहील त्यासाठी राज्यघटनेत अनेक नोंदी घटना निर्मात्यांनी केलेल्या आहेत. न्याय हा राज्यघटनेचा आत्मा आहे. न्याय याचा अर्थ असा की, व्यक्तीच्या वर्तणुकीचा समाजहिताशी मेळ बसविणे होय. न्यायाचा उद्देश समाजाचे जास्तीत जास्त कल्याण करणे हाच असतो. असा न्याय सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनात प्रस्थापित केल्याशिवाय व्यक्तीची अथवा समाजाची

प्रगती, उन्नती होणार नाही. म्हणून राज्यघटनेने समान न्याय प्रस्थापित करण्यावर अधिक भर देण्यात आलेला आहे. न्यायाचे तीन प्रकार पडतात.

**१) सामाजिक न्याय–** सामाजिक न्यायाच्या आधारावर व्यक्ती व्यक्तीमध्ये भेदभाव न करता स्वत:चा विकास करण्यासाठी समान संधी उपलब्ध करुन देणे म्हणजेच सामाजिक न्याय होय.

**२) आर्थिक न्याय–** आर्थिक न्याय म्हणजे जीवन जगण्याइतपत उत्पादनाची साधने उपलब्ध करुन देणे म्हणजे आर्थिक न्याय होय.

**३) राजकीय न्याय–** राजकीय न्याय म्हणजे राज्यकारभारात सहभागाची समान संधी उपलब्ध करुन देणे म्हणजेच राजकीय न्याय होय. समाजात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्र न्याय प्रस्थापित करण्याकरिता सरनाम्यात या तरतुदी करण्यात आल्या आहेत.

८) **स्वातंत्र्य** (Liberty) :

व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला पोषक परिस्थिती निर्माण करणे असा स्वातंत्र्याचा अर्थ अभिप्रेत आहे. भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेच्या तिसऱ्या विभागात राज्यव्यवस्थेचा उद्देश स्पष्ट केलेला असून सरनाम्यातील तत्त्वज्ञानात चार उद्दिष्टये दिलेली आहेत. त्यापैकी स्वातंत्र्य हे एक आहे. भारतात सर्व नागरिकांना विचार, अभिव्यक्ती, विश्वास, उपासना व श्रद्धा याबाबतीत स्वातंत्र्य प्राप्त व्हावे हे राज्यघटनेचे व शासन प्रणालीचे उद्दिष्ट राहील. असे संविधानाच्या उद्देशपत्रिकेत नमूद करण्यात आले आहे. उद्देशपत्रिकेत अभिप्रेत असलेले स्वातंत्र्य घटनेतील मूलभूत अधिकारात साकार केली आहेत. यामध्ये उच्चार, विचार, भाषा वास्तव्य, लेखन, संस्था संघटना स्थापन करणे, धर्मसंस्था इत्यादी स्वातंत्र्याचा समावेश होतो. मात्र स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे तर गैरवर्तनावर बंधन घालणे हाही स्वातंत्र्याचा एक भाग आहे.

९) **समता** (Equality) :

समता म्हणजे सारखेपणा नव्हे. समता म्हणजे मानवनिर्मित विषमता नष्ट करून सर्वनागरिकांना सर्वांगीण विकासाची समान संधी देणे होय. साचेबंदपणामुळे विकासाला खीळ बसते. सर्व नागरिकांना व्यक्तिमत्व विकासाची समान संधी देणे, जाती, वंश, धर्म, संपत्ती इत्यादी आधारावर भेदभाव करण्यात येऊ नये. आपल्या कर्तृत्वानुसार काम करण्यास वाव मिळायला हावा, समान कामासाठी समान वेतन द्यायला हवे, देशातील सर्व नागरिक कायद्यापुढे समान आहेत. व्यक्तिला समतेनुसार संधी मिळाली तरच मिळालेल्या स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल.

**१०) बंधुत्व** (Fraternity) :

भारतासारख्या अखंडप्राय देशात विविध जातीजमाती, धर्म, भाषा आणि भिन्नप्रांत असणाऱ्या देशाला एकसंघ ठेवण्याकरिता त्यांच्यात एकतेची भावना निर्माण होऊन ती टिकवून ठेवणे ही प्राथमिक गरज आहे. या भावनेतून सरनाम्यात बंधुता हे तत्त्व समाविष्ट केले. अस्पृश्यतेसारखा कलंक राज्यघटनेने कायदेशीररीत्या धुऊन टाकण्याचा निर्धार केला.

राष्ट्रीय एकात्मता व अखंडता National Integrity सन १९७६ साली ४२ व्या घटना दुरुस्तीने भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात राष्ट्राचे ऐक्य ऐवजी राष्ट्रीय एकात्मता, अखंडता ही नवीन शब्दयोजना करण्यात आली. एकात्मता या शब्दामुळे राष्ट्रीय ऐक्याच्या भावनेला अधिक अर्थ प्राप्त झाला. लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्तीला प्रतिष्ठा प्राप्त झालेली असते. प्रत्येक व्यक्तीत स्वाभिमानाची भावना प्रेरीत होते. राष्ट्रीय एकता राखण्यासाठी ही भावना महत्वाची असते. व्यक्तीला राज्यात जितकी अधिक प्रतिष्ठा तितक्या प्रमाणात नागरिक या नात्याने देशाबद्दलची त्याची आस्था वाढते त्यामुळे राष्ट्रीय संरक्षण होते. म्हणून राष्ट्रीय एकात्मतेवर उद्देशपत्रिकेत अधिक भर देण्यात आला आहे. भारताने संघराज्यात्मक शासन व्यवस्था स्वीकारलेली आहे. भारतीय संघराज्यातून कोणत्याही घटकराज्याला फुटून बाहेर पडण्याचा अधिकार नाही. भारताची अखंडता राखली जावी आणि एकात्मता प्रस्थापित व्हावी यादृष्टीने संघीय शासन प्रबळ करण्याच्या दृष्टीने उपाय योजना करण्यात आलेल्या आहेत.

**११) सार्वभौम राष्ट्र :**

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात भारत हे सार्वभौम राष्ट्र असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे भारताच्या अंतर्गत बाबीमध्ये हस्तक्षेप व ढवळाढवळ करण्याचा परकीय राष्ट्रांना अधिकार नाही. तसेच परराष्ट्रीय धोरणाबाबत ही भारत स्वतंत्र व सार्वभौम आहे.

**१२) शासनाच्या उद्दिष्टाची घोषणा :**

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत शासनाची ध्येयधोरणे कशी असावीत याचे मार्गदर्शन करण्यात आले असून ती कशी पूर्ण करावीत हे शासनाची कर्तव्य आहे. सरनाम्यानुसार शासनाची ध्येय, न्याय, स्वातंत्र्य समता बंधुत्व ही असायला हवीत.

**मूल्यमापन/महत्त्व :**

राज्यघटनेच्या सरनाम्याचे उद्दिष्ट, ध्येय निश्चित करणे हे होय. अर्नेस्ट बार्कर या राजकीय विचारवंताने आपल्या ''प्रिन्सीपल्स ऑफ सोशल ॲण्ड पॉलिटिकल्स थेअरी'' या ग्रंथाच्या प्रस्तावनेमध्ये भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका छापलेली आहे. त्याच्या मते भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका इतकी उत्कृष्ट आहे की, भारताने स्वीकारलेली राजकीय तत्वे आणि प्रथा या पाश्चात्य देशांनी स्वीकारलेली राजकीय तत्वे आणि प्रथा याहून अधिक श्रेष्ठ आहेत. माझ्या या ग्रंथाचे सार म्हणजेच ही भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका होय. भारतीय राज्यघटनेचा सरनामा हा इतर देशांच्या सरनाम्याहून अधिक श्रेष्ठ व अद्वितिय आहे.

श्री. कन्हैयालाल मुन्शी यांनी भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे वर्णन 'भारतीय राज्यघटनेचे तत्वज्ञाान सांगणारी ती एक राजकीय कुंडली आहे' भारतीय राज्यघटनेची गुरुकिल्ली म्हणजेच भारतीय राज्यघटनेचा सरनामा होय. पंडित ठाकुरदास भार्गव हे सरनाम्याला घटनेचा आत्माच असे म्हणतात. जी. एन. जोशी भारतीय राज्यघटनेचा सरनामा राज्यघटनेच्या आधीच सर्व काही सांगून जातो. घटनेचा उगम, पद्धत, मान्यता, ध्येये यांचा उल्लेख यात सापडतो. डॉ. सुभाष कश्यप यांनी अतिशय अप्रतिम शब्दात सरनाम्याचे वर्णन केलेले

आहे. ते म्हणतात सरनाम्यामध्ये वर्णन केलेले आदर्श आमचे राष्ट्रीय आदर्श आहेत आणि एकाच वेळी ते आम्हाला आमच्या गौरवशाली इतिहासाशी जोडतात तसेच ते भविष्याचा उज्वल मार्गही दर्शवितात.

सरनाम्यातील प्रत्येक शब्द विचारपूर्वक व अर्थपूर्णरीत्या समाविष्ट करण्यात आलेले आहेत. या आधारावरच भारतीय राज्यघटनेची भव्य इमारत उभी राहिलेली आहे. काही महत्त्वाच्या खटल्यामध्ये उदा. केशवानंद भारती प्रकरण सर्वोच्च न्यायालयाने उद्देशपत्रिकेचे महत्व मान्य केले आहे.

भारतीय संविधान निर्मितीच्या ६८ वर्षानंतरही उद्देश पत्रिकेत दिलेली आश्वासने भारतीय शासनाने पूर्ण केलेली नाहीत. भारतात प्रांतवाद, धर्मवाद, भाषावाद इत्यादी वरुन अनेक ठिकाणी संघर्ष सुरु आहेत. भारतीय नागरिकांना स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय देण्यास भारतीय संविधान अयशस्वी ठरलेले आहे. समाजवादी लोकशाहीच्या नावाखाली भांडवलशाही व्यवस्था मजबूत झालेली आहे. दारिद्र्य, बेकारी, कुपोषण, बलात्कार, हिंसाचार, दहशतवाद आदि प्रश्न आजही कमी झालेले नाहीत.

वरील स्वरुपाचे प्रश्न आणि समस्या सोडविण्यास भारतीय शासन सर्वच स्तरावर अयशस्वी ठरलेले आहे. याचा अर्थ असा नव्हे की, सरनामा/उद्देशपत्रिका ही वाईट आहे. शासन व्यवस्था चालविणारे लोकप्रतिनिधी आणि जागरूक नसणारे नागरिक हे सुद्धा तितक्या प्रमाणात जबाबदार आहेत.

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेतील प्रत्येक शब्द हा चित्र आहे हे चित्र बोलतात व कहाणी सांगतात, तपस्या, त्याग आणि बलिदान असे सरनाम्याचे वर्णन डॉ. सुभाष कश्यप यांनी केलेले आहे.

### २.२.२ **मूलभूत हक्क किंवा अधिकार** (Fundamental Rights) :

**प्रस्तावना :**

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या प्रकरणात कलम १२ ते ३५ मध्ये भारतीय नागरिकांना दिलेले मूलभूत अधिकार स्पष्ट करण्यात आलेले आहेत. मूलभूत अधिकार हे लोकशाहीचे शासन पद्धतीचे मुख्य वैशिष्ट आहे. राज्य व व्यक्ती अशा दोन्ही घटकावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य मूलभूत अधिकार करतात. मूलभूत हक्कांची संकल्पना भारताने फ्रान्स आणि अमेरिका या देशाच्या राज्यघटनावरुन घेतलेल्या आहेत. मूलभूत हक्कांवर कोणीही आक्रमण करु शकत नाही. जर अतिक्रमण झाल्यास व्यक्ती न्यायालयाकडे दाद मागू शकते.

भारतीय राज्यघटनेत मुळात एकूण ७ प्रकारचे मूलभूत हक्क होते. व्यक्तीच्या सर्वांगिण विकासाकरिता मूलभूत अधिकार आवश्यक आहेत. सन १९७८ साली झालेल्या ४४ व्या घटनादुरुस्तीने खाजगी संपत्ती (मालमत्तेचा हक्क) मूलभूत हक्कातून वगळण्यात आला. त्यास कायदेशीर हक्क म्हणून स्थान देण्यात आले.

समतेचा अधिकार, व्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार शोषणाविरुद्ध अधिकार, शैक्षणिक व सांस्कृतिक अधिकार, धर्मस्वातंत्र्याचा अधिकार व घटनात्मक उपाययोजनांचा अधिकार असे सध्या ६ प्रकारचे मूलभूत

अधिकार उपलब्ध आहेत. यापैकी पहिल्या ५ अधिकारानुसार नागरिकांना त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक ती परिस्थिती राज्याने निर्माण करुन दिली आहे. तर घटनात्मक उपायांच्या या सहाव्या अधिकाराद्वारे मूलभूत अधिकारांच्या संरक्षणाची तरतूद केली आहे. सरकार, व्यक्ती किंवा संस्था यांच्याकडून वरील मूलभूत अधिकारावर अतिक्रमण झाले तर कलम ३२ नुसार नागरिक सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयात विविध प्रकारचे रिट अर्ज करून आपल्या हक्कांचे संरक्षण करू शकतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनात्मक उपाय योजनेच्या अधिकाराला (कलम ३२) 'राज्यघटनेचा हृदय आणि आत्मा' असे वर्णन केले आहे.

भारतीय नागरिकांवर घातलेली बंधने ही जाचक स्वरुपाची नसून ती माफक स्वरुपाची आहेत. त्यामुळे त्यातून खऱ्या स्वातंत्र्याची अभिव्यक्ती व्यक्त होते. मूलभूत अधिकारात बदल करण्याचा अधिकार शासन किंवा संसदेला आहे की नाही यावर बरीच चर्चा व वादविवाद झाले मात्र घटनेच्या २४ व्या घटनादुरुस्तीने संसदेला मूलभूत हक्कांमध्ये बदल करण्याचा अधिकार असल्याचे स्पष्ट केले.

२६ जानेवारी १९५० पासून भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी सुरू झाली. भारतीय नागरिकांना प्रारंभी सात प्रकारचे मूलभूत अधिकार दिले. भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या विभागात कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत अधिकाराची तरतूद स्पष्ट करण्यात आलेली आहे यांचे विवेचन पुढील प्रमाणे :

१) **समतेचा अधिकार** (Right to Equality) (कलम १४ ते १८) :

**अ) कायद्यापुढे सर्व व्यक्ती समान :**

कलम १४ मध्ये भारतातील प्रत्येक व्यक्तीला कायदयाच्या संदर्भात समानतेची वागणूक देण्यात येईल. त्याचबरोबर कायदयाचे समान संरक्षण देण्यात येईल. कायदयासमोर कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही. कायद्यासमोर गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष (लिंग भेद) वंश, जात, धर्म इत्यादी बाबत कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता राज्यघटनेने कायद्याच्या राज्याला मान्यता दिलेली आहे. कायदयाचे समान संरक्षण हे तत्त्व इंग्लंडच्या राज्यघटनेकडून घेतलेले आहे.

**ब) सार्वजनिक ठिकाणी समानता :**

कलम १५ मध्ये असे स्पष्ट करण्यात आले आहे की, राज्य केवळ धर्म, वंश, लिंग, जन्मस्थान इत्यादीच्या आधारावर कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे भेदभाव केला जाणार नाही. सार्वजनिक स्थळे, उपहारगृहे, करमणूकगृहे, रस्ते मैदाने, स्नानगृहे, स्माशानघाट, आर्थिक सहाय्य लाभलेल्या विहिरी, तलाव, पाणवठे वगैरेंचा वापर करण्यास कोणालाही मज्जाव करता येणार नाही. अशा तरतूदी मुळे समतेच्या अधिकाराची वृद्धी होऊन नागरिकांच्या मध्ये ऐक्याची भावना जोपासली जाते.

**क) नोकरीमध्ये समान संधी :**

कलम १६ प्रमाणे सार्वजनिक सेवांमध्ये प्रवेश देतांना कुठल्याही प्रकारे भेदभाव केला जाणार नाही. राज्यातील सार्वजनीक सेवायोजनाच्यामध्ये कोणत्याही पदावर नेमले जाण्यास सर्व नागरिकांना समान संधी

मिळेल. धर्म, लिंग, जात, वंश असा कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सार्वजनिक सेवात नागरिकांना समान संधी दिली जाईल.

**ड) अस्पृश्यता निवारण :**

कलम १७ प्रमाणे अस्पृश्यता निवारणाची तरतूद करण्यात आलेली आहे. कायदयाने अस्पृश्यता पाळणे गुन्हा आहे. कोणत्याही प्रकारची अस्पृश्यता पाळण्यास मनाई करण्यात आलेली आहे. अस्पृश्यता पाळणे हा शिक्षेस पात्र गुन्हा समजला जाईल. भारतीय राज्य घटनेच्या कलम १७ अन्वये भारतीय संसदेने १९५५ साली अस्पृश्यता निवारणाचा कायदा पास केला. भारतामध्ये समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने म्हणजेच सामाजिक विषमता नष्ट करण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

**इ) पदव्या किंवा किताबांची समाप्ती :**

कलम १८ नुसार सामाजिक विषमतेला बाधा निर्माण करणारी देशातील आणि विदेशातील किताब रद्द करणेत आले. राज्य, लष्करी अगर शिक्षण विषयक पदव्यांव्यतिरीक्त केणतीही पदवी प्रदान करता येणार नाही. परकीय देशांकडून राष्ट्रपतीच्या परवानगीशिवाय कोणतेही पद, पारितोषिक स्वीकारता येणार नाही. १८ व्या कलमानुसार भारतीय राज्यघटनेने पदव्या देण्याची प्रथा बंद केलेली असली तरीही भारत सरकारने अशोकचक्र, कीर्तिचक्र, परमवीरचक्र, वीरचक्र, अशोकचक्र, भारतरत्न, पद्मभूषण, पद्मश्री इत्यादी सारख्या बहुमान सूचक पदव्या देण्याची प्रथा चालु ठेवलेली आहे.

**मूल्यमापन :**

भारतीय राज्यघटनेने नागरिकांना समतेचा हक्क दिलेला असला तरी या हक्कावर काही प्रमाणात मर्यादा घातलेल्या आहेत. उदा. राष्ट्रपती, राज्यपाल, परकीय वकील, सैनिक यांना कलम ३६१ द्वारे संरक्षण दिलेले आहे. समतेची वागणूक व समतेचा कायदा असला तरी मुले व स्त्रीया त्याचप्रमाणे मागासलेल्या जातीजमातीच्या लोकांना विशेष सवलती देण्याबाबत सरकारला विशेष तरतुदी करण्याचा अधिकार आहे.

**२) स्वातंत्र्याचा अधिकार/हक्क** (Right to Liberty) :

Liberty लिबर्टी हा शब्द लॅटीन Liber या शब्दापासून तयार झालेला आहे. लिबर म्हणजे मुक्ती, स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. स्वातंत्र्य म्हणजे बंधनाचा अभाव नव्हे. बंधनाच्या अधिन राहून मिळालेल्या हक्काचा किंवा अधिकाराचा उपभोग घेणे म्हणजेच स्वातंत्र्य होय. व्यक्तिगत स्वातंत्र्य हा प्रजातंत्राचा अधिकार आहे. व्यक्तिला स्वातंत्र्य दिल्याशिवाय व्यक्ती आपला सर्वांगिण विकास किंवा प्रगती करु शकत नाही ही गोष्ट सत्य आहे. स्वातंत्र्याशिवाय व्यक्तिच्या अंगी असणाऱ्या कलागुणांचा विकास होणार नाही. स्वातंत्र्याचा अर्थ बेलगाम अगर स्वैराचारी किंवा अनिर्बंध स्वातंत्र्य असा होत नाही. समाजहितास घातक असे कृत्य करुन कोणीही आपला स्वार्थ साधू शकत नाही. त्याकरिताच व्यक्तिच्या स्वातंत्र्यावर उचित बंधने घालणे क्रमप्राप्त ठरते. समाजात शांतता, सुव्यवस्था, प्रस्थापित करण्याकरिता राज्यसंस्था कायदे निर्माण करते असे कायदे स्वातंत्र्याला पूरक आणि पोषक असल्याने त्या कायदयाचे पालन लोकांच्याकडून केले जाते.

स्वातंत्र्यावर बंधन घालणारे कायदे स्वातंत्र्याला पूरकच असतात. स्वातंत्र्य हया अधिकाराचा विचार भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ ते २२ मध्ये केला आहे.

स्वातंत्र्यांचे दोन प्रकार पडतात १) सकारात्मक स्वातंत्र्य आणि २) नकारात्मक स्वातंत्र्य थोडक्यात व्यक्तिच्या स्वातंत्र्यावर कमीतकमी बंधने घालून व्यक्तिचा सर्वांगिण विकास साधणे हा उद्देश स्वातंत्र्य संकल्पनेच्या पाठीमागे असतो.

**स्वातंत्र्याचे प्रकार** (Kinds of Liberty) :

भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ नुसार खालील सात प्रकारचे स्वातंत्र्य भारतीय नागरिकाला प्राप्त झालेले होते. सध्या सहा प्रकारचे स्वातंत्र्ये आहेत. कितीही प्रमाणात संपत्ती बाळगण्याचे स्वातंत्र्य रद्द केले आहे. सध्या हा अधिकार फक्त कायदेशीर हक्क (३००(क)) आहे.

**१) भाषण आणि विचार स्वातंत्र्य** (Freedom of Speech and Expression) :

भाषणाद्वारे व्यक्ती आपले विचार व्यक्त करते. खुली चर्चा करुन विचारांची देवघेव करते. भारतीय राज्यघटनेच्या मूळ घटनेत 'मुद्रण स्वातंत्र्याचा अधिकार' नसला तरी त्याचा अंतर्भाव विचार आणि भाषण स्वातंत्र्यामध्येच केला आहे. या संदर्भात भाष्य करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, ''समाचार पत्राचा संपादक एक व्यक्ती आहे. संबधीत वृत्तपत्रातील त्याचे विचार म्हणजे त्याची अभिव्यक्ती होय.' १९५० साली ब्रीजभूषण विरुद्ध दिल्ली राज्य या केसचा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने असे स्पष्ट केले की, राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मुद्रण स्वातंत्र्यावर राज्याचे नियंत्रण योग्यच आहे. भाषण आणि विचार स्वातंत्र्यामधील काही उणीवा दूर करणे करिता १९५१ साली १९ व्या कलमात घटनादुरुस्ती करण्यात येऊन भाषण व विचार स्वातंत्र्यावर पुढील बंधने घातली.

राज्याचे संरक्षण, भारतीय एकात्मता व अखंडता आणि सार्वभौमत्व, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता, परकीय देशाशी असलेले मित्रत्वाचे संबंध यांना बाधा उत्पन्न करणारे तसेच गुन्ह्यास उत्तेजन करणारे, सभ्यता व नितीमत्ता, कोणाची बदनामी करणारे, कोर्टाचा अवमान करणारे भाषण अथवा विचार व्यक्त करण्याच्या स्वातंत्र्यावर कायदा करून योग्य ती बंधने घालण्याचा अधिकार शासनाला आहे.

योग्य व अयोग्य बंधने कोणती हे ठरविण्याचा अधिकार अंतिम अधिकार विधीमंडळाला नाही तर हे ठरविण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. कारण मूलभूत अधिकारांचे संरक्षण आणि निरीक्षण करणे हे सर्वोच्च न्यायालयाचे कार्य आहे. विधीमंडळाने संमत केलेल्या एखाद्या कायदयामुळे, राज्यघटनेने दिलेल्या स्वातंत्र्याला विरोध निर्माण झाला तर तो कायदा घटनाबाहय ठरविण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. अशा प्रकारे स्वेच्छाचारी, अतिरेकी अगर अन्यायकारक बंधनापासून व्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यात आलेले आहे.

**२) शांततापूर्वक परंतु शस्त्राशिवाय सभा बोलविण्याचे स्वातंत्र्य** (To Assemble Peaceably and without Arms):

भारतीय नागरिकाला शांततापूर्वक आणि शस्त्राशिवाय सभा आयोजन करण्याचे स्वातंत्र्य आहे. त्या अधिकाराशिवाय भाषण आणि विचार स्वातंत्र्याचा अधिकार लंगडा पडतो. लोकशाही यशस्वी होण्यासाठी आपला दृष्टीकोन लोकांना समजून सांगणे त्यांचेशी सुसंवाद घडविणे आवश्यक आहे. याकरिता सभा, संमेलने भरविता येतात पण हा अधिकार अंतिम नाही. नागरिकाला शस्त्रासहित एकत्रित येण्याचा अधिकार नाही. राज्यघटनेच्या कलम १९ (३) नुसार सार्वजनिक सुव्यवस्था या अधिकारावर बंधने घालण्याचा अधिकार शासनाला आहे. भारताची एकता, अखंडता, सार्वभौमत्व आणि सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी योग्य अशी बंधने शासन घालू शकते. शासनाने घातलेली बंधने योग्य आहेत की, नाहीत हे ठरविण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. असा निर्णय भारत सरकार विरुद्ध इंद्रदेवसिंग या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिला.

**३) संस्था किंवा संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य** (To Form Association and Unions) :

भारतीय नागरिकांना संस्था अगर संघ स्थापन करण्याचा अधिकार दिला आहे. व्यक्तिच्या विकासासाठी संघ व संस्था आवश्यक आहेत. सामाजिक, आर्थिक व राजकीय संघटना स्थापन करण्याचा अधिकार नागरिकांना आहे. राज्यघटनेच्या १९ (४) या कलमानुसार सार्वजनिक सुव्यवस्था आणि नैतिकता यांना बाधा येऊ नये म्हणून या अधिकारावर बंधने घालण्याचा अधिकार सरकारचा आहे. भारताची एकात्मता, सार्वभौमत्व, शांतता धोक्यात येत असेल तर शासन अशा संस्था अगर संघ बेकायदेशीर ठरविण्याचा अधिकार सरकारला आहे. १९७५ च्या आणीबाणीमध्ये सत्ताधारी राजकीय पक्षाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि इतर संस्था व संघापासून सार्वजनिक शांततेला धोका उत्पन्न झाला असे या कारणासाठी बंदी घातली होती.

**४) भारतीय प्रदेशात मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य** (Right to Move Freely Throughout the Territory of India) :

भारतीय राज्यघटनेनुसार भारतीय नागरिकाला भारतीय प्रदेशात संचार करण्याचा अधिकार आहे. त्यामुळेच व्यक्तिगत स्वातंत्र्याची प्राप्ती झाली. भारतीय नागरिकांना मुक्तपणे म्हणजे विनापरवाना संचार करण्याचे म्हणजे फिरण्याचे स्वातंत्र्य मिळाले. हे स्वातंत्र्य असल्याशिवाय इतर स्वातंत्र्याचा उपभोग घेता येत नाही. १९ व्या कलमानुसार भारतीय नागरिकाला हे स्वातंत्र्य मिळाले असले तरी ते अमर्यादित स्वरुपात नाही. लोकहिताचा आणि मागासलेल्या व वन्यजनजातींच्या हिताचा विचार करुन सरकार या स्वातंत्र्यावर मर्यादा घालू शकते. उदा. संसर्गजन्य रोग्याला संचार करण्यापासून सरकार परावृत्त करु शकते. सरकारने सुरक्षित म्हणून घोषित कलेल्या जागी सरकारच्या परवानगीशिवाय संचार करता येत नाही. कायदयाने स्थानबद्ध केलेल्या व्यक्तिचे संचार स्वातंत्र्य नष्ट होते. सरकारने संचार स्वातंत्र्यावर लादलेली बंधने योग्य की

अयोग्य हे ठरविण्याचा अधिकार न्यायालयाचा आहे. उदा. कलकत्याच्या उच्च न्यायालयाने १९५० साली पश्चिम बंगालच्या सुरक्षा कायदयाचे ३८ वे कलम हयाच आधारावर अवैध ठरविले होते.

५) **भारताच्या राज्यक्षेत्रात कोठेही राहण्याचे किंवा वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य** (Right to Reside and Settle in any Part of the Territory of India) :

भारतीय नागरिकाला देशांच्या कोणत्याही भागात स्वत:च्या इच्छेनुसार स्थायी होण्याचे स्वातंत्र्य आहे. संचार स्वातंत्र्याला पुरक हे स्वातंत्र्य आहे. भारतीय राज्यघटनेच्या १९ व्या कलमात भारतीय नागरिकाला हे स्वातंत्र्य उपभोगण्याचा अधिकार मिळाला आहे. उदा. महाराष्ट्रात जन्मलेली व्यक्ती भारताच्या कोणत्याही प्रदेशात नोकरीनिमित्त अगर व्यवसायानिमित्त काही काळ अगर कायमस्वरुपी वास्तव्य करू शकते. भारतीय नागरिकाला भारतीय प्रदेशात कोठेही संचार किंवा वास्तव्य करण्याचा अधिकार असून या अधिकारामुळे भारताची एकात्मता टिकून राहण्यास मदत होते.

६) **कोणताही व्यवसाय, रोजगार, व्यापार, धंदा करण्याचे स्वातंत्र्य** (Right to Practice only Professional or to Carry any Ocupation, Trade or Business) :

भारतीय राज्यघटनेच्या १९ व्या कलमानुसार भारतीय नागरिकाला कोणताही व्यवसाय, धंदा, रोजगार, व्यापार करण्याचे स्वातंत्र्य आहे. भारतीय नागरिकाला स्वत:च्या इच्छेनुसार कोणताही पेशा स्वीकारण्याचा अगर व्यवसाय, धंदा करता येईल. या अधिकारावर राज्यशासनाला नियंत्रण ठेवता येईल कोणताही बेकादेशीर धंदा, व्यवसाय, चालविण्यास त्यावर बंदी आणता येईल हे योग्य अयोग्य ठरविण्याचा अधिकार न्यायालयाचा राहील. एखादा व्यवसाय अगर धंदा करणेसाठी सरकार विशिष्ट पत्रतेची अट सरकार घालू शकेल.

व्यक्ती स्वातंत्र्याची हमी Personal Liberty भारतीय राज्यघटनेच्या २०, २१ आणि २२ व्या कलमान्वये १९ व्या कलमांत सांगितलेल्या स्वातंत्र्याचे संरक्षण नागरिकांना देण्यात आलेले आहे.

३) **पिळवणूकी विरुद्धचा किंवा शोषणा विरुद्धचा हक्क** (Right Against Exploitation) (कलम २३ ते २४) :

भारतीय राज्यघटनेच्या २३ आणि २४ व्या कलमात शोषणाविरुद्धचा हक्क स्पष्ट केलेला आहे. भारतीय राज्यघटनेच्या २३ व्या कलमानुसार भारतामध्ये मानवाच्या क्रय-विक्रयास कायदयाने बंदी घातली आहे. कोणीही कोणत्याही व्यक्तिला गुलाम किंवा दास बनवू शकणार नाही. अगर कोणत्याही व्यक्तिकडून जबदरस्तीने काम करुन घेता येणार नाही. भारतामध्ये फार वर्षापासून वेठबिगारी आणि देवदासी पद्धती अस्तित्वात होती. जमिनदारांचे कडक नियंत्रण मजुर वर्गावरती होते. गरीब पद्दलित व मागासलेल्या जमातींचे शोषण बंद करणेसाठी शोषणाविरुद्धचा हक्क मान्य करणेत आला.

गुलामगिरी प्रथे बरोबरच वेश्या व्यवसायालाही पायबंद घालण्यात आला. भारतीय राज्यघटनेच्या २४ व्या कलमाद्वारे १४ वर्षाच्या आतील मुलामुलींना खाणी अगर धोक्याच्या ठिकाणी काम करण्यास बंदी घातली आहे.

पण सार्वजनिक हिताच्या दृष्टीने शासनाला लोकांच्या कडून सक्तीने काम करुन घेण्याचा अधिकार दिला आहे. (भारतीय राज्यघटनेने सार्वजनिक हिताची व्याख्या स्पष्ट केलेली नाही) उदा. लष्करात भरती होण्याची सक्ती सरकार नागरिकांवर करु शकते. परकीय आक्रमण, पूर निवारण व राष्ट्र उभारणीचे कार्य करण्यास सरकारला सोयीचे जाते म्हणून अशी सक्ती देणे योग्य आहे. अशी सक्ती करताना धर्म, वंश, वर्ण, जात या आधारावर भेदभाव करण्याचा अधिकार सरकारला नाही.

या अधिकारावर अशी टिका केली जाते की, केवळ कायदा करुन अगर राज्यघटनेत नियम केल्याने शोषण थांबत नाही. जोपर्यंत देशात आर्थिक, सामाजिक क्षेत्रात प्रगती होत नाही. देशातील लोकांचे दारिद्र्य नष्ट होणार नाही तो पर्यंत कोणत्या ना कोणत्या स्वरुपात शोषण सुरू राहणारच. इंग्लंड प्रमाणे भारतात निर्धनगृह (Poor House) आणि कार्यागृह  (Work House) निर्माण होणार नाही तोपर्यंत मुलांचे शोषण थांबणार नाही. भारतीय राज्यघटनेने शोषणाविरुद्ध संरक्षण करण्याचा अधिकार दिल्यामुळे वाईट प्रथांद्वारे शोषण होणाऱ्या प्रवृत्तींचे नियमन झाले आहे. शासनास शोषणबंदी संबंधी कायदे करता येतात.

४) **धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार** (Right to Freedom of Religion)

(कलम २५ ते २८) :

ब्रिटिशांनी भारतावर अनेक वर्ष राज्य केले. ब्रिटिशानी स्वार्थापोटी भारतीय लोकांमध्ये धर्माच्या आधारावर भेद निर्माण केलेले होते. पाकिस्तानची निर्मिती ही धार्मिक आधारावर झाली. धर्मामुळेच लोकांच्यामधील ऐक्य लोप पावते त्याची जाणीव घटना निर्मात्यांना होती. म्हणून त्यांनी धर्म ही व्यक्तिगत बाब ठरविली. व्यक्तीला स्वत:च्या इच्छेनुसार कोणत्याही धर्माचा स्वीकार अगर प्रचार करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे भारतात धर्मनिरपेक्ष राज्याची निर्मिती करणे सोयीचे झाले. धार्मिक आधारावर कोणालाही विशेष संधी मिळणार नाहीत असे या अधिकाराने स्पष्ट केले आहे.

प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या विचाराने धर्म स्वीकारण्याचा आणि त्या धर्माचा प्रसार प्रचार करण्याचा अधिकार आहे. पण हा अधिकार अमर्यादित नाही. सार्वजनिक सुव्यवस्था, नीती आणि आरोग्य यांना बाधा येणार नाही याचा विचार करुन व्यक्तीला धर्मस्वातंत्र्याच्या अधिकाराचा उपभोग घेता येईल. उदा. महम्मद सिध्दकी विरुद्ध उत्तर प्रदेश या खटल्यामध्ये उत्तर प्रदेशाच्या पोलीस आयुक्ताने लाऊडस्पीकर वरून दिवसातून पाच वेळा 'अजान' वाचण्याची परवानगी नाकारली होती. यु. पी. च्या न्यायालयाने ही कृती राज्यघटनेच्या कलम २५ (१) नुसार वैध मानली. एखादया धार्मिक संस्थेची अर्थव्यवस्था मोडकळीस आली तर तिच्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार शासनास आहे. सामाजिक कल्याणाच्यादृष्टीने समाजसुधारण्याचे कायदे शासन करू शकते. उदा. हिंदूची मंदिरे सर्व जातीजमातीच्या लोकांच्यासाठी खुली केली. धार्मिक

संस्था राजकीय स्वरुपाची कार्ये करीत असेल तर त्या संस्थेवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार शासनास मिळाला आहे.

भारतीय राज्यघटनेच्या २६ व्या कलमानुसार कायदा करुन राज्यातील संस्थांची चल व अचल संपत्तीची मालकी स्वीकारण्याचा अगर संपतीची व्यवस्था पाहण्याचा अधिकार शासनाला मिळाला. राज्यघटनेच्या कलम २७ नुसार कोणत्याही धर्माच्या प्रचारासाठी सक्तीने पैसा गोळा करण्यावर बंदी घातली आहे. कलम २८ नुसार शिक्षणसंस्था मधून धार्मिक शिक्षणावर बंदी घातली आहे. सरकारी शासनामान्य अगर शासनाकडून अनुदानप्राप्त अशा शिक्षण संस्थातून धार्मिक शिक्षण देता येणार नाही.

**५) शैक्षणिक व सांस्कृतिक हक्क** (Cultural and Educational Rights)

(कलम २९ ते ३०):

भारतीय राज्यघटनेच्या २९ व्या कलमानुसार भारतात वास्तव्य करणाऱ्या नागरिकाला अगर समुहाला आपली स्वत:ची भाषा, लिपी आणि संस्कृती त्याची जोपासना करण्याचा हक्क आहे. सोव्हिएत रशियाच्या राज्यघटनेत अल्पसंख्याकांना आपल्या संस्कृतीचे संरक्षण करण्याचा अधिकार आहे. भारतीय अल्पसंख्याकांना आपल्या संस्कृतिचे संरक्षण करता यावे या हेतुने हा अधिकार दिला आहे. अल्पसंख्याकांना आपल्या आवडीनुसार धर्म अगर भाषा या आधारावर शिक्षण संस्था चालविण्याचा अधिकार आहे असे भारतीय राज्यघटनेच्या (३० (२)) मध्ये स्पष्ट केले आहे. कोणत्याही शैक्षणिक संस्थेत धर्म, वंश, जात, भाषा या आधारावर प्रवेश नाकारता येणार नाही.

**६) मालमत्तेचा किंवा संपत्तीचा हक्क/अधिकार** (Right to Property)

(कलम १९(१), ३१ (१), ३१ ब) :

मालमत्तेच्या अधिकाराचे संरक्षण साध्या कायदयाने होऊ शकते म्हणून मूलभूत अधिकाराच्या यादीतून संपतीचा अधिकार १९७८ च्या ४४ व्या घटनादुरुस्तीने काढून टाकला. सध्या हा अधिकार कलम ३००(क) नुसार केवळ कायदेशीर अधिकार आहे.

**७) घटनात्मक उपायायोजनेचा हक्क** (Right to Constitutional Remedies) (कलम ३२):

भारतीय राज्यघटनेच्या ३२ व्या कलमात घटनात्मक उपाय योजनाचा अधिकार स्पष्ट केला आहे. भारतीय नागरिकाला वरील सहा प्रकारचे मूलभूत अधिकार राज्यघटनेने देण्यात आलेले आहेत. त्याचे संरक्षण करण्यासाठीच घटनात्मक उपाययोजनेचा हक्क नागरिकाला प्राप्त झाला. नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण योग्य प्रकारे होत नसेल तर अधिकरावर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीवर योग्य ती कार्यवाही होत नसेल तर हे सर्व अधिकार निरर्थक ठरतील. मूलभूत अधिकारावर झालेले अतिक्रमण दूर करणेसाठीच उच्च अगर सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागता येते. न्यायालयामार्फत नागरिकांच्या अर्जाचा विचार करुन त्या संदर्भात आज्ञा काढल्या जातात. घटनात्मक उपायांचा अधिकार हा आमचा राज्यघटनेचा 'आत्मा' आणि 'हृदय' आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटलेले आहे. आपल्या हक्कांचे संरक्षण करण्याकरिता पुढील ५ प्रकारचे अर्ज

करता येतात. त्याचा विचार करुन न्यायालय निर्णय देते. न्यायालयाचा निर्णय सर्व व्यक्ती, संस्था, शासन यांचेवर बंधनकारक असतो. अशा प्रकारची तरतूद भारतीय राज्यघटनेने ब्रिटिश राज्य घटनेकडून स्वीकारलेली आहे.

**अर्जाचे पाच प्रकार** (Writs) :

१) **बंदी प्रत्यक्षीकरण** (Habeas Corpus) :

हेबियस कॉर्पस हा लॅटिन असून त्याचा अर्थ 'आम्हाला शरीर द्या' असा होतो. ब्रिटन मध्ये हा कायदा १६७९ साली पास झाला. त्यामुळे मानवी स्वातंत्र्याचे संरक्षण झाले. नंतर अमेरिकेच्या राज्यघटनेने ही हा अधिकार स्वीकारला. भारतीय राज्यघटना निर्मात्यांनी मूलभूत अधिकाराचे संरक्षण करण्याकरिता 'हेबिअस कॉर्पस' आज्ञा मान्य केली. कोणत्याही व्यक्तीला बेकायदेशीररीत्या तुरुंगात डांबून ठेवले असेल. अन्यायपूर्वक दंड केला असेल, कोणत्याही व्यक्तीस बेकायदेशीररीत्या अटक केली असेल तर हया अटकेच्या संदर्भात विचारणा करण्याचा अर्ज स्वत: व्यक्ती अगर नातलग किंवा मित्रमंडळी हा अर्ज उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाकडे करु शकतात. न्यायालयाने हा अर्ज मान्य केल्यास अटक करण्यात आलेल्या व्यक्ती न्यायालयासमोर उभे करण्याची आज्ञा देते. तिच्यावर झालेल्या अन्यायाची चौकशी न्यायालय करते. व्यक्तीची अटक बेकायदेशीर आहे असे न्यायालयास वाटले तर त्या व्यक्तीला तात्काळ सुटका करण्याचा आदेश न्यायालय देते. बंदी प्रत्यक्षीकरण या अर्जाच्या तरतूदीमुळे कोणत्याही व्यक्तीला सरकार अगर संस्था बेकायदेशीररीत्या अटकेत ठेवू शकत नाही.

२) **परमादेश** (Mandamus) :

मॅंडमस या लॅटिन शब्दाचा अर्थ असा की, आम्ही आदेश देतो की, We Command असा होतो. या आदेशान्वये कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला तिचे कर्तव्यपालन करण्याची आज्ञा दिली जाते. शासन एखादी व्यक्ती अगर संस्था आपल्या कर्तव्याचे पालन करीत नसेल यामुळे एखादया व्यक्तीवर अन्याय झालेला असेल तर या अन्यायाचे निवारण करण्याकरिता त्या व्यक्तीने असा अर्ज उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाकडे करावयाचा असतो. अर्ज न्यायालयाने मान्य केल्यास तो अन्याय त्वरीत नाहीसा करावा अशी आज्ञा न्यायालय व्यक्तीस किंवा संस्थेस अथवा शासनाला देते. अशी आज्ञा द्यावी किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार न्यायालयालाच आहे. उदा. 'फॅक्टरी ॲक्ट कायद्यानुसार मजुराला नुकसान भरपाई द्यावी लागते. ही भरपाई देण्याचे मालक टाळाटाळ करीत असेल तर परमादेशचा अर्ज करता येतो व न्यायालयाने हा अर्ज मान्य केला तर मजुराला नुकसान भरपाई द्यावी अशी आज्ञा न्यायालय देते.

३) **अधिकार पृच्छा** (Quo Warrunto) :

कोणतेही सार्वजनिक अगर शासकीय पद पात्रता नसताना कोणतीही व्यक्ती हे पद भुषवित असेल तर त्या व्यक्तीच्या पदग्रहण करणविषयीची पृच्छा करण्याचा अधिकार व्यक्तीला आहे. पण अशा वेळी अर्जदाराने दोन अटी पूर्ण करणे आवश्यक आहे. त्या पदाबाबत वाद सुरू आहे त्या पदशी त्या व्यक्तीचे

हितसंबंध गुंतलेले असावेत व ते पद कायम स्वरुपाचे असावे हे पद प्राप्त करणाऱ्या व्यक्ती कोणाच्याही इच्छेने काढून टाकता येणारे नसावे. न्यायालयाने अर्ज मंजूर केल्यास बेकायदेशीरपणे पद धारण करणाऱ्या व्यक्तीस हे पद सोडण्याची आज्ञा न्यायालय करते. यालाच अधिकार पृच्छा Write of Quo Warranto असे म्हणतात.

४) **प्रतिषेध** (Prohibition) :

हा अर्ज व्यक्ती सर्वोच्च न्यायालयाकडे अथवा उच्च न्यायालयाकडे करु शकते. हा अर्ज मान्य झाल्यास सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालय कनिष्ठ न्यायालयाकडे प्रतिषेध लेख Writ of Prohibition देत असते. कनिष्ठ न्यायालयास त्याच्या अधिकार कक्षेच्या बाहेर असलेल्या खटल्याचे कामकाज थांबविण्याचा आदेश देते. या प्रतिषेध लेखाचा उद्देश कनिष्ठ न्यायालयांना त्याच्या अधिकार कक्षेपुरतेच मर्यादित ठेवण्याचा असतो. त्यामुळे न्यायाधीशांना आपल्या अधिकार क्षेत्रातच कार्य करावे लागते.

५) **उत्प्रेक्षण** (Certiorari) :

कनिष्ठ न्यायालयाकडे चालणारा खटला वरिष्ठ न्यायालयाने चालवावा अशी विनंती करणारा अर्ज याला उत्प्रेक्षण असे म्हणतात. असा अर्ज वरिष्ठ न्यायालयात मान्य झाला तर ते न्यायालय कनिष्ठ न्यायालयाला संबंधित कागदपत्रे (त्या खटल्याची) सादर करण्याची आज्ञा देते. कनिष्ठ न्यायालय एखादा खटला चालविण्यास असमर्थ आहे असे वरिष्ठ न्यायालयाला आढळून आल्यास न्यायदान कार्य योग्य व जलद गतीने व्हावे अशा दृष्टीने आदेश वरिष्ठ न्यायालय देते. प्रतिषेध अर्ज प्रतिबंद स्वरुपाचा तर उत्प्रेक्षण अर्ज खालच्या कोर्टातील खटला वरिष्ठ न्यायालयात चालवावा या संबधीचा असतो.

**मूल्यमापन :**

भारतीय राजकीय लोकशाहीबरोबर मूलभूत अधिकारांनी सामाजिक लोकशाही स्थापन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. राज्यघटनेतील मूलभूत अधिकरावर अनेक राजकीय विचारवंतानी टिका केलेल्या आहेत. पायली या विचारवंताने घटनेतील मूलभूत अधिकार नाममात्र आहेत. वास्तविक ज्या हक्कांना या यादीत स्थान मिळायला हवे होते त्यांना त्यात स्थान दिलेले नाही. उदा. काम मिळविण्याचा अधिकार, बेकार भत्ता, आरोग्य सुविधाचा अधिकार इत्यादी बाबीचा समावेश यात नाही. आणीबाणीच्या काळात अगर संकटकालीन परिस्थितीत मूलभूत हक्क स्थगित होतात. या विरोधात न्यायालयात जाता येत नाही. म्हणजेच मूलभूत हक्क एका हाताने दिले आणि दुसऱ्या हाताने काढून घेतले आहेत. नागरिकांच्या मूलभूत हक्कावर इतकी बंधने का? काही अभ्यासकांच्या मते राज्यघटनेतील या प्रकरणाला 'मूलभूत अधिकाराच्या मर्यादा' हेच शीर्षक द्यायला हवे होते. मूलभूत हक्काशी सबंधीत कलमाची भाष कठीण आहे. भारत हे संघराज्य असले तरी त्याचा आत्मा एकात्म स्वरुपाचा आहे. सार्वजनिक हिताकरिता मूलभूत हक्कावर निर्बंध योग्यच आहेत.

### २.२.३ राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे (नीतीनिर्देशांक तत्त्वे) (The Directive Principles of State Policy)

**प्रस्तावना :**

राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे ही भारतीय राज्यघटनेचे आगळे वैशिष्टय असून भारतीय राज्यघटनेच्या ४ थ्या विभागात याचे विवेचन करण्यात आलेले आहे. अशा प्रकारची तत्त्वे प्राचीन स्पॅनीश राज्यघटनेमध्ये ग्रंथीत केली होती. आयर्लंडच्या राज्यघटनेमध्ये नीतीनिर्देशांक तत्त्वांचा समावेश आढळतो. सीडने आणि वेब या राजकीय विचारवंताचा फार मोठा प्रभाव नीतीनिर्देशांक तत्त्वाच्या भागावर पडला आहे. असे सय अयव्हर जेनिंग यांनी व्यक्त केले आहे. डॉ. एम्. व्ही. पायलीच्या मते युनोच्या मानवी अधिकारपत्र आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या घोषणापत्राचा प्रभाव या नीतीनिर्देशांक तत्त्वाच्यावर पडला आहे. ज्या वेळेला भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीचे कार्य सुरु होते त्यावेळेस युनोमध्ये मानवी अधिकारपत्रावर विचारविनिमय सुरु होतो. या तत्त्वाच्यावर विदेशी विचारांपेक्षा ग्रामपंचायत, कुटीर उद्योग, नशाबंदी, गोवधबंदी इत्यादी विचाराचा व आदर्शाचाच प्रामुख्याने प्रभाव पडलेला दिसतो.

भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या विभागात कलम ३६ ते ५१ मध्ये राज्याच्या धोरणासंबधीची मार्गदर्शक तत्वे स्पष्ट केलेली आहेत. राज्याचे धोरण आणि योजना यांना मार्गदर्शन करण्याकरिता राज्यकारभार करणाऱ्यांना अधिक चांगल्या प्रकारचा मार्ग दाखविण्यासाठी ही तत्त्वे उपयुक्त ठरतात म्हणून त्यांना नीतीनिर्देशांक तत्वे असेही संबोधले जाते. देशाची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यासाठी राज्याचे धोरण आदर्शच पाहिजेत त्या करिता मार्गदर्शक तत्त्वांचा हेतू स्पष्ट करण्यात आलेला आहे. आर्थिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात नागरिकांचा दर्जा वाढविण्यासाठी राज्यकर्त्यांसमोर निश्चित अशी ध्येयधोरणे असावी लागतात. तेव्हा त्यांना त्या संबंधी मार्गदर्शन करण्याकरिता नीतीनिर्देशांक तत्वे अत्यंत महत्वाची ठरतात. तत्त्वाचे पालन करण्याची जबाबदारी राज्यांवर राहते. आयरिश राज्यघटना यावरुन भारतीय घटना निर्मात्यांनी या मार्गदर्शक तत्त्वांचा स्वीकार केलेला आहे.

भारतीय राज्यघटनेत धोरण निर्देशक तत्त्वाचे वर्गीकरण दिलेले नाही. पण आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि परराष्ट्र संबध विषयक अशा स्वरुपाची ही मार्गदर्शक तत्त्वे असल्याने त्याचे विश्लेषण पुढील प्रमाणे -

**अ) आर्थिक तत्त्वे** (Economic Principles) :

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३९, ४१, ४२, ४३, ४३ (क), ४८, ४८ (क) मध्ये आर्थिक स्वरुपातील मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश करण्यात आलेला आहे. राज्य हे पुढील गोष्टी साध्य करण्याच्या दृष्टीने आपले धोरण ठरवील.

१) प्रत्येक भारतीय नागरिकाला (स्त्री पुरुष असा भेदभाव न करता) उपजीवीकेची साधने प्राप्त होतील अशी व्यवस्था करणे.

२) ४४ व्या घटना दुरुस्तीने व्यक्ती व्यक्तीमधील तसेच वेगवेगळया क्षेत्रात राहणाऱ्या आणि व्यवसाय करणाऱ्या लोकसमुहातील उत्पन्नाच्याबाबत असलेली विषमता दूर करण्याचा प्रयत्न राज्य करेल तसेच दर्जा, सुविधा आणि संधीची विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न केला जाईल.

३) समाजहिताला बाधक असलेल्या अर्थव्यवस्थेचे उच्चाटन करुन उत्पन्नाची साधने व संपत्ती यांचे केंद्रीकरण होणार नाही अशी अर्थव्यवस्था निर्माण करणे.

४) प्रत्येक स्त्री–पुरुषाला समान कामासाठी समान वेतन किंवा मोबदला देण्यात येईल.

५) समाजातील भौतिक साधनांची विभागणी अशा पद्धतीने व्हावी की, ज्यामुळे सर्वाचे जास्तीत जास्त कल्याण व्हावे.

६) मजुरी करणारा पुरुष अगर स्त्री यांचे आरोग्य आणि शक्ती तसेच लहान बालकांचे कोमल शरीर यांच्यावर कोणताही वाईट परिणाम होईल असे मेहनतीचे काम करण्यास त्यांना भाग पाडू नये.

७) अल्पवयीन बालकांचे नैतिक अध:पतन व आर्थिक शोषण होईल अशी कामे त्यांच्यावर लादू नयेत.

८) कलम ४१ नुसार सर्व नागरिकांना पुरेसे काम, शिक्षण मिळावायस हवे. आजारपण, म्हातारपण, बेकारी, दौर्बल्य आले असल्यास त्यांना सामाजिक मदत मिळेल अशी व्यवस्था निर्माण करण्यात यावी.

९) कलम ४२ नुसार राज्यातील नागरिकांना पुरेसे वेतन मिळावे स्वत:ची उपजिवीका मागेल इतकेच वेतन नसावे. कायद्याच्या बाबतीत न्याय आणि माणुसकीचे वातावरण रहावे या करिता स्त्रीयांना प्रसुतीच्यावेळी योग्य ते सहाय्य सरकारकडून मिळेल अशी व्यवस्था करावी.

१०) कलम ४३ नुसार राज्याच्या कायद्याद्वारे अगर आर्थिक रचनेनुसार शेती, उद्योगधंदे व इतर क्षेत्रातील कामगारांना काम व निर्वाह वेतन मिळवून देणे जेणेकरुन त्यांना सुखासमाधानाने राहता येईल तसेच त्याचा सामाजिक, सांस्कृतिक विकास होईल. तसेच ग्रामीण भागात वैयक्तिक, सहकारी तत्वावर कुटिरोद्योगांचे संवर्धन करण्यासाठी सरकार प्रयत्न करेल.

११) कलम ४३ (क) नुसार उद्योगधंद्यांच्या व्यवस्थापनात कामगारांना सहभागी होता यावे करिता राज्य योग्य ते कायदे करेल व योग्य त्या उपाययोजना करेल.

१२) कलम ४८ नुसार आधुनिक व शास्त्रीय पद्धतीने शेती, पशुसंवर्धन याची योग्य व्यवस्था करण्याच्या दृष्टीने राज्य प्रयत्न करेल, चांगली जनावरे दुभत्या गाई यांचे जतन करुन त्याच्यात सुधारणा करणे, त्याच्या कत्तली होणर नाहीत याची दक्षता घेण्यासाठी सरकार सर्वतोपरी उपाय योजना करेल.

१३) कलम ४८ (क) नुसार देशाचे पर्यावरण सुरक्षित ठेवून त्यात सुधारणा करणे जंगली वन्य पशुपक्षी यांचे संरक्षण करणे या संदर्भात शासन प्रयत्न करेल.

**ब) सामाजिक तत्त्वे** (Social Principles) :

भारतीय राज्यघटनेच्या कलम ४५, ४६, ४७ व ४९ या कलमात स्पष्ट करण्यात आलेली आहे.

१) कलम ४५ नुसार तरतूदीनुसार मुलामुलींना नि:शुल्क व सक्तीचे (अनिवार्य) शिक्षण - राज्यघटना अंमलात आल्यानंतर दहा वर्षाच्या आत सरकार १४ वर्षाखालील मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची योजना अंमलात आणण्याचा प्रयत्न करेल.

२) कलम ४६ नुसार दुर्बल लोकांचे आणि विशेषत: मागासलेल्या जाती व जमातींच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंबध सुरक्षित ठेऊन त्यांची उन्नती होईल अशी योजना सरकारने करावी. त्याच्यावर कोणत्याही प्रकारचा अन्याय आणि शोषण होणार नाही याची दक्षता राज्याने घ्यावी.

३) कलम ४७ नुसार राज्यातील लोकांना सकस आहार पुरवून त्यांच्या आरोग्याचा दर्जा उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य, राहणीमान सुधारणे लोकांच्या आर्थिक हितसंबधाची राज्याकडून काळजी घेतली जाईल. सर्व प्रकारच्या शोषणापासून, अन्यायापासून त्यांना सरकार संरक्षण देईल. प्रकृतीला घातक अशा उत्तेजक पेयांवर बंदी घालण्यात येईल.

४) कलम ४९ नुसार भारतीय संसदेने केलेल्या कायद्याने राष्ट्रीय ऐतिहासिक महत्त्वाच्या स्थळांचे, कलाकृतींचे, स्मारकांचे, वस्तूंचे नुकसान, मोडतोड, नाश, विटंबना, स्थलांतर, विल्हेवाट अगर निर्यात यापासून
संरक्षण करण्याचे आद्य कर्तव्य सरकारचे राहील.

**क) राजकीय तत्त्वे** (Political Principles) :

केंद्र सरकार आणि घटकराज्य सरकारांनी राज्यकारभार संदर्भात कोणती धोरणे स्वीकारावीत या बाबतचे स्पष्टीकरण या राजकीय तत्त्वांमध्ये केले आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ४० व ५० मध्ये नीतीनिर्देशांक तत्त्वातील राजकीय तत्त्वाचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

१) भारतीय राज्यघटनेच्या ४० व्या कलमानुसार राज्यसरकार ग्रामपंचायती स्थापन करेल. त्यांना राज्याचा घटक म्हणून काम करण्यास आवश्यक ती सत्ता व अधिकार देईल. या ग्रामपंचायतीद्वारे लोकांना प्रशासनाचे शिक्षण मिळेल. स्वत:च्या गैरसोयी लोक स्वत:च दूर करू शकतील.

२) ब्रिटिशकाळात वेगवेगळया जमातीसाठी वेगवेगळे कायदे होते. त्यामुळे लोकांच्यात राष्ट्रीय ऐक्य वाढीस लागले नाही. अशी विषमता नष्ट व्हावी या उद्देशाने घटनेच्या ४४ व्या कलमानुसार भारतातील सर्व नागरिकाना एकच सामाजिक कायदा (Uniform Civil Code) लागू होईल त्या दृष्टीने राज्य प्रयत्न करेल.

३) ब्रिटिश काळात जिल्हाधीश हा जिल्हान्यायाधीश म्हणून कार्य करीत होता. न्यायविभाग हा शासनविभागापासून स्वतंत्र नव्हता असे सतेचे केंद्रीकरण अनिष्ट स्वरुपाचे होते. राज्य कारभारातील

न्याय व अंमलबजावणी खात्यांची फारकत करण्याची योजना राज्य करील असे राज्य घटनेच्या ५० व्या कलमात स्पष्ट केले आहे.

**ड) न्यायालयीन तत्त्वे** (Judicial Principles) :

भारतीय राज्यघटनेच्या ३९ (क) आणि ४ व्या कलमात न्यायालयीन तत्त्वे स्पष्ट करण्यात आलेली आहेत. ३९ व्या कलमानुसार प्रत्येक नागरिकाला समान न्याय मोफत कायदेविषयक सल्ला मिळविण्यासाठी कायदेकरणारी व राबविणारी यंत्रणेने न्याय दिला पाहिजे. दुर्बल घटकाना न्यायापासून वंचित ठेवले जाणार नाही याची दक्षता राज्याने घेतली पाहिजे. कायदेविषयक मोफत सल्ला नागरिकांना राज्याने उपलब्ध करुन दिला पाहिजे.

**इ) आंतरराष्ट्रीय तत्त्वे किंवा परराष्ट्र संबध विषयक तत्त्वे** (Principles Regarding International Relations) :

भारतीय राज्यघटनेच्या ५२ व्या कलमात परराष्ट्रीय संबध, आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता या संबधीची मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहेत. या तत्त्वाचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे.

१) शासनाने असे परराष्ट्र धोरण स्वीकारावे की, ज्याद्वारे जागतिक शांतता, सुरक्षितता आणि सुव्यवस्था कायम राहिल.

२) आंतरराष्ट्रीय संघर्ष वाद विवाद लवादामार्फत मिटविण्यास प्रोत्साहन द्यावे अन्यथा ते परस्पर सामंजस्याने सोडविण्यासाठी शासनाने प्रयत्न करावा.

३) सर्व राष्ट्रांनी परस्परांशी न्यायाने वागावे प्रत्येकाने परस्पराविषयी आदर बाळगावा सन्माननीय संबध प्रस्थापित करण्याचा शासनाने प्रयत्न करावा.

४) आंतरराष्ट्रीय व्यवहार आणि संबध ठेवताना वागताना आंतरराष्ट्रीय कायदा आणि करारनाम्यातील जबाबदारी या प्रती शासनाने आदरभाव वाढविण्याचा प्रयत्न करावा.

### २.२.४ मार्गदर्शक तत्त्वाच्या अंमलबजावणीमधील समस्या अगर अडथळे (टिकात्मक मूल्यमापन) आक्षेप आणि महत्त्व :

राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वाची तरतूद ही निरर्थक आहे. कारण लिखित राज्यघटनेत कायद्याचे स्वरुप नसलेला एखादा भाग घालणे व तिचे पालन किंवा अंमलबजावणीची व्यवस्था नसणे हे तर्क संगत नाही. मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे केवळ घोषणा आहेत. अशी टिका या निर्देशांक तत्त्वाच्यावर होण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांची योग्य अंमलबजावणी नाही. म्हणजेच एखादया राज्यकर्त्याने एखादया निर्देशक तत्त्वाचा पाठपुरावा केला नाही म्हणून नागरिक न्यायालयाकडे दाद मागू शकत नाही. मार्गदर्शक तत्त्वे ही अवास्तव आहेत. कोणत्याही राजकीय पक्षाला ही तत्त्वे राबविता यावीत असा संविधानाचा हेतू असल्याने या तत्त्वांना काटेकोर स्वरुप देण्याचे टाळले आहे.

प्रा. के.टी. शहांच्या मते मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे बँकेच्या सोयीनुसार वटवता येईल असा चेक आहे. हे स्पष्ट करताना ते म्हणतात. या तत्वाची अंमलबजावणी करण्यासाठी कोणतीही कालमर्यादा घालण्यात आलेली नाही. सर आयव्हर जेनिंग्जच्या मते लिखित संविधानात ही तत्त्वे असू शकत नाहीत आणि आपल्या संविधानातील या तत्त्वाचे वर्गीकरण शास्त्रशुद्ध स्वरुपात केलेले नाही. न्यायमूर्ती छागला मार्गदर्शक तत्त्वाचे पूर्णपणे पालन झाले तर भारत हा देश पृथ्वीवरील स्वर्ग होईल. भारतीय संविधानाचे ते एक स्वप्न होते. म्हणून त्याचा त्याग करता येणार नाही. भारतीय जनतेच्या आशा आकांक्षा सफल करावयाच्या असतील तर या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन होणे आवश्यक आहे.

मार्गदर्शक तत्त्वे समाजवादी सिद्धांताच्या आधारावर निर्माण करण्यात आली आहेत. त्यात सामाजिक, आर्थिक, राजकीय स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. संविधानाने आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि सद्‌भावना उत्पन्न करण्याचे आदेश दिला आहे. अशा प्रकारे ही तत्त्वे कल्याणकारी स्वरुपाची असून त्याचे प्रामाणिकपणे पालन केल्यास भारत हा जगामध्ये आदर्श राज्य निर्माण होऊ शकेल. पंडित नेहरुंच्या मते या तत्त्वाचे समर्थन करताना स्पष्ट केले आहे की, भारतीय जनतेचे दारिद्रय, अज्ञान, बेकारी इत्यादी गोष्टी नष्ट करण्यासाठी आणि त्याचे जीवन सुखी, समाधानी करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे आवश्यक आणि उपयुक्त आहे. ऑस्टीनच्या मते- भारतात सामाजिक क्रांती घडवून आणण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संविधानात मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश केलेला आहे. सेटलवाड एम्. सी. यांच्या मते राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे स्पष्ट व विस्तृत स्वरुपाची असून न्याय, समता आणि बंधुता प्रदान करणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे. या तत्त्वाद्वारे कोणत्याही स्वरुपाची कायदेशीर रचना किंवा संविधानात्मक उपाययोजनेची व्यवस्था केलेली नाही. तरीसुद्धा ही तत्त्वे न्यायलयाकरिता दीपस्तंभासारखी आहेत.

देशातील अनेक प्रश्न सोडविणे आवश्यक असून दारिद्रय, बेकारी, भ्रष्टाचार, लाचलुचपत इत्यादी प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी राज्याला ही मार्गदर्शक तत्त्वे आवश्क व उपयुक्त ठरणार आहेत. ४२ व्या घटनादुरुस्तीने आता पर्यंत मार्गदर्शक तत्त्वांना कायदेशीर मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यामुळे ती सरकारवर बंधनकारक ठरली गेली आहेत. सार्वत्रिक निवडणूक झाल्यानंतर राज्यकर्त्यांनी मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी जाणीवपूर्वक करावयास हवी. जाहिरनाम्यात जी मार्गदर्शक तत्त्वे नमूद केली जातात ती तत्त्वे प्रत्यक्षात आणणे राज्यकर्त्यांचे कर्तव्य ठरते. मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी राज्यकर्त्यांवर अवंलबून असते तशी जबाबदारी जनतेवरसुद्धा असते. राज्याने सुरू केलेल्या विकास कार्यक्रमांना योजनांना जनतेचा पाठींबा आवश्यक असतो. लोकमताच्या पाठींब्यावरच नीतीनिर्देशांक तत्त्वांची अंमलबजावणी होत असते. न्यायाधीश मार्गदर्शक तत्त्वाचा आधार घेऊन विविध खटल्याचा निकाल देतात. त्यादृष्टीनेही मार्गदर्शक तत्त्वाचे महत्त्व आहे.

**मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्त्वे यातील फरक :**

**प्रस्तावना :**

मूलभूत अधिकार आणि नीतीनिर्देशांक तत्त्वांचा उद्देश नागरिकांचे जीवन संपत्ती आणि स्वातंत्र्य सुरक्षित ठेवणे इतकाच आहे. दोन्ही तत्त्वांचे अंतिम ध्येय नागरिकांचे जीवन सुखी आणि समाधानी करणे आहे. या दोहोत पुढील प्रकारची भिन्नता आढळते.

१) मूलभूत अधिकार हे निषेधात्मक Prohibitive स्वरुपाचे आहेत तर नीतीनिर्देशांक तत्त्वे Directive स्वरुपाचे आहेत. सरकारने अमुक गोष्टी कराव्यात असे निर्देशन नैतिक तत्वे करतात तर अमुक एक गोष्ट करु नये हे सांगणे हाच मूलभूत अधिकराचा उद्देश असतो. म्हणून ॲलन ग्लँडहील हा विचारवंत म्हणतो की, मूलभूत अधिकार निषेधात्मक आहेत ते सरकारला विशिष्ट कार्य करण्यापासून रोखतात तर निर्देशांकतत्वे सकारात्मक आदेश आहे ते सरकारला विशिष्ट कार्य करण्याचे आदेश देतात.

२) मूलभूत अधिकारांना न्यायालयाचे संरक्षण आहे पण नीतीनिर्देशांकाना न्यायालयीन संरक्षण नाही. एखादया व्यक्तीने, संस्थेने अगर सरकारने व्यक्तीच्या मूलभूत अधिकारावर अतिक्रमण केले तर त्या अन्यायाविरुद्ध न्यायालयाकडे दाद मागण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. त्याकरिता घटनात्मक उपाय योजनेचा अधिकार व्यक्तीला मिळाला आहे. परंतू नीतीनिर्देशांक तत्त्वांना न्यायालयीन संरक्षण नाही याचा अर्थ असा की, सरकारने नीतीनिर्देशांक तत्त्वाचे पालन नाही केले तर त्या कृतीविरुद्ध सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागता येते.

३) मूलभूत अधिकार विशिष्ट परिस्थितीत मार्यादित, निलंबित अथवा स्थगित होऊ शकतात पण नीतीनिर्देशांक तत्त्वांना ही अटक लागू पडत नाही.

४) मूलभूत अधिकार आणि नीतीनिर्देशक तत्त्वे परस्परपुरक आहेत. कारण मूलभूत अधिकाराद्वारे व्यक्तिगत कल्याणाचा तर नीतीनिर्देशांक तत्त्वाद्वारे कल्याणकारी राज्याचा विचार केला जातो. म्हणून मूलभूत अधिकार आणि नीतीनिर्देशांक एकमेकापासून विभक्त करणे अशक्य आहे.

५) मूलभूत अधिकारांचे क्षेत्र मर्यादित आहे. नीतीनिर्देशांक तत्त्वे ही जास्त व्यापक स्वरुपाची आहेत. यामध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय, आंतरराष्ट्रीय समावेश होतो.

६) मूलभूत अधिकाराचा वस्तूविषय व्यक्ती आहे तर नीतीनिर्देशांकतत्त्वाचा विषय राज्य आहे. राज्याने कल्याणकारी राज्याचे स्वरुप प्राप्त करण्यासाठी कोणती कार्ये करावी याची माहिती नीतीनिर्देशांक तत्त्वे देतात.

## २.२.५ मूलभूत कर्तव्ये (Fundamental Duties) :

**प्रस्तावना :**

भारताच्या मूळ राज्यघटनेत कर्तव्याचा समावेश नव्हता. कर्तव्यपूर्ती शिवाय अधिकार प्राप्त होऊ शकत नाहीत. कर्तव्ये आणि अधिकार ही एकाच नाण्याची दोन बाजू आहेत. कर्तव्याशिवाय अधिकार म्हणजे अराजकता होय, आणि अधिकाराशिवाय कर्तव्ये म्हणजे गुलामगिरी होय नागरिकांना कर्तव्याची जाणीव नसल्यास लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. आपल्या देशात कर्तव्याचा स्वतंत्रपणे उल्लेख राज्यघटनेमध्ये केलेला नव्हता. अधिकाराच्या अनुषंगाने व्यक्तीला कर्तव्ये पार पाडावीच लागतात. चीन, पोलंड, झेकोस्लाव्हाकिया, रशिया अशा साम्यवादी देशांच्या राज्यघटनेत उल्लेख करण्यात आलेला आहे. याची प्रेरणा घेऊन भारतीय राज्यघटनेमध्ये याचा समावेश १९७६ साली ४२ वी घटना दुरुस्तीने करण्यात आला. नागरिकांनी कसे आचरण करावे, अधिकाराच्या पुर्ततेसाठी आपल्यावर काही जबाबदाऱ्या असतात याची स्पष्ट जाणीव करुन देण्याकरिता कर्तव्यांचा समावेश राज्यघटनेमध्ये करण्यात आला. ४२ व्या घटना दुरुस्तीने सांगितलेली मूलभूत कर्तव्ये ही कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नाहीत. भारतीय विकासासाठी नागरिकांच्यामध्ये एकता, एकात्मता आणि सहकार्याची भावना वाढीस लागावी यासाठी ही मूलभूत कर्तव्ये राज्यघटनेमध्ये सामविष्ठ करण्यात आलेली आहेत. या मूलभूत कर्तव्याची अंमलबजावणी भारतात ३ जानेवारी १९७७ पासून सुरु झाली.

**मूलभूत कर्तव्ये :**

भारताने एकेरी स्वरुपाचे नागरिकत्व स्वीकारले आहे. भारतीय नागरिकाला घटक राज्याचे नागरीकत्व नाही. बेचाळीसावी घटना दुरुस्ती १९७६ साली होऊन भारतीय राज्यघटनेत मूलभूत कर्तव्याचा समावेश करण्यात आला आहे. राज्यघटनेच्या प्रकरण ४ क मधील ५१ क या कलमांमध्ये पूर्वी दहा सध्या अकरा मूलभूत कर्तव्याचा समावेश करण्यात आलेला आहे. ती पुढीलप्रमाणे –

१) राज्यघटना, राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीत यांचा आदर राखणे.

२) राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यात ज्या उदात्त आदर्शामुळे प्रेरक ठरलेल्या आदर्शाची जोपासना आणि अनुकरण करणे.

३) भारताची सार्वभौमत्व, एकता व एकात्मता यांचा सन्मान करुन त्यांचे संरक्षण करणे.

४) देशाचे संरक्षण करणे आणि आवाहन केले जाताच त्याला प्रतिसाद देऊन राष्ट्राची सेवा करणे.

५) धार्मिक, भाषिक प्रादेशिक किंवा वर्गीय भेदाच्या पलीकडे जाऊन अखील भारतीय जनतेच्या ऐक्याची, बंधुत्वाची भावना वाढीस लावणे तसेच स्त्रीयांच्या प्रतिष्ठेला बाधा आणणाऱ्या प्रथा मोडून काढणे.

६) आपल्या देशाची एकात्म संस्कृती आणि गौरवशाली परंपरेचे रक्षण करणे.

७) जंगले, सरोवरे, नद्या, वन्यपशू या नैसर्गिक साधन संपत्तीचे संरक्षण आणि संवर्धन करुन सजीव प्राण्याबाबत भूतदया दाखविणे.

८) वैज्ञानिक दृष्टीकोन, मानवतावाद, ज्ञानार्जन आणि प्रगतीच्या भावनेचा विकास करणे.

९) सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे आणि हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.

१०) व्यक्तिगत आणि सामुदायिक उत्कर्षाकडे वाटचाल करणे जेणेकरुन राष्ट्राची प्रगती उत्तरोत्तर वाढेल असाच प्रयत्न करणे.

११) मातापित्याने किंवा पालकाने सहा ते चौदा वर्षादरम्यानचे आपले अपत्य किंवा यथास्थिती पाल्य याला शिक्षणाच्या संधी देणे.

**टिकात्मक मूल्यमापन :**

१) राज्यकारभार कसा चालवावा याची माहिति राज्यघटनेत स्पष्ट केली आहे. त्या करिताच वेळोवेळी कायदे तयार केले जातात. त्या कायदयामार्फतच नागरिकांच्या वर्तणुकीचे नियंत्रण होते. अशावेळी कर्तव्याचा घटनेत समावेश करुन राज्यघटनेचा आशय आणि स्वरुप याचे विषयी दुराग्रह निर्माण करणे योग्य नाही.

२) मूलभूत कर्तव्ये ही मोघम स्वरुपाची आहेत. त्याचा भंग झाला हे निश्चितपणे ठरविण्याचे मोजमाप उपलब्ध नाही. त्यामुळे शासन कर्त्याकडून त्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता असते. ज्या कर्तव्याची अंमलबजावणी करता येत नाही अशा मोघम, अस्पष्ट कर्तव्याचा घटनेत समावेश झाल्याने राज्यकर्त्यांना आपल्या विरोधकांचा छळ करण्यासाठी एक नवीन अस्त्र उपलब्ध करुन दिल्याची टीका करण्यात येते.

३) भारतीय राज्यघटनेत समाविष्ट केलेली मूलभूत कर्तव्याची यादी अपूर्ण वाटते कारण मतदानाचा हक्क बजाविणे, नागरिकांना सौनिकी शिक्षण देणे अशी आणखी काही कर्तव्ये समाविष्ट करणे आवश्यक वाटते.

४) मूलभूत कर्तव्याच्या यादीतील काही कर्तव्ये राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्वात सांगितलेली आहेत त्यामुळे पुन्हा त्या कर्तव्यांचा वेगळा उल्लेख करण्याची गरज नव्हती.

५) आणिबाणीच्या काळात मूलभूत अधिकार स्थगीत होतात पण मूलभूत कर्तव्ये स्थगीत होतात की नाही या बाबत स्पष्ट उल्लेख आढळत नाही. मूलभूत कर्तव्याचे पालन योग्य प्रकारे झालेले दिसत नाही. वास्तविक प्रत्येक नागरिकांने स्वत:च्या विकासाबरोबरच समाजाचा सर्वांगीण विकास साधला पाहिजे. समाजाच्या संरक्षणासाठी, संवर्धानासाठी मूलभूत कर्तव्यांचे पालन होणे आवश्यक आहे.

## २.३ सारांश :

१) भारतीय राज्यघटनेचे तात्विक अधिष्ठान या घटकात आपण – राज्यघटनेची उद्देशपत्रिका, मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्ये, मार्गदर्शक तत्वे, मार्गदर्शक तत्वाच्या मार्गातील अडथळे यांचा विचार केला.

२) उद्देशपत्रिकेत नागरिकांना हक्काची व स्वातंत्र्याची हमी घटनेने दिली असून, ही घटना लोकांनी स्वेच्छेने स्वीकारली आहे. या उद्देशपत्रिकेतून भारत हे कशाप्रकारचे लोकशाही राष्ट्र आहे, हे स्पष्ट होते.

३) 'मूलभूत हक्क' हे घटनेचे महत्वपूर्ण वैशिष्ट्ये आहे. घटनेने प्रत्येक नागरिकास – समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, पिळवणूकीविरुद्धचा हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, शैक्षणिक व सांस्कृतिक हक्क, घटनात्मक उपाययोजनेचा हक्क हे हक्क बहाल केले आहेत. या अधिकाराचे रक्षण करण्याची जबाबदारी न्यायालयाकडे सोपविली गेली आहे.

४) कोणती कर्तव्ये याची यादी घटनेत समाविष्ट केली आहे. त्यानुसार नागरिकांने आपले योगदान द्यावे अशी अपेक्षा दिसून येते.

५) लोकशाही व्यवस्था यशस्वीतेसाठी घटनेत राज्यव्यवस्थेला घटनाराकरांनी मार्गदर्शक तत्वे दिली आहेत. राजकीय, सामाजिक, आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी राज्याने त्यांची अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा घटनाकारांनी व्यक्त केली आहे.

घटनेत मूलभूत हक्कांना जे स्थान आहे तसेच स्थान मार्गदर्शक तत्त्वांना नाही त्यामुळे या तत्त्वांच्या अंमलबजावणीत त्रुटी दिसून येतात.

## २.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इत्यादी :

**१) बंदी प्रत्यक्षीकरण :** राज्यघटनेच्या तरतुदीनुसार कोणत्याही नागरिकास बेकायदेशीरपणे अटक करता येत नाही. अटक केल्यास नागरिकाला पोलिसांना न्यायालयासमोर सदेह उपस्थित करुन अटकेची कारणे स्पष्ट करावी लागतात.

**२) परमादेश :** राज्यघटनेच्या तरतुदीनुसार नागरिकांना अन्याय निवारण करण्यासाठी न्यायालयासमोर अर्ज करता येतो, या अधिकारास परमादेश असे म्हणतात.

**३) प्रतिषेध :** न्यायालयीन प्रक्रियेत एखादा निर्णय दिल्यास उच्च न्यायालयाकडे अर्ज करुन मनाई आदेश प्राप्त करता यतो. हा अधिकार प्रतिषेध किंवा मनाई हुकूम म्हणून ओळखला जातो.

**४) अधिकार पृच्छा :** घटनेतील तरतुदीनुसार नागरिकास सार्वजनिक किंवा सरकारी अधिकाराविरुद्ध किंवा पदाधिकाऱ्याविरुद्ध अर्ज करुन त्याच्यानियुक्तीस/अधिकारास आव्हान देता येते. हा अधिकार, अधिकार पृच्छा म्हणून ओळखला जातो.

५) **उत्प्रेषण :** राज्यघटनेनुसार नागरिकांना वरिष्ठ न्यायालयात खटला चालविण्यासाठी या तरतुदीनुसार अर्ज करता येतो, यास उत्प्रेषण असे संबोधले जाते.

## २.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

**पर्यायी उत्तर निवडा**

१) १९७६ साली ------ घटनादुरुस्ती होऊन भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात 'समाजवादी' व 'धर्मनिरपेक्ष' हे दोन शब्द नव्याने योजण्यात आले.

अ) २५ वी  ब) ४२ वी  क) ७३ वी  ड) ७४ वी

२) ---------- रोजी भारतीय राज्यघटनेला घटनासमितीने मंजूरी दिली.

अ) २६ नोव्हेंबर १९४९  ब) २६ जानेवारी १९५०

क) १५ ऑगस्ट १९४७  ड) यापैकी एकही नाही

३) भारतीय राज्यघटनेने राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे ------- या देशाच्या राज्यघटनेतून घेतलेली आहेत.

अ) इंग्लंड  ब) अमेरिका  क) आयर्लंड  ड) कॅनडा

४) भारतीय राज्यघटनेच्या ------ विभागात मूलभूत अधिकार स्पष्ट करण्यात आलेले आहेत.

अ) पहिल्या  ब) दुसऱ्या  क) तिसऱ्या  ड) सातव्या

५) -------- व्या कलमात भारतीय घटनेने नागरिकांना विविध प्रकारची स्वातंत्र्ये दिली आहेत.

अ) १४  ब) १९  क) ३२  ड) ३७

६) नागरिकांच्या मूलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी भारतीय राज्यघटनेच्या ----------- व्या कलमात तरतूद केलेली आहे.

अ) १७ व्या  ब) १९ व्या  क) ३२ व्या  ड) ३७ व्या

७) भारतीय राज्यघटनेच्या ------------ या कलमात अकरा मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

अ) ५१ अ  ब) ५१  क) ५१ क  ड) ५१ ड

८) भारतीय राज्यघटनेच्या ------------- विभागात राज्याच्या धोरणासंबधीची मार्गदर्शक तत्त्वे देण्यात आलेली आहेत.

अ) पहिल्या  ब) दुसऱ्या  क) चौथ्या  ड) बाराव्या

९) राज्यघटनेची उद्दिष्टे, ध्येये, सारांशरुपाने सांगणाऱ्या उद्देशपत्रिकेला ----------- या नावाने संबोधण्यात येते.

अ) सरनामा ब) जाहीरनामा क) हुकूमनामा ड) पंचनामा

१०) कायद्यासमोर सर्वांना समतेने वागविले जाईल असे घटनेच्या ------------- व्या कलमात म्हटले आहे.

अ) १३ ब) १४ क) १९ ड) ३२

११) भारतीय राज्यघटनेच्या १७ व्या कलमाच्या आधारे -------- साली अस्पृश्यता निवारणाचा कायदा करण्यात आला.

अ) १९४५ ब) १९५० क) १९५५ ड) १९६०

१२) प्रतिबंधक स्थानबद्धतेचा कायदा आणि मिसा, पोटा, टाडा, पोटे, मोका यामुळे भारतीय नागरिकांच्या ------------- मर्यादा पडलेली आहे.

अ) मालमत्तेवर ब) कर्तव्यावर क) स्वातंत्र्यावर ड) यापैकी एकही नाही

१३) पुरुष व स्त्रिया या दोघानांही समान कामासाठी समान वेतन दिले जावे हे ------------ स्वरुपाचे मार्गदर्शक तत्त्व आहे.

अ) राजकीय ब) सामाजिक क) आर्थिक ड) यापैकी एकही नाही

१४) १९७८ साली----------- व्या घटनादुरुस्तीनुसार मालमत्तेचा हक्क (संपतीचा हक्क) हा मूलभूत अधिकाराच्या यादीतून काढून टाकण्यात आलेला आहे.

अ) ४४ व्या ब) ७३ व्या क) ८० व्या ड) ८५ व्या

१५) राष्ट्रीय महत्त्वाची स्मारके, स्थाने वस्तू यांचे संरक्षण करणे हे मार्गदर्शक तत्त्व ----------- स्वरुपाचे आहे.

अ) आर्थिक ब) सामाजिक क) राजकीय ड) आंतरराष्ट्रीय संबधविषयक

१६) भारतीय राज्यघटनेच्या कलम २९ व ३० मध्ये ------- हा मूलभूत अधिकार दिलेला आहे.

अ) स्वातंत्र्याचा हक्क ब) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क

क) मालमत्तेचा हक्क ड) शैक्षणिक व सांस्कृतिक हक्क

१७) भारतीय राज्यघटनेच्या कलम २५ व कलम २६ मध्ये ---------- स्वातंत्र्याचा अधिकार नागरिकांना दिलेला आहे.

अ) मालमत्तेचा ब) राजकीय क) धार्मिक ड) शैक्षणिक

१८) नागरिकांच्या मूलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी घटनात्मक उपाय योजनेचा हा अधिकार भारतीय राज्यघटनेच्या---------- व्या कलमात तरतूद केली आहे.

अ) ३२ व्या ब) ३३ व्या क) ३४ व्या ड) ३५ व्या

**उत्तरे :** १ - ब, २ - अ, ३ - क, ४ - क, ५ - ब, ६ - क, ७ - क, ८ - क, ९ - अ, १० - ब, ११ - क, १२ - क, १३ - क, १४ - अ, १५ - ब १६ - ड, १७ - क, १८-अ.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) टीपा लिहा

१) राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे (नितिनिर्देशांक)

२) नागरिकांची कर्तव्ये

३) घटनात्मक उपाय योजनेचा अधिकार

४) स्वातंत्र्याचा अधिकार

५) समतेचा अधिकर

### ब) दीर्घोत्तरी प्रश्न

१) भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेवर भाष्य करा.

२) भारतीय राज्यघटनेतील मूलभूत कर्तव्ये सांगून त्याचे टीकात्मक मूल्यमापन करा.

३) भारतीय राज्यघटनेतील राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे (नीतिनिर्देशांक) स्पष्ट करा.

४) भारतीय राज्यघटनेतील समतेचा व स्वातंत्र्याचा अधिकार स्पष्ट करा.

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१) डॉ. अलका देशमुख, 'भारतीय शासन आणि राजकारण'- श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१०.

२) डॉ. जोशी प.ल., डॉ. देव, 'भारतीय शासन व प्रशासन' - विद्या प्रकाशन, नागपूर, १९९६.

३) डॉ. जोशी प.ल. 'भारतीय संविधान शासन व राजकारण' - विद्या प्रकाशन, नागपूर, १९७७.

४) घांगरेकर चिं. ग. 'भारतीय राज्यघटना स्वरुप आणि राजकारण' - श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९८५.

५) गोखले रामचंद्र महादेव 'भारतीय गणराज्यांचे शासन आणि राजकारण' (भाग पहिला) कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे-३०, १९७८.

६) शृंगारपुरे अरविंद 'भारतीय शासन आणि राजकारण', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९६.

७) भोळे भास्कर लक्ष्मण 'भारतीय गणराज्यांचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे अँन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, जून, २००३.

८) देशमुख बी.टी., 'भारतीय संविधान' पिंपळापुरे अँन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, जुलै, २०००.

❑❑❑

## सत्र २ : घटक ३

# भारताचे कायदे मंडळ व कार्यकारी मंडळ

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ भारताचे कायदेमंडळ
  - ३.२.१.१ लोकसभा
  - ३.२.१.२ राज्यसभा
- ३.२.२ भारताचे कार्यकारी मंडळ
  - ३.२.२.१ भारताचा राष्ट्रपती
  - ३.२.२.२ भारताचा पंतप्रधान
  - ३.२.२.३ केंद्रीय मंत्रीमंडळ

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

३.५ स्वंय-अध्ययन प्रश्न व उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## ३.० उद्दिष्टे :

प्रस्तुत घटकाच्या अभ्यासानंतर आपली पुढील उद्दिष्ट्ये साध्य होतील.

- कायदेमंडळाचा अर्थ समजून घेता येईल.
- भारतीय कायदेमंडळाची रचना, अधिकार व कार्याची माहिती होईल.
- कार्यकारी मंडळाचा अर्थ समजून घेता येईल.
- राष्ट्रपती, पंतप्रधान व मंत्रीमंडळ यांच्या अधिकार व कार्याची माहिती होईल.

## ३.१ प्रास्ताविक :

प्रस्तूत पेपरमध्ये पहिल्या व दुसऱ्या घटकात भारतीय राज्यघटना निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी, राज्यघटनेचे तत्त्वज्ञान, उद्देशपत्रिका, मूलभूत हक्क आणि मुलभूत कर्तव्याचा अभ्यास केलेला आहे. तिसऱ्या घटकात राज्यघटनेच्या चौकटीत राहून राज्यकारभार करणाऱ्या शासन संस्थेचा अभ्यास करणार आहोत. शासनसंस्था म्हणजे राज्यातील जनतेवर राज्य करणारी व नियंत्रण ठेवणारी संस्था होय. राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी व जनतेच्या कल्याणासाठी धोरण निश्चिती करून त्याची आंमलबजावणी करण्याचे कार्य शासनसंस्था करीत असते.

शासनसंस्थेत कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ व न्यायमंडळ यांचा समावेश होतो. त्यातील कायदेमंडळ व कार्यकारीमंडळ या दोन राजकीय संस्थाचा अभ्यास प्रस्तूत घटकात करणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ कायदेमंडळ (भारतीय संसद)

कायदेमंडळ हे शासन संस्थेचे प्रमुख अंग आहे. ज्याचे मुख्य कार्य कायदे तयार करण्याचे असते. जनतेच्या तक्रारींना वाचा फोडणे, राष्ट्रांतर्गत व आंतरराष्ट्रीय प्रश्नावर राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने चर्चा घडवून आणणे व शासकास त्याच्या कार्यात मदत करणे इत्यादी कार्य कायदेमंडळाला करावी लागतात. वेगवेगळ्या देशामध्ये कायदेमंडळास वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते. इंग्लंड व भारतामध्ये संसद, अमेरिकेमध्ये-कॉंग्रेस, जपानमध्ये डायट, स्वित्झर्लंडमध्ये-राष्ट्रीय सभा, रशियामध्ये-ड्यूमा, चीनमध्ये- राष्ट्रीय जनकॉंग्रेस, स्विडनमध्ये-रिक्सडँग असे म्हटले जाते.

भारतीय राज्यघटनेने संसदीय शासन पद्धतीचा स्विकार केला आहे. भारताच्या मध्यवर्ती कायदेमंडळास संसद असे संबोधले जाते. भारतीय संसदेची तरतुद राज्यघटनेच्या पाचव्या भागात दुसऱ्या प्रकरणामधील कलम ७९ ते १२२ मध्ये करण्यात आले आहे. भारताने द्विग्रहात्मक कायदेमंडळ पद्धतीचा स्विकार केलेला

आहे. त्यातील वरिष्ठ सभागृहास राज्यसभा व कनिष्ठ सभागृहास लोकसभा असे म्हणतात. संसदेत राज्यसभा व लोकसभा या दोन सभागृहाबरोबरच राष्ट्रपतींना महत्वाचे स्थान आहे. राष्ट्रपतींना संसदेचे तिसरे सदन म्हणून सुद्धा संबोधले जाते. राष्ट्रपती कोणत्याही सभागृहाचा सदस्य नसतो. तरीही तो संसदेचा अभिन्न अंग असतो. त्याच्या स्वाक्षरी शिवाय कायद्याची निर्मिती होऊ शकत नाही. म्हणूनच संविधान निर्मात्यांनी घटनेच्या कलम ७९ मध्ये असे नमुद केले आहे की ''भारतीय संघराज्यासाठी एक संसद असेल आणि ती राष्ट्रपती राज्यसभा व लोकसभा यांनी मिळून ती बनलेली असेल.''

**३.२.१.१ लोकसभा** (House of People)

लोकसभा हे भारतीय संसदेचे प्रथम व कनिष्ठ सभाग्रह होय. जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सभाग्रह म्हणून लोकसभा ओळखली जाते. गुप्त व प्रौढ मताधिकाराच्या पद्धतीने जनता लोकप्रतिनिधींची निवड करते. १८ वर्ष पूर्ण केलेला प्रत्येक भारतीय नागरिक मतदानाचा हक्क बजावण्यास पात्र असतो (६१ वी घटना दुरुस्ती कायदा १९८८ नुसार मतदानाचे वय २१ वरून १८ वर्ष करण्यात आले) प्रत्येक व्यक्तिस एकच मत देण्याचा अधिकार असतो. सर्वात जास्त मते मिळविणारा उमेदवार लोकप्रतिनिधी म्हणून निवडला जातो.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ८१ मध्ये लोकसभेच्या रचनेची तरतुद केलेली आहे. त्यानुसार लोकसभेची सदस्य संख्या जास्तीत जास्त ५५२ असु शकते. त्यातील ५३० सदस्य हे वेगवेगळ्या घटकराज्यातून जनतेद्वारे प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडले जातात. २० सदस्य केंद्रशासीत प्रदेशातून निवडले जातात. अँग्लो इंडियन जमातीच्या लोकांना लोकसभेत पुरेसे प्रतिनिधीत्व मिळाले नाही असे राष्ट्रपतींना वाटल्यास ते जास्तीत जास्त २ प्रतिनिधी नेमतात (५३०+२०+२=५५२) सध्या लोकसभेची सदस्य संख्या ५४५ आहे.

प्रत्येक घटकराज्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसभा प्रतिनिधींची संख्या ठरविली जाते. साधारणतः १० लाख लोकसंख्येला एक प्रतिनिधी या प्रमाणात लोकसभा मतदारसंघ बनविले जातात. लोकसभेचे सर्व मतदारसंघ एक सदस्यीय बनविण्यात आले आहे. सध्याची सदस्य संख्या १९७१ च्या जनगणनेवरून निर्धारित करण्यात आली आहे. २०२६ पर्यंत त्यात बदल केला जाणार नाही.

लोकसभेत अनुसूचीत जाती जमाती करिता प्रतिनिधीत्व मिळविण्यासाठी भारतीय राज्यघटनेत राखीव जागांची तरतुद करण्यात आली आहे. सध्या लोकसभेत अनुसुचीत जातीसाठी ८४ व अनुसुचीत जमातीसाठी ४७ जागा राखीव आहेत.

**उमेदवाराची पात्रता**

राज्यघटनेच्या कलम ८४ नुसार लोकसभा उमेदवाराची पात्रता पुढील प्रमाणे असावी लागते.

१) ती व्यक्ती भारताची नागरिक असावी.

२) त्या व्यक्तीने वयाची २५ वर्ष पुर्ण केलेली असावी.

३) संसदेने वेळोवेळी कायदा करून विहीत केलेल्या अटी त्या व्यक्तीने पूर्ण केलेल्या असाव्यात.

४) राखीव मतदारसंघातून निवडणूक लढविणारी व्यक्ती संबंधीत जाती, जमातीची सदस्य असावी.

५) त्या व्यक्तीचे नाव संसदीय मतदार संघाच्या यादीत मतदार म्हणून नोंदविलेले असले पाहिजे.

६) ती व्यक्ती सरकारी नोकर, परकीय, दिवाळखोर, भ्रष्टाचारी नसावी.

**लोकसभेचा कार्यकाल**

लोकसभेचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो. पंतप्रधानाच्या सल्ल्याने राष्ट्रपती लोकसभा मुदतपूर्व बरखास्त करू शकतात. आजपर्यंत १९७०, १९७७, १९७९, १९९०, १९९७, १९९९ आणि २००४ मध्ये मुदतपूर्व लोकसभा बरखास्त करण्यात आली होती. संसदेने कायदा केल्यास लोकसभेचा कार्यकाल १ वर्षासाठी वाढवता येतो. १९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्तीने लोकसभेची मुदत ६ वर्ष करण्यात आली होती. नंतर १९७८ मध्ये ४४ वी घटनादुरुस्ती करून लोकसभेचा कार्यकाल पूर्ववत ५ वर्षे करण्यात आला.

लोकसभेचा सदस्य मुदतपूर्व आपल्या पदाचा राजीनामा सभापतीकडे देऊ शकतो. एखादा सदस्य सलग ६० दिवस लोकसभेच्या बैठकिस अनुपस्थित असल्यास त्याचे सदस्यत्व रद्द होते. एका वेळी एकाच सभाग्रहाचे सदस्य राहता येते.

**गणसंख्या**

लोकसभेचे कामकाज सुरू करण्यासाठी एकूण सदस्यांच्या $^{१}/_{१०}$ सदस्य सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**सदस्यांचे वेतन व भत्ते**

राज्यघटनेच्या कलम १०६ नुसार संसद सदस्यांचे वेतन व भत्ते ठरविण्याचा अधिकार संसदेला आहे. घटनेत सदस्यांसाठी पेन्शनची तरतुद नाही. परंतु संसदीय कायद्याद्वारे ती करण्यात आली आहे त्यासाठी ''संसद सदस्यांचे पगार, भत्ते व पेन्शन कायदा १९५४'' हा कायदा संमत केला आहे. २०१० मध्ये त्यात सुधारणा करून संसद सदस्याच्या वेतन भत्यात वाढ करण्यात आली आहे.

**विरोधी पक्ष नेता**

१९७७ पासून लोकसभेत विरोधी पक्ष नेता हे पद आस्तित्वात आले. त्यास कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा देण्यात आले आहे.

**लोकसभेचे पदाधिकारी**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ९३ ते ९७ मध्ये लोकसभा सभापती व उपसभापाती यांची तरतुद करण्यात आलेली आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडूकीच्या पहिल्या अधिवेशनात सदस्य आपल्यामधून एकाची सभापती व एकाची उपसभापती म्हणून निवड करतात. लोकसभेच्या कार्यकाला एवढाच

पदाधिकाऱ्यांचा कार्यकाल असतो. ते मुदतपूर्व आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात. सभापती आपल्या पदाचा राजीनामा लेखी स्वरूपात उपसभापतीकडे देतात तर उपसभापती आपला राजीनामा सभापतीकडे देतात. किंवा त्यांच्या विरूद्ध अविश्वासाचा ठराव संम्मत करून त्यांना पदावरून दूर करता येते.

लोकसभेच्या कामकाजाचे व्यवस्थापन व नियंत्रण करण्याची जबाबदारी सभापतींची असते. त्यांच्या अनुपस्थित उपसभापती त्यांचे कामकाज पाहतात.

**वेतन व भत्ते**

संसद वेळोवेळी कायदे करून सभापती व उपसभापती यांचे वेतन व भत्ते निश्चित करीत असते.

**लोकसभा सभापतीचे अधिकार आणि कार्य**

लोकसभा सभापतीचे पद हे अतिशय सन्मानाचे व जबाबदारीचे समजण्यात येते. लोकसभेचे पहिले सभापती श्री. जी. व्ही. मावळंकर होते. सभाग्रहाचे कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी सभापतीला पुढील अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

१) सभापती लोकसभेच्या बैठकाचे अध्यक्षस्थान भूषवितात. गणपूर्तीच्या अभावी कामकाज स्थगित करू शकतात.

२) सभागृहात चर्चील्या जाणाऱ्या विषयाची रुपरेषा ठरविणे, त्याची वेळ निश्चित करणे, व चर्चा घडवून आणणे.

३) सभागृहात शांतता, सुव्यवस्था व शिस्त राखण्याची जबाबदारी सभापतीची असते.

४) सभागृहाच्या नियमांचे पालन न करणाऱ्या सदस्यास शिक्षा करण्याचा अधिकार सभापतीस आहे.

५) एखाद्या विधेयकावर किंवा प्रस्तावावर समसमान मते पडल्यास निर्णायक मत देण्याचा अधिकार सभापतीस आहे.

६) सभापती लोकसभा सदस्यांच्या विशेषाधिकारांचे संरक्षक म्हणून कार्य करतात.

७) लोकसभेच्या वेगवेगळ्या समित्यांची स्थापना करणे, व त्यांच्या अध्यक्षांची नियुक्ती करणे.

८) संसदेच्या संयुक्त बैठकिचे अध्यक्षस्थान भूषविण्याचा अधिकार लोकसभा सभापतीस असतो.

९) एखादे विधेयक अर्थविधेयक आहे किंवा नाही ते ठरविण्याचा अधिकार सभापतीस असतो.

१०) लोकसभा सदस्यांचे राजीनामे स्विकारणे अथवा नाकारणे याचा अधिकार सभापतीस आहे.

११) सर्व पक्षातील लोकांना चर्चेची समान संधी देणे.

१२) सभागृहाचे कामकाज चालविण्यास आडथळा निर्माण होत असल्यास कामकाज तहकूब करण्याचा अधिकार सभापतीस आहे.

अशाप्रकारे सभागृहात होणारी चर्चा व त्यावर खर्च होणारा वेळ आणि पैसा हा जनहीत, राष्ट्रहिताला धरून झाला पाहिजे याची दक्षता सभापतींना घ्यावी लागते. सभापती पद हे अतिशय महत्वाचे व लोकसभेची प्रतिष्ठा वाढविणारी आहे.

सभापती पदाचे महत्व स्पष्ट करीत असताना पं. जवाहरलाल नेहरूं नी म्हटले आहे की, ''सभापती संपूर्ण सभागृहाचे प्रतिनिधित्व करीत असतो. सभागृहाची प्रतिष्ठा, स्वातंत्र्य'' यांचे सभापती बलराम जाखर यांनी आपल्या ''जनता-लोकसभेचे प्रशासन'' या पुस्तकात सभापती पदाविषयी मत व्यक्त केले त्यांच्या मते ''सभापती एकच भाषा जाणतो, ती म्हणजेच सभागृहाची भाषा होय'' यावरून सभासदाचे महत्व जबाबदारी व त्याचा निपक्षपातीपणा दिसून येते.

**लोकसभेचे सचिवालय**

लोकसभेचे एक सचिवालय असते त्यामध्ये एक मुख्य सचिव व इतर कर्मचारी असतात. जे लोकसभा सभापती, उपसभापती व लोकसभा सदस्यांना त्याच्या कामकाजात माहीती पुरवितात.

**संसदेचे अधिवेशन**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ८५ नुसार राष्ट्रपतीला संसदेचे अधिवेशन बोलावण्याचा अधिकार आहे. एका वर्षात किमान दोन वेळा अधिवेधन भरविले जाते. राष्ट्रपतीला वाटल्यास तो केंव्हाही लोकसभेचे अधिवेशन बोलावू शकतो.

**लोकसभेचे अधिकार आणि कार्ये**

**१) कायदेविषयक अधिकार**

केंद्र व घटकराज्य सरकार यांच्यामध्ये अधिकाराची विभागणी केलेली आहे. त्यानुसार केंद्रसूची मधील ९९ विषय व समवर्ती सूचीतील ५२ विषयांविषयी कायदा करण्याचा अधिकार लोकसभेस आहे. घटक राज्यांनी विनंती केल्यास किंवा राष्ट्रपती राजवट लागू असल्यास राज्यसूचीतील विषयावर सुद्धा कायदा करण्याचा अधिकार लोकसभेस प्राप्त होतो. नवीन कायदे तयार करणे, जुन्या कायद्यात दुरुस्ती करणे व कालबाह्य कायदे रद्द करणे इत्यादी अधिकार लोकसभेस आहेत. साधारणतः विधेयके प्रथम मंजुरीसाठी पाठविले जाते. दोन्ही सभागृहात एखाद्या विधेयकासंबंधी त्यामध्ये बहुमताने निर्णय घेतला जातो. शेवटी राष्ट्रपतींची स्वाक्षरी होऊन, विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते.

**२) कार्यकारी अधिकार**

भारतात संसदीय शासन पद्धती स्विकारल्यामुळे संपूर्ण मंत्रीमंडळ सामुहिकरित्या लोकसभेस जबाबदार राहून कार्य करित असते. मंत्रीमंडळाविरूद्ध लोकसभेने अविश्वास दर्शविल्यास मंत्रीमंडळास राजीनामा दूयावा लागतो. सभागृहात मंत्र्यांना त्यांच्या खात्यांतर्गत कामा विषयी प्रश्न विचारले जातात, त्याची संबंधित

मंत्र्याना उत्तरे द्यावी लागतात. सभागृहात शासनाच्या चुकीच्या धोरणावर टिका केली जाते. लोकसभा वेगवेगळ्या समित्या स्थापन करून सरकारच्या कार्यावर नियत्रंण ठेवीत असते.

**३) आर्थिक अधिकार**

वार्षिक अंदाजपत्रक व वेगवेगळी अर्थविधेयके यांना मंजुरी देण्याचे कार्य संसद करीत असते. संसदेच्या मंजुरीशिवाय सरकार कोणतही नवीन कर लावू शकत नाही किंवा कमी करू शकत नाही. आर्थिक बाबतीत लोकसभेस महत्वाचे अधिकार प्राप्त आहेत. एखादे विधेयक अर्थविधेयक आहे किंवा नाही ते ठरविण्याचा अधिकार लोकसभा सभापतींना आहे. अर्थविधेयक प्रथम लोकसभेतच मांडले जाते.

लोकसभेत अर्थविधेयक मंजूर झाल्यानंतर राज्यसभेकडे मंजुरीसाठी पाठविले जाते. राज्यसभेस ते विधेयक १४ दिवसाच्या आत मंजूर किंवा नामंजूर करून पाठवावे लागते १४ दिवसापर्यत राज्यसभेने काहीही कळवले नाही तर विधेयक राज्यसभेस मंजूर आहे असे समजले जाते. अर्थविधेयकाबाबत दोन्ही सभागृहात सहमती न झाल्यास संयुक्त बैठक बोलावली जात नाही.

**४) घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार**

घटनेच्या कलम ३६८ नुसार घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार संसदेच्या दोन्ही सभागृहांना समान दिलेला आहे. घटनादुरुस्ती विधेयक दोन्हीपैकी कोणत्याही सभाग्रहात प्रथम मांडता येते. घटनेतील काही कलमात, तत्वात, दुरस्ती करायची असेल तर संसदेच्या दोन्ही सभागृहाचे साधे बहुमत आवश्यक आहे. साधे बहुमत, विशेष बहुमत व विशेष बहुमत त्याचबरोबर ५०% घटक राज्याच्या विधीमंडळाची मान्यता घेऊन या तीन पद्धतीने घटनादुरूस्ती करता येते.

**५) निर्वाचन विषयक अधिकार**

राष्ट्रपती व उपराष्ट्रपतींच्या निवडणूकीत मतदान करण्याचा अधिकार लोकसभा व राज्यसभा सदस्यांना (निर्वाचित) आहे.

**६) महाभियोगाचा अधिकार**

राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, उच्च व सर्वोच्च, न्यायालयाचे न्यायधीश, निवडणूक आयुक्त, नियंत्रक व महालेखापरिक्षक अशा वरिष्ठ पदावरील व्यक्तींनी त्यांच्या पदाचा दुरुपयोग केल्यास महाभियोग प्रस्तावाद्वारे संसद $^{२}/_{३}$ बहुमताने त्यांना पदावरून दूर करू शकते.

**७) वटहुकूमांना मंजुरी देणे**

संसदेचे अधिवेशन चालू नसताना एखाद्या कायद्याची आवश्यकता असल्यास राष्ट्रपती वटहुकूम काढू शकतात. संसदेचे अधिवेशन सुरू झाल्यानंतर त्या वटहुकूमास लोकसभा व राज्यसभेची सम्मती घ्यावी लागते.

**८) घटकराज्यासंबंधी अधिकार**

एखाद्या घटकराज्यातील विधानसभेच्या शिफारशीवरून त्या राज्यासाठी विधानपरिषदेची निर्मिती करणे. किंवा आस्तित्वात असलेली विधानपरिषद बरखास्त करणे, नवीन घटक राज्याची निर्मिती करणे, घटक राज्याची नावे व सीमा यात बदल करणे हे अधिकार लोकसभा व राज्यसभेस आहेत.

अशा प्रकारे लोकसभेस अत्यंत महत्वाचे अधिकार आहेत. लोकसभा हे जनतेच्या प्रतिनिधीचे सभागृह असल्यामुळे जनतेच्या इच्छा आकांक्षा, लक्षात घेवून कायदेनिर्मितीचे कार्य ती करीत असते.

**३.२.१.२ राज्यसभा** (Council of States)

राज्यसभेस भारतीय संसदेचे वरिष्ठ किंवा द्वितीय सभागृह असे संबोधले जाते. संघराज्यातील घटक राज्यांचे प्रतिनिधीत्व करणारे हे सभागृह आहे. परंतु राज्यसभेत अमेरिकेतील वरिष्ठ सभागृह सिनेट प्रमाणे सर्व घटक राज्यांना समान प्रतिनिधित्व दिले जात नाही. म्हणून राज्यसभेतील प्रत्येक घटक राज्याची सदस्य संख्या, कमी जास्त असलेली दिसते. कारण राज्यसभा सदस्य संख्या घटक राज्यांच्या लोकसंस्थेच्या प्रमाणात ठरविली जाते.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ७९ ते ९२ मध्ये राज्यसभेची रचना व स्वरूप याविषयी तरतुद केलेली आहे. घटनेच्या कलम ८० नुसार राज्यसभेची सदस्य संख्या जास्तीत जास्त २५० इतकी निश्चित केलेली आहे. त्यातील २३८ सदस्य घटक राज्यातून निवडले जातात व इतर १२ सदस्य राष्ट्रपती कला, साहित्य, विज्ञान, समाजसेवा, क्रिडा इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीतून नियुक्त करतात. सध्या राज्यसभेत २४५ सदस्य आहेत.

राज्यसभा हे घटकराज्याचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह असल्यामुळे राज्यसभामध्ये घटकराज्यातून पाठविण्यात येणाऱ्या प्रतिनिधींची निवड त्या त्या घटकराज्याच्या विधानसभेच्या निर्वाचित सदस्यांकडून केली जाते. ही निवडणूक अप्रत्यक्षपणे खुल्या मतदान पद्धतीने व एकलसंक्रमणीय मतदान पद्धतीने होते. त्यामुळे वेगवेगळ्या राजकीय पक्षांना त्यांच्या विधानसभेतील सदस्य संख्येच्या प्रमाणात आपले प्रतिनिधी राज्यसभेत पाठवण्याची संधी मिळते.

**उमेदवाराची पात्रता :**

घटनेच्या कलम ८४ नुसार राज्यसभा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी उमेदवाराकडे पुढील पात्रता असावी लागते.

१) उमेदवार भारताचा नागरिक असावा.

२) उमेदवाराचे वय ३० वर्षे पूर्ण असावे.

३) संसदेने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटींची त्याने पुर्तता केली पाहिजे.

४) ज्या घटकराज्यातून उमेदवार निवडणूक लढविणार आहे त्याघटकराज्याच्या मतदार संघात तिचे नाव असले पाहिजे.

५) संबंधीत उमेदवार शासकीय नोकर, वेडा, दिवाळखोर, गुन्हेगार, भ्रष्टाचारी नसावा.

**राज्यसभेचा कार्यकाल :**

राज्यसभा हे स्थायी सभागृह असल्यामुळे त्याचे विसर्जन केले जात नाही. दर दोन वर्षांनी राज्यसभेचे $^{१}/_{३}$ सदस्य निवृत्त होतात व त्या जागेवर तेवढेच सदस्य नव्याने निवडले जातात. राज्यसभा सदस्यांचा कार्यकाल ६ वर्षे आहे. लोकसभा विसर्जित असताना कायदेविषयक सल्ला देण्यासाठी व सरकारच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यसभा महत्वाची भूमिका बजावत असते.

**गणसंख्या :**

राज्यसभेचे कामकाज सुरू करण्यासाठी एकूण सदस्य संख्येच्या $^{१}/_{१०}$ सदस्य सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**राज्यसभेचे पदाधिकारी :**

राज्यसभेचे कामकाज पाहण्यासाठी घटनेत सभापती व उपसभापती यांची तरतूद आहे. घटनेच्या कलम ८९ नुसार भारताचा उपराष्ट्रपती हा राज्यसभेचा पदसिद्ध सभापती असतो. सभापतींच्या गैरहजेरीत सभागृहाचे कामकाज पाहण्यासाठी राज्यसभा सदस्य आपल्यातूनच एकाचा उपसभापती म्हणून निवड करतात. राज्यसभेचा सभापती हा राज्यसभेचा सदस्य नसतो. त्याचा कार्यकाळ ५ वर्षांचा असतो.

राज्यसभा सदस्याला पदावरून काढण्याचा अधिकार राज्यसभेला नाही. पण उपराष्ट्रपती या नात्याने घटनाविरोधी वर्तन केल्यास संसदेत अविश्वास ठराव पास करून त्यास पदावरून दूर करता येते. उपसभापतीला काढण्याचा अधिकार राज्यसभेस आहे. उपसभापती घटनाविरोधी वर्तन केल्यास राज्यसभा बहुमताने त्यास पदावरून दूर करू शकते.

**वेतन व भत्ते :**

संसद वेळोवेळी कायदा करून राज्यसभा सभापती व उपसभापती यांचे वेतन भत्ते निश्चित करीत असते. त्यांचे वेतन भारताच्या संचित निधीमधून दिले जाते.

**सभापतींचे अधिकार व कार्य :**

राज्यसभेचे कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी सभापतीला पुढील अधिकार प्राप्त आहेत.

(१) सभागृहाच्या बैठकांचे अध्यक्षस्थान भूषविणे. (२) सभागृहातील सदस्यांवर नियंत्रण ठेवणे. (३) सभागृहातील चर्चेचे विषय ठरविणे. (४) सभागृहात होणाऱ्या चर्चेस परवानगी देणे. (५) स्थगन प्रस्ताव मान्य वा अमान्य करणे. (६) सभागृहातील नियम व शिस्तीचे पालन न करणाऱ्या सदस्यावर कारवाई

करणे.  (७) सभागृहात मांडण्यात येणाऱ्या ठराव व विधेयकावर चर्चा च मतदान घेणे. (८) एखाद्या ठराव व विधेयकावर समसमान मते पडल्यास निर्णायक मत देणे. (९) सदस्यांच्या विशेषाधिकारांचे रक्षण करणे.

**राज्यसभा सचिवालय**

राज्यसभेचे एक सचिवालय असते. त्यामध्ये एक मुख्य सचिव व त्याच्या मदतीला इतर सचिव व अनेक कर्मचारी असतात. त्यांची नेमणूक व सेवाशर्ती राज्यसभाच ठरविते.

**राज्यसभेचे अधिकार आणि कार्य –**

**१) कायदेविषयक अधिकार :**

अर्थविधेयक सोडून इतर विधेयक राज्यसभेत प्रथम मांडता येतात. कायदेनिर्मितीमध्ये राज्यसभेला लोकसभेप्रमाणेच अधिकार आहेत. राज्यसभेच्या संम्मतीशिवाय विधेयकाचे कायद्यात रूपांतर होत नाही. नवीन कायदे करणे, जुन्या कायद्यात दुरुस्ती करणे व कालबाह्य कायदे रद्द करणे, असे कार्य राज्यसभा करीत असते. लोकसभेप्रमाणेच राज्यसभेत चर्चा होऊन बहुमताने विधेयक मंजूर किंवा नामंजूर केले जाते. विधेयकाबाबतीत दोन्ही सभागहात मतभेद निर्माण झाल्यास राष्ट्रपती संयुक्त बैठक बोलावतात व त्यामध्ये बहुमताने निर्णय घेतले जात. साधारणतः लोकसभेची सदस्य संख्या जास्त असल्यामुळे निर्णय लोकसभेप्रमाणेच होतो.

**२) कार्यकारी अधिकार :**

केंद्रीय मंत्रीमंडळ हे घटनेतील तरतुदीप्रमाणे लोकसभेला जबाबदार राहून कार्य करते. लोकसभा मंत्रीमंडळाविरुद्ध अविश्वास प्रस्ताव सम्मत करून मंत्रीमंडळ बरखास्त करू शकते. परंतु राज्यसभासुद्धा वेगवेगळ्या मार्गांनी मंत्रीमंडळाच्या कार्यावर नियंत्रण ठेवित असते. प्रश्न उपप्रश्न विचारणे, कामरोको प्रस्ताव, स्थगन प्रस्ताव, निंदाव्यंजक प्रस्ताव, इत्यादी संसदीय आयुधांच्या माध्यमातून राज्यसभा मंत्रीमंडळाच्या कार्यावर नियंत्रण ठेवीत असते.

त्याचप्रमाणे संसदीय समित्यामध्ये लोकसभा सदस्यांबरोबरच राज्यसभेचे सदस्य असतात. या संसदीय समित्यांच्या माध्यमातून सुद्धा राज्यसभा सरकारच्या कार्यावर नियंत्रण ठेवत असते.

**३) आर्थिक अधिकार**

आर्थिक क्षेत्रात राज्यसभेला अत्यंत नाममात्र अधिकार आहेत. कोणत्याही अर्थविधेयकाची सुरूवात लोकसभेत होते. लोकसभेत अर्थविधेयक मंजुर झाल्यानंतर राज्यसभेकडे मंजुरीसाठी पाठविले जाते. १४ दिवसाच्या आत राज्यसभा ते विधेयक मंजूर, नामंजूर, किंवा शिफारशी व दुरुस्त्यासह परत पाठवते. त्या दुरुस्त्या मान्य करणे लोकसभेला बंधनकारक नसते. १४ दिवसापर्यंत ते विधेयक राज्यसभेने परत पाठविले नाही तर लोकसभेने ज्या स्वरूपात मंजुर केले आहे. त्या स्वरुपात दोन्ही सभागृहांना ते विधेयक मान्य आहे असे समजण्यात येते व राष्ट्रपतीच्या संम्मतीसाठी पाठविले जाते.

**४) घटनादुरुस्तीचा अधिकार**

घटनेच्या कलम ३६८ नुसार संसदेस घटनादुरुस्तीचा अधिकार प्राप्त आहे. घटनादुरुस्ती विधेयक राज्यसभेत सुद्धा प्रथम मांडता येते. राज्यसभेच्या मंजुरीशिवाय घटनादुरुस्ती होऊ शकत नाही.

**५) निर्वाचनविषयक विषयक अधिकार**

राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार लोकसभेप्रमाणेच राज्यसभा सदस्यांना आहे.

**६) महाभियोगाचा अधिकार**

राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, उच्च व सर्वोच्य न्यायालयाचे न्यायाधीश निवडणूक आयुक्त, नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी घटना विरोधी वर्तन केल्यास त्यांना पदच्युत करण्याचा अधिकार लोकसभेबरोबर राज्यसभेस आहे.

**७) वटहुकूमास मंजुरी देणे**

संसदेचे अधिवेशन चालू नसताना एखाद्या कायद्याची आवश्यकता असल्यास राष्ट्रपती वटहुकूम काढतात. त्या वटहुकूमास कायद्याएवढाच दर्जा असतो. परंतु अधिवेशन सुरू झाल्यानंतर लोकसभा व राज्यसभेची मंजुरी घ्यावी लागते. वटहुकूमास सहा महिन्याच्या आत संसदेची मंजुरी घ्यावी लागते अन्यथा सदरचा वटहुकूम रद्द होतो.

**८) अखिल भारतीय सेवांची निर्मिती**

केंद्र व राज्यशासनात सनदी सेवक असावेत असे भारतीय राज्यघटनेत तरतूद केलेली आहे. राज्यघटनेच्या ३१२ व्या कलमानुसार राज्यसभा दोन तृतीयांश बहुमताने ठराव संम्मत करून अखिल भारतीय सेवा निर्माण करण्याची शिफारस करू शकते.

**९) आणीबाणीस मंजुरी देणे**

देशात युद्ध, बाह्य आक्रमण, वा अंतर्गत अशांततेने देशाला धोका निर्माण होणे, घटकराज्यात घटनात्मक पेचप्रसंग उद्भवणे किंवा देशात आर्थिक अस्थिरता निर्माण होणे. अशावेळी राष्ट्रपती घटनेतील कलम ३५२, ३५६, ३६० नुसार आणीबाणी घोषित करतात. त्या आणीबाणीस नंतर राज्यसभा व लोकसभेची संम्मती घ्यावी लागते.

अशाप्रकारे राज्यसभेस लोकसभेप्रमाणेच महत्वपूर्ण अधिकार आहेत. अर्थविधेयक सोडून इतर सर्व विधेयकाच्या बाबतीत राज्यसभेची सम्मती आवश्यक असते. जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी, त्यांच्या कल्याणासाठी कायदेनिर्मितीचे कार्य संसदेचे दोन्ही सभागृह राज्यसभा व लोकसभा करतात.

**स्वयं अध्ययन प्रश्न–१**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) भारतीय कायदेमंडळास ........ म्हणून संबोधले जाते.

२) .......... दोन सदस्यांची नियुक्ती राष्ट्रपती लोकसभेत करतात.

३) राज्यसभेत ........ सदस्य राष्ट्रपतीमार्फत नामनिर्देशित केले जातात.

४) ......... हा राज्यसभेचा पदसिद्ध सभापती असतो.

५) अर्थविधेयक हे प्रथम ......... या सभागृहात मांडले जाते.

### ३.२.२ भारताचे कार्यकारीमंडळ

भारतीय राजघटनेच्या पाचव्या भागातील पहिल्या प्रकरणातील कलम ५२ ते ७८ मध्ये केंद्रीय कार्यकारी मंडळाची तरतुद केली आहे. केंद्रीय पातळीवर प्रत्यक्षपणे ध्येयधोरणे ठरविणे व कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या त्यावर देखरेख ठेवणाऱ्या यंत्रणेला कार्यकारी मंडळ असे म्हणतात. केंद्रीय कायदेमंडळात राष्ट्रपती, पंतप्रधान व त्याचे मंत्रीमंडळ यांचा समावेश होतो.

भारतीय राज्यघटनेने संसदीय शासनपद्धतीचा स्विकार केलेला आहे. त्यानुसार भारताचा राष्ट्रपती हा नामधारी सत्ता प्रमुख असून पंतप्रधान व त्याचे मंत्रीमंडळ वास्तववादी सत्ताप्रमुख आहेत. भारताचा संपूर्ण राज्यकारभार राष्ट्रपतीच्या नावाने चालतो. परंतु प्रत्यक्षात त्यांच्या अधिकारांचा वापर पंतप्रधान व मंत्रीमंडळाद्वारे केला जाते.

### ३.२.२.१ भारताचा राष्ट्रपती

संसदीय शासन पद्धतीप्रमाणे राष्ट्रपती हा भारतीय कार्यकारी मंडळाचा घटनात्मक प्रमुख आहे. तो देशाचा प्रथम नागरिक आहे. देशाचा संपूर्ण कारभार त्याच्या नावाने चालतो. भारतीय राज्यघटनेच्या भाग ५ मध्ये कलम ५२ ते ६२ मध्ये राष्ट्रपती पदासंबंधीची तरतूद करण्यात आली आहे. घटनेच्या ५२ व्या कलमात भारतासाठी एक राष्ट्रपती असेल असे म्हटले आहे. घटनेच्या कलम ५३ नुसार राष्ट्रपती कार्यकारी प्रमुख असून तो राज्यघटनेनुसार सत्ता वापरील. अशा सत्तेचा वापर तो पंतप्रधान आणि त्याच्या मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानुसार करेल.

भारतात इंग्लंडप्रमाणे संसदीय शासन पद्धती स्विकारली असली तरी भारताचा राष्ट्रपती इंग्लंडच्या राजपदाप्रमाणे नाही कारण इंग्लंडच्या राजाप्रमाणे भारताचा राष्ट्रपती वंशपरंपरेने सत्तेवर येत नाही. तर राष्ट्रपतीची निवड जनतेकडून अप्रत्यक्षपद्धतीने होते. तसेच आणीबाणीच्याकाळात राष्ट्रपतीला विशेष अधिकार प्राप्त होतात.

**राष्ट्रपतीपदासाठी पात्रता**

भारतीय राज्यघटनेच्या ५८ व्या कलमानुसार राष्ट्रपती पदाच्या उमेदवारास पुढील पात्रता पूर्ण कराव्या लागतात.

१) ती व्यक्ती भारताची नागरिक असावी.

२) त्या व्यक्तीने वयाची ३५ वर्ष पूर्ण केलेली असावीत.

३) ती व्यक्ती लोकसभेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असावी.

४) ती व्यक्ती केंद्रीय किंवा राज्यविधिमंडळाचा सदस्य नसावी. जर असेल तर राष्ट्रपतीपदाची शपथ घेण्यापूर्वी त्या पदाचा राजीनामा द्यावा लागतो.

५) त्याने केंद्र किंवा घटकराज्यातील सरकारमध्ये कोणतेही लाभाचे पद धारण केलेले नसावे.

**सूचक व अनुमोदक**

राष्ट्रपतीची निवडणुक लढविणाऱ्या उमेदवाराचे नाव निर्वाचन मंडळाच्या कमीत कमी ५० सदस्यांनी सुचविले पाहिजे व ५० सदस्यांनी अनुमोदन दिले पाहिजे. तरच उमेदवार निवडणुकीस पात्र ठरतो.

**अनामत रक्कम**

राष्ट्रपतीपदाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास १५०००/- रु अनामत रक्कम म्हणून भरावी लागते.निवडून येण्यासाठी आवश्यक असणाऱ्या एकूण मतांच्या $^{१}/_{६}$ मते प्राप्त झाले नाही तर अनामत रक्कम जप्त होते.

**निवडणूक प्रक्रिया**

राष्ट्रपतीची निवडणूक अप्रत्यक्ष मतदान पद्धतीने होते. घटनेतील कलम ५४ नुसार राष्ट्रपतीची निवडणूक एका निर्वाचक मंडळाकडून होते. त्या निर्वाचक मंडळामध्ये संसदेच्या दोन्ही सभाग्रहाचे निवडून आलेले सदस्य आणि राज्याच्या विधानसभेतील निवडून आलेले सदस्य यांचा समावेश होतो.

निर्वाचक मंडळाच्या सर्व सभासदांच्या मताचे मूल्य सारखे नसते. घटक राज्यांची लोकसंख्या भिन्न असल्यामुळे त्यांच्या विधानसभेतील सदस्यांना समान मताचा अधिकार देणे योग्य ठरणार नाही. म्हणून लोकसंख्येच्या प्रमाणात मतांचे मूल्य ठरविण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. विधानसभेच्या प्रत्येक सदस्याच्या मताचे मूल्य खालील सुत्रानुसार काढले जाते.

$$\frac{\text{संबंधीत घटकराज्याची लोकसंख्या}}{\text{विधानसभेतील निर्वाचित सदस्याची संख्या}} \times \frac{१}{१०००} = \text{विधानसभेतील प्रत्येक निर्वाचित सदस्याच्या मताचे मूल्य}$$

संसद सदस्यांच्या मताचे मूल्य खालील सुत्रानुसार काढले जाते.

$$\frac{\text{सर्व घटकराज्यांच्या विधानसभेतील सदस्यांची एकूण मते}}{\text{संसदेतील सदस्यांची एकूण संख्या}} = \text{संसदेतील खासदाराच्या मताचे मूल्य}$$

निर्वाचक मंडळातील मतदारांच्या मताचे मूल्य ठरविल्यानंतर मतदानाच्या दिवशी मतदार राष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी मतदान करतात. राष्ट्रपतीची निवडणुक गुप्त मतदान व प्रमाणशीर प्रतिनिधीत्व पद्धतीने आणि एकल संक्रमणीय मतदान तत्वानुसार होते. मतदार आपल्या पसंतीप्रमाणे जेवढे उमेदवार असतात तेवढ्या उमेदवाराच्या नावापूढे १.२.३ असे पसंतीक्रम टाकतो. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत निवडून येण्यासाठी पहिल्या पसंतीची आवश्यक संख्येएवढी मते मिळवावी लागतात.

**निर्वाचन कोटा**

राष्ट्रपती म्हणून निवडून येण्यासाठी आवश्यक मताची संख्या/ कोटा पुढील सुत्रानुसार काढले जाते.

$$\frac{\text{राष्ट्रपतीपदासाठी झालेले एकूण मतदान (मतसंख्या)}}{\text{निवडून द्यावयाच्या प्रतिनिधींची संख्या + १}} + १ = \text{निवडून येण्यास आवश्यक असणारी मते (कोटा)}$$

मतमोजणीच्या पहिल्या फेरीत ज्या उमेदवाराला पहिल्या पसंती क्रमांकाची आवश्यक संख्येएवढी मते मिळतील त्याची राष्ट्रपती म्हणून निवड केली जाते. पहिल्या फेरीत कोटा पूर्ण न झाल्यास मतमोजणीची दुसरी फेरी घेतली जाते व सर्वात कमी मते मिळमिणाऱ्या उमेदवाराला यातून वगळले जाते व त्याची दुसऱ्या क्रमांकाची मते मोजली जातात. त्याच्या मतपत्रिकेतील दुसऱ्या क्रमांकाची मते ज्याला मिळाली असतील त्याच्या पहिल्या पसंतीक्रमांकाच्या मतात मिळविली जातात. आणि आवश्यक मते मिळविणाऱ्या उमेदवारास विजयी घोषित केले जाते. जोपर्यंत आवश्यक संख्येएवढी मते प्राप्त होत नाहीत तो पर्यंत मताच्या संक्रमणाची प्रक्रिया चालू ठेवली जाते. व आवश्यक संख्येएवढी मते मिळविणारा उमेदवार निवडून येतो.

**राष्ट्रपतीचा कार्यकाल**

राज्यघटनेच्या कलम ५६ (१) नुसार राष्ट्रपतीपदाचा कार्यकाल ५ वर्षाचा निश्चित केला आहे. राष्ट्रपती पद ग्रहण केलेल्या दिवसापासून कार्यकाल मोजला जातो. राष्ट्रपती स्वमर्जीने आपल्या पदाचा राजीनामा उपराष्ट्रपतीस संबोधून देवू शकतात. घटनेच्या कलम ५७ नुसार राष्ट्रपती पदावरील व्यक्ती दुसऱ्या कार्यकाळासाठी निवडणूक लढविण्यास पात्र असते. राष्ट्रपतीने घटनाबाह्य वर्तन केल्यास घटनेच्या कलम ६१ नुसार संसदेत महाभियोग खटला चालवून त्यांना पदच्यूत करता येते. काही कारणास्तव राष्ट्रपतीचे पदमुदतपूर्व रिक्त झाल्यास राष्ट्रपतीचे काम उपराष्ट्रपती पाहतात. राष्ट्रपती व उपराष्ट्रपती ही दोन्ही पदे एकाच वेळी रिक्त झाल्यास सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश राष्ट्रपतीचे काम पाहतात.

**राष्ट्रपतीचे वेतन व भत्ते**

राष्ट्रपतीचे वेतन व भत्ते ठरविण्याचा अधिकार संसदेला आहे. राष्ट्रपतीचे वेतन देशाच्या संचित निधीतून दिले जाते.

**राष्ट्रपतीचे अधिकार आणि कार्य**

**१) कार्यकारी अधिकार**

भारत सरकारचा सर्व कार्यकारी कारभार राष्ट्रपतीच्या नावाने चालविला जातो. राष्ट्रपती पंतप्रधानाची नेमणूक करतात व त्यांच्या सल्ल्याने इतर मंत्र्याची नेमणूक करतात. भारताचा महान्यायवादी, महालेखापरिक्षक, मुख्य निवडणूक आयुक्त, संघलोकसेवा आयोगाचे अध्यक्ष, राज्याचे राज्यपाल, वित्तआयोगाचे अध्यक्ष इत्यादी उच्चपदस्थांची नेमणूक करतात. तसेच अनुसुचीत जाती जमाती व इतर मागासवर्ग आयोगाची स्थापना करू शकतात. राष्ट्रपती तिन्ही सैन्यदलाचा प्रमुख असतो. सैन्यदलाच्या प्रमुखांच्या तो नेमणूका करतो. त्याचप्रमाणे परराष्ट्रांच्या वकिलांची अधिकारपत्रे स्विकारणे, परराष्ट्रीय पाहुण्यांचे स्वागत करणे, चीफ कमिशनरच्या सहाय्याने केंद्रशासित प्रदेशांचा राज्यकारभार पाहणे, इत्यादी कार्यकारी अधिकार राष्ट्रपतीला घटनेने प्रदान केलेले आहेत.

**२) कायदेविषयक अधिकार**

राष्ट्रपती हा संसदेचा अविभाज्य घटक असल्यामुळे त्यांना विविध कायदेविषयक अधिकार प्राप्त आहेत. संसदेचे अधिवेशन बोलविणे आणि स्थगित करणे तसेच पंतप्रधानाच्या सल्ल्याने लोकसभा विसर्जित करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे. राष्ट्रपती संसदेच्या दोन्ही सभागृहाची संयुक्त बैठक बोलावू शकतात. सार्वत्रिक निवडूकीनंतरच्या पहिल्या अधिवेशनाच्या सुरवातीला राष्ट्रपती संसदेसमोर अभिभाषण करतात. दरवर्षी संसदेच्या पहिल्या अधिवेशनाची सुरवात ही राष्ट्रपतीच्या अभिभाषणानेच होते. महत्वाच्या विधेयकासंबंधी राष्ट्रपती संसदेस संदेश पाठवू शकतो. राष्ट्रपती लोकसभेमध्ये २ सदस्य व राज्यसभेत १२ सदस्यांची नेमणूक करू शकतात. संसदेने परित केलेल्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होण्यासाठी राष्ट्रपतीची संमती आवश्यक असते. घटनेच्या कलम १२३ नुसार राष्ट्रपतीस वटहुकूम काढण्याचा अधिकार आहे. त्याला कायद्याइतकेच महत्व असते. घटक राज्याची रचना, सीमा व नाव बदलणारी विधेयके तसेच अर्थविधेयके यांना संसदेत सादर करण्यापूर्वी राष्ट्रपतीची पूर्वसंमती घ्यावी लागते. तसेच राष्ट्रपती, वित्त आयोग, लोकसेवा आयोग, महालेखापरिक्षक यांच्याकडून आलेले अहवाल चर्चेसाठी संसदेसमोर मांडतात.

**३) अर्थविषयक अधिकार**

राज्यघटनेने राष्ट्रपतीस महत्वपूर्ण आर्थिक अधिकार दिलेले आहेत. अर्थविधेयक प्रथम राष्ट्रपतीच्या पूर्वसम्मतीनेच लोकसभेत सादर केले जाते. प्रत्येक वर्षासाठी जे अंदाजपत्रक तयार केले जाते ते संसदेसमोर मांडण्याची व्यवस्था राष्ट्रपती करतात. राष्ट्रपतीच्या शिफारशी शिवाय सरकारला संसदेत कोणत्याही अनुदानाची मागणी करता येत नाही. संचित निधीवर राष्ट्रपतीचे नियंत्रण असते. संसदेच्या परवानगीने

आकस्मिक कारणासाठी या निधीतून तो पैसा खर्च करू शकतो. केंद्र व राज्यामध्ये कर उत्पन्नाची वाटणी करण्यासाठी राष्ट्रपतींना दर पाच वर्षांनी वित्त आयोग नेमण्याचा अधिकार असतो.

**४) न्यायविषयक अधिकार**

न्यायविषयक अधिकाराअंतर्गत राष्ट्रपती आपल्याकडे येणाच्या दयेच्या अर्जास अनुसरून एखाद्या गुन्हेगाराची शिक्षा कमी करू शकतो किंवा ती पूर्णपणे माफ करू शकतो. राज्यघटनेच्या कलम १२४ नुसार राष्ट्रपती सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या न्याधीशांची नेमणूक करतात. घटनेच्या कलम १४३ नुसार महत्वाच्या प्रश्नासंदर्भात राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयास सल्ला विचारू शकतो. सर्वोच्च न्यायालयातील अधिकारी वर्ग व नोकरवर्ग यांची नियुक्ती, वेतन निवृत्तीवेतन, सुट्ट्या या संबंधी नियम करताना सरन्यायाधीश राष्ट्रपतींची संमती घेतात.

**५) आणीबाणी विषयक अधिकार**

देशापुढील संकटांचा सामना करता यावा म्हणून भारतीय राज्यघटनेच्या १८ व्या भागातील कलम ३५२, ३५६, ३६० नुसार राष्ट्रपतीस आणीबाणीविषयक अधिकार प्राप्त आहेत.

**अ) राष्ट्रीय आणीबाणी– (कलम ३५२)**

युद्ध किंवा बाह्यआक्रमण किं वा अंतर्गत अशांतता यामुळे देशाच्या सुरक्षिततेस धोका निर्माण झाल्यास राष्ट्रपती कलम ३५२ नुसार राष्ट्रीय आणीबाणी घोषित करू शकतो. अशा प्रकारची आणीबाणी संसदेच्या मान्यतेशिवाय २ महिन्यापर्यत आंमलात राहतो. दोन महिन्याच्या आत या घोषणेला संसदेची मंजुरी घ्यावी लागते. संसदेच्या मंजुरीने ६ महिन्यापर्यंत आणीबाणीचा कालावधी वाढवता येतो. दर सहा महिन्यांनी मंजुरी घ्यावी लागते. संसदेने मान्यता दिली नाही तर घोषणा रद्द समजण्यात येते.

राष्ट्रीय आणीबाणीच्या परिणामस्वरूप जनतेच्या मुलभूत अधिकाराचा संकोच होतो. संसदेला राज्यसुचीतील विषयावर कायदा करण्याचा अधिकार प्राप्त होते. केंद्र सरकारचे घटक राज्याच्या कार्यकारी मंडळावर नियंत्रण प्रस्थापित होते.

**ब) घटकराज्यआणीबाणी / राष्ट्रपती राजवट –(कलम ३५६)**

एखाद्या घटक राज्यात राजकीय अस्थैर्य किंवा घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाल्यास संबंधीत घटक राज्याचा राज्यपाल राष्ट्रपतींना त्याबाबतचा अहवाल सादर करतो. त्यानुसार राष्ट्रपती त्या संबंधीत घटक राज्यात कलम ३५६ नुसार राष्ट्रपती राजवट लागू करतात. आणीबाणी घोषणेस २ महिन्याच्या आत संसदेची मान्यता घ्यावी लागते. घटक राज्यातील आणीबाणीमुळे घटकराज्याचा कारभार राष्ट्रपती राज्यपालामार्फत चालवितात. घटक राज्याचे कायदे करण्याचा अधिकार राष्ट्रपती संसदेकडे सुपूर्द करतो.

**क) आर्थिक आणीबाणी – (कलम ३६०)**

संपूर्ण देशात किंवा एखाद्या घटकराज्यात आर्थिक आस्थिरता निर्माण झाल्यास राष्ट्रपती कलम ३६० अन्वये आर्थिक आणीबाणी घोषित करतात. आर्थिक आणीबाणीची मुदत २ महिने असते. या कालावधीत संसदेची मंजुरी घ्यावी लागते. आर्थिक आणीबाणीच्या परिणाम स्वरूप राष्ट्रपती घटकराज्यांना आर्थिक बाबतीत आदेश देतात. घटकराज्यांनी केलेले कायदे राष्ट्रपती सम्मतीसाठी मागवू शकतो. केंद्र व राज्य सरकारने अधिकारी ज्यामध्ये उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश यांच्या वेतन भत्त्यात कपात करण्याचा आदेश राष्ट्रपती देवू शकतात.

भारताच्या राष्ट्रपतींचे अधिकार व कार्याचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, ते भारताचे घटनात्मक प्रमुख आहेत. वास्तविक त्यांना आपल्या अधिकाराचा वापर पंतप्रधान व मंत्रीमंडळाच्या सल्ल्याने करावे लागते. परंतु त्यामुळे भारतीय राजकीय व्यवस्थेतील राष्ट्रपतींचे महत्व कमी होत नाही. संकटकालीन परिस्थितीत त्यांना महत्वपूर्ण अधिकार प्राप्त होतात. अमरनन्दी यांच्या मते, ''राष्ट्रीय संकटांचा सामना करण्यासाठी राष्ट्रपतीला जे संकटकालीन अधिकार दिलेले आहेत ते भरलेल्या बंदुकीप्रमाणे आहेत. ज्यांचा उपयोग व्यक्ती स्वांतत्र्य रक्षणासाठी सुद्धा केला जाऊ शकतो किंवा व्यक्ती स्वातंत्र्य नष्ट करण्यासाठी सुद्धा होऊ शकतो. म्हणून या बदुंकीचा वापर अंत्यंत सावधानीने केला गेला पाहिजे.'' यावरून राष्ट्रपतीपदाचे महत्व आणि जबाबदारी अत्यंत महत्वपूर्ण असण्याची दिसून येते.

**३.२.२.२ भारताचा पंतप्रधान**

संसदीय शासन पद्धतीच्या तत्वानुसार पंतप्रधान हा कार्यकारी मंडळाचा वास्तववादी प्रमुख असतो. राज्यघटनेच्या कलम ७४ नुसार राष्ट्रपतीस सहाय्य व सल्ला देण्यासाठी पंतप्रधानाच्या नेतृत्वाखाली एक मंत्रीमंडळ असेल व राष्ट्रपती मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानुसार वागेल.

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत ज्या राजकीय पक्षास बहुमत प्राप्त होते. त्या पक्षाच्या नेत्यास पंतप्रधान म्हणून राष्ट्रपती नियुक्त करतात. जेंव्हा लोकसभेत कोणत्याही एका राजकीय पक्षास बहुमत प्राप्त होत नाही त्यावेळी विविध राजकीय पक्ष आघाडी करून बहुमत स्पष्ट करतात त्या आघाडीच्या नेत्याची राष्ट्रपती पंतप्रधान म्हणून नेमणूक करतात.

**पात्रता**

१) तो भारताचा नागरिक असावा.

२) त्याने वयाची २५ वर्ष पूर्ण केलेली असावीत.

३) ती व्यक्ती लोकसभा किंवा राज्यसभेची सदस्य असावी. नसेल तर सहा महिन्याच्या आत त्याने सभासदत्व प्राप्त केले पाहिजे.

४) पंतप्रधानाच्या पाठीशी लोकसभेचे बहुमत असणे आवश्यक आहे. मात्र पंतप्रधान लोकसभेचाच सदस्य असावा असे बंधन नाही.

**कार्यकाल**

लोकसभेचा कार्यकाल जेवढा असतो तेवढाच पंतप्रधानाचाही कार्यकाल असतो हा कार्यकाल साधारणतः ५ वर्षाचा आहे. लोकसभेत जोपर्यंत सत्तारुढ पक्षाचे बहुमत टिकून असेल तोपर्यंतच पंतप्रधान व त्याचे मंत्रीमंडळ सत्तेवर राहते. पंतप्रधान मुदतपूर्व आपल्या पदाचा राजीनामा देवू शकतो. जर लोकसभेने मंत्रीमंडळाविरूद्ध अविश्वास ठराव पारित केला तर पंतप्रधानाला राजीनामा द्यावा लागतो.

**वेतन व भत्ते**

पंतप्रधानांना संसदेच्या सदस्या इतकेच वेतन व भत्ते प्राप्त होतात. याशिवाय मोफत निवास, प्रवासभत्ता, वेद्यकीय भत्ता, व इतर सुविधा प्राप्त होतात.

**पंतप्रधानाचे अधिकार व कार्य**

१) केंद्रीय मंत्रीमंडळातील मंत्री राष्ट्रपतीकडून पंतप्रधानाच्या सल्ल्यानुसार नियुक्त केले जातात. पंतप्रधान आपल्या पक्षातील योग्य कार्यक्षम, व्यक्तींची मंत्री म्हणून निवड करतो मंत्र्यांमध्ये खातेवाटप करणे, मंत्रीमंडळात फेरबद्दल करणे इ. कार्य पंतप्रधान करतो.

२) पंतप्रधान हा लोकनिर्वाचित नेता असतो त्यामुळे त्यास सर्व वास्तविक अधिकार प्राप्त होतात. राष्ट्रपतींना आपल्या अधिकारांचा वापर पंतप्रधानाच्या सल्ल्यानेच करावा लागतो.

३) पंतप्रधान मंत्रीमंडळाच्या प्रमुख या नात्याने मंत्रीमंडळाची बैठक बोलावणे, विषय निश्चित करणे, मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेतलेले निर्णय जाहीर करणे इत्यादी कार्य करतो. मंत्रीमंडळात मतभेद निर्माण झाल्यास ते दुर करून मंत्र्यामध्ये समन्वय घडवून आणतो.

४) पंतप्रधान हा सत्ताधारी पक्षाचा नेता असतो. त्यामुळे आपल्या पक्षाची ध्येय धोरणे आणि कार्यक्रम प्रत्यक्ष आमलात आणणे हे पंतप्रधानाचे कार्य असते.

५) पंतप्रधान हा संपूर्ण देशातील जनतेचा नेता असतो. पंतप्रधान या नात्याने तो संपूर्ण जनतेचे प्रतिनिधित्व करीत असतो. जनहीताची धोरणे तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे अशी कार्य पंतप्रधानास करावी लागतात.

६) पंतप्रधान मंत्रीमंडळाचा प्रमुख या नात्याने मंत्रीमंडळाच्या कार्यावर नियंत्रण ठेवतो. त्याला कोणत्याही खात्याशी निगडीत असलेली माहिती मिळविण्याचा आणि दस्तावेज मागविण्याचा अधिकार असतो.

७) पंतप्रधान राष्ट्रांतर्गत शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याबरोबरच आंतरराष्ट्रीय स्तरावर राष्ट्राचे हित लक्षात घेऊन धोरण निश्चित करीत असतात.

८) राष्ट्रपती व मंत्रीमंडळ यांच्यातील महत्वाचा दुवा म्हणून पंतप्रधान महत्वाची भूमिका पार पाडतात. पंतप्रधान राष्ट्रपतींना मंत्रीमंडळाच्या कार्यासंबंधी माहिती पुरवितो तसेच राष्ट्रपतींना केलेल्या सुचना, त्यांनी दिलेला सल्ला तो मंत्रिमंडळा पर्यंत पोहचवितो.

९) पंतप्रधान संसदेतील सत्तारूढ पक्षाचा नेता असतो. सभाग्रहाला विश्वात घेवून तो कायदेनिर्मितीचे कार्य करतो.

अशाप्रकारे भारतीय संसदीय शासन व्यवस्थेत पंतप्रधानाचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. पंतप्रधान पदाचे महत्व स्पष्ट करताना विविध विचारवंतानी आपले मत व्यक्त केले आहे. लॉर्ड मोर्ले यांच्या मते ''पंतप्रधान समानातील प्रमुख व मंत्रीमंडळरूपी कमानीची मध्यशिला होय.'' रॅम्सेमुर यांच्या मते ''पंतप्रधान म्हणजे राज्यरूपी जहाजाचा सुकाणूधारी होय'' सर विल्यम हारकोर्ट यांच्या मते ''पंतप्रधान हा तारांगणातील चंद्र असतो'' मन्रो यांच्या मते ''पंतप्रधान हा शासनरूपी जहाजाचा कॅप्टन होय.'' यासर्व विचारवंताच्या विधानावरून पंतप्रधानपदाचे महत्व अधोरेखित होते.

### ३.२.२.३ केंद्रीय मंत्रीमंडळ

भारताच्या राज्यघटनेत इंग्लंडच्या धर्तीवर संसदीय शासन पद्धतीचा स्विकार केलेला आहे. त्यानुसार केंद्रीय कार्यकारी मंडळाची वास्तववादी सल्ला पंतप्रधानाच्या नेतृत्वाखालील मंत्रीमंडळाच्या हातात असते. घटनेच्या कलम ७४ नुसार राष्ट्रपतीस सहाय्य व सल्ला देण्यासाठी पंतप्रधानाच्या नेतृत्वाखाली एक मंत्रीमंडळ असेल ४४ व्या घटनादुरुस्ती प्रमाणे राष्ट्रपती मंत्रीमंडळाला अशा सल्ल्याचा फेरविचार करण्यास सांगू शकतात. त्यानंतर राष्ट्रपती अशा फेरविचारा अंती देण्यात आलेल्या सल्ल्यानुसार वागतील. तसेच मंत्र्यांनी राष्ट्रपतींना दिलेल्या सल्ल्याची चौकशी कोणत्याही न्यायालयात करता येत नाही.

**मंत्रीमंडळाची निर्मिती**

राज्यघटनेच्या कलम ७५ नुसार ''पंतप्रधानाची नियुक्ती राष्ट्रपतीकडून केली जाईल आणि इतर मंत्र्याची नियुक्ती पंतप्रधानाच्या सल्ल्याने राष्ट्रपती करतील.'' पंतप्रधान आपल्या पक्षातील निवडून आलेल्या महत्वाच्या प्रतिनिधीची मंत्री म्हणून नेमणूका करीत असतो.

मंत्र्यांची निवड ही संसद सदस्यातूनच केली जाते. संसदेचा सदस्य नसणाऱ्या एखाद्या व्यक्तीची निवड मंत्री म्हणून केली असेल तर त्या व्यक्तीला सहा महिन्याच्या आत संसदेच्या कोणत्याही एका सभागृहात निवडून यावे लागते. निवडून नाही आला तर त्याला मंत्रीपद सोडावे लागते. मंत्र्यांनी आपले पदग्रहण करण्यापूर्वी राष्ट्रपती त्यांना पद व गोपनियतेची शपथ देतात.

मंत्रीमंडळातील मंत्र्यांची संख्या ही लोकसभेतील एकूण सदस्य संख्येच्या १५% एवढी असते. मंत्र्यांच्या नेमणुका करताना पंतप्रधानास विशेष काळजी घ्यावी लागते. स्वतःच्या पक्षातील महत्त्वाच्या नेत्यांना डावलता येत नाही. तसेच सर्व घटकराज्यांना मंत्रीमंडळात प्रतिनिधीत्व मिळेल याची काळजी घ्यावी लागते. कारण लोकसभेत त्याला आपल्या पक्षाचे बहुमत सातत्याने टिकवून ठेवावे लागते. पंतप्रधान व मंत्रीमंडळ

सामुहिकरीत्या लोकसभेला जबाबदार राहून कार्य करतात. लोकसभेचा विश्वास असेपर्यंत मंत्रीमंडळ अधिकारपदावर राहते. जर लोकसभेने मंत्रीमंडळाविरुद्ध अविश्वास प्रकट केला तर पंतप्रधानास आपल्या मंत्रीमंडळासह राजीनामा द्यावा लागतो.

संसदेच्या एका सभागृहाचा सदस्य असलेल्या मंत्र्यास दुसऱ्या सभाग्रहास बोलण्याचा व कामकाजात भाग घेण्याचा अधिकार असतो. मात्र ती केवळ सदस्य असलेल्या सभागृहातच मतदानात भाग घेऊ शकतो.

**मंत्र्यांचे प्रकार :**

मंत्रीमंडळामध्ये पंतप्रधान व मंत्र्यांचा समावेश होतो. पंतप्रधान मंत्रीमंडळाचा प्रमुख असतो. मंत्रीमंडळामध्ये तीन प्रकारचे मंत्री असतात.

१) कॅबिनेट मंत्री

२) राज्यमंत्री

३) उपमंत्री

**१) कॅबिनेट मंत्री :** पंतप्रधान आपल्या पक्षातील महत्त्वाच्या जेष्ठ व अनुभवी सदस्यांची निवड कॅबिनेट मंत्री म्हणून करतात. कॅबिनेट मंत्री हे प्रथम दर्जाचे मंत्री समजले जातात. राज्यघटनेनुसार कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्यांची संख्या १२ ते १५ च्या आसपास असते. कॅबिनेट मंत्र्यांकडे महत्त्वाची खाती देण्यात येतात. उदा. गृहखाते, संरक्षण खाते, अर्थखाते, कृषी खाते, परराष्ट्र खाते, इत्यादी

**२) राज्यमंत्री :** राज्यमंत्री मंत्रीमंडळात दुसऱ्या क्रमांकाचे मंत्री म्हणून ओळखले जातात. राज्यमंत्र्यांना एखाद्या मंत्रालयाचा स्वतंत्र कार्यभार दिला जाऊ शकतो किंवा कॅबिनेट मंत्र्याला सहाय्यक म्हणून नेमले जाते. राज्यमंत्र्यांना मंत्रीमंडळाच्या बैठकींना उपस्थित राहता येत नाही. परंतु त्यांच्या विभागाशी संबंधित बाबीवर चर्चा करतेवेळी पंतप्रधानाच्या निमंत्रणावरून त्यांना मंत्रीमंडळाच्या बैठकीस उपस्थित राहता येते. राज्यमंत्र्यांकडे स्वतंत्र कार्यभार असल्यास ते कॅबिनेट मंत्र्यांप्रमाणे आपल्या अधिकाराचा वापर करू शकतात.

**३) उपमंत्री :** उपमंत्र्यांना मंत्रालयाचा स्वतंत्र कार्यभार दिला जात नाही. ते कॅबिनेट मंत्री किंवा राज्यमंत्र्यांना सहाय्यक म्हणून कार्य करतात. उपमंत्री हे मंत्रीमंडळातील तिसऱ्या क्रमांकाचे मंत्री समजण्यात येतात. त्याचप्रमाणे मंत्र्यांना मदत करण्यासाठी पंतप्रधान स्वपक्षातील काही सदस्यांची संसदीय सचिव म्हणून नेमणूक करतात. हे सचिव मंत्र्यांना त्यांच्या संसदीय कामकाजात मदत करण्याचे कार्य करतात.

**मंत्रीमंडळाची वैशिष्ट्ये :**

**१) वास्तविक सत्ता प्रमुख :** संसदीय शासन पद्धतीमध्ये नामधारी कार्यकारी सत्ता राष्ट्रपतीकडे असते. वास्तविक कार्यकारी सत्ता पंतप्रधानाच्या नेतृत्त्वाखालील मंत्रीमंडळाच्या हातात असते. मंत्रीमंडळ या वास्तविक सत्तेचा वापर करून राज्यकारभार करीत असते.

२) **राजकीय एकरूपता :** मंत्रीमंडळातील सर्व मंत्र्यांचा समान दृष्टीकोन असतो. ते आपल्या राजकीय पक्षाचे ध्येय, धोरण प्रत्यक्षात राबविण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करतात. त्यांना या कार्यात पंतप्रधान मार्गदर्शन करीत असतात.

३) **पंतप्रधानाचे नेतृत्व :** मंत्रीमंडळाचा प्रमुख पंतप्रधान असतो. मंत्रीमंडळाची निर्मिती त्याच्याच सल्ल्याने राष्ट्रपती करतात. मंत्र्यांमध्ये खातेवाटपाचे कार्य पंतप्रधानच करतात. तसेच ते मंत्रीमंडळाच्या बैठकांचे अध्यक्षस्थान भूषवितात. मंत्रीमंडळावर घेतलेल्या सर्व निर्णयावर पंतप्रधानाचा प्रभाव असतो.

४) **सामूहिक उत्तरदायित्व :** मंत्रीमंडळातील सर्व मंत्री व्यक्तीगत व सामुदायिक स्वरूपात लोकसभेप्रति जबाबदार राहून कार्य करतात. मंत्रीमंडळात एकदा घेतलेले निर्णय सर्व मंत्रीमंडळावर बंधनकारक असते. सर्व मंत्री एक गट म्हणून कार्य करतात. मंत्रीमंडळ एकत्रित बुडते किंवा एकत्रित तरंगते.

५) **गोपनियता :** मंत्रीमंडळात घेतलेले सर्व निर्णय गोपनिय ठेवले जातात. राज्यघटनेच्या कलम ७५ नुसार मंत्रीपद ग्रहण करण्यापूर्वी प्रत्येक मंत्र्यास राष्ट्रपती पद व गोपनियतेची शपथ देतात. मंत्रीमंडळात एकजीनसीपणा राहण्यासाठी गोपनियता महत्त्वाची असते.

६) **कायदेमंडळाशी घनिष्ठ संबंध :** मंत्रीमंडळ संसदेच्या दोन्ही सभागृहाचे प्रतिनिधित्व करते. मंत्रीमंडळाची निर्मिती लोकसभेत बहुमत प्राप्त पक्षातील सदस्यातून होत असते. पंतप्रधान राष्ट्रपतीला सल्ला देवून लोकसभा बरखास्त करू शकतात.

७) **एकवाक्यता :** मंत्रीमंडळात जे निर्णय घेतले जातात त्यामध्ये एकवाक्यता असते. कॅबिनेट बैठकीत निर्णय घेत असताना मंत्र्यांमध्ये कधी कधी मतभेद होतात. पण एकदा निर्णय घेतला की ते सर्वांना मान्य करावे लागते.

**मंत्रीमंडळाचे अधिकार व कार्य**

१) **धोरण ठरविणे व आंमलबजावणी करणे :** जनकल्याणाच्या दृष्टीने मंत्रीमंडळ धोरण निश्चित करीत असते. मंत्रीमंडळ वेगवेगळी खाती निर्माण करून कार्य करते. धोरणे ठरविणे, त्या धोरणास संसदेची संमती घेणे, संसदेची संमती मिळाल्यानंतर त्या धोरणाची आंमलबजावणी करणे इत्यादी कार्य मंत्रीमंडळास करावी लागतात.

२) **कायदेविषयक कार्य :** कायदेनिर्मितीचे कार्य संसदेचे आहे. मात्र त्यात मंत्रीमंडळाची महत्त्वाची भूमिका असते. बहुतेक सर्व महत्त्वाची विधेयके मंत्र्याद्वारे संसदेत मांडले जातात. संसदेत ही विधेयके पारित करून घेणे मंत्रीमंडळाची जबाबदारी असते. संसदेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नाची उत्तरे मंत्र्यांना द्यावी लागतात. एकूणच कायदानिर्मितीत मंत्रीमंडळाचे महत्त्वपूर्ण योगदान असते.

३) **आर्थिक कार्य :** मंत्रीमंडळ देशाचे आर्थिक धोरण निश्चित करीत असते. संसदेसमोर वार्षिक अंदाजपत्रक सादर करण्याची जबाबदारी अर्थ खात्याची असते. अर्थमंत्री विविध खात्याकडून माहिती

मागवून अंदाजपत्रक तयार करतो. संसदेत या अंदाजपत्रकास मंजूरी मिळविली जाते. अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्याशिवाय मंत्रीमंडळास पैसा खर्च करता येत नाही. इतर अर्थविधेयक सुद्धा मंत्रीमंडळाद्वारे लोकसभेत सादर केले जाते. अर्थ विधेयक मंजूर झाले नाही तर मंत्रीमंडळास राजीनामा द्यावा लागतो.

४) **नियुक्ती संबंधी कार्य :** भारताचा राष्ट्रपती देशाच्या राजकीय क्षेत्रातील व प्रशासनातील वरिष्ठ पदावरील महत्त्वपूर्ण अधिकाऱ्यांच्या नेमणूका पंतप्रधान व मंत्रीमंडळाच्या सल्ल्याने करतो. उदा. राज्यपाल, राजदूत, सेनाधिकारी, न्यायाधीश विविध आयोगाचे अध्यक्ष इत्यादी.

५) **देशात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे :** शांततेच्या काळातच देश प्रगती करू शकतो. म्हणून मंत्रीमंडळ विविध प्रकारची धोरणे आखून, वेगवेगळ्या कायद्याची निर्मिती करते व त्याद्वारे देशात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते. देशात वेळोवेळी विविध कारणामुळे संघर्ष निर्माण होतात ते संघर्ष सोडवून शांतता प्रस्थापित करण्याचे कार्य मंत्रीमंडळास करावे लागते.

६) **परराष्ट्र संबंध विषयक कार्य :** देशाच्या सार्वभौमत्वाचे बाह्य आक्रमणापासून रक्षण करणे, परराष्ट्राशी युद्ध, तह, करार किंवा मैत्री करणे इत्यादी कार्य मंत्रीमंडळ करीत असते. परराष्ट्र संबंध विषयक कार्य करण्यासाठी व देशाच्या सुरक्षिततेसाठी संरक्षण व परराष्ट्र मंत्रालयाची निर्मिती करण्यात आली आहे. परराष्ट्राशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करून आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या देशाची प्रतिष्ठा वाढविण्याचे कार्य मंत्रीमंडळास करावे लागते.

एकंदरीत मंत्रीमंडळाच्या अधिकार व कार्यावरून असे दिसून येते की, भारतीय राजकीय व प्रशासकीय व्यवस्थेत मंत्रीमंडळाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. संपूर्ण देशाचा राज्यकारभार चालविण्याची वास्तविक जबाबदारी मंत्रीमंडळावर असते. राष्ट्रीय हित समोर ठेवून धोरण निश्चित करणे व त्याची अंमलबजावणी करण्याचे कार्य मंत्रीमंडळ करीत असते.

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

**ब) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) राष्ट्रपतीपदाच्या उमेदवाराचे वय ........ वर्ष पूर्ण असावे लागते.

२) ........... विधेयक राष्ट्रपतीच्या पूर्वसम्मतीनेच लोकसभेत मांडले जाते.

३) मंत्रीमंडळातील ............. मंत्री हे प्रथम क्रमांकाचे मंत्री समजले जातात.

४) मंत्रीमंडळ हे सामुहिकरित्या ................. या सभागृहास जबाबदार असते.

५) मंत्रीमंडळातील मंत्र्यांची संख्या लोकसभेतील एकूण सदस्यांच्या .......... टक्के असते.

## ३.३ सारांश

भारतीय संसदीय शासन पद्धतीमध्ये कायदेमंडळाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. भारतात द्विग्रही कायदेमंडळ असून त्यातील प्रथम व कनिष्ठ सभागृहास लोकसभा तर द्वितीय व वरिष्ठ सभागृहास राज्यसभा असे संबोधले जाते. लोकसभा हे जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह आहे तर राज्यसभा घटक राज्यांचे प्रतिनिधीत्व करते. लोकसभेचा कार्यकाल ५ वर्षाचा असतो. राज्यसभा हे स्थायी सभागृह असून त्यातील सदस्यांचा कार्यकाल ६ वर्षाचा असतो. दर दोन वर्षांनी एक-तीतीयांश सदस्य निवृत्त होतात व तेवढेच नवीन सदस्य निवडले जातात. लोकसभा सभापतीची निवड लोकसभा सदस्यातूनच होते. उपराष्ट्रपती हा राज्यसभेचा पदसिद्ध सभापती असतो. अर्थ विधेयक प्रथम लोकसभेतच मांडले जाते. इतर सर्व विधेयकाबाबतीत दोन्ही सभागृहांना समान महत्त्व आहे.

संसदीय शासन पद्धतीच्या तत्त्वानुसार भारतात एक नामधारी व एक वास्तववादी सत्ताप्रमुख असे दोन प्रमुख असतात. राष्ट्रपती हा नामधारी सत्ताप्रमुख तर पंतप्रधान हा वास्तववादी सत्ताप्रमुख असतो. देशाचा संपूर्ण कारभार राष्ट्रपतीच्या नावाने चालतो परंतु प्रत्यक्षात त्यांच्या अधिकाराचा वापर पंतप्रधान व मंत्रीमंडळ यांच्याद्वारे केले जाते. राष्ट्रपतींची निवड करण्यासाठी एक निर्वाचक मंडळ असते त्या निर्वाचक मंडळात संसदेचे निर्वाचित सदस्य व विविध घटक राज्यांच्या विधानसभेचे निर्वाचित सदस्य असतात. राष्ट्रपतींची निवडणूक गुप्त, प्रमाणशीर प्रतिनिधीत्व पद्धतीने, व एकलसंक्रमणीय तत्त्वानुसार होते. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीशिवाय कोणत्याही विधेयकाचे कायद्यात रूपांतर होत नाही. राष्ट्रपतींना अध्यादेश काढण्याचा अधिकार आहे. तसेच संकटकाळात राष्ट्रीय, राज्यांतर्गत व आर्थिक आणीबाणी घोषित करण्याचा अधिकार त्यांना आहे. राष्ट्रपती हा तिन्ही सैन्यदलाचा प्रमुख असतो.

पंतप्रधान हा कार्यकारी मंडळाचा वास्तविक प्रमुख असतो. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत ज्या राजकीय पक्षाला बहुमत प्राप्त होते त्या पक्षाच्या नेत्यास पंतप्रधान म्हणून राष्ट्रपतीकडून नियुक्त केले जाते. केंद्रीय मंत्रीमंडळातील इतर मंत्री राष्ट्रपतीकडून पंतप्रधानाच्या सल्ल्याने नियुक्त केले जातात. मंत्र्यामध्ये खाते वाटप करणे, मंत्रीमंडळाच्या बैठकींचे अध्यक्षस्थान भूषविणे, राष्ट्रपती व मंत्रीमंडळ यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करणे, मंत्रीमंडळाच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे इत्यादी कार्य पंतप्रधानास करावे लागते. मंत्रीमंडळातील मंत्र्यांची संख्या लोकसभेतील एकूण सदस्य संख्येच्या १५ टक्के असावी लागते. मंत्रीमंडळात कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री असे तीन प्रकारचे मंत्री असतात. मंत्रीमंडळ हे सामुदायिकरित्या लोकसभेस जबाबदार राहून कार्य करते. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारे कायदे निर्माण करणे, आर्थिक धोरण ठरविणे, देशात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे. इत्यादी कार्ये मंत्रीमंडळास करावी लागतात.

## ३.४ पारिभाषिक शब्दावली

**१) संसद :** भारतीय कायदेमंडळास संसद असे संबोधले जाते.

**२) गणपूर्ती/गणसंख्या :** गणपूर्ती म्हणजे संसदेच्या सभागृहाची सभा भरण्यासाठी आवश्यक असलेल्या किमान सदस्यांच्या उपस्थितीची संख्या होय.

**३) अध्यादेश किंवा वटहुकूम :** संसदेच्या विराम काळात एखाद्या कायद्याची गरज निर्माण झाल्यास राष्ट्रपती अध्यादेश/वटहुकूम काढू शकतात. त्या अध्यादेशास कायद्याइतकेच महत्त्व असते.

**४) प्रश्न काळ :** संसदेच्या प्रत्येक बैठकीचा पहिला तास प्रश्न विचारणे व उत्तर देणे यासाठी उपलब्ध असतो. त्यास प्रश्न काळ असे म्हणतात. साधारणतः ११ ते १२ ही वेळ प्रश्नकाळाची असते.

**५) स्थगन प्रस्ताव :** स्थगन प्रस्ताव म्हणजे सभागृहाचे नेहमीचे कामकाज स्थगित करून सार्वजनिक महत्त्वाच्या मुद्यावर चर्चा करणे होय.

**६) निंदाव्यंजक प्रस्ताव :** मंत्रीमंडळाच्या विशिष्ठ धोरणावर व कार्यावर टिका किंवा दोषारोपण करण्यासाठी निंदाव्यंजक प्रस्ताव विरोधी पक्षाद्वारे सभागृहात मांडले जाते.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

अ) स्वयं-अध्ययन प्रश्न १ ची उत्तरे

१) संसद

२) अँग्लो इंडियन

३) १२

४) उपराष्ट्रपती

५) लोकसभा

ब) स्वयं अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

१) ३५

२) अर्थविधेयक

३) कॅबिनेट

४) लोकसभा

५) १५ टक्के

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

१) लोकसभेची रचना, अधिकार व कार्य स्पष्ट करा.

२) राज्यसभेची रचना अधिकार व कार्य स्पष्ट करा.

३) राष्ट्रपतीचे अधिकार व कार्य स्पष्ट करा.

४) भारतीय संसदीय शासन पद्धतीत पंतप्रधानाची भूमिका स्पष्ट करा.

५) केंद्रीय मंत्रीमंडळाची रचना अधिकार व कार्य स्पष्ट करा.

६) टिपा लिहा.

१) राष्ट्रपतींचे आणीबाणी विषयक अधिकार

२) मंत्रीमंडळाची वैशिष्ट्ये

३) लोकसभा सभापती

४) प्रादेशिक मतदारसंघ

५) राज्यसभा सभापती

## ३.७ संदर्भ – अधिक वाचनासाठी पुस्तके


१) Pylee M. V. (2016) Indias Constitution, S.Chand Publishing.

२) Basu D. D. (1994) An Introduction to the Constitution of India, New Delhi.

३) Kashyap S. C. (2011) Our Parliament, National Book Trust.

४) Singh H, Singh P (2011) Indian Administration, Pearson Education, India.

५) चौधरी वाल्मिकी, (१९६९) संविधान मे राष्ट्रपती की भूमिका, नॅशनल हेरॉल्ड नई दिल्ली.

६) फाडिया बी. एल., जैन पी. (२०१४) भारतीय शासन एवं राजनीति, साहित्य भवन पब्लिकेशन, आग्रा.

७) घायाळ विनायक, (२०१४) भारतीय राज्यघटना आणि राजकीय व्यवहार एक परामर्श, के. सागर पब्लिकेशन.

८)  घोरमोडे के. यु. (२०१३) भारतीय (संविधान) शासन व राजकारण, विद्या प्रकाशन, नागपूर.

९)  देवगावकर एस. जी. (२०१२) भारतीय राजकीय व्यवस्था, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

१०) पाटील बी. बी., चव्हाण उर्मिला (२०१३) भारतीय शासन, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

❑❑❑

## सत्र २ : घटक ४

# न्यायमंडळ

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ सर्वोच्च न्यायालयाची रचना

४.२.२ सर्वोच्च न्यायालयाची अधिकार व कामे

४.२.३ न्यायालयीन पुनर्विलोकन

४.२.४ न्यायालयीन स्वातंत्र्य

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

४.५ स्वंय-अध्ययन प्रश्न व उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## ४.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणांस पुढील गोष्टी समजून येतील.

- भारतीय न्यायव्यवस्था
- सर्वोच्च न्यायालयाची रचना
- सर्वोच्च न्यायालयाचे विविध अधिकार व कामे
- न्यायालयीन पुनर्विलोकनाची संकल्पना
- न्यायालयीन स्वातंत्र्य

## ४.१ प्रास्ताविक :

आपण प्रस्तुत प्रकरणात न्यायमंडळ या शासनाच्या तिसऱ्या व महत्त्वपूर्ण घटकाचा अभ्यास करणार आहोत. भारतीय न्यायमंडळाची रचना, स्वरूप व अधिकार, कामे, न्यायालयीन पुनर्विलोकन यांचा आढावा या घटकात घेतला आहे. इतर संघराज्यात्मक देशांच्या तुलनेत भारतीय न्यायमंडळ वैशिष्ट्यपूर्ण बनले आहे. ज्यामध्ये केंद्र व राज्य यांसाठी एकीकृत न्यायव्यवस्था निर्माण केली आहे. भारतीय न्यायमंडळाचे स्वरूप एकेरी व पिरॅमीडच्या आकाराचे आहे. सर्वोच्च न्यायालय शिखर न्यायालय असून अपिलाचे अंतिम न्यायालय आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली घटक राज्याच्या परीक्षेत्रात उच्च न्यायालये कार्य करतात. उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली दुय्यम (कनिष्ठ) न्यायालयांचे जिल्हा व तालुका स्तरावर कार्य करतात. भारतीय न्यायमंडळात कनिष्ठ न्यायालयाकडून वरिष्ठ न्यायालयांकडे अपिल करण्याची पद्धती स्वीकारली आहे. शिवाय आपण संघराज्यात्मक शासनपद्धतीचा स्वीकार केला असला तरी, अमेरिकन संघराज्याप्रमाणे दुहेरी न्यायव्यवस्थेचा स्वीकार केला नाही. २६ जानेवारी १९५० पासून ब्रिटीश राजवटीतील न्यायव्यवस्था बरखास्त करून भारतीय संविधानानुसार नवीन न्यायमंडळ अस्तित्वात आले.

भारतीय न्यायमंडळ

सर्वोच्च न्यायालय
(सरन्यायाधीश व सहायक न्यायाधीश)

↓

उच्च न्यायालय
(मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीश)

↓

कनिष्ठ न्यायालये
(जिल्हा व सत्र न्यायाधीश)

↓ ↓ ↓

| दिवाणी न्यायालये | फौजदारी न्यायालये |
|---|---|
| १) सिव्हिल जज्ज (सिनिअर डिव्हीजन) | १) मॅजिस्ट्रेट वर्ग १ |
| २) सिव्हिल जज्ज (जुनिअर डिव्हीजन) | २) मॅजिस्ट्रेट वर्ग २ |
| ३) स्मॉल कॉज कोर्ट | ३) मॅजिस्ट्रेट वर्ग ३ |

(लोकन्यायालय, महान्यायवादी, महाधिवक्ता)

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ सर्वोच्च न्यायालयाची रचना :

ब्रिटीश राजवटीत १९३५ च्या भारत प्रशासन कायद्यानुसार 'Federal Court of India' (संघीय न्यायालय)ची स्थापना कलकत्ता येथे करण्यात आली. या न्यायालयाविरुद्ध इंग्लंडमधील

'प्रिव्ही कौन्सील'कडे अपील करता येत होते. २६ जानेवारी १९५० ला संघीय न्यायालय बरखास्त करून त्या जागी दिल्ली येथे सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली. भारतीय राज्यघटनेनुसार न्यायमंडळात सर्वोच्च न्यायालय हे शिखरस्थानी असून ते अपिलाचे अंतिम न्यायालय आहे. भारतीय राज्यघटनेच्या पाचव्या भागात कलम १२४ ते १४६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाची तरतूद केली आहे. सर्वोच्च न्यायालयाची रचना पुढीलप्रमाणे आहे.

**I) न्यायाधिशांची पात्रता :**

भारतीय राज्यघटनेच्या कलम १२४ (३) मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांची पात्रता दिली आहे. ती पुढीलप्रमाणे

* ती व्यक्ती भारतीय नागरीक असावी.
* तीने किमान पाच वर्षे उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशपदी काम केले असावे. किंवा किमान दहा वर्षे उच्च न्यायालयात वकील म्हणून काम पाहिले असावे.
* राष्ट्रपतींच्या मते, ती व्यक्ती सुप्रसिद्ध कायदेपंडीत असावी.

**II) न्यायाधिशांची नियुक्ती :**

सर्वोच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधिशाची नियुक्ती राष्ट्रपती करतात. मुख्य न्यायाधिशांच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपतींमार्फतच इतर न्यायाधीश नियुक्त केले जातात. सर्वसाधारणपणे मुख्य न्यायाधिशाच्या नियुक्तीबाबत पदवरिष्ठताक्रम विचारात घेतला जातो. तसेच हंगामी न्यायाधिशांची नियुक्ती राष्ट्रपतींच्या सल्ल्याने मुख्य न्यायाधिशांकडून केली जाते.

**III) न्यायाधिशांची संख्या :**

भारतीय राज्यघटनेतील कलम १२४ (१) नुसार सर्वोच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश व संसद कायद्याने निश्चित करेल एवढी न्यायाधीशांची संख्या असेल. १९८६ पासून संसदेने कायदा करून एक मुख्य न्यायाधीश व इतर २५ न्यायाधीश असे एकूण २६ इतकी संख्या निश्चित केली होती. सध्या सर्वोच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश व इतर ३० न्यायाधीश असे एकूण ३१ न्यायाधीश आहेत.

न्यायाधिशांची संख्या किती असावी? याबाबत भारतीय राज्यघटनेत स्पष्ट उल्लेख नाही. परंतु कलम १४५ (क) असे निर्देशित करते की, संविधानिक विषयावर निर्णय देण्यासाठी किमान पाच न्यायाधिशांचे पीठ असावे.

**IV) न्यायाधिशांचा कार्यकाल :**

भारतीय राज्यघटनेत सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांचा कार्यकाल निश्चित केला नाही. मात्र न्यायाधिशांच्या निवृत्तीचे वय ६५ वर्षे इतके निर्धारित केले आहे. तर निवृत्तीपूर्वी न्यायाधीश आपल्या पदाचा

राजीनामा राष्ट्रपतींकडे सुपूर्द करू शकतात. तसेच महाभियोगाच्या प्रक्रियेद्वारे न्यायाधिशांना पदच्युत केले जाते.

### V) महाभियोग :

सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशांना गैरवर्तन किंवा अकार्यक्षमता या कारणास्तव महाभियोगाच्या प्रक्रियेद्वारे पदच्यूत केले जाते. महाभियोगाचा खटला संसदेमध्ये चालविला जातो. न्यायाधिशांवरील आरोप सिद्ध होण्यासाठी संसदेच्या दोन्ही सभाग्रहांमध्ये एकूण सभासद संख्येच्या बहुमताची आणि ठरावाच्या दिवशी सभागृहात उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सभासदांच्या $^{२}/_{३}$ बहुमताची आवश्यकता असते. आरोप सिद्ध झाल्यास राष्ट्रपतींच्या आदेशाद्वारे संबंधित न्यायाधिशाला पदच्यूत केले जाते. परंतु आजतागायत एकही न्यायाधिश या प्रक्रियेद्वारे पदच्यूत झालेला नाही.

### VI) वेतन व भत्ते :

भारतीय राज्यघटनेच्या कलम १२५ मध्ये संसद कायद्याद्वारे ठरवेल त्याप्रमाणे न्यायाधिशांना वेतन व इतर सोईसुविधा दिल्या जातील. अशी तरतूद आहे. या व्यतिरिक्त न्यायाधिशांना निवृत्तीवेतन, मोफत निवासस्थान, प्रवासभत्ता इत्यादी सुविधा पुरविल्या जातात. न्यायाधिशांच्या वेतनात आर्थिक आणिबाणीच्या काळात कपात केली जाऊ शकतो. इतर वेळी त्यात नुकसानकारक बदल केले जाऊ शकत नाहीत. तसेच सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश निवृत्तीनंतर भारतातील कोणत्याही न्यायालयात वकिली करू शकत नाहीत.

### ★ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१

**रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.**

१) सर्वोच्च न्यायालय ............. न्यायालय आहे.

अ) द्वितीय ब) कनिष्ठ क) शिखर ड) वरील सर्व बरोबर

२) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांचे निवृत्तीवय .......... आहे.

अ) ५८ वर्षे ब) ६० वर्षे क) ६२ वर्षे ड) ६५ वर्षे

३) सर्वोच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधिशांची नियुक्ती ............ करतात.

अ) पंतप्रधान ब) राष्ट्रपती क) उपराष्ट्रपती ड) लोकसभेचे सभापती

४) भारतात सर्वोच्च न्यायालयाची स्थापना राज्यघटनेच्या ........... या कलमाद्वारे झाली आहे.

अ) कलम १२४ ब) कलम २६८ क) कलम ३ ड) कलम २७३

५) भारतात ............ पद्धतीची न्यायव्यवस्था स्वीकारली आहे.

अ) एकेरी ब) दुहेरी क) तिहेरी ड) यापैकी नाही

## ४.२.२ सर्वोच्च न्यायालयाची अधिकार कामे

सर्वोच्च न्यायालयाचे कार्यक्षेत्र अतिशय व्यापक व महत्त्वपूर्ण आहे. राज्यघटनेचा अर्थ लावणे, नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करणे, केंद्र व राज्य यांच्यातील संघर्ष सोडविणे इत्यादी महत्त्वपूर्ण कामे सर्वोच्च न्यायालयास करावी लागतात. पुढील तक्त्याच्या आधारे ती अधिक स्पष्ट करता येतील.

**सर्वोच्च न्यायालयाची अधिकार कामे**

- प्रारंभिक कार्यक्षेत्र
  - एकमेव
  - मध्यवर्ती
- पुनर्निर्णयात्मक /अपिलाचे कार्यक्षेत्र
  - अर्थासंबंधी पुनर्विचार
  - कलम १३६ नुसार सोपवलेली कामे
  - स्वतःच्या निर्णयात फेरबदल करून पुन्हा निर्णय देणे
- सल्लाविषयक कार्यक्षेत्र
  - सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाच्या प्रश्नावर राष्ट्रपतींना सल्ला
- अभिलेख न्यायालय
  - न्यायालयीन निर्णय व कामकाज लेखन
- न्यायालयीन प्रशासनाबाबतची कार्ये
  - कलम १४६ नुसार सोपविलेली कामे
- न्यायालयीन पुनर्विलोकनाचे कार्य
  - घटनाबाह्य कायदे अवैध घोषित करणे

### १) प्रारंभिक अधिकारक्षेत्र : (कलम १३१)

प्रारंभिक अधिकारक्षेत्रात पुढील दोन प्रकारांचा समावेश होतो.

**I) एकमेव प्रारंभिक कार्यक्षेत्र :** जे खटले केवळ सर्वोच्च न्यायालयात चालविले जातात, इतर न्यालयात ते चालविले जात नाहीत अशा सर्व खटल्यांचा समावेश एकमेव प्रारंभिक कार्यक्षेत्रात होतो. यात तीन स्वरूपाचे खटले समाविष्ट होतात. भारत सरकार व एक किंवा अधिक घटकराज्ये यांच्यातील वाद, भारत सरकार व एक किंवा अनेक घटकराज्ये एका बाजूस आणि दुसऱ्या बाजूस एक किंवा अनेक घटकराज्ये यांतील वाद, दोन किंवा अधिक घटक राज्यांतील वाद.

**II) समवर्ती प्रारंभिक कार्यक्षेत्र :** भारतीय संविधानानुसार नागरिकांच्या मूलभूत अधिकारांच्या संरक्षणाची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयावर सोपविली आहे. मूलभूत अधिकारांच्या संरक्षणासंदर्भातील वादांचा समावेश समवर्ती प्रारंभिक कार्यक्षेत्रा अंतर्गत होतो. संविधानाच्या कलम ३२ नुसार विविध

आदेशाद्वारे सर्वोच्च न्यायालय नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करते. उदाहरणार्थ – बंदीप्रत्यक्षीकरण, परमादेश, प्रतिषेध, अधिकारपृच्छा, उत्प्रेषण लेख.

**२) पुनर्निर्णयात्मक/अपिलाचे कार्यक्षेत्र**

भारतीय संविधानाच्या कलम १३२ नुसार 'सर्वोच्च न्यायालय हे अपिलाचे अंतिम न्यायालय आहे.' उच्च न्यायालयानी दिलेल्या निर्णयाविरुद्ध अपिल स्वीकारून त्यावर पुनर्निर्णय देण्याचे कार्य सर्वोच्च न्यायालय करते. पुढील परिस्थितीत सर्वोच्च न्यायालय पूनर्निर्णयाचे कार्य करते.

- एखाद्या खटल्यामध्ये घटनेच्या अर्थासंबंधी कायद्याचा मूलभूत प्रश्न अंतर्भूत असल्याचे उच्च न्यायालयाने प्रमाणित केल्यास, अशा खटल्यावर पुनर्विचार करून निर्णय देण्याचे कार्य सर्वोच्च न्यायालय संविधानाच्या कलम १३४ (आ) नुसार करते.
- दिवाणी स्वरूपाच्या खटल्याबाबत अपिल स्वीकारून पुनर्निर्णय देण्याचे कार्य सर्वोच्च न्यायालय करते. अशावेळी संबंधीत खटल्यात कायद्याचा महत्त्वपूर्ण प्रश्न अंतर्भूत असल्याचे न्यायालयाने प्रमाणित करणे आवश्यक आहे.
- उच्च न्यायालयांनी फौजदारी खटल्याबाबत दिलेल्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपिल करता येते. सर्वोच्च न्यायालय पुनर्निर्णयासाठी आलेल्या अपिलावर पुनर्विचार करून निर्णय देण्याचे कार्य करते. याबाबत उच्च न्यायालयाने संबंधित खटला सर्वोच्च न्यायालयात अपिल करण्यास योग्य असल्याचे शिफारसपत्र देणे आवश्यक आहे. वरील तरतुदी व्यतिरिक्त सर्वोच्च न्यायालयास कलम १३६ नुसार विशेष कार्य सोपविले आहे. ज्यामध्ये सैनिकी न्यायालय सोडून भारतातील कोणत्याही न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध अपिलाची खास परवानगी सर्वोच्च न्यायालय एखाद्यास देऊ शकते.
- संविधानाच्या कलम १३७ नुसार सर्वोच्च न्यायालय हे स्वतः दिलेले निर्णय किंवा आदेशावर फेरविचार करू शकते. एखाद्या खटल्याबाबत नवीन तथ्य समोर आल्यास किंवा एखादा व्यक्ती किंवा पक्षावरती अन्याय झाल्याची शंका वाटल्यास सर्वोच्च न्यायालय स्वतः दिलेल्या निर्णयात फेरबदल करून पुनर्निर्णय देण्याचे कार्य करते. अशाप्रकारे सर्वोच्च न्यायालय विविध मार्गांनी पुनर्निर्णय देण्याचे कार्य करीत असते.

**३) सल्लाविषयक कार्यक्षेत्र (कलम १४३)**

भारतीय राज्यघटनेच्या कलम १४३ नुसार राष्ट्रपतींनी सल्ला मागितल्यास सर्वोच्च न्यायालय सल्ला देण्याचे कार्य करते. एखाद्या सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाच्या मुद्यांबाबत, ज्यामध्ये कायदा व वस्तुस्थितीचा प्रश्न उपस्थित झाला असेल, अशावेळी राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयास सल्ला विचारतात. मात्र एखाद्या प्रकरणात दिलेला सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक असत नाही. तर एखाद्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयास सल्ला देणे अनावश्यक वाटत असल्यास ते नकारही दर्शवू शकते. सर्वोच्च न्यायालयावर सल्ला देण्याचे संवैधानिक बंधन नाही. राष्ट्रपतीला केंद्र आणि घटकराज्ये यांच्यातील वाद मिटविण्यासाठी अनेक

वेळा सल्ला देण्याचे कार्य सर्वोच्च न्यायालयाने केले आहे. उदा. गुजरात विधानसभा निवडणूक प्रकरण (२००२), बाबरी मश्चिद प्रकरण अशा अनेक प्रसंगात सर्वोच्च न्यायालयाने सल्लाविषयक कार्य पार पाडले आहे.

### ४) अभिलेख न्यायालय (कलम १२९)

राज्यघटनेच्या कलम १२९ नुसार सर्वोच्च न्यायालय अभिलेख न्यायालय म्हणून ओळखले जाते. सर्वोच्च न्यायालयातील सर्व कामकाज व निर्णयविषयक कागदपत्रे लिखित किंवा अभिलेखीत करून ठेवली जातात. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय भारतातील सर्व न्यायालयांवर बंधनकारक असतात. सर्वोच्च न्यायालयाचे अभिलेखीत निर्णय भविष्यकाळात उद्भवणाऱ्या खटल्यांबाबत आधारभूत मानले जातात.

### ५) न्यायालयीन प्रशासनाबाबतचे कार्य

राज्यघटनेच्या कलम १४६ नुसार सर्वोच्च न्यायालय आपल्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या व त्याबाबत सेवाशर्ती निर्धारित करते. सर्वोच्च न्यायालय उच्च न्यायालयाच्या प्रशासनासंबंधी निर्देश देते. अशाप्रकारची न्यायालयीन प्रशासनाबाबतची कामे सर्वोच्च न्यायालयाला करावी लागतात.

### ६) न्यायालयीन पुनर्विलोकनाचे कार्य

भारतीय संघराज्य, राज्यघटना, मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयावर सोपविण्यात आली आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार दिला आहे. कायदेमंडळाने केलेले कायदे, कार्यकारी मंडळाची कृती यांचे परीक्षण करून संबंधीत कायदे किंवा कृती घटनाबाह्य असल्यास ते अवैध घोषित करण्याचा अधिकार म्हणजे न्यायालयीन पुनर्विलोकन होय.

भारतीय सर्वोच्च न्यायालय पुढील परिस्थितीत न्यायालयीन पुनर्विलोकनाचे कार्य करते.

- कायदेमंडळाने केलेला कायदा किंवा कार्यकारी मंडळाची कृती, ही त्यांच्या अधिकार मर्यादांचे उल्लंघन करीत असल्यास.
- संबंधीत कायदा व प्रशासकीय कृती ही घटनात्मक तरतुदींचे उल्लंघन करीत असल्यास.
- संबंधीत कायदा किंवा प्रशासकीय कृती ही मूलभूत अधिकारांची पायमल्ली करीत असल्यास न्यायालयीन पुनर्विलोकनाचे कार्य करून सर्वोच्च न्यायालयाने मूलभूत अधिकारांना संरक्षण मिळवून देते.

एकंदरीत सर्वोच्च न्यायालयाचे कार्यक्षेत्र व्यापक व विस्तृत स्वरूपाचे आहे. घटना निर्मात्यांनी सोपविलेली जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाने कार्यक्षमपणे पार पाडलेली आहे. संविधानाचा अधिकार व संरक्षक म्हणून सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. कार्यकारी मंडळ व कायदे मंडळाच्या स्वैर धोरणाला आळा घालून नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्यास सर्वोच्च

न्यायालयाने गेल्या ६८-६९ वर्षात सकारात्मक पाऊले उचलून भारतीय लोकशाहीला बळकट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे आजपर्यंतचे न्यायाधीश**

| अ.क्र. | सरन्यायाधिशाचे नाव | कालावधी |
|---|---|---|
| १ | एच. जे. कानिया | १९५० ते १९५१ |
| २ | एम. पी. सस्त्री | १९५१ ते १९५४ |
| ३ | एम. सी. महाजन | १९५४ ते १९५४ |
| ४ | बी. के. मुखर्जी | १९५४ ते १९५६ |
| ५ | एस. आर. दास | १९५६ ते १९५९ |
| ६ | बी. पी. सिंह | १९५९ ते १९६४ |
| ७ | पी. बी. गर्जेंद्रगडकर | १९६४ ते १९६६ |
| ८ | ए. के. सरकार | १९६६ ते १९६६ |
| ९ | के. एस. राव | १९६६ ते १९६७ |
| १० | के. एन. वांछू | १९६७ ते १९६८ |
| ११ | एम. हिदायतूल्लाह | १९६८ ते १९६९ |
| १२ | जे. सी. शाह | १९७० ते १९७१ |
| १३ | एस. एम. सिक्री | १९७१ ते १९९३ |
| १४ | ए. एन. रे | १९७३ ते १९७७ |
| १५ | एम. एच. बेग | १९७७ ते १९७८ |
| १६ | वाय. व्हि. चंद्रचूड | १९७८ ते १९८५ |
| १७ | पी. एन. भगवती | १९८५ ते १९८६ |
| १८ | आर. एस. पाठक | १९८६ ते १९८९ |
| १९ | ई. एस. वेंकटरमेय्या | १९८९ ते १९८९ |
| २० | एस. मुखर्जी | १९८९ ते १९९० |

| | | |
|---|---|---|
| २१ | आर. मिश्रा | १९९० ते १९९१ |
| २२ | के. एन. सिंग | १९९१ ते १९९१ |
| २३ | एम. एच. कनिया | १९९१ ते १९९२ |
| २४ | एल. एम. शर्मा | १९९२ ते १९९३ |
| २५ | एम. एन. वेंकटचेलय्या | १९९३ ते १९९४ |
| २६ | ए. एम. अहमदी | १९९४ ते १९९७ |
| २७ | जे. एस. वर्मा | १९९७ ते १९९८ |
| २८ | एम. एम. पूंछी | १९९८ ते १९९८ |
| २९ | ऐ. एस. आनंद | १९९८ ते २००१ |
| ३० | एस. पी. भरूचा | २००१ ते २००२ |
| ३१ | बी. एन. किरपाल | २००२ ते २००२ |
| ३२ | जी. बी. पटनाईक | २००२ ते २००२ |
| ३३ | व्ही. एन. खरे | २००२ ते २००४ |
| ३४ | एस. आर. बाबू | २००४ ते २००४ |
| ३५ | आर. सी. लाहोटी | २००४ ते २००५ |
| ३६ | अय के. सभरवाल | २००५ ते २००७ |
| ३७ | के. जी. बाळकृष्णन | २००७ ते २०१० |
| ३८ | एस. एच. कपाडीया | २०१० ते २०१२ |
| ३९ | ए. कबीर | २०१२ ते २०१३ |
| ४० | छी. सथशिवम् | २०१३ ते २०१४ |
| ४१ | आर. एम. लोढा | २०१४ ते २०१४ |
| ४२ | एच. एल. दत्तू | २०१४ ते २०१५ |
| ४३ | टी. एस. ठाकूर | २०१५ ते २०१७ |
| ४४ | जे. एस. खेहर | २०१७ ते २०१७ |

| | | |
|---|---|---|
| ४५ | दिपक मिश्रा | २०१७ ते २०१८ |
| ४६ | रंजन गोगोई | २०१८ पासून.... |

★ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-२

पुढील विधाने चूक की बरोबर आहेत ते लिहा.

१) सर्वोच्च न्यायालय अपिलाचे अंतिम न्यायालय आहे.

२) सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला राष्ट्रपतीवर बंधनकारक असतो.

३) भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ अन्वये सर्वोच्च न्यायालय मुलभूत अधिकारांचे रक्षण करते.

४) भारतीय राज्यघटनेच्या कलम १२९ नुसार सर्वोच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय म्हणून ओळखले जाते.

## ४.२.३ न्यायालयीन पुनर्विलोकन

**प्रास्ताविक :**

न्यायव्यवस्थेत 'न्यायालयीन पुनर्विलोकन' या संकल्पनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कायदेमंडळाने केलेला कायदा घटनात्मक तरतुदीशी विसंगत असल्यास संबंधित कायदा अवैध ठरविण्याचा अधिकार न्यायमंडळाला असणे म्हणजे न्यायालयीन पुनर्विलोकन होय. न्यायालयीन पुनर्विलोकनाला 'न्यायालयीन सिंहावलोकन' असेही म्हणतात. कारण कायदेमंडळाने किंवा कार्यकारी मंडळाने घेतलेल्या निर्णयाकडे/कृतीकडे न्यायमंडळ या अधिकाराद्वारे सिंहाप्रमाणे मागे वळून पाहते आणि त्याची योग्यायोग्यता पडताळून पाहते.

**भारतीय राज्यघटना व न्यायालयीन पुनर्विलोकन**

भारतीय राज्यघटनेत न्यायालयीन पुनर्विलोकन अशी स्पष्ट शब्दरचना कोठेही आढळत नाही. परंतु संविधानातील काही तरतुदी न्यायमंडळास न्यायालयीन पुनर्विलोकनाची सत्ता किंवा अधिकार प्रदान करतात. त्या तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत.

अ) भारतीय राज्यघटना कलम १३ नुसार, राज्याद्वारे केलेल्या कायद्यामुळे मुलभूत अधिकारांचे उल्लंघन होत असल्यास संबंधित कायदा अवैध घोषित केला जातो. कलम ३२ नुसार, राज्याद्वारे केलेल्या कायद्यामुळे मुलभूत अधिकारांचे उल्लंघन होत असल्यास संबंधित कायदा अवैध घोषित केला जातो. कलम ३२ नुसार, घटनात्मक उपाययोजनेच्या आधारे कोणतीही व्यक्ती आपल्या मुलभूत अधिकारांवरील अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागू शकते. कलम २२६ नुसार, मुलभूत अधिकारांच्या रक्षणाची जबाबदारी उच्च न्यायालयावर सोपविली आहे.

वरील कलमांच्या आधारे न्यायमंडळ नागरिकांच्या मुलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी कायदेमंडळाचे कायदे व कार्यकारी मंडळाचे निर्णय व कृती यांचे पुनर्विलोकन करू शकते.

ब) भारतीय राज्यघटनेच्या कलम १३२ नुसार, राज्यघटनेचा अर्थ लावण्यासंदर्भातील खटले सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केले जातात. अशा स्वरूपाच्या संविधानिक खटल्यावर निर्णय देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. या कलमाच्या आधारे न्यायमंडळ न्यायालयीन पूनर्विलोकनाचा अधिकार वापरते.

क) भारतीय राज्यघटनेच्या कलम २४६ मध्ये केंद्र आणि राज्य यांच्या कायदेविषयक अधिकारक्षेत्रांची स्पष्ट नोंद केली आहे. यानुसार केंद्र आणि राज्य यांची कायदे निर्मितीची अधिकारमर्यादा निश्चित केली आहे. केंद्र किंवा राज्य यांनी आपल्या अधिकारक्षेत्राच्या बाहेरील विषयावर कायदा केल्यास संबंधित कायदा अवैध घोषित करण्याचा हक्क न्यायमंडळाला आहे.

ड) भारतीय राज्यघटना कलम ३६८ नुसार घटनादुरुस्तीची प्रक्रिया स्पष्ट केली आहे. राज्यघटनेच्या विशिष्ट कलमांमध्ये दुरुस्ती करताना संसद व राज्यविधीमंडळाच्या मान्यतेची आवश्यकता असते. एखादी घटनादुरुस्ती या प्रक्रियेनुसार झालेली नसेल तर न्यायमंडळ संबंधित घटनादुरुस्ती अवैध ठरवून रद्द करू शकते.

एकंदरीत, लिखित व ताठर राज्यघटना, मुलभूत अधिकारांची व्यवस्था, केंद्र आणि राज्य यांतील सत्ताविभाजन ह्या बाबी भारतीय न्यायमंडळास न्यायालयीन पुनर्विलोकनाची सत्ता प्रदान करतात.

**न्यायालयीन पुनर्विलोकनाचा उदय**

न्यायालयीन पुनर्विलोकन या संकल्पनेचा उदय सर्वप्रथम १८०३ मध्ये अमेरिकेत झाला. अमेरिकेकडून ही संकल्पना भारतीय न्यायव्यवस्थेत स्वीकारण्यात आली. परंतु भारतीय संघराज्य व अमेरिकन संघराज्य यांत न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या बाबतीत बरीच तफावत आहे. अमेरिकन शासन प्रणालीत न्यायालयीन पुनर्विलोकनाची प्रक्रिया अत्यंत प्रभावीपणे वापरली जाते. कारण अमेरिकन संविधानाने न्यायालयीन सर्वोच्चता मान्य केली आहे. याउलट इंग्लंडच्या शासनप्रणालीत ‘संसदीय सर्वोच्चता’ मान्य केली आहे. भारतीय शासनव्यवस्थेत या दोन्हीचा सुवर्णमध्य साधून ‘संविधानिक सर्वोच्चता’ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

अमेरिकन न्यायमंडळास न्यायालयीन पूनर्विलोकनाबाबत व्यापक अधिकार प्राप्त झाले आहेत. कारण अमेरिकन संविधानात 'Due process of Law' (कायद्याची उचित प्रक्रिया) अशी शब्दरचना स्वीकारली आहे. परंतु भारतीय संविधानात, जपानी संविधानाप्रमाणे 'Procedure Established by Law' (कायद्याद्वारे स्थापित प्रक्रिया) अशी शब्दरचना स्वीकारली आहे. ही शब्दरचनाच अमेरिकन न्यायमंडळास कायद्याचे परीक्षण करण्याचे विस्तृत अधिकार प्राप्त करून देते. या शब्दरचनेनुसार अमेरिकन न्यायमंडळास एखाद्या कायद्याची उचीतता व अनुचीतता पडताळण्याचा हक्क प्राप्त झालेला आहे. अर्थात हा अधिकार

अमेरिकन न्यायमंडळाचा स्वविवेकाधीन अधिकार आहे. विधिमंडळाने केलेला कायदा नैसर्गिक न्यायाच्या काही सर्वमान्य सिद्धांताच्या विरुद्ध असेल तर असा कायदा न्यायमंडळाकडून रद्द ठरविला जातो. अमेरिकन न्यायमंडळाप्रमाणे भारतीय न्यायमंडळ कायद्याची उचीतता वा अनुचीतता नैसर्गिक न्यायाच्या आधाराने पडताळून पाहू शकत नाही. कारण भारतीय राज्यघटनेने 'कायद्याद्वारे स्थापित प्रक्रिया' अशी शब्दरचना स्वीकारली आहे. या शब्दरचनेनुसार भारतीय न्यायमंडळ हे विधिमंडळानी केलेला कायदा तेव्हाच रद्द करू शकते, जेव्हा संबंधित कायदेमंडळाने आपल्या कायदा निर्माण करण्याच्या क्षमतेचे उल्लंघन केले असेल.

थोडक्यात भारतीय राज्यघटना निर्माते देखील नयायमंडळास न्यायालयीन पूनर्विलोकनाची व्यापक अधिकारीता देण्यास उत्सुक नव्हते. याबाबत पंडीत ज. नेहरू यांनी संविधान सभेत असे मत व्यक्त केले होते की, ''कोणतेही न्यायालय अथवा सर्वोच्च न्यायालय स्वतःला कायदेमंडळाचे तिसरे सभागृह बनवू शकत नाही. कोणतेही न्यायालय सर्व जनतेचे प्रतिनिधी असणाऱ्या संसदेच्या इच्छेला विरोध करू शकत नाही. आम्ही केलेल्या त्रुटी ते सांगू शकते परंतु जिथे सर्व समुदायाच्या भविष्याचा प्रश्न आहे. तिथे न्यायपालिका अडथळा बनू शकत नाही.''

**न्यायालयीन पुनर्विलोकनाबाबत न्यायमंडळाची भूमिका**

राज्यघटनेच्या अंमलबजावणीपासून आजतागायत न्यायमंडळाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण राहिलेली आहे. न्यायमंडळाने न्यायालयीन पुनर्विलोकनाबाबत अनेक निर्णय दिले आहेत. भारतीय संघराज्य व मुलभूत अधिकारांशी संबंधित संसदेने केलेले कायदे अवैध घोषित केले आहेत. पुढील मुद्यांच्या आधारे न्यायमंडळाची याबाबतची भूमिका स्पष्ट करता येईल.

सर्वप्रथम १९५१ साली ए. के. गोपालन विरुद्ध मद्रास राज्य खटल्यात न्यायालयाने 'निवारक निरोध अधिनियम' चे १४ चे खंड असंवैधानिक ठरवून रद्द घोषित केले. तेव्हापासून न्यायमंडळाने न्यायालयीन पुनर्विलोकन या अधिकाराचा वापर करून कायदेमंडळानी केलेल्या कायद्याची घटनात्मकता तपासली आहे. १९६७ साली गोलखनाथ विरुद्ध पंजाब राज्य या खटल्याबाबत निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण मत नोंदविले की, संविधानाच्या तिसऱ्या भागात नमूद केलेल्या मुलभूत अधिकारांमध्ये दुरुस्ती करण्याचा अधिकार संसदेला कलम ३६८ अन्वये प्राप्त होत नाही. या ऐतिहासिक निर्णयामुळे संसदेच्या कायदे निर्मितीच्या सत्तेला/अधिकाराला न्यायमंडळाकडून मोठे आव्हान देण्यात आले. पुढे 'संसद श्रेष्ठ की न्यायमंडळ श्रेष्ठ' हा वाद समोर आला. मात्र १९७३ ला केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य या खटल्याचा निर्णय देताना न्यायालयाने पूर्वी स्वतः दिलेल्या निर्णयात बदल करून असे स्पष्ट केले की, घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आलेला आहे. राज्यघटनेच्या कलम ३६८ नुसार संसद मुलभूत अधिकारांसह राज्यघटनेच्या कोणत्याही भागात दुरुस्ती करू शकते. परंतु पुढे न्यायालयाने असेही स्पष्ट केले की, 'संविधानाची मूळ चौकट' नष्ट होईल इथपर्यंत संसद या अधिकाराचा वापर करू शकत नाही. परिणामी या निर्णयाने संसदेच्या कायदे निर्मितीच्या अधिकारात व क्षमतेत काही अंशी वाढ झाली असे म्हणता येते.

**न्यायालयीन पुनर्विलोकनाचे समर्थन**

प्रा. मन्रो, डिमॉक आणि डिमॉक, प्रो.डायसी व केंट या विचारवंतांनी न्यायालयीन पुनर्विलोकनाचे समर्थन केले आहे. त्याची मांडणी पुढीलप्रमाणे आहे.

i) न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला मिळाल्याने ते नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करते. नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर आक्रमण झाल्यास सर्वोच्च न्यायालय त्या गोष्टी, कायदे पुनर्विलोकनाद्वारे रद्द ठरवते.

ii) न्यायालयीन पुनर्विलोकनामुळे संघराज्य शासनपद्धतीला स्थैर्य लाभते. तसेच घटक राज्यांची स्वायत्तता व अधिकारांचे संरक्षण होते.

iii) न्यायालयीन पूनर्विलोकनामुळे कायदेमंडळाकडून योग्य व सुसंगत कायद्याची निर्मिती होऊ शकते.

iv) न्यायालयीन पुनर्विलोकनामुळे राज्यघटनेचे पावित्र्य राखले जाते. राज्यघटनेतील तत्त्वे, नियमांचे रक्षण करण्याची महत्त्वपूर्ण भूमिका न्यायालयाला पार पाडावी लागते.

v) न्यायालयीन पुनर्विलोकनामुळे अल्पसंख्यांकाना संरक्षण मिळते.

**परीक्षण**

न्यायालयीन पुनर्विलोकनाचा वापर आजपर्यंत न्यायालयाने विवेकपूर्ण केला आहे. परंतु इ.स. १९६७ ते १९७३ या काळात दिलेल्या अनेक निर्णयात न्यायालयाची भूमिका वादग्रस्त व आक्षेपार्ह राहिलेली आहे. त्याची चर्चा पुढील मुद्यांच्या आधारे करता येते.

i) १९५०-५१ साली जमिनदारी व जहागिरदारी निर्मुलनांतर्गत संमत केलेल्या भूसुधारणा कायद्यांना रद्द करून न्यायमंडळाने सुधारणा असा प्रत्यय दिला.

ii) १९६७ साली गोलकनाथ खटल्यात न्यायालयाने संसदेच्या घटनादुरुस्तीच्या अधिकाराला संकुचित करणारा निर्णय दिला. याबाबत माजी संसद सदस्य सुरेंद्रनाथ द्विवेदी यांनी असे मत मांडले की, ''या देशात न्यायमंडळ विशिष्ठ वर्गाच्या हिताचे प्रतिनिधित्व करीत आहे असे वाटते. कायद्याचा अर्थ लावताना न्यायालय राज्यघटनेसमोर ठेवलेल्या सामाजिक उद्देशांना दुर्लक्षित करू शकत नाही.''

iii) सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या आधारे दिलेल्या निर्णयात वारंवार बदल करून घटनात्मक कायद्याबाबत संभ्रम निर्माण केला आहे. उदाहरणार्थ, गोलकनाथ खटला (१९६७) व केशवानंद भारती खटला (१९७३).

iv) या अधिकाराचा वापर करून न्यायमंडळाने संसद विरुद्ध न्यायमंडळ या वादाला जन्म दिला आहे. प्रगल्भ लोकशाही व शासनपद्धतीच्या विकासासाठी ही धोक्याची सूचना आहे असे वाटते.

थोडक्यात, न्यायमंडळाने या अधिकाराचा वापर करून स्वतःच्या अधिकारमर्यादाचे उल्लंघन केले आहे. भारतीय घटनाकारांना देखील या अधिकाराची व्यापकता मान्य नव्हती असे पंडीत नेहरूंच्या संविधान सभेतील वक्तव्यावरून स्पष्ट होते. या अधिकारामुळे सामाजिक व आर्थिक जीवनामध्ये अस्थिरता निर्माण झाली आहे. विकासाला बाधक अशी न्यायमंडळाची भूमिका राष्ट्रहितासाठी धोकादायक ठरू शकते. याविषयी मत व्यक्त करताना माजी केंद्रीय कायदामंत्री गोखले म्हणाले की, 'न्यायालय कायदेविषयक मुद्यांवर निर्णय देऊ शकते. राजकीय व आर्थिक मुद्यांवर निर्णय देण्याचा अधिकार न्यायालयास नाही. संसद, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांचे समान महत्त्व आहे. न्यायमंडळाचे महत्त्व कमी नाही परंतु राजकीय व आर्थिक प्रश्न न्यायमंडळाच्या अधिकार क्षेत्राबाहेरचे आहेत.

**न्यायालयीन पुनर्विलोकनाचे महत्त्व**

कायदेतज्ञ, राजकीय नेतृत्व, अभ्यासकांनी न्यायमंडळाच्या भूमिकेवर विविधांगी आक्षेप घेतले आहेत. तरीही न्यायमंडळाची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे. मुलभूत अधिकारांच्या रक्षणार्थ न्याय मंडळ नेहमीच संवेदनशिल राहिले आहे. प्रातिनिधिक लोकशाहीत बहुमताची हुकूमशाही निर्माण होऊ नये याबाबत नेहमी दक्ष राहिले आहे. न्यायमंडळावर सुधारणाविरोधी अशी टीका केली जाते. परंतु ही टीका फोल असल्याचे स्पष्ट करताना सोली सोराबजी असे मत व्यक्त करतात की, 'कर्मचारी भविष्य निधी अधिनियम'', 'बोनस वाटप अधिनियम' इत्यादीच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. परंतु न्यायालयाने त्यास वैध घोषित केले. न्यायालयाने औद्योगिक विषयावर निर्णय देताना मालकांच्या हितापेक्षा कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याचा दृष्टीकोन बाळगला आहे.' न्यायमंडळाने स्वतः दिलेल्या निर्णयात अनेकवेळा बदल केले आहेत. ज्यामुळे न्यायमंडळाने विकासमूलक संविधानालाच पाठपुरावा दिला आहे हे स्पष्ट होते.

**४.२.४ न्यायालयीन स्वातंत्र्य (Judicial Independence)**

न्यायालयीन स्वातंत्र्य ही संकल्पना आधुनिक लोकशाही राज्यातील महत्त्वाची संकल्पना आहे. लोकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे आणि लोकशाही तत्त्वांची जोपासणा करून लोकशाहीचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी न्यायालयीन स्वातंत्र्य आवश्यक असते. देशातील नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्याबरोबरच संविधानाचे पावित्र्य जपण्याची जबाबदारी न्यायालयाची आहे. न्यायालयीन स्वातंत्र्य ही संकल्पना सत्ता विभाजनाच्या सिद्धांतातून पुढे आली आहे. न्यायालयीन स्वातंत्र्यासाठी पहिला महत्त्वाचा भाग म्हणजे कायदेमंडळ व कार्यकारीमंडळ यापासून न्यायमंडळ सुस्पष्टपणे वेगळे (अलग) असले पाहिजे. हे कार्यविभाजन लक्षात घेवून न्यायदान करणाऱ्या व्यक्ती सरकारचा किंवा कायदेमंडळाचा भाग असून चालणार नाहीत. न्यायाधीश हे शासन संस्थेला कोणत्याही प्रकारे बांधील असून चालणार नाही. यामधील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे न्यायनिर्णय करताना कायदा आणि संविधान यांच्या पलिकडे कशाचाही प्रभाव न्यायालयावर पडता कामा नये. सरकारला एखादा निर्णय आवडेल की नाही, पटेल की नाही, याचा विचार न करता कोणता निर्णय संविधान, लोकशाहीचे तत्त्वज्ञान आणि न्यायबुद्धी यांना धरून आहे यावर न्यायनिर्णय व्हायला हवेत, हे न्यायालयीन स्वातंत्र्यात अभिप्रेत असते.

न्यायालयीन स्वातंत्र्य असेल तरच नागरिकांचे मूलभूत हक्क, संविधानातील तत्त्वे-मूल्ये यांचे संरक्षण होत असते. न्यायालयीन स्वातंत्र्याचे हे महत्त्व लक्षात घेवून संविधानातच त्यासंदर्भात काही तरतुदी करून ठेवलेल्या आहेत. त्यामध्ये न्यायाधीशांची नेमणूक, बदली, बढती, निवृत्ती, वेतन, त्यांना मिळणारे संरक्षण, पदच्युती यांचा समावेश होतो. संविधानाने संविधानात्मक तरतुदी करून न्यायमंडळाला कायदेमंडळ व कार्यकारी मंडळापासून स्वतंत्र ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. कार्यकारी मंडळ (पंतप्रधान, मंत्रीमंडळ) आणि कायदेमंडळ (संसद) यांचे अतिक्रमण, दबाव आणि हस्तक्षेपापासून न्यायालय मुक्त असावे. कोणत्या दबावाला किंवा प्रलोभनाला बळी न पडता न्यायदान करावे, निष्पक्षपातीपणे कायद्याच्या चौकटीत निर्णय घ्यावेत. यासाठी संविधानात्मक तरतुदी पुढीलप्रमाणे केल्या आहेत.

**१. न्यायाधीशांची नियुक्ती :–** सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नियुक्त्या या कोणत्याही राजकीय किंवा व्यावहारिक हितसंबंधाच्या आधारावर होत नाहीत. न्यायाधीशांना निर्भिडपणे, स्वतंत्रपणे, तटस्थपणे न्यायदान करता यावे यासाठी त्यांच्या नियुक्त्या निष्पक्षपणे व योग्य पद्धतीने पात्रता, क्षमता, गुणवत्ता या आधारावर झाल्या पाहिजेत. सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधीशांची नियुक्ती राष्ट्रपती करतात आणि त्यांच्या मदतीने इतर न्यायाधीशांची नियुक्ती केली जाते. वास्तवात न्यायाधीशांच्या नेमणुका करताना सत्तारूढ पक्ष त्यामध्ये हस्तक्षेप करताना किंवा आपला प्रभाव टाकत असताना दिसतो. या न्यायाधीशांकडून स्वतंत्रपणे, निष्पक्षपातीपणे न्यायदान होईल याची शाश्वती देता येत नाही. भारतीय सर्वोच्च न्यायालयाच्या इतिहासात काही वेळा न्यायाधीशांचा ज्येष्ठता क्रम डावलून कनिष्ठ न्यायाधीशांना वरिष्ठ पदावर नेमले होते. १९७३ साली न्यायमुर्ती हेगडे, न्यायमूर्ती शेलाट व न्यायमूर्ती ग्रोव्हर यांची ज्येष्ठता डावलून न्यायमूर्ती रे यांची नेमणूक केली होती.

**२. कार्यकालाची हमी :–** सर्वोच्च व उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना कार्यकालाची हमी देण्यात आली आहे. न्यायाधीशांना कार्यकालाची सुरक्षितता देण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश आपल्या वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत पदावर रहात असतात. राष्ट्रपतींनी त्यांची नियुक्ती केलेली असली तरी राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत ते पदावर राहतात असे नाही. भारतीय संविधानाने न्यायाधीशांना सेवेची शाश्वती-हमी दिलेली आहे. सेवा-निवृत्तीच्या काळापर्यंत ते आपल्या पदावर निर्धास्तपणे रहात असतात. त्याचप्रमाणे गैरवर्तन, भ्रष्टाचार, अशोभनीय वर्तन या कारणास्तव न्यायाधीशांना पदावरून काढून टाकण्यासाठी महाभियोगाची प्रक्रिया अवलंबली जाते. महाभियोगाची पद्धती अवघड स्वरूपाची असल्याने न्यायाधीशांना कोणी आकस बुद्धीने किंवा मुद्दामहून काढू शकत नाही. त्यामुळे न्यायाधीश आपली कार्ये, जबाबदारी निर्धास्तपणे पार पाडू शकतात.

**३. न्यायाधीशांचे वेतन, सुखसुविधा :–** न्यायाधीशांना वेतन व सुखसुविधा मिळणे न्यायालयीन स्वातंत्र्यासाठी आवश्यक आहे. न्यायाधीशांना चांगले वेतन असल्यास ते पैशाच्या अमिषांना बळी पडणार नाहीत. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे वेतन, भत्ते, निवृत्तीवेतन, सुखसुविधा या बाबी संसदेकडून वेळोवेळी निश्चित केल्या जातात. आर्थिक आणीबाणीचा (कलम ३६०) अपवाद वगळता न्यायाधीशांच्या नियुक्तीनंतर त्यामध्ये बदल करता येत नाही. सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधीशांना सद्या दरमहा २.८०

लाख वेतन व इतर न्यायाधीशांना २.५० लाख वेतन याशिवाय इतर भत्ते, निवासस्थान व सुखसोयी प्राप्त होतात. न्यायाधीशांना कमी वेतन दिले जात असल्यास हुशार, नावाजलेले वकील न्यायाधीश पद स्वीकारण्यास उत्सुक असत नाहीत.

सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश आणि कर्मचारी यांचे वेतन, भत्ते आणि निवृत्तीवेतन तसेच न्यायालयाचा प्रशासकीय खर्च भारताच्या संचित निधीतून केला जातो. त्यामुळे खर्चाच्या विषयावर संसदेला मतदान करता येत नाही फक्त चर्चा करता येते.

**४. निवृत्तीनंतर पद मुक्त :–** न्यायालयीन स्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठी न्यायाधीशांच्या निवृत्तीनंतर त्यांनी कोणतेही पद घेवू नये. सामान्यत: न्यायाधीशांना भविष्यात कोणत्याही पदाची अपेक्षा असेल तर ते स्वतंत्रपणे, निर्भयपणे न्याय देवू शकणार नाहीत. त्याचप्रमाणे विद्यमान सरकारच्या विरोधात निर्णय देण्याचे धाडस दाखवू शकणार नाहीत. म्हणून सेवानिवृत्तीनंतर न्यायाधीशांनी कोणतेही पद स्वीकारू नये. त्याचबरोबर निवृत्त न्यायाधीशांना कोणत्याही न्यायालयात वकिली करता येणार नाही, अशी संविधानात्मक तरतुद केली आहे. परंतु विविध आयोग आणि चौकशी समित्यावर निवृत्त न्यायाधीशांची नेमणूक केली जाऊ शकते.

**५. न्यायिक श्रेष्ठत्व :–** सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी आपण न्यायदान करताना घेतलेल्या निर्णयाबाबत संसदेत किंवा कोणत्याही राज्य सरकारच्या विधीमंडळामध्ये चर्चा करण्यास बंदी असते. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायाबाबत टिका टिपणी केली जात नाही. सर्वोच्च न्यायालय त्याच्या अवमानासाठी कोणलाही शिक्षा करू शकते. त्यामुळे न्यायालयाच्या निर्णयावर कोणीही टिका करीत नाही. तसेच त्यास विरोध करीत नाही. आपली अधिसत्ता, प्रतिष्ठा आणि सन्मान अबाधित राखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयांना हा अधिकार दिला आहे.

**६. न्यायिक अधिकारक्षेत्र :–** सर्वोच्च न्यायालयाचे न्यायिक अधिकारक्षेत्र संविधानाने निश्चित केले आहे. ते निश्चित केलेल्या अधिकार क्षेत्राचा संकोच कोणालाही करता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र कमी करण्याचा अधिकार संसदेला नाही. विविध स्वरूपाचे न्यायिक अधिकारक्षेत्र संविधानानेच निश्चित केले आहे. असे असले तरी न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात संसद वाढ करू शकते.

**७. कर्मचारी नियुक्तीचे स्वातंत्र्य :–** सर्वोच्च व उच्च न्यायालयात न्यायाधीशांबरोबरच कर्मचारी वर्गही महत्त्वाचा असतो. हा कर्मचारी वर्ग नियुक्तीचे स्वातंत्र्य न्यायालयास आहे. कोणत्याही प्रकारच्या कार्यकारी मंडळाच्या हस्तक्षेपाशिवाय स्वतंत्रपणे सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायालयातील अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करतात. त्याचबरोबर त्यांच्या सेवाशर्तीही ठरवितात.

कायद्याचे राज्य प्रत्यक्षात यावे, नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे प्रभावीपणे संरक्षण केले जावे, लोकशाही मूल्यांची जोपासणा व्हावी, लोकशाही कार्यपद्धतीशी संबंधित अशा सर्व व्यवहारांचे यथायोग्य नियंत्रण व्हावे यासाठी न्यायालयांचे स्वातंत्र्य महत्त्वाचे असते. सर्वोच्च व उच्च न्यायालयात येणारे खटले केवळ कायद्याच्या तांत्रिक प्रश्नांच्या पुरते किंवा खालच्या कोर्टातून अपिलास आलेल्या खटल्यांच्या पूरते मर्यादित नसतात. तिथे संवैधानिक प्रश्न, त्याचे अर्थ, कायद्याची मूलभूत तत्त्वे अंतर्भूत असणारे प्रश्न आणि

ज्या प्रश्नांमध्ये राजकारण, सैद्धांतिक भूमिका आणि संविधानाची तत्त्वे एकत्रपणे गुंतलेले असतात असे खटले येतात. त्याचबरोबर मूलभूत अधिकारांच्या संरक्षणाची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयावर आहे. त्यामुळे किती तरी खटले हे सरकारच्या विरोधातले असतात त्यात न्यायालयांना सरकारच्या विरोधात निर्णय देण्याची वेळ येवू शकते. संविधान आणि त्याच्या पाठीमागे असणारे कायद्याच्या राज्याचे तत्त्व यांचा कठोरपणे पाठपुरावा करणे ही न्यायालयाची जबाबदारी असते, कारण लोकशाहीत जशी राजकीय स्पर्धा असते तसेच कायद्याचे राज्य आणि नागरिकांचे अधिकार या बाबी लोकशाहीत अनिवार्य असतात आणि त्यांची निगराणी ही न्यायालयाची जबाबदारी असते. ती पार पाडणे हा न्यायालयीन स्वातंत्र्याचा उद्देश असतो.

वादग्रस्त कायद्याच्या विरोधातील खटले झटपट सुनावणीला न घेणे, अटकेत असलेल्या राजकीय आरोपींचे बंदी प्रत्यक्षीकरणचे (हेबियस कॉर्पस) खटले प्राधान्याने विचारात घेण्याचे टाळणे, यासारख्या न्यायालयाच्या भूमिकेमूळे न्यायालयीन स्वातंत्र्याबद्दल लोकांच्या मनात प्रश्न उभे राहतात. यामुळे न्यायालयाच्या मार्फत गुंतागुंतीचे राजकीय-संवैधानिक प्रश्न सुटू शकतात या जनतेच्या विश्वासाला तडा जावू शकतो. कायद्याचे राज्य ही लोकशाहीतील मध्यवर्ती कल्पना दुबळी होवू शकते. तसेच सर्वात महत्त्वाचे म्हणजे न्यायालय ही स्वतंत्र-स्वायत्त अशी यंत्रणा आहे हा विश्वास कमी होवू शकतो आणि त्यातून न्यायालयीन स्वातंत्र्य या तत्त्वाचे महत्त्व कमी होवू शकते.

संविधान न्यायालयाला स्वातंत्र्य बहाल करू शकते पण ते वापरून आपली प्रतिष्ठा द्विगुणीत कशी करायची हे न्यायालयांच्या कामगिरीवर अवलंबून असते. म्हणजेच अंतिमत: न्यायालयाचे स्वातंत्र्य हे न्यायालये जेवढ्या स्वतंत्रपणे निर्णय देतील, तेवढीच न्यायालयीन स्वातंत्र्याची व्याप्ती असू शकते. न्यायालये आणि न्यायाधीश जेवढे निर्भय आणि तत्त्वनिष्ठ असतील तेवढ्या प्रमाणात न्यायालयांचे स्वातंत्र्य प्रत्यक्षात येवू शकेल.

★ **स्वयं अध्ययन प्रश्न-३**

**पुढील विधाने चूक की बरोबर ते ओळखा**

१) 'न्यायालयीन पुनर्विलोकन' अशी शब्दरचना भारतीय राज्य घटनेत स्पष्ट केली आहे.

२) भारतात न्यायालयीन पुनर्विलोकन अधिकारावर काही मर्यादा आहेत.

३) न्यायालयीन पुनर्विलोकन संकल्पनेचा उदय अमेरिकेत झाला.

## ४.३ पारिभाषिक शब्द

**प्रिव्ही कौन्सिल** (Privy Council) प्रिव्ही कौन्सिल ही युनायटेड किंग्डमच्या न्यायव्यवस्थेचे अविभाज्य अंग आहे. ब्रिटीश साम्राज्यांतर्गत येणाऱ्या, अर्थात राष्ट्रमंडळातील सदस्यराष्ट्रासाठी ते शिखर न्यायालय होते. ब्रिटनस्थित प्रिव्ही कौन्सिल हे स्वातंत्र्यपूर्व भारताचे अपिलाचे अंतिम न्यायालय आहे. त्यात हाऊस ऑफ लॉर्डस् सभागृहातील सदस्य, लॉर्ड चान्सलर व इतर कायदेतज्ञाचा समावेश होतो.

**शिखर न्यायालय :** अंतिम, सर्वोच्च न्यायालय

**उचीतता व अनुचीतता :** योग्यायोग्यता तपासणे

**संविधान दुरुस्ती :** घटनादुरुस्ती, विशोधन

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

★ **स्वयं अध्ययन प्रश्न–१ ची उत्तरे**

१) शिखर २) ६५ वर्षे ३) राष्ट्रपती ४) कलम १२४ ५) एकेरी

★ **स्वयं अध्ययन प्रश्न–२ ची उत्तरे**

१) बरोबर २) चूक ३) बरोबर ४) बरोबर

★ **स्वयं अध्ययन प्रश्न–३ ची उत्तरे**

१) चूक २) बरोबर ३) बरोबर

## ४.५ सारांश

भारतीय न्यायदान प्रक्रियेतील सर्वोच्च न्यायालय व न्यायालयीन पुनर्विलोकन हे मुद्दे आपण पाहिले. त्याचा सारांश पुढीलप्रमाणे आहे.

**१) सर्वोच्च न्यायालय :**

**रचना :** पार्श्वभूमी, न्यायाधिशांची पात्रता, नियुक्ती, संख्या, कार्यकाल, महाभियोग, वेतन व भत्ते.

**अधिकार कामे :** प्रारंभिक कार्यक्षेत्र, पुनर्निर्णयात्मक कार्यक्षेत्र, सल्लाविषयक कार्यक्षेत्र, अभिलेख न्यायालय, न्यायालयीन प्रशासनाबाबतची कार्ये, न्यायालयीन पुनर्विलोकनाचे कार्य.

**२) न्यायालयीन पुनर्विलोकन :**

पार्श्वभूमी, भारतीय राज्यघटना व न्यायालयीन पुनर्विलोकन, उदय, न्यायालयीन पुनर्विलोकनाबाबत न्यायमंडळाची भूमिका, न्यायालयीन पुनर्विलोकनाचे समर्थन, परीक्षण, महत्त्व.

**३) न्यायालयीन स्वातंत्र्य :**

न्यायालयीन स्वातंत्र्याची आवश्यकता, संविधानात्मक तरतूदी, महत्त्व.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) सविस्तर उत्तरे लिहा.

१) सर्वोच्च न्यायालयाची रचना व अधिकार कामे विषद करा.

ब) टीपा लिहा.

१) न्यायालयीन पुनर्विलोकन

२) सर्वोच्च न्यायालयाची रचना

३) न्यायालयीन स्वातंत्र्य

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१) भारताचे संविधान, भारत सरकार, विधीमंत्रालय प्रकाशन १९९६.

२) भोळे भा. ल, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे ॲण्ड पब्लिशर्स, नागपूर, जून, २००३.

३) देशमुख बी. टी., भारतीय संविधान, पिंपळापुरे ॲण्ड पब्लिशर्स, नागपूर, जुलै २०००.

४) जोशी प. ल., भारतीय संविधान : शासन व राजकारण, विद्या प्रकाशन, नागपूर, १९७७.

५) Basu D. D., Introduction to the constitution of India, Wadhwa, Nagpur, 2007

६) Kashyap Subhash, Our Political System, National Book trust, India, 2009.

७) Laxmikant M., Indian Polity, McGraw-Hill Education, 2010.


❑❑❑